**( सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.उषा दराडे )**

**पृ.शी.**: गरिबांसाठी प्रभावी आरोग्य विमा राबविण्याची गरज

**मु.शी.**: गरिबांसाठी प्रभावी आरोग्य विमा राबविण्याची गरज या विषयावर डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री हेमंत टकले, सुभाष चव्हाण, ॲड.उषा दराडे, सर्वश्री हुसेन दलवाई,रमेश शेंडगे, श्रीमती अलका देसाई सर्वश्री प्रकाश बिनसाळे, सतीश चव्हाण, वि.प.स.यांचा प्रस्ताव

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांबरोबरच आरोग्य व शिक्षण या देखील मानवाच्या मूलभूत गरजा निर्माण झाल्या असणे, गरिबांना आम आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे हे कल्याणकारी शासनाचे कर्तव्य असणे, तथापि, सध्या शासकीय आरोग्य सेवांना संख्यात्मक दृष्टया पुरेशा यंत्रसामुग्री उपलब्ध असल्या तरी अत्याधुनिक यंत्र सामुग्रीचा अभाव असणे, त्या उपलब्ध असल्यास त्या कार्यरत नसणे, अनेक पदे रिक्त असणे, शासकीय रुग्णालयांत औषधे न मिळणे, यामुळे सर्व सामान्यांना शासकीय आरोग्य सेवेबद्दल विश्वास न वाटणे, या पार्श्वभूमीवर खाजगी रुग्णालयांच्या सेवा अतिशय महाग होत चाललेल्या असून त्या सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाणे, परिणामी शासकीय रुग्णालयातील वाढत असलेली गर्दी, या सर्व बाबी विचारात घेता गरिबांसाठी प्रभावी आरोग्य विमा राबविणे गरजेचे असणे, विद्यमान आरोग्य विमा योजना पुरेशी नसणे व त्याची व्याप्ती सीमित असणे, याकरिता शासनाने करावयाची ठोस कारवाई व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या निमित्ताने मी आरोग्य विषयक काही मूलभूत स्वरुपाचे मुद्दे याठिकाणी मांडणार आहे. सध्या ग्रामीण भागामध्ये शहरीकरण झपाट्याने वाढत आहे. परंतु त्याच्या उलट आरोग्य सेवेची परिस्थिती वाईट होत चालली आहे. ग्रामीण भागातील आरोग्याचा प्रश्न महत्वाचा आहे तसाच तो शहरी भागाच्या दृष्टीनेही महत्वाचा आहे. सध्या शहरांमध्ये लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे आरोग्य सुविधांवर प्रचंड ताण वाढलेला आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

डॉ.सुधीर तांबे....

आरोग्य सेवेची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. राज्यात सध्या सार्वजनिक रुग्णलयांची संख्या 1,054 इतकी आहे. सार्वजनिक दवाखान्यांची संख्या 2072 इतकी आहे. प्रा.आ.केंद्रांची संख्या 1818 इतकी आहे. उपकेंद्रांची संख्या 10,579 इतकी आहे. खाटांची संख्या 1 लाख 31 हजार आहे. ही सर्व आकडेवारी 2010 पर्यंतची आहे. परंतु या आकडेवारीला फारसे महत्व नाही असे माझे मत आहे. सध्या ही सर्व यंत्रणा उभी असली आणि प्रा.आ.केंद्रांच्या माध्यमातून त्यात भर घालत असलो तरी सध्या जी प्रा.आ.केंद्रे आहेत त्यांची अवस्था कशी आहे ते महत्वाचे आहे. त्या बाबत अनेकदा सभागृहात चर्चा झालेली आहे. राज्यातील आरोग्य सेवेविषयी सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केलेली आहे. राज्यात डॉक्टरांची संख्या कमी आहे. अनेक पदे रिक्त आहेत. एमबीबीएस डॉक्टर्स उपलब्ध होत नाही. राज्यात बीएएमएस व बीएचएमएस ची संख्या जास्त आहे. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय अधिका-यांची पदे कशी भरता येतील याचा शासनाने विचार करणे आवश्यक आहे. अनेक रुग्णालयात नर्सेची पदे रिक्त आहेत. अनेक रुग्णालयात यंत्र सामुग्री नाही, त्याबाबत सभागृहात वेळोवेळी चर्चा झालेली आहे. अनेक रुग्णालयांमध्ये रुग्णवाहिका नाही, ज्या ठिकाणी आहे तेथे वाहन चालक नाही. तसेच काही ठिकाणी रुग्णवाहिका असली तरी डिझेलसाठी निधी उपलब्ध करुन दिला जात नाही, अशी दुरवस्था सर्वत्र अनुभवयास मिळते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे....

त्याच प्रमाणे औषधांचा तुटवडा देखील विविध रुग्णालयांमधून सातत्याने भासत असतो. बहुतांश वेळा शासकीय रुग्णालयामध्ये येणा-या रुग्णांना बाहेरुन औषधे आणावी लागतात. औषधे खरेदी करण्याची शासनाची जी पध्दत आहे त्यामध्ये बदल होणे नितांत गरजेचे आहे. रेट कॉण्ट्रॅक्टच्या माध्यमातून औषधांची खरेदी होत असते. फार्मास्युटिकल कंपन्यांच्या औषधांच्या किंमती फार जास्त असतात. या ऐवजी अन्य पध्दतीने देखील आपणास औषधांची खरेदी करता येऊ शकेल. शासनाने जर जेनेरीक माध्यमातून औषधे विकत घेतली तर चांगल्या कंपनीची चांगली औषधे कमी किंमतीमध्ये शासनाला उपलब्ध होऊ शकतील. तेव्हा जेनेरिक माध्यमातून औषधे का खरेदी केली जात नाही हा प्रश्न आहे. शासनाच्या माध्यमातून जेनेरिक औषधे उपलब्ध करुन देण्यात आली तर शासनाची खूप मोठ्या प्रमाणावर आर्थिक बचत होऊ शकते आणि रुग्णांना देखील मोठ्या प्रमाणावर लाभ होऊ शकतो. अशी एकंदरीत अवस्था असताना शासनाच्या माध्यमातून काही चांगल्या गोष्टी देखील झालेल्या आहेत. या ठिकाणी आरोग्य सेवेच्या संदर्भात बोलत असताना नेहमी कोणकोणत्या त्रुटी आहेत हे दाखविण्याचे काम होते. परंतु आरोग्य सेवेमध्ये शासनाने कोणत्या चांगल्या गोष्टी केलेल्या आहेत हे देखील सांगितले गेले पाहिजे. शासनाने आरोग्य सेवेचे नेटवर्क ग्रामीण भागामध्ये, आदिवासी भागामध्ये नेण्याचा प्रयत्न केलेला असून त्याचे चांगले परिणाम झालेले आहेत.

पूर्वी साथीचे आजार खूप मोठ्या प्रमाणावर होते. या साथीच्या आजारांना आळा घालण्यासाठी शासनाने प्रतिबंधात्मक लसीकरणाचा कार्यक्रम राबविला. परिणामी साथीच्या आजाराचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी झालेले आहे. लसीकरणाच्या कार्यक्रमामुळे बालमृत्यूचे प्रमाण लक्षणीय कमी झालेले आहे. 1971मध्ये बालमृत्यूचे प्रमाण 148 होते ते आता 76 पर्यन्त आलेले आहे. त्याच प्रमाणे गरोदर मातांच्या मृत्यूचे प्रमाण देखील खूप कमी झालेले आहे. शहरी भाग आणि ग्रामीण भागाची तुलना केली तर यामध्ये तफावत आढळून येते. शहरी भागामध्ये आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध असतात. ग्रामीण भागामध्ये त्या तशा नसतात. आरोग्य विषयक सुविधांच्या बाबतीत गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या भागांचा विचार केला तर शहरी भागाच्या तुलनेने तेथे खूप तफावत आढळते. गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या भागामध्ये आरोग्य विषयक सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करुन देण्याची नितांत गरज आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे....

सभापती महोदय, आपल्या राज्यातील लोकांचे सरासरी आयुष्यमान हे स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये 33 वर्षे होते ते आता 65 ते 68 वर्षापर्यंत गेलेले आहे. भारतातील सरासरी आयुष्यमानाच्या तुलनेत महाराष्ट्रातील आयुष्यमान 68 वर्षे झालेले आहे. शासनाने राज्यामध्ये आरोग्य विषयक ज्या काही चांगल्या योजना राबविल्या त्याचा हा परिणाम आहे. त्याबद्दल शासनाला निश्चितपणे धन्यवाद दिले पाहिजेत. एकीकडे शासनाला धन्यवाद देत असताना मला हेही सांगावयाचे आहे की आरोग्य विषयक सुविधा देताना, आरोग्य विषयक विविध योजना राबविताना त्यामध्ये त्रुटी देखील मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. राज्यातील कुपोषणाचा प्रश्न अजूनही संपलेला नाही. अर्भक मृत्यूचे प्रमाण देखील लक्षणीय आहे.

सभापती महोदय, आणखी एक गोष्ट मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे आणि ती म्हणजे राज्यामध्ये नागरीकरण खूप मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. ज्या छोट्या छोट्या शहरांमध्ये नगरपालिका आहेत त्या नगरपालिकांची नागरिकांसाठी चांगल्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्याची आर्थिक क्षमता नसते. अशा नगरपालिकेच्या ठिकाणी असणा-या रुग्णालयामध्ये येणारे रुग्ण हे केवळ त्या शहरातीलच नसतात तर आजूबाजूच्या ग्रामीण भागातील देखील असतात. अशा रुग्णांना चांगली ट्रीटमेंट देण्याची आर्थिक कुवत नगरपालिका अथवा महानगरपालिकेमध्ये नसते. सभापती महोदय, आणखी एक विसंगती मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे ती म्हणजे ग्रामीण भागामध्ये रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केन्द्र, उपकेन्द्रे बांधत असताना त्यामध्ये लोकांचा सहभाग असावा म्हणून लोकांकडून जागा घेतली जाते. यामधून अनेक चुकीच्या गोष्टी घडतात. ग्रामीण भागातील बहुतेक प्राथमिक आरोग्य केन्द्रे आपण पाहिली तर ती गावापासून दूर अंतरावर असल्याचे दिसून येते. तसेच शासकीय रुग्णालय हे देखील शहरी भागापासून खूप दूर अंतरावर असते. लोकांना इतक्या दूर जाणे गैरसोयीचे होते. मी एक उदाहरण देतो. आमच्या येथे संगमनेरला एक कॉटेज हॉस्पिटल आहे. तेथे अतिशय चांगल्या पध्दतीने ट्रीटमेंट मिळते. मोठ्या प्रमाणावर लोक तेथील आरोग्य सेवेचा लाभ घेत असतात. शासनाचे त्या भागामध्ये एक ग्रामीण रुग्णालय आहे. ते रुग्णालय 5-6 कि.मी. दूर अंतारावर आहे. मला या निमित्ताने हे सांगावयाचे आहे की, शासन कोटयवधी रुपये खर्च करुन आरोग्याच्या

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पायाभूत सुविधा निर्माण करते. परंतु त्या पायाभूत सुविधांचा उपयोग्य व्हायला पाहिजे त्या प्रमाणात होत नाही. अशा प्रकारची अनेक उदाहरणे देता येतील. ग्रामीण भागामध्ये 2-3 कि.मी. अंतरावर प्राथमिक आरोग्य केंद्रे असल्यामुळे त्यांचा पाहिजे तसा उपयोग होत नाही.

सभापती महोदय, आजकाल आरोग्य सेवा खूप महाग होत चालली आहे. एक वेळ भाकरी स्वस्त पण औषध महाग अशा प्रकारची चमत्कारिक अवस्था निर्माण झालेली आहे. मध्यंतरी विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येबाबत विश्लेषण झाले.

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

त्यावेळेस असे लक्षात आले की, 35 टक्के लोक कर्जबाजारी कशामुळे झालेले आहेत ? त्यांना औषोधोपचार करण्यासाठी मोठा खर्च लागतो. खाजगी रुग्णालयात ते जातात. शासकीय रुग्णालयामध्ये जाण्याचा लोकांमध्ये विश्वास राहिलेला नाही, ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. प्रत्येक सामान्य माणसाची इच्छा असते की, खाजगी रुग्णालयात गेले तर तेथे मला चांगली ट्रीटमेंट मिळेल अशी त्याची भावना आहे. ती सत्य आहे. वस्तुस्थितीला धरुन आहे. परंतु खाजगी रुग्णालयातील आरोग्य सेवा त्यांना परवडत नाही. म्हणून त्या रुग्णाचे कुटुंबीय कर्जबाजारी होते. ही वस्तुस्थिती ग्रामीण भागात राहिलेली नसून, शहरात देखील अशीच अवस्था आहे. खाजगी रुग्णालयातील सेवा सुध्दा अतिशय महागडया होत चालल्या आहेत. सामान्य माणसांच्या अवाक्या बाहेर चाललेल्या आहेत, ही सुध्दा वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, आरोग्याच्या बाबतीत मी मघाशी म्हटले की, आजारांचे पॅटर्न आता चेंज होत चालले आहे. दोन चित्र दुर्देवाने आपल्याकडे दिसून येत आहे की, एकीकडे पूर्वीचे साथीचे आजार होते, ते कमी झालेले आहेत. परंतु रक्तदाबाचे प्रमाण, अति रक्तदाबाचे प्रमाण, डायबेटिक्स प्रमाण या राज्यात आणि या देशात अतिशय भयानक वेगाने वाढत आहेत. आपला देश तरुणांचा आहे असे आपण म्हणतो. परंतु या देशातील आणि या राज्यातील तरुण आजाराने ग्रस्त होत असल्याने ती एक गंभीर समस्या निर्माण होत आहे. 40 वर्षानंतर प्रत्येकाने आरोग्याची तपासणी करुन घेतली पाहिजे. हृदयविकाराचा आजार हा 40 वर्षानंतर होण्याची शक्यता होती. परंतु आत 20 वर्षे, 25 वर्षे वयाचा तरुणाला हृदयविकाराचा झटका येतो. तरुण मुलांना उच्च रक्तदाब होतो आहे, तरुण मुलांना डायबेटीस होतो. आपली तरुण पिढी अशा आजाराने आजारी पडली तर आपले एक मोठे राष्ट्रीय व सामाजिक नुकसान होत आहे असे म्हटले तर ते काही वावगे ठरणार नाही. आजाराचा जो पॅटर्न बदललेला आहे, तो देखील विषय महत्वाचा आहे. आरोग्याच्या बाबतीत भविष्यात ज्या काही उपाययोजना करणार आहात, त्यावेळी या बदललेल्या पॅटर्नकडे गांभीर्याने लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे.त्याकडे लक्ष घालणे अत्यंत आवश्यक आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

सभापती महोदय, क्षय, टी.बी.,हिवताप इत्यादी आजार परदेशामध्ये पूर्णपणे नष्ट झालेले झालेले आहेत. या साथींच्या आजारांचे त्यांनी पूर्णपणे उच्चाटन केले आहे. परंतु दुर्दैवाने आपल्याकडे हिवतापाचे प्रमाण खूपच वाढत चालले आहे. मुंबई सारख्या शहरामध्ये देखील अनेक लोक हिवतापामुळे बळी पडत आहेत. मेंदुमध्ये हिवतापाचा प्रादुर्भाव होतो, त्यामुळे त्या आजाराचे स्वरुप प्राणघातक ठरु शकते. आज राज्यातील 16 जिल्हयांमध्ये हिवतापाचे प्रमाण अतिशय चिंताजनक आहे. ते प्रमाण दरवर्षी वाढत चालले आहे. टी.बी., क्षय इत्यादीचे आजार हे दिवसें दिवस वाढत चालले आहे. या आजारांवर वेळेवर औषधोपचार न होणे, त्या रुग्णांनी आजारांबाबत पूर्णतः ट्रीटमेंट योग्य पध्दतीने न घेणे, त्यातून ड्रग रजिस्टन्स निर्माण होतो. त्यामुळे टी.बी.चा आजार मोठया प्रमाणात वाढत चालला आहे. मध्यंतरी पोलिओचे रुग्ण आढळले होते. आपल्याकडे सरळ सरळ दोन चित्र निर्माण झालेले आहेत. ज्याची आर्थिक परिस्थिती चांगली आहे, जी कुटुंबे सधन आहेत. त्यांच्यात जीवनशैलीशी रिलेटेड आजारांचे प्रमाण वाढत चालले आहे. दुसरीकडे जो गरीब माणूस आहे, सर्वसामान्य माणूस आहे, त्यांच्या बाबतीत सार्वजनिक स्वच्छतेचा अभाव असल्यामुळे हिवताप, डेग्यु असे आजार त्यांना होत आहेत. नवीन नवीन प्रकारचे व्हायरल येत आहेत, हे सगळे आजार हे मोठे प्राणघातक आहेत. या नवीन नवीन आजारांना नागरिक बळी पडत आहेत. या बदललेल्या सर्व परिस्थितीचा विचार आपल्याला आरोग्य सेवेचे नियोजन करताना केला पाहिजे.

सभापती महोदया, मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, या सार्वजनिक आरोग्य सेवा आहेत. आज राज्यात ग्रामीण व शहरी भागात अनेक वैद्यकीय महाविद्यालये आहेत. मी सांगू इच्छितो की, ससून हॉस्पिटलमधील वैद्यकीय महाविद्यालयात मी शिक्षण घेत होतो....

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे.....

त्यावेळी ऑनररी पध्दत होती. शहरातील हुशार, तज्ज्ञ, अनुभवी डॉक्टर रुग्णालयात सेवा देण्यासाठी येत असत.

**तालिका सभापती** (ॲड.उषा दराडे) : मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छिते की, दुपारी 1.00 वाजेपर्यंत या प्रस्तावावरील चर्चा मंत्री महोदयांच्या उत्तरासह पूर्ण करावयाची आहे. त्यामुळे माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांच्या भाषणानंतर या प्रस्तावावर सदस्यांनी वेळेचे बंधन पाळून आपले विचार मांडावेत, अशी विनंती आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदया, ऑननरी पध्दत खूप चांगली होती. शहरातील तज्ज्ञ डॉक्टर रुग्णालयात येऊन गरीब रुग्णांवर उपचार करीत होते. ससून रुग्णालयातील ट्रिटमेंटवर गरीब रुग्णांचा विश्वास होता. उदाहरण म्हणून सांगू इच्छितो, खाजगी ट्रस्टची हॉस्पिटल्स आहेत ती चांगल्या प्रकारे आरोग्य सेवेचे काम करीत आहेत. ग्रँट इन एडच्या माध्यमातून ससून रुग्णालयाला सी.टी.स्कॅन मशिन उपलब्ध करुन दिले. परंतु एमआरआय मशिन, न्यूरोसर्जरीसाठी लागणारी आधुनिक यंत्रणा निर्माण करण्यामध्ये आपण कमी पडलो आहोत. खाजगी रुग्णालये जी चालविली जात आहेत तेथे मोठया प्रमाणात आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत. बदललेल्या गोष्टींचा विचार करुन चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत विचार करावा. सामान्य माणसांचे आजार लक्षात घेऊन डॉक्टर काम करीत असतात. परंतु आवश्यक ती यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्यामुळे डॉक्टरांना उपचार देण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. त्यांची परिस्थिती अवघड होते. औषधांची बिले, डॉक्टरांची फी पाहिल्यानंतर रुग्णांवर देखील अक्षरश: आत्महत्या करण्याची वेळ येते. म्हणून सार्वजनिक आरोग्य सुविधा चांगल्या केल्याच पाहिजेत.

सभापती महोदय, केंद्र शासनाकडून मोठया प्रमाणात एनआरएचएम योजनेच्या माध्यमातून शासनाला आर्थिक मदत केली जात आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. केंद्र शासनाच्या इतर योजना असतील त्यांची चांगल्याप्रकारे अंमलबजावणी करावी लागेल. आरोग्य सुविधा निश्चितपणे प्रभावी कराव्या लागतील. आज खाजगी रुग्णालयांची स्थिती पाहिली तर अगदी छोट्या छोट्या ठिकाणी, तालुक्याच्या ठिकाणी देखील उत्तम दर्जाची खाजगी रुग्णालये आरोग्य सेवेचे काम करीत आहेत. त्या ठिकाणी आय.सी.यू., व्हेंटिलेटर, मॉनिटर उपलब्ध आहेत. चांगल्या सुविधा असलेल्या खाजगी रुग्णालयांची संख्या मोठी आहे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे.....

सभापती महोदया, शासनाने गरीब रुग्णांसाठी आरोग्य विम्याची योजना लागू केली. माझी हीच इच्छा आहे की, आरोग्य विमा योजना चांगल्या पध्दतीने राबविली तर आरोग्याबाबतचे अनेक प्रश्न सुटू शकतात. सध्या आरोग्य विमा योजनेमध्ये अनेक अडचणी उद्‌भवत आहेत. राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना अत्यंत चांगली योजना असली तरी या योजनेमध्ये 30 हजार रुपयांची मर्यादा निश्चित केलेली आहे. ग्रामीण भागात, तालुक्याच्या ठिकाणी जवळजवळ 80 टक्के आजार या योजनेमध्ये कव्हर होऊ शकतात. केंद्र शासनाची योजना असली तरी 60 टक्के हिस्सा केंद्र शासनाचा व 40 टक्के हिस्सा राज्य शासनाचा आहे. ही योजना अद्याप लोकांपर्यंत पोहोचलेली नाही. उदाहरण म्हणून मी धुळे जिल्हा सामान्य रुग्णालयाचे देऊ इच्छितो. धुळे जिल्हा रुग्णालयासाठी शासन 18 कोटी रुपये उपलब्ध करुन देते, त्यातील 14 कोटी रुपये वेतनावर खर्च होतो. उर्वरित रक्कमेतून रुग्णांना किती फायदा मिळतो? तेथे राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना राबविली गेली. 2 कोटी रुपये विम्याचा हप्ता भरुन असंख्य रुग्णांना फायदा झाला आहे. खाजगी रुग्णालयात जाऊन लोक चांगल्या पध्दतीची ट्रिटमेंट घेऊ शकतात. आरोग्य विमा योजनेबाबत माननीय मुख्यमंत्री व माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचे निश्चितपणे अभिनंदन केले पाहिजे. आंधप्रदेश राज्याच्या धर्तीवर राजीव गांधी जीवनदायी विमा योजना राबविण्याचा शासनाने संकल्प मांडला आहे, त्याबद्दल वेळोवेळी त्यांनी सभागृहात व सभागृहाबाहेर देखील विचार मांडले आहेत. ही योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात यावी. राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना चांगली असून गरीब रुग्णांना परवडणारी आहे.

नंतर इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे......

या योजनेसाठी 30 हजार रुपयांची मर्यादा ठरवून देण्यात आली आहे. ही मर्यादा वाढविण्यात आली त्याचबरोबर आणखी काही आजारांचा समावेश त्या योजनेमध्ये केला तर आरोग्य विमा योजनेचा चांगल्या प्रकारचा फायदा रुग्णांना मिळू शकेल. खाजगी रुग्णालयामध्ये रुग्णाना उत्तम प्रकारची सेवा आपण देऊ शकतो. शासन आणि खाजगी रुग्णालये अशा प्रकारे संयुक्तपणे प्रयोग केला तर या योजनेच्या माध्यमातून आशादायक चित्र निर्माण होऊ शकते.असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, या नंतर मला दुसरा एक मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. दिवसेंदविस अपघातांचे प्रमाण वाढत चालले आहेत. अपघात हा एक नवीन आजार आहे. तेव्हा या संदर्भात देखील विचार केला पाहिजे. एखाद्या ठिकाणी जर अपघात झाला तर त्या अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला औषधोपचार घेण्याकरता अधिक खर्च येत असतो आणि त्याची आर्थिक परिस्थिती जर चांगली नसेल तर त्याची अडचण होत असते. अपघात झाल्यानंतर कोणी तरी अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला कोणत्या तरी रुग्णालयामध्ये दाखल करीत असतो. त्याच्याकडे कोणी फारसे लक्ष देत नाही तेव्हा प्रत्येक नागरिकांचा अपघात विमा योजना सुरु करण्यात आली पाहिजे. जो आर्थिक दृष्टया कमकुवत आहे अशा व्यक्तीसाठी अपघात विमा योजना सक्तीची करण्यात आली पाहिजे. दुर्देवाने जर अपघात झाला तर औषधोपचार घेण्यासाठी जो काही खर्च येतो तो प्रचंड असल्यामुळे त्या व्यक्तीला हा खर्च परवडत नाही. दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण वाढत चालले असल्यामुळे अपघात हाच एक मोठा आजार या काळात निर्माण झालेला आहे असे जर मी म्हटले तर ते वावगे होणार नाही. या सर्व दृष्टीकोनातून राज्य शासनाने जी आरोग्य विमा योजना प्रस्तावित केलेली आहे ती विमा योजना अधिक परिपूर्ण कशी होईल आणि त्या योजनेच्या माध्यमातून सर्व सामान्य माणसाला चांगल्या पध्दतीने आरोग्याच्या सेवा कशा उपलब्ध होतील हे पाहणे गरजेचे आहे असे मला वाटते. सभापती महोदया, राज्य शासनाने निरनिराळया योजनांचा अभ्यास निश्चितपणे केलेला असणार आहे. परंतु या बाबतीत तज्ज्ञ व्यक्तींचा विशेषत: ग्रामीण भागात काम करणारे जे डॉक्टर्स आहेत त्यांचा सहभाग कसा वाढवता येईल आणि आरोग्य विमा योजना अधिक परिपूर्ण कशी करता येईल या दृष्टीने शासनाच्या माध्यमातून प्रयत्न व्हावेत अशी मला या निमित्ताने सूचना करावयाची आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे......

सभापती महोदया, शासनाने कितीही योजना आणण्याचा प्रयत्न केला तरी त्याची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होणे हे महत्वाचे असते. या संदर्भात मी आपल्याला जीवनदायी योजनेचे उदाहरण देतो.जीवनदायी योजनेची अंमलबजावणी होत असतांना मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होत असतो. शासनाकडून देखील जीवनदायी योजनेचे पैसे वेळेवर मिळत नाहीत. त्यातून सध्या जी जीवनदायीची योजना सुरु आहे ती तितकीची प्रभावी होऊ शकत नाही असे मला सांगावयाचे आहे. परंतु त्या पार्श्र्वभूमीवर नवीन योजना आणत असतांना ती योजना अधिक पारदर्शक कशी होईल आणि रुग्णांना चांगली सेवा तातडीने कशी देता येईल याचा विचार होणे आवश्ययक आहे.

सभापती महोदया, सध्या तंत्रज्ञान खूप विकसित झालेले आहे. एखाद्या ग्रामीण भागात जर अपघात झाला असेल व अपघातात जखमी झालेल्या रुग्णाचा स्कॅन काढण्यात आला तर मुंबई, पुणे शहरातील न्युरो सर्जन ऑन लाईन स्कॅनचा रिपोर्ट पाहू शकतो आणि मोबाईलवरुन देखील तो सल्ला देऊ शकतो. अशा प्रकारच्या चांगल्या सुविधा आता उपलब्ध झालेल्या आहेत. तेव्हा डॉक्टरांमध्ये कनेक्टीव्हीटी निर्माण करुन दिली आणि टेली मेडिसिनीचा वापर केला तर रुग्णांना त्याचा फायदा होऊ शकेल असे मला वाटते.अशा प्रकारे आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग आपल्याला एका बाजूला करुन घ्यावा लागेल तसेच. ग्रामीण भागातील चांगल्या खाजगी रुग्णालयांचा समावेश यामध्ये करुन घ्यावा लागेल त्याचबरोबर सध्या शासनाची जी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था आहे त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. ही व्यवस्था देखील अधिक चांगली व सक्षम केली पाहिजे. या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमधील सर्व पदे वेळेच्या वेळी भरण्यात आली पाहिजेत. त्याच बरोबर तेथे सर्व प्रकारच्या जेनेरिक ओषधांचा साठा उपलब्ध करुन दिला पाहिजे, प्रतिबंधात्मक उपाय जे केले जातात त्याची व्याप्ती वाढविण्यात आली पाहिजे.असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, धुळे आणि आदिवासी भागामध्ये सिकलसेल ॲनिमियाचे तसेच काही भागामध्ये थॉयराईडचे प्रमाण जास्त आहे. तेव्हा आरोग्याच्या योजना चांगल्या प्रकारे राबविण्यात आल्या तर रुग्णांना चांगल्या प्रकारच्या सुविधा निर्माण करुन देऊ शकू एवढेच नव्हेतर भविष्य

3..



VTG/ KTG/ D/ प्रथम श्री.भोगले 11.20

डॉ.सुधीर तांबे......

काळात आरोग्य विमा योजना राबविणे हे फार महत्वाचे असल्यामुळे ती योजना राबविण्यात आली पाहिजे असे मी शासनाला सांगू इच्छितो.

सभापती महोदया, आरोग्य विमा योजनेच्या माध्यमातून एक चांगली सुविधा सामान्य व गरीब माणसाला मिळू शकेल. सध्या आपल्या राज्यात गरिबीचे प्रमाण सुध्दा दिवसेंदिवस वाढत चालले आहे. 38 टक्के दारिद्रय रेषेखालील व्यक्तींची संख्या आहे असे महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणी अहवालामध्ये म्हटलेले आहे.त्यामुळे महाराष्ट्रातील 4 कोटी व्यक्तींना तरी ही सुविधा द्यावी लागणार आहे. ही सुविधा देत असतांना शासनाला मोठया प्रमाणावर खर्च येणार आहे. .राज्यामध्ये काही श्रीमत आणि काही अती श्रीमंत लोक आहेत. 20 टक्के लोक तर इतके श्रीमंत आहेत की ते अत्यंत महागडया गाडया वापरत असतात त्यामुळे त्या गाडयांचा खप मोठया प्रमाणावर वाढत चालला आहे. समाजामध्ये श्रीमंत आणि गरीब असे विसंगत चित्र पहावयास मिळत आहे .या श्रीमंत व्यक्तींवर अधिक कर लावण्यात आला पाहिजे आणि त्यातून गरीब लोकांना चांगल्या प्रकारच्या आरोग्याच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. तेव्हा याबाबतीत शासनाने विचार करावा.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे....

आणि या बाबतीत कोणताही आर्थिक भार शासनावर न पडणारी किंवा कोणतीही आर्थिक अडचण न येणारी ही योजना दुप्पट वेगाने अंमलात आणावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी या सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाच्या वतीने नियम 260 अन्वये प्रस्ताव चर्चेकरिता मांडून महाराष्ट्रामधील आरोग्याची सत्य परिस्थिती सांगण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. उणिवा कुणामध्ये नसतात? त्या सर्वांमध्ये असतात त्या उणिवामधून सरकारने शिकायचे असते आणि त्याप्रमाणे पुढील तजवीज करावयाची असते, अशाप्रकारचा त्यांचा प्रस्तावाचा उद्देश आहे असे मला वाटते म्हणून मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो व त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी आपल्या प्रस्तावामध्ये म्हटले आहे ते महत्वाचे आहे. याबद्दल मी नामदार मंत्री महोदयांचे या करिता अभिनंदन करतो की, गेल्या आठ वर्षामध्ये हे खाते तुमच्या सहकारी पक्षाकडे होते त्यामुळे या खात्याची त्यांनी तब्येत बिघडवून टाकल्यामुळे आपले मुख्यमंत्री पद गेले तरी चालेल परंतु आरोग्य खाते कॉग्रेस पक्षाला मिळाले पाहिजे या तळमळीने तुम्ही ते घेतले आहे. त्यामुळे या खात्यावर जी काही टीका होईल, जे काही दोषारोप होतील त्यांचे धनी तुम्ही नाही तर ते असतील. आपण या वेळी हे खाते आपल्या ताब्यात घेतले आहे, हा तुमचा स्वभाव असल्यामुळे तुम्ही ही टीका वैयक्तिक पातळीवर घेऊ नका. या सभागृहामध्ये या प्रस्तावाच्या रुपाने जी काही टीका होणार आहे त्या अनुषंगाने तुम्हाला या खात्याचे आव्हान स्वीकारणे क्रमप्राप्त आहे. हे खाते आपल्याकडे यावे या करिता चार दिवस सरकार स्थापन करण्याची प्रक्रिया थांबविण्यात आली होती. कॉग्रेस पक्षाला हे खाते मिळावे या मागणीकरिता चार दिवस आपल्या पक्षाचे सरकार बनविण्यात आले नाही. या खात्यामध्ये असलेला गोंधळ आणि त्यामधून आपल्या पक्षाची होत असलेली बदनामी याची जाणीव झाल्यामुळे हे खाते हट्टाने मागून घेऊन त्यानंतर सरकार स्थापन करण्यात आले. त्यामुळे या खात्याची एक वेगळया पध्दतीने आपल्यावर जबाबदारी आलेली आहे.

तुमच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे तुम्ही या खात्याची चोख व्यवस्था ठेवायला जाता, परंतु या खात्यातील अधिकारी व डॉक्टर्स ती व्यवस्था सुधारु देत नाहीत. या ठरावामध्ये असे म्हटले आहे की, "गरिबांना आम आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे हे कल्याणकारी शासनाचे कर्तव्य असणे" परंतु ती सेवा मिळत नाही असे आपण सांगत आहात. पूर्वीच्या लोकांनी या खात्यामध्ये जे काही करुन ठेवले आहे त्यावरुन आपला असा समज झाला असावा असे मला वाटते. आपण राष्ट्रीय कॉग्रेसचे आमदार आहात. आपण ठरावात पुढे असेही म्हटले आहे की, "सध्या शासकीय आरोग्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. दिवाकर रावते ....

सेवांना संख्यात्मक दृष्टया पुरेशा यंत्रसामग्री उपलब्ध असल्या तरी अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा अभाव असणे", याचा अर्थ उपलब्ध असलेली यंत्रसामग्री अत्याधुनिक नाही, सेल्समनने आपल्या गळयात मारली म्हणून आपण ती खरेदी केली, जिचा आता काही उपयोग नाही अशाप्रकारची यंत्रसामग्री आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने अत्याधुनिक असलेल्या यंत्रसामग्रीचा अभाव निर्माण झाला. तसेच, पुढे असेही म्हटले आहे की, "त्या उपलब्ध असल्यास त्या कार्यरत नसणे, अनेक पदे रिक्त असणे" हे दाखवून देण्याकरिता मी या ठिकाणी उभा आहे. या ठिकाणी अनेक पदे रिक्त आहेत याला मंत्री व त्यांचे खाते जबाबदार आहे काय? सभापती महोदया, मंत्री महोदयांची पदे भरण्याची कितीही इच्छा असली तरी या सरकारमधील अर्थ खाते त्याबाबतची नस्ती तीन-चार वर्षे अशी काही रोखून ठेवते की, आपण त्या खात्यापुढे हतबल होतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

म्हणजे अर्थ विभागामध्ये बसलेले जे कोणी आहेत, त्यांच्यातील माणुसकी नावाची जी चीज असावयास पाहिजे त्याबाबत काय सांगावयाचे? कारण माझ्या दृष्टीने शिक्षण आणि आरोग्य या अत्यंत मूलभूत बाबी आहेत. मग रस्त्यांची कामे कमी झाली तरी चालू शकतील. पण सध्या शिक्षण आणि आरोग्याच्या बाबतीत काय स्थिती आहे हेही आपण अनुभवत आहोत.

याठिकाणी आता सभापती स्थानी सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे आहेत. मला आपले कौतुक वाटते. कारण आपण याठिकाणी मराठवाड्यातील प्रश्न मांडता, ते पाहिल्यानंतर सदरहू प्रश्न किती मूलभूत आहेत हे लक्षात येते.त्यावेळी आपण सरकारवर टीका करीत आहात असे आम्ही म्हणत नाही. ते मूलभूत प्रश्न असतात आणि आपण ते अनुभवत असतो आणि ते प्रश्न मांडून सरकारकडून कार्यवाहीबाबत अपेक्षा करीत असतो. त्याप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये पदे रिक्त का राहिली आहेत याची जनतेला माहिती दिली पाहिजे.जनतेला- सांगितले पाहिजे की,आमची याबाबतीत काही करण्याची इच्छा आहे.सार्वजनिक आरोग्य विभागा कडून पदे भरण्याच्या बाबतीत मागणी केली तरी अर्थ विभागाकडून ते अडविले जाते. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांना पुढील चार वर्षामध्ये आणखी अनुभव येणार आहेत. आज अशी स्थिती आहे की, औषधे मिळत नाहीत, त्याबाबत देखील मी बोलणार आहे. माननीय मंत्री महोदय आपली बदनामी झाली, तेव्हा मी आपल्याला फोन केला होता. आमचे माननीय मंत्री महोदय मुंबईतील असून त्यांना धाराशीव येथील पालकमंत्री केले आहे आणि "ई"टी.व्ही. वर तीन दिवस बातम्या दाखवित होते की,माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री हे धाराशीव येथील पालकमंत्री असताना देखील दवाखान्या- मध्ये औषधे नाहीत. पण त्यांना हे माहिती नाही की, ही सर्व त्या लोकांची पूर्वपुण्याई आहे आणि त्याचे सर्व ओझे घेऊन माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री काम करण्यासाठी निघालेले आहेत हे मी अनुभवत होतो.खरे म्हणजे मी विरोधी पक्षातील एक सदस्य म्हणून त्यांच्यावर धडकच मारावयास हवी होती.औषधे उपलब्ध नसणे आणि जी औषधे उपलब्ध आहेत त्याबाबत काय स्थिती आहे हे देखील मी सांगणार आहे.या सर्व गोष्टींमुळे लोकांचा आरोग्य सेवेवरील विश्वास उडालेला आहे. आपल्या सरकारच्या गेल्या 11-12 वर्षातील कर्तृत्वामुळे लोकांचा आरोग्य सेवेवरील विश्वास उडालेला आहे असे आपण या प्रस्तावामध्ये म्हटलेले असल्याने मी सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे साहेब यांचे अभिनंदन करतो.आपल्या सरकारचा कारभार कशा प्रकारे सुरु आहे हे या सदनाच्या माध्यमातून याची देही याची डोळा राज्यातील जनतेला सांगत आहात म्हणून मी येथे ...

श्री.दिवाकर रावते . . . .

सन्माननीय सदस्यांचे अभिनंदन केले. पण ही परिस्थिती सुधारली पाहिजे. अशा वेळी एकमेकांवर दोषारोप करुन चालणार नाही.

सभापती महोदय, सभापती महोदय, याठिकाणी मघाशी असे बोलण्यात आले की, तुम्ही देखील सत्तेवर होतात, मग का केले नाही ? मला वाईट वाटले. आम्ही देखील चार-साडेचार वर्षे सत्तेमध्ये होतो. पण जे तुम्हाला 50 वर्षामध्ये जमत नाही, त्याबाबत तुम्ही आमच्याकडून साडेचार वर्षामध्ये अपेक्षा कशी करीत आहात ? असा मी आपल्याला उलट प्रश्न विचारु शकतो. हे मान्य आहे की, लोकांनी आम्हाला निवडून दिले होते. त्यामुळे आमची जबाबदारी होती. आम्ही ते करावयास हवे होते. पण उणिवा किंवा एखादी बाब लक्षात येईपर्यंत ती एवढी पुढे गेलेली असते की ती सुधारताना देखील नाकीनऊ येतात. म्हणून प्रत्येक वेळेला युती शासनाकडे बोट दाखवत फिरावयाचे हे प्रकार सोडून द्यावेत. आपण हे किती दिवस करणार आहात ? आमची योग्यता होती की नाही हा नंतरचा भाग आहे. पण आता तुम्ही योग्य आहात असे ठरवून जनतेने निवडून दिलेले आहे तर मग आपण ते काम करावे. त्यामुळे प्रत्येक वेळेला युती शासनाने काय केले असे म्हणत बसण्यापेक्षा, आता तुमच्याकडे सत्ता असताना का केले नाही असा प्रश्न आहे. त्याचे तुम्ही उत्तर देत नाही. तुम्ही प्रत्येक वेळी तुमचा नाकर्तेपणा हा मागील साडेचार वर्षे सत्तेमध्ये असलेल्या युती शासनाच्या माथ्यावर टाकत असता, त्यावेळी एकापरीने आपण किती नाकर्ते आहोत हे लोकांना सांगत असता याचे भान नेहमी ठेवावयास पाहिजे. म्हणून मघाशी आपण याबाबतीत जो उल्लेख केला, तो मला योग्य वाटला नाही.

सभापती महोदय, यापूर्वी 2000 मध्ये धुळे येथे माझा अपघात झाला होता. त्यावेळी देखील मी जे.जे.हॉस्पिटल मध्येच ॲडमिट झालो होतो. पण मी तेथे नुसता बसून रहात नाही. माझ्या डोक्यामध्ये काही विचार सुरु असतात आणि त्यानुसार त्यावेळी तेथे काही सुधारणा करुन घेतल्या. त्यानंतर मध्यंतरी मी परत जे.जे.हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होतो. मला एका गोष्टीबाबत आनंद झाला. मोठमोठया रुग्णालयांमध्ये ज्या सोयी आहेत, तेवढया तोडीच्या सर्व व्यवस्था जे.जे.हॉस्पिटलमध्येही आहेत.मी डॉ.लहाने यांचे मनापासून अभिनंदन करणार आहे.मी अनेक वर्षापासून जे.जे. हॉस्पिटल पहात आलो आहे. कारण आपल्याला स्वत:साठी नाहीतर दुसऱ्यांसाठी सुध्दा तेथे जावे लागते. पूर्वीची जे.जे.हॉस्पिटलची परिस्थिती पाहिल्यानंतर लोकांना किळस वाटत असे. परंतु आता तशी स्थिती नाही. आज तुम्ही जे.जे.हॉस्पिटलच्या परिसरामध्ये पाऊल टाकल्यानंतर तेथे प्रथम स्वच्छता



APR/ KTG/ D/ 11:30

श्री.दिवाकर रावते . . . .

असल्याचे दिसून येते. तेथे कागदाचा कपटाही पडलेला दिसत नाही. मी तेथे ॲडमिट असताना रोज पहात होतो की, पहाटे साडेपाच-सहा वाजल्यापासून सात-साडेसात वाजेपर्यंत जे.जे. हॉस्पिटलचे कम्पाऊंड पूर्णपणे साफ करण्यात येते. सध्या तेथे कुठेही पानाच्या पिचकाऱ्या दिसत नाहीत. लोकांच्या या सवयी आहेत आणि त्या सुटत नाहीत. तेथे सर्वसामान्य लोक येत असतात, ते ऐकत नाहीत. पण याबाबतीत जो प्रशासकीय भाग आहे तो अत्यंत मोलाचा, महत्वाचा आहे आणि तो अंमलात आणला जात आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मी माहिती घेतली. त्या रुग्णालयात जे अनेक मोठमोठे डॉक्टर्स होते ते सोडून गेले होते. अजूनही त्या ठिकाणी डॉ. लहाने यांच्या स्वत:च्या संबंधातून म्हणा पण काही मोठे डॉक्टर्स उपलब्ध झालेले आहेत. ज्याचे नाव जागतिक पातळीवर झालेले आहेत असे डॉक्टर्स उपलब्ध आहेत. किडनीच्या विकाराशी संबंधित डॉ. बहादूर आहेत. मधुमेहाच्या आजाराशी संबंधित जागतिक कीर्तीचे डॉ. शशांक आहेत. त्या भागात पोटाचा विकार फार महत्वाचा आहे. पोटाच्या विकाराशी संबंधित डॉ. अमित आहेत, हृदयविकाराशी संबंधित डॉ. अनिलकुमार आहेत. डॉ. अनिल कुमार हे बॉम्बे हॉस्पिटलमध्ये प्रमुख आहेत. मी नुकताच त्या ठिकाणी जाऊन आलो. श्री. कठाळे यांना भेटून आलो. श्री. डी.वाय.पाटील साहेब त्या ठिकाणी आहेत त्यांनाही भेटून आलो. जे.जे. हॉस्पिटलमध्ये हे मोठमोठे डॉक्टर्स सामान्य रुग्णांकरिता उपलब्ध झालेले आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी जे मांडले ते खरे आहे. मी ते अनुभवले म्हणून सांगतो. त्या ठिकाणी यंत्रसामुग्री असताना माझ ो रक्त तपासण्यासाठी बाहेर पाठवावयाचे. मी विचारले की रक्त तपासण्यासाठी बाहेर का पाठविता, आपल्याकडे सोय नाही का ? त्या ठिकाणी सर्व सोय आहे. जे अनालायझर असतात ते 10 पैकी 2 चालू आहेत, 8 बंद आहेत. मी त्या बाबत विचारले. त्या करिता जे 10 टेक्निशियन्स पाहिजेत त्यापैकी फक्त 2 टेक्निशियन्स आहेत. 1 टेम्पररी घेतलेला आहे. बाकीच्या पोस्ट रिक्त आहेत. आपण जनतेच्या पैशातून आरोग्य सेवेसाठी अप्रतिम यंत्रसामुग्री, चांगल्या पध्दतीची यंत्रसामुग्री घेतो आणि ती गरजेची असते. मी एका गोष्टीचे मनापासून कौतुक करतो. हृदयविकाराचा रुग्ण असेल तर गरीब माणसाकरिता 3 लाख रुपये देण्याची व्यवस्था शासनाने केलेली आहे. त्यामध्ये स्टेन बसविणे वगैरे काम करतो. पण औषधे बाहेरुन आणावी लागतात. मी त्याच्या खोलात जाणार नाही. रक्ताची तपासणी करण्यासाठी बाहेर पाठवितात आणि त्यासाठी 2 ते 3 हजार रुपये लागतात. ती वेगळ्या प्रकारची रक्त तपासणी असते. ते सामान्य माणसाला परवडणार आहे का ? आपल्याला रक्त तपासणी करता येत नाही. सोय नसेल तर मी मान्य करीन. त्या रक्त तपासणीचा रिपोर्ट आल्यानंतर पुढची उपाययोजना डॉक्टर ठरवित असतो. केईएम रुग्णालयामध्ये सुध्दा असेच होते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

मी स्थायी समितीचा अध्यक्ष असताना श्री. तिनईकर आयुक्त होते. त्या ठिकाणी आणलेले एक मशिन 11-12 वर्षे बंद होती. ती मशिन एकदाही चालली नव्हती. त्या बाबत मी माहिती घेतली. मी श्री. तिनईकर यांना त्या ठिकाणी घेऊन गेलो आणि या बाबत काय करावयाचे ते सांगा, असे मी विचारले. त्यांनी सांगितले की, अमेरिकेहून विमानाने संबंधित भाग आणावे लागतात, मग त्यांची त्यांची राहण्याची व्यवस्था करावी लागते, मग ते येणार आणि सांगणार, त्यांचे टेक्निशियन येणार आणि एवढा मोठा खर्च असतो म्हणून कोणी केले नसेल. मुंबई महानगरपालिकेमध्ये विद्युत विभाग होता. त्या ठिकाणी चांगले इंजिनियर्स होते. त्यांना एकदा विचारा असे मी सांगितले. त्यांना विचारल्यानंतर असे लक्षात आले की, 12 वर्षे 10 कोटी रुपयांची जी मशिन केईएम हॉस्पिटलमध्ये बंद आहे त्या मशिनचा 250 रुपयांचा रजिस्टर गेला होता. तो टाकल्यानंतर मशिन चालू झाले. त्यानंतर त्या ठिकाणी दुरुस्ती खाते चालू केले. त्या वेळी श्री. कानडे उपायुक्त होते. त्या वेळी आयएएस अधिकारी उपायुक्त असावयाचे. त्यावरुन त्यांनी धडा घेतला. मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये परदेशातून यंत्रसामुग्री आली तर त्यांचे जे इलेक्ट्रीक सर्किट वगैरे असते ते पाठविण्याचे बंधन घातले. आपल्याकडे सुध्दा हुशार माणसे आहेत. हा विषय गंभीर आहे. आपल्याकडे यंत्रसामुग्री आहे पण आपण ती वापरु शकत नाही आणि गरिबांना सेवा देऊ शकत नाही. कोट्यवधी रुपयांच्या मशिन्स धूळ खात पडलेल्या आहेत. हा विषय आपण घेणार की नाही ? खाजगी हॉस्पिटलमध्ये फार महाग सेवा आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी यांना सांगू इच्छितो की, वित्त विभाग काही देणार नाही. आपण माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करा. त्यावर खर्च केला आहे ते सुरु झाले पाहिजे. आरोग्य आणि शिक्षण या दोन बाबतीत कोणत्याही परिस्थितीमध्ये कारणे न देता सेवा उपलब्ध झाली पाहिजे.

सभापती महोदया, औषधांच्या बाबतीत बोलत असताना मी सांगू इच्छितो की, काल 'लोकसत्ता' दैनिकामध्ये नर्सेसचे एक प्रकरण आले होते. एका नर्सने दहा-दहा खोल्या अडवून ठेवलेल्या आहेत. त्या ठिकाणी नर्सेस असलेल्या छोट्या छोट्या मुली डोंबिवली, कल्याणवरुन येतात आणि रात्रपाळी संपल्यानंतर परत जातात.

यानंतर श्री. ओटवणेकर...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

ती माहिती घेईपर्यंत यासंबंधातील बातमी वर्तमानपत्रात छापून आली. यासंबंधी मी डॉ.लहाने यांच्याकडे विचारणा केली. त्यांनी सांगितले की, हा प्रश्न माझ्या हातामध्ये नाही. धुळ्यातील एक वरिष्ठ परिचारिका 10 खोल्या अडवून बसली आहे. त्यामुळे यासंबंधी माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे. तरच या चर्चेला अर्थ राहणार आहे. यासंबंधातील बातमी लोकसत्तेमध्ये आली आहे. वयाने लहान असलेल्या मुली परिचारिकेमध्ये येतात व रूग्णांची सेवा करतात. त्यांचे काय होईल ? परिचारिकेचा ड्रेस कोड काय असावा याबद्दल वाद असून दोन गटामध्ये माऱ्यामाऱ्या होतात. परिचारिकांसाठी पंजाबी ड्रेस असावा या मताचा मी आहे. पण शेवटी कोणता गणवेष परिधान करायचा हा त्यांच्या संस्थेचा अधिकार आहे.

एक महत्त्वाची आणि आव्हानात्मक गोष्ट मी येथे सांगणार आहे. औषध खरेदी श्री शेट्टीसाहेब आपल्या काळात झालेली नाही. ती औषधे अजूनही संपत नाही. श्री.शेट्टी साहेब आपल्याला आव्हान स्वीकारावयाचे असेल तर मी स्वत: आपल्या बरोबर सर जे.जे.रूग्णालय आणि सेंट जॉर्जेस रूग्णालय येथे येतो. तेथे जाऊन आपण औषधांचा साठा व सॅम्पल तपासू या व ते सॅम्पल सील करू या. या शासकीय रूग्णालयातून पॅरासिटामॉल व कफसिरप सह अन्य विविध प्रकारची औषधे दिली जातात. यासंबंधातील बातमी देखील मीडियामध्ये आली होती. या औषधांचा रूग्णांवर काहीच उपयोग होत नाही. देशामध्ये 40 हजार पेक्षा जास्त औषधे विकली जातात. त्याचा रूग्णांवर काहीच उपयोग होत नाही. हा काय प्रकार आहे ? सदर बाब शासन गांभीर्याने घेणार आहे की नाही ? याबाबत संबंधितांवर शासन गुन्हा दाखल करणार आहे की नाही ? रूग्णालयाच्या बाहेर असलेल्या केमिस्टच्या दुकानातून औषध घेतले तर ते रूग्णांना लागू होते. मात्र, तेच औषध शासकीय रूग्णालयातून घेतले तर लागू पडत नाही. याला कारण त्या औषधामध्ये औषधाची मात्रा कमी असते. 100 ML ऐवजी 10 ML मात्रा असते. अशा प्रकारे बोगस औषध खरेदी होत आहे. याचा दोष सरकारला द्यायचा काय ? सरकारने याबाबत नियंत्रण ठेवले पाहिजे. हे औषध निर्माते कोण आहेत ? यांच्यावर गुन्हा का दाखल होत नाही ? हा प्रकार खता सारखा आहे. एकीकडे सॅम्पल तपासले आणि ते बोगस आहे असे सांगितले की, दुसरीकडे म्हणजे दिल्लीच्या लॅबमध्ये जाऊन औषध तपासून आणले जाते. त्या लॅबने ok आहे असे

...2

श्री.दिवाकर रावते....

सांगितल्यावर ते गुन्ह्यातून सुटतात, अशा प्रकारची परिस्थिती आहे. आज अशी परिस्थिती आहे की, या औषध निर्मात्यांनी लॅब सुद्धा खरेदी केलेल्या आहेत. गरीब लोक शासकीय रूग्णालयामध्ये उपचारासाठी येतात. मला एका डॉक्टरचा अभिमान वाटला. त्या दिवशी मी त्यांच्या घरी मिठाई पाठविली. त्या डॉक्टरने माझ्या डोळ्या समोर गेलेल्या म्हातारीला जीवंत केले. शॉक ट्रीटमेंटने त्याने तिला जीवंत केली. त्यावेळी माझ्या डोळ्यात अश्रू आले. रूग्णांना जीवदान देण्याचे सामर्थ्य डॉक्टरांमध्ये असते ते मी त्या दिवशी अनुभवले. मी तेथे गेल्यानंतर तो डॉक्टर मला म्हणाला साहेब, आपली मिठाई माझ्या घरी पोचली. मी असे काय केले होते ? मग मी त्याला ते सांगितले. वयोवृद्ध म्हातारी होती. ती गेली होती. माझ्या डोळ्या समोर त्यांनी तिच्या हृदयाला शॉक देऊन तिला जीवंत केली. माझ्या डोळ्यात अश्रू आले. किती ताकद डॉक्टरांमध्ये असते. त्यांचे हात आपण बळकट करणार आहात की नाही ? तसे जर करणार नसाल तर मग कठीण आहे. माझ्या बहिणीने सेवानिवृत्त होईपर्यंत सामान्य रूग्णालयामध्येच काम केले आहे. के.इ.एम.मध्येच तिने काम केले. ॲनेस्थेशियाची प्रोफेसर आहे. सेवानिवृत्ती झाल्यानंतर देखील तिला खाजगी रूग्णालयात तिप्पट पगार मिळाला असता. पण ती खाजगी रूग्णालयामध्ये गेली नाही. आम्ही जीवनात सत्त्व आणि तत्त्व पाळणारी माणसे असल्यामुळे समर्पित भावननेने काम केले. असे सगळे अनुभव आमच्याकडे आहेत. आपण डॉक्टरांचे हात बळकट करणार की नाही, हा मूळात प्रश्न आहे.

फार मोठी चर्चा मला करावयाची नाही. पण मंत्र्यांकडून मला अपेक्षा आहे. आपण तसे कराल म्हणूनच मी हे बोलत आहे. नाही तर येथे कशाला निरर्थक बोलायचे. आरोग्य हा विषय गंभीर आहे. तो सामान्य माणसाच्या जीवनाशी निगडित आहे. खूप मोठे-मोठे डॉक्टर डॉ.लहाने यांनी आणले आहेत. यातील थोडा विषय हा डॉ.गावित या मंत्र्यांशी देखील संबंधित आहे. त्यामुळे डॉक्टरांचे हात आपण बळकट करणार आहात की नाही ? मी डॉ.अनिलकुमार यांच्याकडून माहिती घेतली. त्यांनी माझी देखील एन्जीओप्लास्टी केली आहे. ते म्हणाले की, माझे जे स्टुडंट आहेत, त्यांच्या हाता खाली मला काम करायला सांगतात. हे डॉक्टर मोठे आहेत. त्यांची अपॉईंटमेंट मिळण्यासाठी 2-3 महिन्यांची वाट पहावी लागते. तो डॉक्टर आपल्यकडे सेवेला येतो.

यानंतर श्री.खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

ते डॉक्टर शासकीय रुग्णालयात सेवा देण्यासाठी येतात, प्रामाणिकपणे ते काम करतात. रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करतात. त्यांचे असे म्हणणे आहे की, मी याच रुग्णालयात प्रोफेसर म्हणून काम केलेले असल्यामुळे निदान माझ्या नावाचा तसा बोर्ड तरी लावावा. या बाबत मॅनेजमेंटने हा निर्णय घ्यावयाचा आहे. ती नस्ती कशामुळे अडली आहे, कोणामुळे अडली आहे ते समजत नाही. मी त्याच्या खोलात जाणार नाही. मी टीका करण्यासाठी उभा राहिलेलो नाही. मला सगळे माहीत नाही. पण रुग्णालयात राजकारण करु नये अशी अपेक्षा आहे. आपण येथे एकमेकांविरुध्द खूप राजकारण करतो. तुम्ही आपापसात राजकारण करावे, आम्ही तुमच्या बरोबर करु. पण वैद्यकीय सेवेत राजकारण आणता कामा नये. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे सतत जे.जे.रुग्णालयात जात होते. शेवटी त्यांनी जे.जे.रुग्णालयातील प्रशासकीय यंत्रणेवर पीएचडी. केली आहे. सन्माननीय सदस्य आता सभागृहात नाहीत, ते जर आले तर या विषयातील अनेक उणिवा सांगतील. त्यांनी प्रशासकीय यंत्रणेतील गलनाथपणावर संशोधन केलेले आहे. रुग्णालयातील प्रशासकीय यंत्रणेवर संशोधन करण्याइतपत शासनाने ती ढिसाळ करुन ठेवलेली आहे. एका डॉक्टरना त्या विषयावर डॉक्टरेट मिळते.

सभापती महोदय, दोन दिवसापूर्वी विधानसभेतील सन्माननीय सदस्य श्री.बापूसाहेब पठारे हे आजारी पडल्यामुळे त्यांना रुग्णालयात घेऊन गेले होते. त्या रुग्णवाहिकेच्या चालकाची चूक होती का ? त्यांनी शासनाला निवेदन लिहून दिले आहे. त्यावेळी परिस्थिती तशी होती, त्यामुळे त्यात आमदारांची सुध्दा चूक होती असे म्हणता येत नाही. कारण त्यांनाही असे वाटत होते की, आपला सहकारी लवकरात लवकर रुग्णालयात पोहोचला पाहिजे. त्या गडबडीत गाडीच्या चालकावर खूप प्रेशर आले. त्यामुळे गाडी चालविताना क्लचवरुन त्याचा पाय सुटल्याने गाडी बंद पडली होती. ती गाडी बिघडलेली नाही. त्या बाबत चौकशी करण्यात यावी. ती गाडी ताब्यात घेण्यात यावी. गाडी लवकर रुग्णालयात घेऊन चल, लवकर घेऊन चल असे सातत्याने आमदार बोलत असल्यामुळे त्याचा गाडीच्या क्लचवरुन पाय सुटला. त्यामुळे गाडी एकदा बंद पडली होती. परंतु ती गाडी रुग्णालयात पोहोचली. पण या घटनेसाठी शासनाने त्या रुग्णालयाचे प्रमुख असलेले श्री.गायकवाड यांना थेट निलंबित केले आहे. श्री.गायकवाड यांना यापूर्वी एका गोष्टीसाठी निलंबित केले होते. त्यावेळी त्यांच्याकडून चूक झाल्यामुळे निलंबित केले असेल तर ठीक आहे. परंतु

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

रुग्णवाहिकेच्या प्रकरणात त्यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यामुळे मंत्री महोदयांना मी एक प्रश्न विचारतो. या संदर्भात सेंट जॉर्ज रुग्णालयाने संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांच्याकडे दोन वर्षापूर्वी कार्डियाक रुग्णवाहिकेची मागणी केलेली आहे. या मागणीची नस्ती कोठे अडकून पडली आहे ? ही नस्ती ज्या डेक्समध्ये अडकून पडली असेल त्या डेक्स ऑफिसरला शासनाने प्रथम सस्पेंड करावे. आमदार निवासात रहात असताना एखाद्या आमदारांना हृदयाचा त्रास झाला तर त्यांना रुग्णालयात नेण्यासाठी कार्डियाक ॲम्ब्यूलन्स उपलब्ध नाही. हा कोणाचा दोष आहे ? डॉक्टरांचा दोष नंतर येतो. याबाबत कार्यवाही शासन करणार आहे का, तरच सन्माननीय सदस्य डॉ.तांबे यांनी मांडलेल्या प्रस्तावाला अर्थ आहे. एका बाजूला सेंट जॉर्ज रुग्णालयाने दोन वर्षापूर्वी कार्डियाक ॲम्ब्यूलन्सची मागणी केल्यानंतर ती दिली जात नाही. दुसऱ्या बाजूला श्री.गायकवाड यांना थेट निलंबित केले जाते ? ती ॲम्ब्यूलन्स ड्रायव्हर चालवित होता, ती नादुरुस्त नाही. त्या गाडीचे इंजिन बिघडलेले नाही, गाडीत ऑईल नव्हते असेही नाही. तो ड्रायव्हर आमदारांच्या दबावामुळे घाबरला होता. गाडी एकदा बंद पडली होती. पण ती गाडी रुग्णालयात पोहोचली होती. पण काही तरी घोषणा करावयाची म्हणून शासनाने केली. श्री.गायकवाड हे चांगले आहेत की वाईट आहेत यावर मी बोलणार नाही. तो माझा विषय नाही. ॲम्ब्यूलन्स बंद पडल्यामुळे थेट रुग्णालयाच्या प्रमुखांना निलंबित केले जाते ते गैर आहे, असे मी मुद्दाम नमूद करतो.

सन्माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांच्याकडून आम्हाला खूप अपेक्षा आहेत. कारण आपला रोखठोक व चोख स्वभाव आहे. त्यामुळे आपण या विषयात प्रामाणिकपणे लक्ष घालावे. औषध खरेदी हा आव्हानात्मक विषय आहे. यातील टेंडर वगैरेचा भाग सोडावा. अधिक पैसे गेले तरी चालतील, पण गरिबांना चांगली औषधे मिळाली पाहिजेत. शासकीय रुग्णालयात गरीब लोक उपचारासाठी कसे येतात ते मी पाहिलेले आहे. मी याबाबत आपल्याला कळकळीची विनंती करतो. हा निंदाजनक प्रस्ताव असला तरी शासनाच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे. ग्रामीण भागातील आरोग्य सेवेबाबत मी बोलत नाही. पण तेथेही काय अवस्था आहे ते सांगण्यास वेळ अपुरा असल्यामुळे बोलत नाही. मी ग्रामीण भागात फिरत असतो. त्या बाबतीत शासनाकडून योग्य ती दखल घेतली जाईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी आरोग्य सेवे बाबतचा एक अतिशय महत्वाचा विषय सभागृहासमोर आणलेला आहे.

या प्रस्तावात ज्या गोष्टी अंतर्भूत केलेल्या आहेत त्या सर्व महत्वाच्या आहेतच.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...
शासनाने ज्या काही ठिकाणी उणिवा राहिल्या असतील, काही त्रुटी राहिल्या असतील त्या ताबडतोबीने दुरुस्ती करण्याची सुध्दा गरज आहे. यामध्ये असा कोणताही भाग नाही की, ज्यासाठी आपण मागच्या इतिहासात जाऊन खाते कोणाकडे होते, काम कोणी केले, त्यात काय चुका झाल्या या सगळयांचा पंचनामा करण्यासाठी ह्या चर्चेचा उपयोग आहे असे मला वाटत नाही. मुळामध्ये एकूणच सध्याच्या काळामध्ये आपण बघतो की, शासनाची जी अनेक गोष्टींची जबाबदारी असते त्यामध्ये आरोग्य आणि शिक्षण या अतिशय मूलभूत गोष्टी आहेत, ज्याकडे सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी लक्ष वेधलेले आहे. आता आमच्या समोरच्या बाकावरुन भाषण करताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी देखील त्याचा उल्लेख केलेला आहे. या सगळयामध्ये एक यंत्रणा म्हणून, एक स्ट्रक्चर म्हणून राज्यामध्ये आरोग्य सेवेचे नेटवर्क जरुर उभे करण्यात आलेले आहे. मग प्राथमिक आरोग्य केन्द्रे असतील, कुटीर रुग्णालये असतील, जिल्हा रुग्णालये असतील, विभागीय ठिकाणची सुपर स्पेशालिटी हॉस्टिल्स असतील, अशा सर्व यंत्रणा आज उपलब्ध केलेल्या आहेत. यासाठी आवश्यक ते वैद्यकीय शिक्षण घेतलेले मनुष्यबळ निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, यांना मी सांगू इच्छितो की, त्यांच्या काळामध्ये आरोग्याला प्राधान्य देऊन आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना झालेली आहे.एक रचनात्मक कार्यक्रम म्हणून मी त्याकडे बघतो. परंतु आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना केल्यानंतर त्या विद्यापीठाच्या माध्यमातून केवळ वैद्यकीय ज्ञान नव्हे तर बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये, वैद्यकीय क्षेत्रामध्ये आवश्यक असणा-या तांत्रिक गोष्टींचे प्रशिक्षण देणे त्यांचे कोर्सेस सुरु करणे याबाबतीत आपण किती यशस्वी झालेलो आहोत याचा लेखाजोखा या निमित्ताने घेणे आवश्यक आहे.

खरे म्हणजे राज्यातील आरोग्य सेवेबाबत खरोखरच आव्हानात्मक अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. पर्यावरणामध्ये बदल होत आहेत. त्यामुळे आजारांचे स्वरुप बदलत आहे. नवनवे आजार जे आतापर्यन्त कधी ऐकले नव्हते ते गेल्या 5-6 वर्षामध्ये ठिकठिकाणी उद्‌भवताना दिसत आहेत. त्या आजारांशी सामाना करण्यासाठी त्या त्या काळामध्ये त्यासाठी तंत्रज्ञान आहे की नाही, लॅबोरेटरी आहे की नाही, व्हॅक्सिन आहे की नाही या गोष्टींची चर्चा अनेक वेळा येथे झालेली आहे. भविष्यामध्ये नवीन निर्माण होणारे जे आजार आहेत, ज्यांचा साथीचे रोग म्हणून

..2..

श्री. हेमंत टकले...

मोठ्या प्रमाणावर प्रादूर्भाव होऊ शकतो अशा रोगांशी सामना करण्यासाठी आपल्या विभागामध्ये अधिक कार्यक्षमता आणण्याची गरज आहे.

सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये बोगस डॉक्टर हुडकून काढण्याचा विषय चर्चेला येतो. त्यासंदर्भात भरारी पथक नेमलेले आहे. परराज्यातील बोगस सर्टिफिकेट दवाखान्यामध्ये लावून उपचार देत राहाण्याच्या पध्दती कमी होण्या ऐवजी वाढतच आहेत. प्रामुख्याने वैद्यकीय शिक्षणाचा भाग घेतला की त्यामध्ये 4 पॅथी असतात. एक ॲलोपॅथी, आयुर्वेदिक, होमिओपॅथी आणि युनानी अशा या 4 पॅथींची संकल्पना भारतात आहे.या प्रत्येक शाखेतून वैद्यकीय ज्ञान घेऊन प्रशिक्षित लोक बाहेर पडत असतात. होमिओपॅथी हा विषय असा आहे की त्याबद्दल सातत्याने आंदोलन चालू असते. त्यांना वैद्यकीय सेवेमध्ये सहभागी करुन घेणे, त्यांना कम्बाईन कोर्सेस देऊन त्यांना अशा प्रकारे उपयोगात आणता येईल का यादृष्टीने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शासकीय रुग्णालयातून औषधांचा पुरवठा शासनाच्या माध्यमातून केला जातो. या औषध पुरवठ्याच्या संदर्भात अनेक ठिकाणी अनेक वेळा असे आढळून येते की, ज्या वेळेला औषधांची उपलब्धता असणे आवश्यक असते नेमके त्याच वेळेला ती औषधे प्रशासकीय यंत्रणेतील त्रुटीमुळे उपलब्ध नसतात. रुग्ण दवाखान्यामध्ये आलेला असतो. त्याला औषधे हवी असतात. मग अशा वेळी सांगितले जाते की, बाहेरुन औषधे आणून दिली तरच रुग्णावर उपचार केले जातील. डॉ.भालचंद्रांचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. नाशिकच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये डोळयांचे सर्जन म्हणून त्यांनी अतिशय मोठे काम केलेले आहे. 10 जून हा त्यांच्या जयंतीचा दिन नेत्रदिन म्हणून शासनाने जाहीर केला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

जिल्हयातील सिव्हील सर्जन हे महत्वाचे पद आहे. एखाद्या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांचे ज्या प्रमाणे पद असते, तसे आरोग्य सेवेच्या बाबतीत जिल्हयाच्या ठिकाणी सिव्हील सर्जन हे पद अतिशय महत्वाचे असते. अनुभव असा आहे की, या शासकीय सेवेमध्ये अनेक वेगवेगळे तज्ज्ञ आहेत. कोणी नेत्र तज्ज्ञ असतील, कोणी हृदयाचे तज्ज्ञ असतील, कोणी ऑर्थोपेडीक असतील, असे वेगवेगळया विभागाचे तज्ज्ञ आहेत. अशा तज्ज्ञांच्या वेगवेगळया ब्रॅचेस असतात. जे सिव्हील सर्जन म्हणून कार्यरत असतात, ते सिव्हील सर्जन बेसिकली त्याची स्पेशालिटी आहे, ती ब्रँच तो चांगल्या प्रकारचे चालवितो. परंतु त्या हॉस्पिटलमध्ये इतर ब्रँचेस ज्या आहेत, त्याकडे दुर्लक्ष करण्यात येते, अश गोष्टी निदर्शनास येतात.

सभापती महोदय, आपण सेवेचा पिरॅमीड बघतो, त्यावेळेला सिव्हीज सर्जन हे जिल्हयातील महत्वाचे पद आहे. त्यांच्याकडे आपण प्रशासकीय अधिकार मोठया प्रमाणावर दिलेले असते. या प्रशासकीय कामामध्ये, ते काम समजावून घेणे, त्या कामाची आवड असणे, प्रशासकीय सेवेमध्ये त्यांचा अंकूश निर्माण करण्याची शक्ती आहे, ती निर्माण होण्यासाठी हॉस्पिटल मॅनेजमेंट प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच प्रशासकीय क्षमता वाढविण्यासाठी आपल्या आरोग्य सेवेमध्ये, ज्यांच्यावर प्रशासकीय जबाबदाऱ्या आहेत. त्याच्यासाठी प्रशक्षिण देण्याचा उपाय आपल्याला आणता येईल काय हे बघितले पाहिजे. आपण प्रत्येक जिल्ह्यासाठी काही ठिकाणी निश्चित असे ब्रेचमार्कस् केले पाहिजेत. त्या बेंचमार्कमध्ये राज्यापुढचे किंवा त्या जिल्हयापुढचे आरोग्य सेवेमधील महत्वाचे प्रश्न आहेत. ज्या प्रमाणे कुपोषणाच्या बाबतीत शासनाने श्रेणी ठरवून दिलेल्या आहेत. तशा एका जिल्हयामध्ये आरोग्य सेवेमध्ये लागणारी सुविधा आणि त्यासाठी लागणारी सामुग्री ती उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रयत्न होणे आवश्यक आहे. महत्वाचे चार आजार कोणते आहेत, त्यांचे प्रमाण काय आहे, त्या आजराचा क्रमांक कोणता आहे, त्यासाठीची सेवा आपण अधिक चांगल्या प्रकारे तसेच दर्जात्मक कशी करु शकू असा काही तरी ब्रेंचमार्ग करुन, प्रत्येक जिल्हयासाठी आपल्याला उद्दिष्ट ठरविली पाहिजेत. अमुक जिल्ह्यामध्ये आरोग्याच्या बाबतीत असे असे प्रश्न आहेत, त्यावर उपाय करण्यासाठी या या गोष्टींची आवश्यकता आहे आणि त्या गोष्टींची उपलब्धता शासनाने करुन दिली पाहिजे. मला आठवते की, पूर्वीच्या काळी सिव्हील हॉस्पिटलमध्ये अनेक विषयांचे तज्ज्ञ ऑननरी म्हणून काम करावयाचे. ते ऑननरी डॉक्टर सिव्हील हॉस्पिटलचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

लॉंचीग पॅड म्हणून उपयोग करावयास लागले. ते ऑननरी डॉक्टर सिव्हील हॉस्पिटलमध्ये जाऊन जिल्हयातील व ग्रामीण भागातील व्यक्तींची ओळख करुन घ्यावयाचे आणि त्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये येणारे रुग्ण आपल्या रुग्णालयात न्यावयास लागले, असे प्रकार अनेक ठिकाणी आढळून आले आहे व आजही आढळून येत आहेत. या प्रस्तावाचा मूळ गाभा आरोग्य सेवा आहे. मला वाटते की, काही देश छोटे आहेत, म्हणून त्यांना ते करणे शक्य आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

त्यांनी एक निश्चित मापदंड ठरवून दिला आणि ज्या प्रायव्हेट इन्स्टिटय़ूशन्स अशा प्रकारे काम करतील आणि त्यांचे पॅरामीटर म्हणून सोयी सुविधा आणि वैद्यकीय तज्ज्ञ उपलब्ध करुन देतील त्यांना रिकग्निशन देऊन जो लोड वाढतो तो त्यांच्याकडे जाऊन त्यांच्या सेवेची पूर्तता किंवा प्रतिपूर्ती शासन थेट त्यांच्याकडे देते. अशा पध्दतीने या नेटवर्कला सपोर्टिंग नेटवर्किंग म्हणून उपयोग करता येतो. या बरोबरच शासनाचा आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग आणि फार्मसी या विभागाचे एकत्रीकरण करताना वारंवार आपल्याला समन्वय साधून या सेवेचा दर्जा कसा सुधारेल आणि शासकीस सेवेवर लोकांचा भविष्यकाळात विश्वास अधिक कसा वाढेल या दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी शासन गंभीरपणे विचार करेल असा मला विश्वास वाटतो. केंद्र सरकारची एनआरएचएम योजना असो वा राज्य शासनाच्या योजना असोत, चांगल्या योजना हाती घेतलेल्या आहेत. या योजना गरीब लोकांपर्यंत नेण्यासाठी स्तर निश्चित करणार असाल तर त्या स्तराची फेरआखणी करुन अधिकाधिक लोकांपर्यंत योजना पोहोचविणे अतिशय गरजेचे आहे, आवश्यक आहे.

सभापती महोदया, सामान्य माणसांना दिलासा देणारी आरोग्य यंत्रणा अशी महाराष्ट्र शासनाची ओळख भविष्यकाळात व्हावी या निमित्ताने ही चर्चा सभागृहात होत आहे. शासन आणि मंत्री महोदय स्वत: अतिशय गंभीरपणे या व्यवस्थेकडे लक्ष देत आहेत. 24 तास काम करीत आहेत याची मला जाणीव आहे. या सगळ्या गरजा लक्षात घेऊन यामध्ये सुधारणा योग्य पध्दतीने आणि योग्य वेळेत निश्चित केल्या जातील असा मला विश्वास वाटतो. त्या दृष्टीने शासनाने विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदया, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदया, आरोग्य सेवा आणि शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली असली तरी प्रत्यक्षात ही जबाबदारी पार पाडली जात नाही, असा या प्रस्तावाच्या अनुषंगाने वारंवार खेद व्यक्त केला जात आहे. जिल्हा रुग्णालयातील दुरवस्था एक कार्यकर्ता या नात्याने मी स्वत: अनुभवतो आहे. मी झोपडपट्टीमध्ये रहात असल्यामुळे अनेकदा शासकीय रुग्णालयात रुग्णांसोबत मला जावे लागते. जखमी रुग्ण वेदनेने विव्हळत असतो, परंतु त्याच्यावर उपचार सुरु होत नाहीत. जोपर्यंत औषधे आणि आवश्यक असलेले साहित्य आणून दिले जात नाही, तोपर्यंत उपचार सुरु होत नाहीत. साधा कापूस नसतो आणि रुग्ण ओरडत असतो परंतु उपचार केले जात नाही.

सभापती महोदया, नागपूर महानगरात दोन मोठी रुग्णालये आहेत. एक शासकीय रुग्णालय व महाविद्यालय आणि दुसरे इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथे आहे. इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला विधिमंडळाच्या अंदाज समितीने कत्तलखाना म्हणून घोषित केले आहे. या रुग्णालयातील शवविच्छेदन गृहात मृतदेह उंदीर कुरतडत असताना मी स्वत: पाहिले आहे. प्रत्यक्षात तेथे काय व्यवस्था असेल याचा आपण सर्वांनी विचार केला पाहिजे. या रुग्णालयाचा विस्तार करण्याची शासनाने घोषणा केली. त्यासाठी 220 कोटी रुपयांचा प्रकल्प जाहीर केला. 1997 मध्ये तत्कालीन आरोग्यमंत्र्यांनी प्रकल्पाचे उद्‌घाटन केले. आजपर्यंत त्या प्रकल्पाचे काम सुरु झालेले नाही. अशी महाराष्ट्राच्या उपराजधानीतील रुग्णालयाची अवस्था आहे. म्हणून विदर्भातील जनतेच्या भावना तीव्र होत चाललेल्या आहेत. विदर्भाच्या जनतेला सरकार न्याय देत नाही. त्यामुळे स्वतंत्र विदर्भाची मागणी वारंवार पुढे येत आहे, डोके वर काढत आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, शासकीय रुग्णालयात सर्व प्रकारच्या सोयी सुविधा निर्माण केल्या पाहिजेत. तेथे येणाऱ्या रुग्णांना उपचार मिळाले पाहिजेत. आज रुग्ण जेव्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी जातो तेव्हा त्याच्या परिवारातील मंडळींना तो रुग्ण परत घरी येईल याची शाश्वती नसते. तो रुग्ण घरी परत आला तर त्यांना आश्चर्य वाटते. ही परिस्थिती बदलविण्याचे काम आम्हा सर्वांना करावयाचे आहे अशी प्रार्थना करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---

नंतर एन1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, डॉ. सुधीर तांबे यांनी त्यांच्या घरातील लाल बावटा अजुन गुंडाळून ठेवलेला नाही याची प्रचीती या ठरावाच्या निमित्ताने आली. म्हणून याच ठरावात ते म्हणू शकले की आरोग्य सेवेवरील लोकांचा विश्वास उडून गेला आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, डॉक्टरमध्ये मेलेल्या माणसाला जिवंत करण्याचे सामर्थ्य आहे. पण मी त्यांना असे सांगू इच्छितो की, या शासनाने मात्र जिवंत माणसाला मरणाच्या दारात आणून ठेवण्याची योजना आखली आहे. मुळात दुखणे काय आहे तर हॉस्पिटल आहे, यंत्रणा आहे पण डॉक्टर्स नाहीत. शाळा बांधून ठेवतात पण शिक्षक नसतील तर त्या चालू शकत नाहीत. तसेच आरोग्य सेवेत डॉक्टर्स पुरविले जात नाहीत. राज्यात आरोग्य सेवेत 67 टक्के डॉक्टर्सची पदे रिक्त आहेत. कारण डॉक्टर्स येण्यास तयारच नसतात. त्याचे कारण म्हणजे नव्याने एमबीबीएस झालेल्या डॉक्टर्सना आणि एमडी झालेल्या डॉक्र्टर्सना सारखाच पगार दिला जातो त्यामुळे कोणतेही डॉक्टर्स येण्यास तयार नाहीत. शासनाने चांगल्या डॉक्टर्सना आकृष्ट करण्याची व्यवस्था आपल्या आरोग्य सेवेत केलेली नाही. यात मंत्री महोदयांचादोष नाही तर खरे दुखणे म्हणजे बजेटमध्ये या विभागासाठी तरतूद केली जात नाही. शासनाने नुकतेच प्रकाशित केलेल्या "राज्याची आर्थिक पाहणी" या पुस्तकात गेल्या दोन वर्षात शासनाने आरोग्य सेवेवर किती खर्च केला याची नोंद केलेली आहे. त्यात राज्याच्या एकूण स्थुल उत्पन्न रु. 9 लाख कोटी असताना आरोग्य सेवेसाठी मागील वर्षी फक्त 1 हजार कोटी एवढीच तरतूद केली होती. यावर्षी तर फक्त 550 कोटी इतकाच खर्च आरोग्य सेवेसाठी करण्यात आला. ही माहिती पृ.क्र. 145 वर दिलेली आहे. म्हणजे स्थुल उत्पन्नाच्या 0.01 टक्का सुध्दा आरोग्य सेवेवर खर्च केलेला नाही. तसेच मागील वर्षी 0.05 टक्के इतका खर्च केला आहे. केवळ अर्धा पैसा खर्च आरोग्य सेवेवर होणार असेल तर राज्यातील गरीब माणूस मरणार नाही तर काय ?

डॉ. तांबे यांनी त्यांच्या भाषणात डॉ. नरेंद्र जाधव यांची समिती नेमल्याचा उल्लेख केला. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या समितीने शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांचे विश्लेषण केले व त्यानुसार कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झालेल्या आहेत, असेही त्यांनी म्हटले आहे. कारण शासकीय रुग्णालयात सुविधा नसल्याने नाईलाजाने खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घ्यावे लागतात. त्यासाठी शेतकऱ्याकडे पैसा नसतो म्हणून कर्ज काढावे लागते आणि ते कर्ज फेडणे

....2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील......

शक्य होत नाही तेव्हा तो आत्महत्त्या करतो, अशी आत्महत्त्येची प्रकरणे वाढत जातात. वैद्यकीय उपचारासाठी गरिबांवर किती खर्च झाला याचीही नोंद त्यांनी आपल्या अहवालात केली आहे. म्हणजे शेतकऱ्याच्या घरी त्याची मुलगी बाळंतपणासाठी येते. ती प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा ग्रामीण रुग्णालयात बाळंत होण्यासाठी जाते तेव्हा तेथे सुविधा नसतात. तिला सांगण्यात येते की, खाजगी रुग्णालयात जा, पण पैशाअभावी ती तेथे पोहचू शकत नाही. खाजगी रुग्णालयात गेलीच तर त्यासाठी पैसा नसतो म्हणून कर्जाने पैसे घेऊन ते फेडता येत नाही म्हणून आत्महत्त्या करावी लागते ही या राज्यातील गरीब जनतेची अवस्था आहे. म्हणून राज्यातील जनतेला आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात, शिक्षण मिळावे, वैद्यकीय उपचार वेळेवर व्हावा याची कुठलीही तमा शासनाच्या लेखी दिसत नाही.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी शासनाच्या बाबतीत माणूसकीशून्य असा शब्द त्यांनी वापरला, पण मी तर असे म्हणेन की, त्यापेक्षाही वाईट परिस्थिती शासनाची आहे. शेवटी राज्यातील गरिबांना जिवंत ठेवावयाचे की नाही यासंबंधीचा निर्णय एकदा शासनाने घेऊन टाकावा. केवळ केंद्र शासनाकडून येणाऱ्या पैशातूनच आपल्या राज्यात तुटपुंजा आरोग्य सुविधा पुरविण्याचे काम हे शासन करीत आहे. त्यात देखील प्रचंड असा भ्रष्टाचार सुरु आहे. म्हणजे डॉक्टरांची एक-एक पोस्टिंग देण्यासाठी सुध्दा पैसे घेतले जात असतील तर राज्यातील जनतेचे आरोग्य कसे राहणार याचा विचार केलेला बरा. अशा प्रकारे राज्यात भ्रष्टाचार किती पराकोटीला पोहचला आहे हे सांगण्यासाठी पुराव्याची गरज नाही. याची नोंद शासनाने स्वत:च करुन ठेवलेली आहे. राज्यात आरोग्य सेवेवर केंद्राकडून मिळणाऱ्या निधीच्या व्यतिरिक्त जास्तीचा एक पैसाही देण्यास शासन तयार नाही. तसेच त्यांनी पुढे असेही सांगितले की, राज्यात दवाखान्यात यंत्रे आहेत पण ती चालविण्यासाठी टेक्निशियन्सची पदे भरलेली नाहीत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ...

त्या ठिकाणी टेक्निशिअन, स्त्रीरोग तज्ज्ञ, भूलतज, बालरोग तज्ज्ञ, हृदयरोग तज्ज्ञ नाहीत. नव्याने एम.बी.बी.एस. झालेल्या डॉक्टरांना जेवढे वेतन दिले जाते तेवढेच वेतन एम.एस. आणि एम.डी. इ ाालेल्या डॉक्टरांना देण्यात येत असल्यामुळे हे डॉक्टर्स त्या ठिकाणी येऊ शकत नाहीत त्यामुळे एम.एस. आणि एम.डी झालेल्या डॉक्टरांना तेथे टिकविण्याचे सामर्थ्य किंवा व्यवस्था त्या ठिकाणी नाही. एम.डी आणि एम.एस झालेल्या डॉक्टरांना कमी वेतन दिले जात असल्यामुळे हे डॉक्टर्स तेथे टिकत नाहीत. त्यातून नवीन रॅकेटस सुरु होत असते. त्या ठिकाणी नव्याने एम.बी.बीएस.

झालेल्या डॉक्टरला पेशंटला वाचवता येत नाही त्यामुळे तो पेशंट खाजगी डॉक्टरकडे जातो या संधीचा उल्लेख सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे व श्री.हेमंत टकले यांनी आपल्या भाषणात केला होता.या प्रकारातून भ्रष्टाचार सुरु होत असतो व त्याची मोठी चेन आहे. भ्रष्टाचाराल जन्म देण्याची व्यवस्था शासन स्वत: करीत आहे. सभापती महोदया, महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या 11 कोटी इ ााली असून उत्तर प्रदेश नंतर आपल्या राज्याचा लोकसंख्येमध्ये दुसरा क्रमांक लागतो 11 कोटी मधील 29 टक्के लोक दारिद्रय रेषेखालील आहेत. जे लोक दारिद्रय रेषेच्या वरील आहेत वा सीमेवर आहेत ते लोक सुध्दा औषधोपचारावर मोठा खर्च करु शकत नाही अशा लोकांची संख्या देखील मोठी आहे.या सगळया लोकांना वाचविण्यासाठी व त्याला सन्मानाने जगण्यासाठी शासन काही व्यवस्था करणार आहे किंवा नाही ? केवळ चार रुग्णालये बांधली वा चार डॉक्टर्स दिले किंवा मेयो हॉस्पिटलसाठी, जे.जे.हॉस्पिटलसाठी अमुक एवढे पैसे दिले असे माननीय मंत्र्यांनी सांगता कामा नये. या हॉस्पिटल्स करिता डॉक्टर्स , नर्सेस किती पुरविण्यात आले आहे, औषधे किती पुरविण्यात आली आहेत या तीन प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्र्यांनी दिली तरी गोर गरीब जनतेसाठी हे शासन काही करीत आहे हे त्यांना देखील कळेल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, डॉक्टरांच्या बदल्यासंबंधीचा एक मुद्दा येथे मांडण्यात आला होता. माननीय मंत्र्यांनी डॉक्टरांच्या बदल्या केल्या होत्या आणि मॅटने त्या सर्व रद्द केल्या होत्या. तेव्हा आता मॅटच रद्द करणार आहात काय असा प्रश्न पुढे आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई ( विधान सभेने निवडलेले ) सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ सुधीर तांबे यांनी या ठिकाणी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, या प्रस्तावावर बोलत असतांना सन्माननीय सदस्यांनी वस्तुनिष्ठ चर्चा केली आहे. आजारीपडणे म्हणजे मरणाला सामोरे जाणे हाच गरिबांच्या समोर एक पर्याय राहिला आहे.सरकारी हॉस्पिटल्स आणि महानगरपालिकांच्या हॉस्पिटल्समध्ये मोठया प्रमाणावर गरीब रुग्णांची गर्दी होत असते. के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये दोन कॉटस एकमेकांना जोडून त्यावर तीन बाळंतिणी बाळासह झोपतात. इतकेच नव्हे तर त्या कॉटच्या खालीसुध्दा पेशंट असतो.वर्षानुवर्षे ही स्थिती आहे व त्यामध्ये सुधारणा का होत नाही हे मला समजत नाही.महानगरपालिकेला जर जास्त पैसे हवे असतील तर ते त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सरकारी आणि महानगरपालिकांची हॉस्पिटल्स हाच गरिबांचा आधार आहे. त्यामध्ये सुधारणा व्हावयास पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.यातील काही हॉस्पिटलचे खाजगीकरण करण्याचा प्रयत्न होत आहे. तर काही हॉस्पिटल बंद करण्याचे प्रयत्न सुरु आहेत तेव्हा या बाबतीत माननीय मंत्र्यांनी कडक भूमिका घेतली पाहिजे से मला त्यांना सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, हाफकिन इन्स्टिटयूटमध्ये सुध्दा मोठयाप्रमाणावर गोंधळ सुरु आहे.हा प्रकार थांबविण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत .सभापती महोदया, ठाण्याच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये गेलो तर ते गुरांचे आहे की माणसाचे आहे हे समजत नाही अशी त्या हॉस्पिटलची वाईट अवस्था झ ाालेली आहे. जिल्हा पातळीवर असलेल्या सर्व सिव्हील हॉस्पिटलचा दर्जा तातडीने सुधारण्यात यावा असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, या बाबतीत विचार करीत असतांना महिलांच्या संदर्भात मी जर मुंबईचे उदाहरण दिले तर ते माननीय मंत्र्यांना कदाचित खरे वाटणार नाही. झोपडपट्टयात राहणा-या ब-याच महिलांना बाळंतपणासाठी हॉस्पिटलमध्ये पोहोचता येत नाही . महाराष्ट्रातील 30 टक्के महिला झोपडयांमध्ये बाळंत होतात. भ्रूण हत्येसबंधी सभागृहात सातत्याने चर्चा होत असते परंतु त्यातून फारसे काही निष्पन्न होत नाही. बोगस औषधे मोठया प्रमाणावर दिली जातात बोगस औषधे विकणारी ठराविक दुकाने आहेत. डॉक्टर रवी पाटील याच्या सारख्या काही डॉक्टरांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई ..

चांगले काम केलेले आहे व पुस्तक लिहिलेले आहे. या विषयावर ते अत्यंत कळकळीने बोलत असतात तेव्हा आरोग्याच्या क्षेत्रामध्ये नेमकी कोणती सुधारणा करणे आवश्यक आहे हे जाणून घेण्याकरिता त्यांना बोलावून त्यांचा सल्ला घेतला पाहिजे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई...

सभापती महोदया, मी आपले एका गोष्टीकडे लक्ष वेधतो की, मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गावर एकही हॉस्पिटल उपलब्ध नाही. या रस्त्यावर नेहमी वाहनांचे अपघात होतात व त्यामध्ये माणसे मरण पावतात. तरी सुध्दा शासन त्याबाबत काहीही व्यवस्था करीत नाही. या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण केव्हा होणार आहे हे मला माहीत नाही. त्याबाबतची चर्चा होऊन बरीच वर्षे झाली तरी त्याची अंमलबजावणी होईल की नाही हे मला माहीत नाही.

सभापती महोदया, त्याचप्रमाणे बी.इ.एम.एस. झालेल्या डॉक्टर्सना शासकीय सेवेमध्ये कां घेतले जात नाहीत हे मला समजत नाही? संविधानाच्या अनुच्छेद 309 मध्ये स्पष्टपणे तरतूद असतांना आपण बी.ए.एम.एस. डॉक्टर्सना घेतले त्याप्रमाणे बी.इ.एम.एस. डॉक्टर्सना आपण इतकी वर्षे कां बाहेर ठेवीत आहात? ते एकाच समाजातील लोक असल्यामुळे त्यांच्या अनेक वर्षापासूनच्या असलेल्या मागणीकडे फारसे लक्ष दिले जात नाही हे बरोबर नाही. याचे कारण असे की, विधिमंडळाचे प्रत्येक अधिवेशन भरल्यानंतर ही मंडळी आपल्या मागणीसाठी उपोषणाला बसतात, धरणे धरतात, अनेक लोकांना पत्र पाठवितात परंतु त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जाते.

सभापती महोदया, माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी सांगितल्याप्रमाणे आरोग्य विमा योजना अधिक सक्षम करुन तिचा लाभ समाजातील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविला पाहिजे यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. त्याचप्रमाणे शहरामध्ये असलेल्या अनेक खाजगी इस्पितळांवर शासनाने नियंत्रण ठेवले पाहिजे. आज आपण शहरामध्ये पहात आहोत की, हिंदुजा, लिलावती आंणि अंबानी यांनी मोठ-मोठी इस्पितळे सरकारी जमिनीवर बांधली आहेत. परंतु या इस्पितळामधील व्यवस्थापकीय यंत्रणा इतकी बेदरकारपणे वागते. एखादा रुग्ण त्या इस्पितळामध्ये उपचाराकरिता दाखल झाल्यानंतर त्याची वैद्यकीय सुश्रुषा करण्याऐवजी पहिल्यांदा तुझ्याकडे मेडिक्लेम आहे काय असे विचारले जाते आणि जर का त्याने "होय" म्हटले तर त्या रुग्णाला पूर्णपणे लुटून बाहेर पाठविले जाते. तो रुग्ण इस्पितळात दाखल असलेल्या कालावधीमध्ये दर दोन ते तीन मिनिटांनी गरज नसतांनाही डॉक्टर्स तपासणी करण्याकरिता येत असतात. अशाप्रकारे जो गैर कारभार सुरु आहे त्यावर शासनाने नियंत्रण ठेवले पाहिजे. त्याचप्रमाणे औषधांच्या किमती भरमसाठ पध्दतीने वाढविल्या जात आहेत त्यावर देखील शासनाने तात्काळ नियंत्रण ठेवले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/

श्री. हुसेन दलवाई....

मुबईमध्ये असलेल्या महानगरपालिकेच्या इस्पितळामधील व्यवस्था सुधारण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत.

सभापती महोदया, माननीय सदस्य श्री. कपिल पाटील या ठिक्‍ाणी बोलले ते खरे आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये आरोग्य विभागासाठी गेल्या वर्षीपेक्षा कमी तरतूद करण्यात आली आहे. एका बाजूला आरोग्य, स्वच्छता, शिक्षण आणि पिण्याचे पाणी ही अत्यावश्यक आणि महत्वाची असलेली खाती आपण म्हणत असतो. परंतु दुर्दैवाने त्यासाठी आवश्यक असलेली तरतूद केली जात नाही. या विभागाकरिता करण्यात आलेल्या तरतुदीमध्ये मंत्री महोदय कसे काम करीत असतील याचे मला आश्चर्य वाटते. त्यांच्यावर या विभागाचे असलेले दडपण लक्षात घेता या विभागासाठी शासनाने जास्तीत जास्त तरतूद केली पाहिजे अशी मी माननीय अर्थ राज्यमंत्र्यांना विनंती करतो. आणि शासनाने संपूर्ण आरोग्य व्यवस्थेमध्ये सुधारणा करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदया, माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी सभागृहामध्ये अत्यंत महत्वाचा ठराव मांडून आपणा सर्वांचे लक्ष वेधले आहे. माझ्या मते आपण अनेक वेळा या मुद्दयांवर चर्चा करतो परंतु महाराष्ट्रामध्ये कॅन्सरच्या आजारासारखी या आरोग्य विभागाची अवस्था झाली आहे की काय अशी मला शंका वाटते. याचे कारण असे की, कोणत्याही गोष्टीवर आपल्याला शासनाकडून परिणामकारक उत्तर मिळत नाही.

सभापती महोदया, या प्रस्तावामधील विद्यमान आरोग्य विमा योजनेच्या संदर्भातील शेवटच्या भागावर मी बोलणार आहे. यामध्ये आपल्याला एक चित्र स्पष्ट दिसते की, आजकाल विमा क्षेत्रामध्ये सरकारचा सहभाग कमी होऊन खाजगी विमा कंपन्यांचे प्रमाण वाढले आहे. त्याबाबत मी स्वत: आढावा घेण्याचा प्रयत्न केला असता आज आरोग्य विमा योजनेची काय परिस्थिती आहे, याचा विचार केला तर मुख्यत: खाजगी विमा कंपन्यांना पोसण्यासाठी आरोग्य विमा योजनेचा उपयोग होतो की काय याबाबतच्या निष्कर्षापर्यंत आपल्याला यावे लागेल. त्याचे कारण असे की, एकीकडे आरोग्य व्यवस्थेमधील भ्रष्टाचार, दुसरीकडे औषधामधील भेसळ आणि तिसरी गोष्ट म्हणजे नुकत्याच बीड येथील खाजगी रुग्णालयामध्ये भार नियमनामुळे इनक्युबिटरमधील बालके मृत्यूमुखी पडण्याचे उदाहरण घडले आहे. आपण खाजगी क्षेत्राला सुध्दा विमा योजना लागू केली तर अशा परिस्थितीत लहान बालके मृत्युमुखी पडल्यानंतर त्यांची जी काही नुकसान भरपाई मिळेल तिला काही अर्थ राहणार नाही. आपण आरोग्य विमाच्या बाबतीत विचार करावयास लागलो तर त्याचा गोर गरीब माणसाला किती फायदा मिळतो?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

सभापती महोदय, आमच्या माहितीप्रमाणे जिजामाता महिला आधार योजना ही महिलांच्या आरोग्याच्या बाबतीत आणि अपघात झाले तर त्याबाबत काळजी घेणारी योजना होती. पण शासनाने ही योजना बंद केलेली आहे. म्हणून आरोग्य विम्याच्या बाबतीत उल्लेख केला जातो, त्याबाबतीत मला मुद्दाम लक्ष वेधावयाचे आहे की, सध्या विमा कंपन्यांनी ज्या-ज्या गोष्टींसाठी विमा देऊ केला आहे त्याचे निकष कशा पध्दतीने राबविले जातात, त्याचा सामान्य माणसांना फायदा मिळतो की नाही याचा विचार केला तर आज कॉर्पोरेटमधील लोकांना आरोग्य विम्याच्या नावाने मोठया प्रमाणात जसा फायदा मिळू शकतो, त्याप्रमाणे असंघटित शेतमजुरांना किंवा सामान्य लोकांना आरोग्य विम्यापर्यंत पोहोचणे ही अतिशय अवघड गोष्ट झालेली आहे.म्हणून यावर उत्तर शोधावयाचे असेल तर आरोग्य विमा योजनेबाबत बोलत असताना चांगले आरोग्य कसे मिळेल याचा विचार केला पाहिजे. याठिकाणी मला एका गोष्टीकडे लक्ष वेधावयाचे आहे की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये सर्व प्रकारच्या चाचण्या होऊ शकतील अशी अद्ययावत हॉस्पिटल्स् उपलब्ध नाहीत. सध्या आपण हॉस्पिटलमधील जी दुरावस्था आहे त्याबाबत सातत्याने चर्चा करीत असतो. सर्व समाजाच्या आरोग्याचा प्रश्न असताना सुध्दा नवीन जनगणनेनुसार महिलांच्या आरोग्याच्या संदर्भात जी आकडेवारी पुढे आलेली आहे त्याचा अभ्यास सार्वजनिक आरोग्य विभाग करीत असेल असे वाटते. या आकडेवारीनुसार असे दिसते की, बीडमध्ये 1000 मुलांमागे केवळ 801 मुली हे प्रमाण आहे. येथे स्त्री-गर्भ हत्ये बाबत देखील वारंवार चर्चा झाली आहे. परंतु आपण एका बाजूला म्हणतो की, आपल्याकडे अद्ययावत यंत्रसामुग्री नाही. पण दुसरीकडे जेथे भ्रष्टाचार होऊन पैशाचा फायदा मिळतो त्याठिकाणी तंत्रज्ञान मोठया प्रमाणात पोहोचत आहे असे चित्र दिसते. म्हणून मला आरोग्य विमा योजनेबाबत पहिला मुद्दा असा मांडावयाचा आहे की, जर शासनाने जिजामाता महिला आधार योजना बंद केली असेल तर त्यासाठी दुसरा कोणता पर्याय उपलब्ध करुन दिलेला आहे या बाबत शासनाने विचार केला पाहिजे. तसेच आपण खाजगीकरणाला चालना देत असताना या सगळया विमा कंपन्यांचे सोशल ऑडीट झाले पाहिजे.

सभापती महोदय, माझी आग्रहाची मागणी आहे की, सरकारने आरोग्य विम्याच्या बाबतीत आपला विचार समृध्द केला तर त्यांनी शासकीय सहभागाने राष्ट्रीयीकरण झालेल्या ज्या विमा कंपन्या आहेत, त्यांनाच प्राधान्य दिले पाहिजे अशी माझी आग्रहाची मागणी आहे.कारण मी स्थानिक लोकाधिकारच्या अधिवेशनासाठी गेले होते,त्यावेळी असे पाहिले की, तेथील स्टाफ, तेथील कर्मचारी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

विम्याचे क्लेम्स् मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात, त्याच्या तुलनेमध्ये आपल्याला खाजगी विमा कंपन्या सातत्याने क्लेममधून गिऱ्हाईकांना कशा प्रकारे बाजूला करता येईल यासाठी प्रयत्न करीत असतात.

सभापती महोदय, मला आपले लक्ष तिसऱ्या भागाकडे वेधावयाचे आहे. खाजगी आरोग्य क्षेत्र असेल किंवा इतर आरोग्य क्षेत्र असेल त्याठिकाणी तपासणी करण्याच्या बाबतीत मोठे वातावरण निर्माण झालेले आहे. आज तपासणी करणे आवश्यक आहे हे खरे आहे. पण दुसरीकडे आपण आरोग्य संस्कृतीचा विचार करावयास लागलो तर मोठया प्रमाणात रुग्णांची फसवणूक केली जाते. स्त्रियांच्या बाबतीत बोलावयाचे तर आवश्यकता नसताना बहुतेक स्त्रियांचे सिझेरियन ऑपरेशन आणि हिस्टेस्टॉमी केली जाते. आज यासंबंधात कारखाना तयार झालेला आहे. सध्या टॉन्सिल्स् किंवा इतर अनेक ऑपरेशन्स् गरज नसताना लादली जातात. याठिकाणी माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री हे डॉक्टर आहेत, पण माननीय राज्यमंत्री डॉक्टर नाहीत ही चांगली गोष्ट आहे. मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचा अपवाद सोडून देईन. परंतु काहीवेळेला डॉक्टरांकडून खाजगी क्षेत्राबरोबरच सरकारी क्षेत्रामध्ये देखील फसवणूक होत असते आणि सरकारी व खाजगी क्षेत्रांमध्ये संगनमत असते.

**तालिका सभापती (ॲड.उषाताई दराडे)** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला शेवटच्या मुद्याकडे लक्ष वेधावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले सदनामध्ये उपस्थित नाहीत. ते राष्ट्रवादी पक्षाचे प्रतोद आहेत. ते चारवेळा बेल वाजवून देखील ते बोलत राहिले आणि आम्ही मात्र एकदा बेल वाजविल्यानंतर भाषण संपवून खाली बसतो. मी यासंदर्भातील फरक लक्षात आणून देऊ इच्छिते. शेवटी असे सांगावयाचे आहे की, आजारपणानंतर बऱ्याच वेळी रुग्णांना सॅनिटोरिअममध्ये म्हणजे ज्याठिकाणी शांतपणे राहून आजारातून बाहेर पडण्यासाठी काही व्यवस्था होईल याची गरज असते. काही वर्षापूर्वी अनेक थंड हवेच्या ठिकाणी अनेक धर्मादाय संस्थांनी अनेक सॅनिटोरिअम सुरु केली होती. परंतु आज त्यांची असलेली परिस्थिती आणि तेथील ट्रस्टी पाहिले तर दिसून येईल की, ते ट्रस्टीच आज 80 ते 90 वर्षाचे आहेत. ही सॅनिटोरिअम समाजाच्या उपयोगाची आहेत,ती कशा पध्दतीने चालविली जातील याचा विचार करण्याच्या बाबतीत मला संपूर्णपणे दृष्टीकोनाचा अभाव दिसून येतो



APR/ D/ ST/ 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

म्हणून वेगवेगळया प्रकारच्या जीवनशैलीमुळे होणारे रोग समाजाच्या पाठीमागे लागत असताना, दुसरीकडे व्यसनाधीनता असेल किंवा अपघात असतील असे जे मानवनिर्मित आजार आहेत त्याबाबत आरोग्य विम्याच्या योजनेसाठी समग्र दृष्टीकोन, निधीची तरतूद आणि स्त्री आरोग्या सारख्या दुर्लक्षित विषयांसाठी देखील आपण प्रत्येक जिल्ह्यामध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्लॅनिंग केले पाहिजे आणि तसे ते नसेल तर सातत्याने यातील दुरवस्था समोर येतील.

सभापती महोदय, मध्यंतरी बीडमध्ये बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, त्यामध्ये डॉक्टरचा कसा दोष नाही या बाबत खूप लोक मला सांगत आहेत. डॉक्टरचा दोष आहे की नाही, भारनियमनामुळे झाले असे सांगितले जाते. कोणाचाच जर दोष नसेल तर बालके जन्माला आली हा त्यांचा दोष आहे का, असा प्रश्न विचारण्याची वेळ आलेली आहे. म्हणून मी असे म्हणेन की, आरोग्य विम्याचा विचार करीत असताना खाजगीपेक्षा राष्ट्रीय विमा योजनेला आपण प्राधान्य देण्याच्या दृष्टीकोनातून एखादी योजना, गरीब लोकांना खऱ्या अर्थाने त्याचा उपयोग करुन घेता येईल असे नियम ज्यामध्ये असतील अशी योजना करावी, याकडे मी शासनाचे लक्ष वेधते व माझे भाषण संपविते.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, या ठिकाणी आपण नियम 260 अन्वये अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा करीत आहोत. ज्या पध्दतीने लोकसंख्येची वाढ होत आहे, ज्या पध्दतीने मेडिकल सर्व्हिसेस कोठे तरी कमी पडावयास लागल्या आहेत असे वाटावयास लागले आहे ते पाहता आपण अनेक वेळा या सभागृहामध्ये या बाबतीत चांगल्या चर्चा केल्या. त्या निमित्ताने सदस्यांच्या भावना व्यक्त झाल्या. सरकारी सर्व्हिसेसच्या बाबतीत अनेक वेळा म्हटले जाते की, सगळेच ऑलबेल आहे. कोणाचेही त्या ठिकाणी लक्ष नाही. कोणाची बंधने नाहीत, कोणाचे नियंत्रण नाही. त्यामुळे अनेक सरकारी सर्व्हिसेस चांगल्या सुविधा असतानाही गरिबांपर्यंत पोहचू शकत नाहीज, ही आज वस्तुस्थिती आहे. या निमित्ताने भ्रष्टाचाराच्या अनेक तक्रारी करण्यात आल्या. बदलीच्या संदर्भात तक्रारी करण्यात आल्या. डॉक्टर्स मिळत नाहीत, स्टाफ मिळत नाही अशा अनेक गोष्टींची या ठिकाणी चर्चा झाली. मी त्याच्या खोलात जाणार नाही. माझ्या सहकारी सदस्यांनी अनेक गोष्टींचा ऊहापोह या ठिकाणी केला. परंतु माझी स्वत:ची भावना अशी आहे की, जर लोकांना सरकारी सर्व्हिसेस व्यवस्थितपणे मिळावयाच्या असतील तर जे सरकारी कर्मचारी त्या ठिकाणी काम करीत आहेत त्या कर्मचाऱ्यांना कोठे तरी वाटले पाहिजे की, आपल्यावर वरुन कोणाची तरी देखरेख आहे. आपण व्यवस्थितपणे काम करीत आहोत की नाही, सर्व्हिसेस देत आहोत की नाही, वैद्यकीय सुविधा गरिबांपर्यंत पोहोचतात की नाही, या बाबत कोणी तरी मॉनिटरींग करीत आहे, ही भावना ज्या वेळी त्यांच्या मनामध्ये येईल त्या वेळी त्यामध्ये फरक पडू शकतो.

आपल्याला माहीत आहे की, मंत्रालयामध्ये पूर्वीच्या काळामध्ये कार्यालयात येण्याची वेळ 10.00 वाजताची असताना 11.00-12.00 वाजता कर्मचारी कार्यालयात येत होते. वेळेचे बंधन पाळण्यासाठी आपण बोयोमेट्रिक सिस्टिम आणली आणि त्यामुळे वेळेवर येण्याचे प्रमाण चांगल्या पध्दतीने वाढले. त्याच पध्दतीने आज मेडिकल सर्व्हिसेसमध्ये कोठे तरी संगणकीकरणाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्याची गरज आहे. या निमित्ताने आपण संपूर्ण महाराष्ट्रातील वेगवेगळ्या हॉस्पिटल्ससाठी कोट्यवधी रुपयांची औषधे घेतो. तरीही औषधे मिळत नाही ही तक्रार असते. मग ही औषधे कोठे जातात, असा प्रश्न येतो. माननीय आरोग्य मंत्र्यांना माझी विनंती आहे. संगणकीकरणाबद्दल त्यांच्याशी माझी अनेक वेळा वैयक्तिक चर्चा झालेली आहे. या मेडिकल



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे ....

सर्व्हिसेसमध्ये जी औषधे आपण विकत घेतो त्याच्या स्टॉकची माहिती जर ऑनलाईन असेल तर कोठे तरी मॉनिटरींगची सिस्टीम मोठ्या प्रमाणावर राबविणे शक्य होणार आहे. आज ज्या पध्दतीने मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या वाढत आहे तसेच ज्या पध्दतीने साथीचे रोग असतील, कॅन्सर असेल असे वेगवेगळे रोग वाढीस लागले आहेत त्यामुळे हॉस्पिटल्समध्ये येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत आहे. महाराष्ट्रामध्ये आपण त्या ठिकाणी येणाऱ्या रुग्णांना जर युनिट आयडेंटीटी दिली आणि त्यांची संपूर्ण हिस्ट्री जर ऑनलाईन उपलब्ध करुन दिली तर त्या रुग्णाला जर एखाद्या एक्स्पर्ट डॉक्टरचे ओपिनियन लागत असेल तर ऑनलाईन ही माहिती उपलब्ध असल्यास दुसऱ्यांकडून त्या रुग्णाच्या बाबतीत ऑनलाईन रेफरंस घेणे सहज शक्य होणार आहे. त्याच बरोबर या रुग्णांना जी औषधे दिली जातात ती किती दिली गेली, किती प्रमाणात दिली गेली याचीही माहिती जर ऑनलाईन टाकली गेली तर जी औषधे आपण त्या रुग्णालायाला दिली त्यातील किती औषधे रुग्णांना दिली गेली यावर मॉनिटरींग होईल आणि त्यांना वेळेत औषध पुरवठा करण्याचे काम सेंट्रलाईज्ड सिस्टिमने जर करता येणे शक्य झाले तर गरिबांसाठी फार मोठी मदत होणार आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.....

अध्यक्ष महाराज, एक्सरे, एम.आर.मशिन्स आपण घेतो. ह्या करोडो रूपयांचा मशिन्स असतात. पण त्यासाठी कर्मचारी नसतो. त्यामुळे ह्या मशिन्स आपण बीओटी तत्त्वावर दिल्या पाहिजेत. यासाठी आपण स्पेसिफिक चार्जेस आकारावेत व तशा पद्धतीने टेंडर्स काढावित. त्यामुळे शासकीय रूग्णालयातील मशिन्स ऑपरेट करण्यासाठी, बसविणे इत्यादी प्रकारची जबाबदारी ही त्या सबंधितांची राहील. अशा प्रकारची आपण सिस्टीम निर्माण केली तर त्याचा फायदा आपल्याला निश्तिचपणे होईल.

आज वैद्यकीय सेवांची किंमत वाढली आहे. शासकीय कर्मचाऱ्याला देखील चांगल्या रूगणालयात जाऊन उपचार करून घेणे शक्य होत नाही. त्यामुळे वैद्यकीय सेवांच्या ज्या काही किंमती आहेत त्याचे आपण नियमन करू शकतो काय याचा देखील विचार करणे गरजेचे आहे.

हृदय रूग्णांचे प्रमाण वाढत आहे. आजचे जीवन धकाधकीचे, घाईगर्दीचे आहे. त्यामुळे हृदय रूग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस भर पडत आहे. माणसाच्या आयुष्यातील ताणाचे प्रमाणे वाढले आहे. हृदय रूग्णांचा पहिला एक तास महत्त्वाचा असतो. त्याला गोल्डन अवर असे म्हणतात. या तासामध्ये त्याला तातडीने उपचार मिळणे आवश्यक असते. त्यामुळे या गोल्डन अवरसाठी शासनाने सामाजिक संस्थेच्या माध्यमातून योजनेची अंमलबजावणी केली तर त्याचा फायदा निश्चितपणाने सर्वसामान्य नागरिकांना झाल्याशिवाय राहणार नाही. मला खात्री आहे की, वेळेत हृदय रूग्णांना उपचार मिळाले तर त्याचा निश्चितच फायदा रूग्णांना झाल्या शिवाय राहणार नाही.

यानंतर मी लहान मुलांशी अत्यंत निगडित असा प्रश्न उपस्थित करणार आहे. काही लहान बालके जन्मतःच मुकी-बहिरी असतात. पहिल्या तीन वर्षात त्यांना कॉकलेअर इम्प्लांटसाठी मदत केली तर बरे होईल. कारण या ट्रीटमेंटसाठी फार मोठा खर्च येतो. साधारणतः 3 ते 5 लाख इतका खर्च येतो. पहिल्या 3 वर्षातील मुलांना अशा प्रकारची सेवा शासनाने उपलब्ध करून दिली तर बरे होईल. अशा प्रकारची मुले फार मोठ्या संख्येने असतील असे मला तरी वाटत नाही. जन्माला येणाऱ्या मुलांचा विमा शासनाने काढला व पहिल्या तीन वर्षामध्ये कॉकलेअर इम्प्लांटची सर्व्हिस मिळाली तर अनेक मुले ऐकू शकतील व सामान्य जीवन जगू शकतील. अशा प्रकारची फार

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.....

मोठी देणगी आपण सरकारच्या वतीने देऊ शकू असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. बोलण्यासारखे अनेक आहे. पण येथे मी सभागृहाचा वेळ घेत नाही. या सर्व्हिसेसमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी संगणकीकरण करणे आवश्यक आहे व ते शासन करेल अशी आशा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द समाप्त करतो. जय हिंद.

...........

...3

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

आरोग्य आणि शिक्षण हे राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे विषय आहेत. हे दोन्ही विषय या 260 च्या प्रस्तावामध्ये आले आहेत. आरोग्य व शिक्षण याकरिता ज्याप्रमाणे तरतूद करायला पाहिजे ती करण्यात येते नाही. दरवर्षी ही तरतूद वाढत जाणे अपेक्षित असताना ती कमी कमी होत चालली आहे. त्यामुळे आरोग्य सेवा ढासळली जात आहे. मी कोकणाचे प्रतिनिधीत्त्व करतो. कोकणभागामध्ये सामान्य आजार सोडले आणि एखादा गंभीर आजार झाला तर त्याला थेट मुंबई गाठावी लागते. मुंबईतील रूग्णालयामध्ये आणावे लागते. अशा प्रकारची अवस्था संपूर्ण कोकणात आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय येथील सेवा चांगली नसल्यामुळे कोकणातील ग्रामीण भागातील जनता आरोग्याची सेवा मिळण्याच्या दृष्टीने अडचणीत आली आहे. अनेक रूग्णालयांमध्ये मी गेलो आहे. मी येथे मोजकी उदाहरणे देखील देईन. मी गेले चार दिवस सिव्हील हॉस्पिटलमध्ये जात आहे. तेथील कर्मचाऱ्यांच्या घरांचा लाईट 25 दिवस कट केला होता. त्यामुळे त्यांच्या मुलांना अभ्यास करता येत नव्हता. तेथील परिस्थिती अत्यंत गंभीर झाली होती. दोन दिवसांमध्ये हा प्रश्न सुटला आहे. रूग्णालयाच्या संबंधित जे काही कर्मचारी आहेत त्यांना देखील योग्य प्रकारे सेवा पुरविणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.खंदारे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

त्याचबरोबर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये केस पेपरचे 5 रुपये किंवा 10 रुपये घेतले पाहिजेत. परंतु जसजशी संध्याकाळ होत जाते तसतसे केसपेपरसाठी रुग्णांकडून 50 रुपये किंवा 100 रुपये घेतले जातात. रुग्णालयात औषधाचा साठा असला तरी बाहेरुन औषधे आणण्यासाठी चिठ्ठी लिहून दिली जाते. बाहेरुन औषधे विकत घेण्यासाठी त्यांना परवडत नाही. सामान्य व गरीब रुग्णाला शासकीय रुग्णालयाशिवाय अन्य रुग्णालयात जाणे परवडत नाही. पण नाईलाजास्तव त्याला खाजगी रुग्णालयाचे दरवाजे ठोठावे लागतात. सर्व जिल्ह्याच्या सिव्हिल हॉस्पिटलची ही परिस्थिती आहे, बाकीच्या ठिकाणी काय परिस्थिती असेल याची कल्पना न केलेली बरी.

माननीय आरोग्य मंत्री हे विक्रमगड येथील हॉस्पिटलचे उद्घाटन करण्यासाठी आले होते. ते त्यांच्या पध्दतीने व प्रामाणिकपणे काम करीत आहेत, उपाययोजना करीत आहेत. परंतु त्यांची पाठ फिरली की अनेक गोष्टी दिसेनाशा होतात. कारण पाठीला डोळे नसतात. पण आम्ही डोळे बनून काम करीत असतो. पत्राद्वारे कळवित असतो, निवेदने देत असतो. अधिकाऱ्यांना फोन करुन सांगत असतो.

सभापती महोदय, मी कर्जत येथील रुग्णालयात गेलो होतो. त्या रुग्णालयाची दुरुस्ती करण्यासाठी निधी नसल्यामुळे स्लॅब कोसळण्याची शक्यता आहे. तसेच पनवेल येथील रुग्णालयात गेलो असताना चालता चालता मला डॉक्टरांनी थांबविले होते. मी आणखी एक पाऊल पुढे टाकले असते तर माझ्या डोक्यावरच ती स्लॅब पडली असती. त्या रुग्णालयाच्या इमारतीचे आयुष्य संपत आलेले आहे. त्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी निधी मिळत नाही. त्याचा प्रस्ताव शासनाकडे पडून आहे तो लवकर मंजूर करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, ज्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालये आहेत त्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पाट्या लावल्या पाहिजेत अशी स्थिती आहे. मी हे जबाबदारीने बोलत आहे. कारण मी प्रत्येक रुग्णालयात गेलेलो आहे. मी लोकांच्या सांगण्यावरुन किंवा वर्तमानपत्रातील बातमीवरुन हे बोलत नाही. कर्जतच्या रुग्णालयात तर कळसच झाला आहे. मी त्या बाबत पत्र लिहून मंत्री

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

महोदयांना कळविलेले आहे. तेथील डॉक्टरांनी हजर नसताना पुढील 4 दिवसांच्या सह्या करुन ठेवल्याचे आढळले होते. मी तेथे गेलो असताना डॉक्टर हजर नव्हते, परंतु त्यांनी मस्टरवर सही केली होती. शासन या सर्व प्रकाराची चौकशी करणार आहे का, शासन अशा प्रकारे आरोग्य सेवा देणार आहे का ?

सभापती महोदय, अलिबाग येथील रुग्णालयात एक पेशंट पायरीवर रडत बसला होता. मी त्याला विचारल्यावर त्याने मला असे सांगितले की, मी दोन दिवस रुग्णालयात फे-या मारत आहे, पण दोन दिवसापासून तपासण्यासाठी येथे डॉक्टरच नाहीत. ग्रामीण भागातील प्रा.आ.केंद्रांची किंवा ग्रामीण रुग्णालयांची दैन्यावस्था असेल तर सामान्य माणूस तेथे जाणार नाही, तेथे जाण्यास कोणीही सांगणार नाही. खाजगी रुग्णालयात जाणे परवडणार नाही, त्यामुळे मरण्याशिवाय त्याच्यासमोर दुसरा पर्याय शिल्लक रहात नाही. सगळया जिल्ह्यातील रुग्णालयांची ही अवस्था आहे. मंत्री महोदय उत्तर देताना कदाचित असे सांगतील की, आम्ही रिक्त पदे भरणार आहोत, औषध साठा मुबलक आहे. प्रत्यक्षात याच्या उलट परिस्थिती पहावयास मिळते ती खूपच दुर्दैवी आहे. विक्रमगडच्या हॉस्पिटलला आजही ॲम्ब्यूलन्स मिळालेली नाही. शासनाने 17 ॲम्ब्यूलन्सची व्यवस्था केलेली आहे, हे वाचून मला फार आनंद वाटला आहे. या वेळच्या पावसाळ्यात सर्प दंशामुळे माणसे किंवा मुले मरणार नाहीत. त्यांची काही तरी व्यवस्था झालेली आहे. ग्रामीण भागात सर्प दशाच्या केसेस खूप होतात. ठाणे जिल्ह्यात सर्प दंश झाल्यानंतर वेळेवर उपचार न झ ाल्यामुळे अनेक मुले मरण पावलेली आहेत. पण आता त्यांच्यावर त्याला आळा बसेल.

ठाणे जिल्ह्यात मनोरुग्णालय आहे त्याचे नाव बदलण्यात येणार आहे अशी माझी माहिती आहे. पण माझी तशी मागणी आहे की, या रुग्णालयाचे नाव बदलण्यात यावे. एका बाजूला त्या मनोरुग्णालयाच्या इमारतीच्या विस्ताराचे भूमिपूजन केले जात आहे. दुसऱ्या बाजूला तेथील 200 कंत्राटी कामगारांना सहा महिन्यांचे वेतन दिले नव्हते. आता काय परिस्थिती आहे ते मला माहीत नाही. पण 31 मार्चपूर्वी कंत्राटी कामगारांचे सहा महिन्यांचे वेतन दिले जाणार होते ते दिले आहे की नाही ते मंत्री महोदयांनी उत्तरातून सांगावे.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

शासकीय रुग्णालयात औषधांचा साठा नसल्यामुळे, योग्य उपचार मिळाले नाहीत म्हणून डॉक्टरांवर रुग्णांच्या नातेवाईकांकडून हल्ले होतात. या प्रकाराबाबत शासनाने गंभीरपणे पावले उचचली पाहिजेत. कारण त्या ठिकाणी डॉक्टर्स काम करण्यास तयार नाहीत. ते बदली करण्याची मागणी करीत आहेत. यापूर्वी त्या त्या सिव्हिल हॉस्पिटलसाठी, जिल्हा रुग्णालयासाठी कमिटी नेमली होती. त्या कमिटीद्वारे या रुग्णालयांचे मॉनेटरिंग केले जात होते. त्यातून सामान्य माणसांच्या अडचणी काय आहेत, रुग्णालयांच्या अडचणी काय आहेत ते समजून घेतले जात होते. त्या समित्यांचे पुनर्गठन करण्यात यावे अशी मी मागणी करतो.

त्याचप्रमाणे समाजात नेत्र दान करु इच्छिणाऱ्यांची संख्या खूप आहे. मी माझा अनुभव सांगतो. रत्नागिरी जिल्ह्यातील 150 लोकांनी नेत्र दानाची इच्छा प्रदर्शित केलेली आहे, त्यापैकी 8 व्यक्तींचे हॉस्पिटलमध्ये निधन झाले परंतु त्यांना नेत्र दान करता आले नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

कारण नेत्रदानाच्या संदर्भात आपल्याकडे जी व्यवस्था असायला पाहिजे ती नाही. त्याबाबतीत पाठपुरावा केल्यानंतर ती व्यवस्था झाली हा भाग वेगळा. महाराष्ट्रामध्ये देहदान करण्यासाठी, नेत्रदान करण्यासाठी मोठ्या संख्येने लोक पुढे येत आहेत. मला आठवते की, विधानसभेतील ठाण्याचे एक माजी सन्माननीय सदस्य श्री. चौधरी यांचे निधन झाल्यानंतर त्यांनी देहदान करावे अशी अंतिम इच्छा लिहून ठेवली होती. परंतु देहदानासंबंधीची व्यवस्था नसल्यामुळे त्यांचे देहदान होऊ शकले नाही. नेत्रदान आणि देहदान यांची ठिकठिकाणी व्यवस्था असेल तर दुस-या रुग्णांना उपयोग होऊ शकतो. अशा प्रकारची व्यवस्था करण्यासाठी केन्द्र शासनाकडून निधी उपलब्ध होतो. तेव्हा केन्द्र शासनाच्या निधीचा वापर करुन ही व्यवस्था प्राधान्याने राज्यामध्ये उपलब्ध करुन द्यावी अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, हा असा विषय आहे की, यावर बोलण्यासारखे खूप मुद्दे आहेत. अशा चर्चेसाठी 2 तासाचा वेळ पुरा पडणार नाही. या विषयी मंत्री महोदयांकडून ठोस उपाययोजना अपेक्षित असून त्या त्यांनी कराव्यात, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलत असताना मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. कारण सार्वजनिक आरोग्य विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी या विभागाला न्याय देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. आम्ही सन्माननीय सदस्य पंचायती राज समितीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केन्द्रे, रुग्णालये यांना भेटी देत असतो. या भेटी देत असताना शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीची एक चांगली योजना राज्य शासना मार्फत राबविली जात असल्याचे निदर्शनास आले. परंतु आमच्या भेटी दरम्यान विदर्भ, मराठवाडा या ग्रामीण भागामध्ये असे आढळून आले आहे की, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झाल्यानंतर, काही विद्यार्थ्यांमध्ये हृदयविकारासारखे गंभीर आजार आढळून आल्यानंतर त्यांना संदर्भसेवा दिली जाते. ही संदर्भसेवा दिल्यानंतर त्या विद्यार्थ्यांच्या आरोग्या बाबत कोणत्याही प्रकारचा पाठपुरावा केला जात नाही. माझे असे सांगणे आहे की, गंभीर आजार असलेल्या विद्यार्थ्याला केवळ संदर्भ सेवा देऊन थांबू नये तर तो विद्यार्थी संपूर्णपणे बरा होईपर्यन्त त्याच्या आरोग्याची काळजी घेतली गेली पाहिजे.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केन्द्रे, जिल्हा रुग्णालये यामध्ये वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त आहेत. ग्रामीण भागामध्ये डॉक्टर का जात नाहीत, त्याबाबतीत काय उपाययोजना करता येतील याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्याचा आरोग्याचा प्रश्न प्रत्येक अधिवेशनामध्ये उपस्थित करण्यात येतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वैद्यकीय अधिका-याची 115 पदे मंजूर असून त्यापैकी 62 पदे भरलेली आहेत व 53 पदे रिक्त आहेत. सिंधुदुर्गमधील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये 1999मध्ये सिटीस्कॅन मशिन देण्यात आले. परंतु त्याठिकाणी रेडिओलॉजिस्टचे पद रिक्त होते त्यामुळे त्या मशिनचा उपयोग होऊ शकला नाही. आपण रुग्णालयामध्ये मोठमोठ्या मशिन्स देतो, परंतु त्या योग्य प्रकारे हाताळण्याचे ज्ञान असणारे मनुष्यबळ पुरवत नसल्यामुळे त्या मशिन्स बंद पडतात. मध्यंतरी कणकवलीमध्ये लेप्टोस्पारोरिसची साथ आली होती. त्यामध्ये 26 लोकांचा मृत्यू झाला होता. या वर्षी कणकवलीमध्ये प्लेटलेट आणि ब्लडबँकेची सुविधा केल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

..3..



MSS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:40

श्री. राजन तेली...

राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरोग्य सेवा उत्तम आहे. आमच्या जिल्ह्यातील दवाखाने स्वच्छ आणि टापटीप असतात. मात्र वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त आहेत. आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सिव्हिल रुग्णालयामध्ये सोडल नावाचे सिव्हिल सर्जन गेली 30 वर्षे फार चांगले काम करीत आहेत. त्या सिव्हिल रुग्णालयामध्ये रुग्णांना अतिशय चांगल्या प्रकारच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. यामुळे त्या परिसरातील खाजगी डॉक्टर सोडल यांची बदनामी करीत आहेत. तेव्हा या खाजगी डॉक्टरांचा बंदोबस्त कसा करायचा याचाही विचार करण्याची गरज आहे. कोकणासाठी मेडिकल कॉलेज काढण्याचे प्रयत्न व्हावयास पाहिजेत.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

सभापती महोदया, मला एक सगळयात महत्वाचा विषय मांडावयाचा आहे. जिल्हा परिषदेतील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. जिल्हयातील ग्रामीण भागातील बऱ्याच प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना ओ.पी.डी.नसते. प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि सिव्हील हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय अधिकारी यांचे एकत्रिकरण करता येईल काय याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना काहीही कामे नसतात.त्या ठिकाणी दोन दोन वैद्यकीय अधिकारी कार्यरत असतात. त्यातील एका वैद्यकीय अधिकाऱ्यास देखील ओ.पी.डी.नसते. त्यामुळे तेथील एक वैद्यकीय अधिकारी 15 दिवस रजेवर जातो, तो वैद्यकीय अधिकारी रजेवरुन परत आल्यानंतर दुसरा वैद्यकीय अधिकारी रजेवर जातो. म्हणून सिव्हील हॉस्पिटलच्या आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना एकाच चॅनेलवर एकत्र आणून, त्यांना आरोग्य सेवेत कसे वापरता येईल, या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता नाही. तेथे वैद्यकीय अधिकारी पुरेसे आहेत. सिव्हील हॉस्पिटलमध्ये देखील वैद्यकीय अधिकारी पुरेसे आहेत, म्हणून त्यांना एकाच चॅनेलवर आणून त्यांच्याकडून आरोग्य सेवा उपलब्ध करुन घेण्याचा शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आरोग्याच्या बाबतीत जीवनदायी आणि विमा योजना कार्यान्वित आहेत. या योजनांचा वर्षातून किती लोकांना फायदा होतो, त्याचा तपशील माननीय आरोग्य मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयात 17 क्रमांकाचा हायवे आहे. युती सरकारच्या वेळी महाड आणि कणकवली येथे ट्रॉमा केअर युनिट देण्याची घोषणा केली गेली होती. ती घोषणा शासनाने मान्य देखील केली होती. महाड आणि कणकवली येथे ट्रॉमा केअर युनिट सुरु करण्याबाबत माननीय आरोग्य मंत्र्यांनी प्रयत्न करावेत, अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

श्री.दिवाकर रावेत : या प्रस्तावाच्या अनुषंगाने अनेक सन्माननीय सदस्यांना अजून बोलावयाचे आहे, त्यामुळे या प्रस्तावावरील उत्तराचे भाषण उद्या ठेवावे.

श्री. सुरेश शेट्टी : ठीक आहे.

-----

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे ( नाशिक विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये अतिशय महत्वाच्या विषयावर सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी चर्चा उपस्थित केली आहे.

सभापती महोदय, राज्यातील जनतेला सहजतेने आणि परवडणारी आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या माध्यमातून अनेक कार्यक्रम व योजना राबाविल्या जात असतात. सदर कार्यक्रम आणि योजना अधिक प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे असतील, ग्रामीण रुग्णालये असतील, जिल्हा रुग्णालये असतील, या ठिकाणी अत्याधुनिक यंत्रणे उपलब्ध करुन देणे नितांत गरजेचे आहे. या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील गरीब रुग्णांसाठी त्या रुग्णालयांमध्ये औषधांचा पुरवठा करणे आवश्यक आहे व त्यासाठी मोठया प्रमाणात शासनाने तरतूद उपलब्ध करुन दिली पाहिजे.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि कामगार यांची आर्थिक परिस्थिती अतिशय नाजूक असते. घरातील एखादी व्यक्ती आजारी पडली तर कुटुंबातील मुख्य व्यक्तीस रोजगार बंद ठेवून त्या रुग्णास रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी वेळ आणि पैसे उपलब्ध करुन घ्यावा लागतो. चांगल्या रुग्णालयात पैशां अभावी ते रुग्ण औषोधोपचार घेऊ शकत नाही. खाजगी डॉक्टरकडे जावून औषोधोपचार घेण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नसते. म्हणून ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उप केंद्रे, तालुका रुग्णालये येथे रुग्णांना चांगली सुविधा उपलब्ध करुन दिली पाहिजे.

सभापती महोदय, ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी तसेच इतर कर्मचारी वर्ग भरण्याचा प्रयत्न शासनाकडून झालेला आहे. परंतु अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. ती पदे तात्काळ भरण्यात यावीत. प्राथमिक केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा उप रुग्णालये आहेत, त्या ठिकाणी ज्या पध्दतीची पदे पाहिजेत, ती पदे भरलेली नसतात. त्यामुळे रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नाही. म्हणून सदरहू पदे भरणे आवश्यक आहे. ही पदे ताबडतोब भरली गेली तर ग्रामीण भागातील रुग्णांना चांगल्या प्रकारे सुविधा पुरविता येतील. जे अस्थायी स्वरुपाचे वैद्यकीय अधिकारी आहेत, त्यांना कामे करुन पाच-पाच, सहा-सहा

3...



ABG/ ST/ प्रथम श्री.भोगले 12:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे...

वर्षे होऊन गेली आहेत. त्यांना स्थायी करण्याच्या संदर्भात शासनाने एखादी योजना राबवावी, अशी मी माननीय आरोग्य मंत्र्यांना मी विनंती करतो. त्याच बरोबर प्राथमिक आरोग्य केंद्रे, उप केंद्र, तालुका केंद्रामध्ये तातडीने वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन द्यावेत अशीही माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, जीवनदायी योजना राबविण्याच्या संदर्भात शासनाकडून काही निर्णय घेतले जातात. यासंदर्भात वाचल्यानंतर आणि ऐकल्यानंतर थोडासा आनंद वाटतो. राजीव गांधी जीवनदायी योनजेच्या संदर्भामध्ये ज्याप्रमाणे आपण बी.पी.एल.कार्डधारकांना त्यासंबंधी सुविधा उपलब्ध करुन देतो. ए.पी.एल.मधील लोक देखील गरीब आहेत. ते गंभीर आजारावरील उपचारासाठी पैसा उपलब्ध करु शकत नाही. या योजनेतील काही निकषांमध्ये बदल करुन ए.पी.एल.च्या लोकांना देखील राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ उपलब्ध करुन देण्याचा राज्य शासनाने प्रयत्न करावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ 12:50

श्री.दिलीपराव सोनवणे........

सभापती महोदया, 'डॉक्टर तुमच्या दारी' ही योजना चांगली होती. परंतु या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली असती तर बरे झाले असते. ही योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. रुग्णालयातील स्वच्छता हा विषय अत्यंत गहन बनलेला आहे. रुग्णालयातील स्वच्छतेवर अधिक भर देणे गरजेचे आहे. भविष्यात रुग्णालयांमध्ये स्वच्छता कशी राहील यासाठी शासनाकडून प्रयत्न केले जातील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. रुग्णालयामध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांना जेवणाची सोय केली पाहिजे. प्रा.आ.केंद्र, ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना जेवण मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य केंद्रामार्फत तपासणी होत असते. परंतु आरोग्य तपासणीमध्ये संदर्भ सेवेची गरज असेल, शस्त्रक्रिया करण्याची गरज असेल तर पुढील औषधोपचाराची व्यवस्था करण्याबाबत लक्ष दिले तर विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. कुपोषण, बाल मृत्यू, भ्रूण हत्या या संदर्भात ज्या योजना आखण्यात आल्या आहेत त्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. आरोग्य विभागामार्फत ग्रामीण भागासाठी ज्या ज्या योजना आखण्यात आल्या आहेत त्या प्रभावीपणे राबविल्या गेल्या तर निश्चितपणे जनतेला फायदा होईल. ग्रामीण भागातील गरीब रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्याच्या संदर्भात या चर्चेच्या माध्यमातून सूचना करण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून माझे भाषण संपवितो.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदया, या विषयावर वारंवार या सभागृहात चर्चा होत असताना सिंधुदुर्ग जिल्हयातील जिल्हा रुग्णालय व उप जिल्हा रुग्णालयात आरोग्य सेवेबाबत सुरु असलेली दुर्दशा मी अनेकदा या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मंत्री महोदयांनी या सभागृहात असे आश्वासन दिले होते की, राज्यात 2000 वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून ती लवकरच भरली जातील. त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्हयात 28 वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती देण्यात आली. त्यातील किती डॉक्टर आज सिंधुदुर्ग जिल्हयात कार्यरत आहेत हा संशोधनाचा विषय ठरेल. मंत्री महोदय उत्तराच्या भाषणात सांगतील की, आपल्यासारख्या लोकप्रतिनिधींकडून चिठ्ठी देण्यात आल्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची बदली केली गेली. विरोधी पक्षातील माननीय सदस्यांकडून डॉक्टरांच्या बदलीची विनंती करण्यात आलेली नाही. कदाचित सत्ताधारी पक्षातील लोकप्रतिनिधींकडून तशी मागणी केली गेली असावी. परंतु सिंधुदुर्ग जिल्हयात डॉक्टरांची पदे भरण्याबाबत वारंवार मागणी केली जात असताना नव्याने नियुक्ती दिलेल्या डॉक्टरांची बदली न करता त्यांना तेथेच कार्यरत ठेवावे. मागील अधिवेशनात मंत्री महोदयांनी जाहीर केले होते की, कोकणात डॉक्टर काम करण्यास का इच्छूक नाहीत या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांचे पालकमंत्री व संबंधित आमदारांच्या समवेत मी बैठक आयोजित करतो. परंतु अद्याप अशी बैठक घेण्यात आलेली नाही याकडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. आम्ही तेथील डॉक्टरांशी चर्चा केल्यानंतर त्यांनी असे सांगितले की, नक्षलवादी आणि आदिवासी भागात काम करणाऱ्या डॉक्टरांना विशेष भत्ता दिला जातो त्याच धर्तीवर कोकणातील डोंगरी भागात काम करणाऱ्या डॉक्टरांना विशेष भत्ता दिला जावा. या मागणीबाबत मंत्री महोदयांनी निश्चित विचार करावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालय 1998 मध्ये सुरु झाले. त्या रुग्णालयात सी.टी.स्कॅन मशिन, सोनोग्राफी मशिन, कार्डियाक मशिन पुरविण्यात आले. परंतु त्यासाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञ व रेडिऑलॉजिस्ट ही पदे भरण्यात आलेली नाहीत. तंत्रज्ञ उपलब्ध करुन देण्याची मागणी केल्यानंतर कोल्हापूर येथील तंत्रज्ञ 15 दिवसातून एकदा सिंधुदुर्ग जिल्हयात

..3..



SGB 12.50

श्री.परशुराम उपरकर.......

सेवा देण्यासाठी येईल अशी व्यवस्था केली गेली. परंतु दोन महिन्यानंतर तंत्रज्ञ येण्याचे बंद झाले. त्यामुळे जिल्हा रुग्णालयात उपलब्ध असलेल्या मशिन्स धूळ खात पडून आहेत. आज तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कमिशन बेसीसवर आपला व्यवसाय सुरु केलेला आहे. तेथील वैद्यकीय अधिकारी रुग्णांना ठराविक खाजगी रुग्णालयात किंवा पॅथॉलॉजिस्टकडे पाठवितात. कोणत्याही आजाराचे विश्लेषण करावयाचे झाल्यास सर्वप्रथम रक्त तपासणीची गरज असते. परंतु रुग्णांना ठराविक पॅथॉलॉजिस्टकडून रक्त तपासणी करुन घेण्याची सक्ती केली जात आहे. अशा प्रकारची कमिशन बेसीसवर सुरु असलेली प्रॅक्टिस ताबडतोब थांबली पाहिजे. एकीकडे सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोग्य व्यवस्थेच्या दुर्दशेबाबत चर्चा होत असताना शासनाने सिंधुदुर्ग येथील जिल्हा रुग्णालय 200 खाटांचे करण्याचा निर्णय घेतला आहे. तेथील आरोग्य सेवेच्या दुरवस्थेबाबत अनेकदा या ठिकाणी बोलले गेले आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ........

200 खाटांचे रुग्णालय करुन शासन काय साध्य करणार आहे हेच मला समजत नाही. मुळात अस्तित्वात असलेले रुग्णालयच सुस्थितीत नाही तर नवीन रुग्णालय देण्याचे कारण काय आहे याचा विचार होणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे या ठिकाणी राष्ट्रीय महामार्गावर अनेक वेळा अपघात होऊन लोक दगावतात म्हणून तेथे ट्रॉमा केअर सेंटरची सुविधा होणे आवश्यक आहे. कोल्हापूर आणि गोव्यासारखी या ठिकाणी मृत झालेल्यांची आकडेवारी दिली तर या रुग्णालयात किती रुग्ण दगावतात याची माहिती शासनाला सुध्दा कळेल, म्हणून ही व्यवस्था करणे आवश्यक आहे.

महोदय, माझी अशी विनंती आहे की, या रुग्णालयात लेप्टो रुग्णांसाठी प्लेटलेट सेप्रेशन युनिट कोणत्याही परिस्थितीत चालू करतो म्हणून सांगितले आहे, अद्यापही हे युनिट सुरु झालेले नाही, शासनाने लवकरात लवकर प्लेटलेट सेप्रेशन युनिट सुरु करण्यात यावे. सेल्फ काऊंटींग मशीन कणकवली, कुडाळ या रुग्णालयामध्ये देण्यात यावी. हे युनिट सुरु झाल्यानंतर प्लेटलेटसचे रिपोर्ट तातडीने येऊ शकतात. तसेच शासनाच्या अंदमान येथून आलेल्या टीमने दिलेला संशोधन अहवाल विचारात घेऊन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लोकांना आरोग्य सुविधा मिळण्यासाठी योग्य ते सहकार्य शासनाने करावे, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----------

...2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी राज्यातील आरोग्य व्यवस्थेसंबंधी जो प्रस्ताव सभागृहात चर्चेला आणलेला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, राज्यात सार्वजनिक आरोग्य सेवेसाठीचा निधी वाढवित असताना रुग्णांना जास्तीत जास्त सेवा देण्याचा प्रयत्न शासन करीत असते. हे करीत असताना आपल्या राज्यातील निधी मात्र दिवसेदिवस कमी कमी होत आहे, आरोग्य सेवेवरील दरांमध्ये मात्र वाढ झालेली आहे. तेव्हा हा जो उलटा प्रवास सुरु आहे तो पाहिला तर आरोग्याची स्थिती अत्यंत खराब होऊ शकते. शासनाचे विशेष करुन सार्वजनिक आरोग्य विभागाचे "सर्वांसाठी आरोग्य" हे ब्रीद वाक्य आहे परंतु आरोग्य सेवेतील अडी-अडचणी पाहिल्या तर सर्वांसाठी आरोग्य खरोखरच शासनामार्फत दिले जाते काय हा संशोधनाचा विषय आहे. भरमसाठ महागाईमुळे त्रस्त झालेल्या गरीब माणसाला दैनंदिन जीवन जगतांना जी कसरत करावी लागते ते एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला आरोग्य सेवेच्या दरांमध्ये झालेली वाढ या सर्व गोष्टींचा शासनाने विचार करण्याची वेळ आली आहे. कारण दवाखान्यात आंतररुग्ण म्हणून 10 रुपये पूर्वी घेतले जात होते, त्यात आता 20 रुपयापर्यंतची वाढ केली आहे. एक्स-रे काढण्यासाठी 30 रुपयाऐवजी 50 रुपये द्यावे लागतात तर सी.टी. स्कॅनसाठी लागणाऱ्या 300 रुपयांऐवजी 500 रुपये भरावे लागतात. ही वाढ गरिबांना न परवडणारी आहे. आरोग्य विभागाच्या वतीने ग्रामीण भागात ज्या सोई-सवलती दिल्या जातात त्या खरोखरच शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार मिळतात काय याचा विचार केला तर आदेशांचे पालन केले जात नाही असेच दिसून येईल. प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा ग्रामीण रुग्णालय किंवा उप जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी ओपीडीचे प्रमाण जास्त असते. कारण गोर गरीब रुग्ण अशा दवाखान्यात जास्त प्रमाणात येत असतात पण त्यांना आवश्यकतेनुसार औषधांचा पुरवठा केला जात नाही. एकदा एका महिलेचे डोके दुखत होते, ती सरकारी दवाखान्यात गेल्यानंतर डॉक्टरांनी डोके दुखीचे औषध दवाखान्यात नाही असे सांगून तिला बाहेरुन औषध विकत घेण्यास सांगितले. मला जेव्हा ही बातमी कळली तेव्हा मी त्या डॉक्टरांना फोन केला. तेव्हा डॉक्टर स्वत: सारवासारव करण्याचा प्रयत्न करुन सांगत होते की, त्या महिलेचा रक्तदाब वाढला होता म्हणून बाहेरुन औषध घेण्याचा सल्ला दिला. अशा प्रकारे शासनाच्या निकषांप्रमाणे ग्रामीण भागातील रुग्णांना औषधांचा पुरवठा केला जात नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे ..

तेव्हा ग्रामीण भागातील रुग्णांना आपण खरोखर औषधाच्या सोयी सवलती देतो काय ?सांगली जिल्हयामध्ये दोन उप जिल्हा रुग्णालये आहेत.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ पाच मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदया, सांगली जिल्हयामध्ये दोन उप जिल्हा रुग्णालये आहेत. त्यातील एक उप जिल्हा रुग्णालय कवठेमहांकाळ तालुक्यामध्ये असून त्या ठिकाणी दोन डॉक्टर्स आहेत. तेथे औषधांचा पुरवठा केला जात नाही. याबाबतीत डॉक्टरांना विचारल्यानतर ते असे सांगतात की, औषधे येणार आहेत. ही बाब तपासून पहावी अशी माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे.सिव्हील सर्जनसुध्दा सांगतात की औषधांचा पुरवठा झालेला नाही. एनआरएचएम मधून वेगळया पध्दतीने ओषधांचा पुरवठा केला जातो बाकीच्या योजनांखाली वेगळया पध्दतीने ओषधांचा पुरवठा केला जातो. परंतु वेळेवर ओषधाचा पुरवठा केला जाता नाही त्याचबरोबर स्टॉक रजिस्टर व्यवस्थितपणे मेन्टेन केले जात नाही. स्टॉक रजिस्टर चेक करुन त्यावर डीएचओ, सिव्हील सर्जन वा अन्य वरिष्ठ डॉक्टर्स सहया करत नाहीत विविध योजनांसाठी शासनाकडून निधी दिला जातो आणि विविध योजना अंमलात आणल्या जातात परंतु त्याची अंमलबजावणी प्रशासनाकडून योग्य प्रकारे होत नाही तेव्हा या योजनांची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे झाली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी जे. जे. रुग्णालयाचा येथे उल्लेख केला होता. त्या ठिकाणी डॉ. लहाने यांच्या सारखे नामांकित डीन आहेत. जे. जे. हॉस्पिटल असो वा महानगरपालिकेचे मोठे हॉस्पिटल असो त्या ठिकाणी चांगल्या प्रकारची आरोग्य सुविधा मिळते अशा प्रकारचा आत्मविश्वास लोकांच्या मनामध्ये निर्माण झालेला आहे. त्या ठिकाणी कार्डिओ सर्जिकल विभाग , न्युरो सर्जन विभाग , किडनीवर उपचार करणारा विभाग इत्यादी ठिकाणी अपग्रेडेशन करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर त्या ठिकाणी पॅरा मेडिकल स्टाफ वाढविण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. 50 कोटी रुपयांची मागणी त्यांनी केलेली आहे तेव्हा 50 ते 70 कोटी रुपयांची तरतूद जर केली व पॅरा मेडिकल स्टाफ वाढविण्यात आला तर रुग्णांना चांगल्या प्रकारची सोय उपलब्ध होऊ शकेल व तेथे सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटल निर्माण होईल असे मला वाटते.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे ..

सभापती महोदया, औषधे खरेदी करण्याकरिता 7 कोटी 20 लाख रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. अनेक वर्षापासून एवढीच तरतूद केली जाते त्याकरिता अधिक तरतूद करण्यात यावी असे मला सांगावयाचे आहे .गोर गरीब रुग्णांना आरोग्याच्या चांगल्या सोयी सुविधा देत असतांना आमदार सुध्दा एखाद्या रुग्णालयामध्ये ॲडमिट झाले तर त्यांना लागणारा औषधाचा पुरवठा 100 टक्के त्या रुग्णालयाकडून दिला जाईल याची खात्री नाही. त्यांनासुध्दा लागणारे ओषधे खरेदी करण्याचे अधिकार रुग्णालयांना नाहीत. त्यामुळे गोर गरिबांना तर ओषधे मिळत नाहीच परंतु एखादा आमदार जर त्या ठिकाणी ॲडमिट झाले तर त्यांनाही औषधे मिळत नसतील तर ते बरोबर नाही. त्यामुळे ही बाब तपासून पाहण्यात यावी असे मला सांगावयाचे ओ.

सभापती महोदया, राजीव गांधी जीवनदायी योजना ही केन्द्र सरकाराची आहे. त्याकरिता राज्य शासना मार्फत 250 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे . ही योजना सहा जिल्हयासाठी का लागू करण्यात आली नाही. तेव्हा सर्व जिल्हयामध्ये या योजनाची अंमलबजावणी करण्यात यावी.असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, राज्य शासनाच्या काही योजना खरोखर चांगल्या आहेत.ग्रामीण भागातील महिलांना स्तनपान करण्याचे प्रशिक्षण देण्याची एक योजना चांगली आहे. हिरकणी नावाचा कक्ष काही ग्रामीण भागात सुरु करण्यात आल्याचे आम्हाला पहावयास मिळाले आहे. तेव्हा ग्रामीण भागातील गोर गरिब महिलांना व मुलांना उपयोगी पडतील या दृष्टीने काही चांगल्या योजना शासनाने सुरु केलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली तर त्याचा फायदा अधिक लोकांना मिळेल. या ठिकाणी मांडण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ज्या सूचना करण्यात आलेल्या आहेत त्या अंमलात आणल्या तर ग्रामीण भागातील जनतेला त्याचा उपयोग होऊ शकतो एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनीष जैन ( जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी जो प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सर्वश्री.हेमंत टकले,हुसेन दलवाई,सुभाष चव्हाण, रमेश शेंडगे इत्यादीनी आपले विचार व्यक्त केले असल्यामुळे मलाही त्याबाबतीत दोन शब्द मांडण्याची इच्छा झाली असून मला आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदया, माननीय मंत्र्यांना मी असे सुचवू इच्छितो की, खाजगी डॉक्टरांनी आठवडयातून दोन तीन तास वा दिवसातून दोन तीन तास सरकारी रुग्णालयातील रुग्णांची तपासणी करण्याची त्यांच्यावर सक्ती करावी. माझ्या तालुक्यामध्ये ॲम्बुलन्स फार कमी आहेत. माझ्याकडे सर्प दंश झालेल्या एका पेशंटची माहिती आहे.. त्या पेशंटला ॲम्बुलन्सची आवश्यकता होती. शेतकरी, शेतमजूर शेतामध्ये काम करीत असतात व त्या ठिकाणी सर्प दंशांच्या केसेस जास्त होत असतात ........

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनीष जैन...

खेडेगावामध्ये शेतकरी शेतामध्ये काम करीत असतांना त्यांना सर्पदंश होतो त्यावेळी त्या शेतकऱ्याला तात्काळ औषधोपचाराची आवश्यकता असते...

**तालिका सभापती (ॲड. उषा दराडे)** : माननीय सदस्यांनी आपले भाषण अपूर्ण ठेवावे आणि पुढील वेळी अपूर्ण राहिलेले भाषण पुढे सुरु करावे. या प्रस्तावावरील चर्चा आता थांबविण्यात येत आहे. उर्वरित चर्चा आणि मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण नंतर पूर्ण करण्यात येईल.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनी पुन: भरेल.

(दुपारी 1.05 ते 1.15 पर्यन्त बैठक स्थगित झाली.)

-------

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

नियम 289 अन्वये प्रस्तावाबाबत

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव आलेले आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विश्वकरंडक स्पर्धेमध्ये भारतीय क्रिकेट संघाने विश्वकरंडक जिंकल्याबद्दल अभिनंदनाच्या प्रस्तावाची नोटीस दिलेली आहे. त्याचप्रकारे सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील यांनी सुध्दा नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा प्रस्ताव घेण्यात यावा आणि श्री.सचिन तेंडूलकर यांना "भारतरत्न" या पुरस्काराने गौरविण्यात यावे अशी शिफारस विधान परिषदेने करावी अशी नोटीस दिलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला नसून, तो नियम 14 अन्वये दिलेला आहे.

**सभापती** : ठीक आहे. मी हा प्रस्ताव सभागृहाच्या वतीने सन्माननीय सभागृहाचे नेते यांना मांडण्यास सांगणार आहे. त्या प्रस्तावाला सन्माननीय विरोधी पक्षनेते अनुमोदन देतील, त्यानंतर विविध पक्षाचे गट नेते त्यावर आपापले विचार मांडतील. यासाठी प्रश्नोत्तराच्या तासातील किमान 15 मिनिटे कमी होतील, ती 15 मिनिटे मी पुढे वाढवून देणार आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी याठिकाणी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. परवा भारतीय क्रिकेट संघाने वर्ल्डकप जिंकला आणि या देशातील करोडो जनतेला परमोच्च आनंद मिळवून दिलेला आहे. आपण या सदनामध्ये त्याचा अभिमान आणि आनंद झाल्याचे व्यक्त केले पाहिजे. महेंद्रसिंग धोनीच्या टीमने जे कर्तृत्व दाखविले त्याने या देशातील ...

**सभापती** : मी ज्यावेळी अभिनंदनाच्या प्रस्तावावर गट नेता म्हणून आपल्याला बोलण्यासाठी परवानगी देईन, त्यावेळेस आपण हे सगळे बोलावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण वर्ल्डकपच्या बाबत सांगितले. पण मला एकच विनंती करावयाची आहे की, या विजयामध्ये ज्याचा सिंहाचा वाटा आहे, त्या श्री.सचिन तेंडूलकरला "भारतरत्न" किताब मिळाला पाहिजे यासाठी आपण शिफारस करणे आवश्यक आहे. परंतु आपल्या कडून तशी शिफारस करण्यात आलेली नाही. त्याचा उल्लेख या प्रस्तावामध्ये होणे आवश्यक आहे. त्यासाठी मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे.

**सभापती** : आपल्या सर्वांच्या मनामध्ये नक्की हीच भावना आहे आणि सभागृहाचे सन्माननीय नेते सुध्दा या गोष्टीची जरुर नोंद घेतील.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : जर श्री.सचिन तेंडूलकर यांना "भारतरत्न" पुरस्कार दिला तर तो सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्यामुळे मिळाला असे होईल.

**सभापती** : तसे नाही. सभागृहातील दोन्ही बाजूच्या सर्व सन्माननीय सदस्यांची भावना हीच आहे म्हणून मी आता या सभागृहाचे नेते सन्माननीय श्री.अजित पवार साहेब यांना येथे अभिनंदनाचा ठराव मांडण्यासाठी परवानगी देतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपले अभिनंदन करतो की, सदरहू प्रस्ताव सभागृहाने मिळून केला आहे. त्यामुळे याठिकाणी हा प्रस्ताव काही सन्माननीय सदस्यांनी मांडला असे होता कामा नये. त्यामुळे या संबंधातील अगोदरचे कामकाज काढून टाकण्यात यावे आणि या सभागृहाने संयुक्तपणे हा प्रस्ताव मंजूर करावा. तसे झाले तर त्याचे महत्व जास्त आहे असे मला वाटते, कोणत्याही व्यक्तीचा उल्लेख असू नये.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपल्याला विनंती केली आहे . . . .

**सभापती** : त्याबाबतीत मी निर्णय दिला की, मी सभागृहाच्या वतीने सदनाच्या नेत्यांना अभिनंदनाचा ठराव मांडण्यास सांगितले आहे आणि माननीय विरोधी पक्षनेते त्याला अनुमोदन देतील.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत विश्व विजेता ठरल्याबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन

**मु. शी.** : विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत विश्व विजेता ठरल्याबद्दल भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा प्रस्ताव

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विश्व विजेत्या भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत आहे.

"तब्बल 28 वर्षाच्या प्रतीक्षेनंतर 121 कोटी भारतीयांच्या अपेक्षा पूर्ण करीत विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत विश्व विजेता ठरलेल्या भारतीय संघाचे ही विधान परिषद मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन करीत आहे. भारतीय संघाचा कर्णधार महेंद्रसिंह धोनी, विक्रमवीर सचिन तेंडूलकर, मालिकावीर युवराज, झहीर खान आणि इतर संघातील सर्व खेळाडू यांनी भारताला हा बहुमान प्राप्त करुन देऊन भारतीयांची मान जगात उंचावली आहे.

जगज्जेत्या भारतीय संघात राज्याचे प्रतिनिधित्व करणारा महाराष्ट्राचा सुपुत्र विक्रमवीर सचिन तेंडुलकर आणि झहीर खान या खेळाडूंना राज्य शासनाच्या वतीने एक कोटी रुपये आणि मानपत्र देऊन त्यांचा उचित गौरव करण्यात येणार आहे.

तसेच या सामन्यासाठी वानखेडे स्टेडियम सुसज्ज ठेवण्यात महत्वाची भूमिका बजावणारे लॉजिस्टिक्स मॅनेजर मयंक पारिख आणि संघाचे मॅसियर (Masseur) रमेश माने यांनाही राज्य शासनाच्या वतीने 50 लाख रुपये पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

सन 2011 च्या विश्व करंडक क्रिकेट सामन्याच्या मालिकेत टीम इंडियाने विश्व विजेत्यासारखाच खेळ केला. उपांत्य सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा पराभव केल्यानंतर मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर दिनांक 2 एप्रिल, 2011 रोजी खेळला गेलेला श्रीलंका संघाविरुध्दचा अंतिम सामना भारतीय संघाने 6 गडी राखून जिंकला, ही बाब सर्व भारतीयांची मान उंचावणारी आहे. हे देदीप्यमान यश आयसीसीचे अध्यक्षपद भारताकडे असताना आणि

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. अजित पवार ....

बीसीसीआयचे अध्यक्षपदही महाराष्ट्राकडेच असताना तसेच ज्या मुंबई शहराच्या नसानसात क्रिकेट आहे त्या महाराष्ट्राच्या पवित्र भूमीत हे यश मिळाले हा चांगला योगायोग आहे.

महाराष्ट्राचा सुपुत्र विश्वविक्रमवीर सचिन तेंडुलकर याला 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी किताब देऊन त्याच्या तेजस्वी कारकिर्दीचा उचित गौरव करावा ,अशी एकमुखी शिफारस ही विधान परिषद केंद्र सरकारला करीत आहे. वेगवेगळ्या यंत्रणांकडून सामन्यांच्या वेळी अतिरेकी कारवायांच्या धोक्याबाबत माहिती मिळाली होती तथापि पोलीस दलाने चोख बंदोबस्त ठेऊन सुरक्षिततेत सामने पार पाडले त्यांनाही विधान परिषद धन्यवाद देत आहे. महाराष्ट्रातील जनतेने अत्यंत संयमाने हा आनंदोत्सव साजरा केल्याबद्दल त्यांचेही कौतुक करावेसे वाटते.

भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक विजयाची अत्यंत मौल्यवान भेट राज्यातील जनतेला नववर्षाच्या सुरुवातीलाच दिली आहे. पुन्हा एकदा भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन करुन भविष्यातही क्रिकेटच्या विश्वात यशाची अनेक शिखरे हे खेळाडू पादाक्रांत करतील, याची आम्हाला खात्री आहे. यासाठी त्यांना पुनश्च खूप खूप शुभेच्छा."

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय अजितदादा पवार यांनी भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकल्याबद्दल भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडला त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. ज्याची इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी नोंद व्हावी अशा प्रकारचा 2 एप्रिलचा दिवस हिंदुस्थानवासियांनी त्या दिवशी पाहिला. गेले अनेक वर्षे पाहिलेले विश्व विजयाचे स्वप्न भारताने अखेर शनिवारी 2 एप्रिलला साकार केले. 1983 मध्ये कपिल देवच्या नेतृत्वाखाली वर्ल्ड कप जिंकल्यानंतर पुन्हा एकदा 28 वर्षानंतर भारतीय क्रिकेटपटूंच्या हातात वर्ल्ड कप विसावला व 121 कोटी भारतीय जनतेचे ऐतिहासिक व अविस्मरणीय स्वप्न साकार झाले. उपान्त्य फेरीत ऑस्ट्रेलिया व पाकिस्तान यासारख्या बलाढ्य संघांना पराभूत करुन भारताने अंतिम फेरीत दिमाखाने प्रवेश केला व श्रीलंकेच्या संघाला पराभूत करुन विश्व चषक जिंकून एव्हरेस्टही छोटा वाटेल अशी दिमाखदार आणि शानदार कामगिरी त्या दिवशी भारतीय क्रिकेटपटूंनी केली. खऱ्या अर्थाने भारत क्रिकेट विश्वातील सुपर पावर झाला. हा विजय उत्कंठावर्धक आणि क्षणोक्षणी तमाम भारतीयांच्या हृदयाचे ठोके चुकविणारा होता. भारतीय संघाने सांघिक कामगिरीच्या बाळावर विश्व चषक जिंकण्याचा गौरवशाली इतिहास निर्माण केला व गुढी पाडव्याला, नववर्षाला दोन दिवस शिल्लक असताना विजयाची गुढी त्याच दिवशी उभारुन भारतीय जनतेला नववर्षाचा अनोखा व आगळावेगळा नजराणा पेश केला.

यानंतर श्री. ओटवणेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

हा नजराणा गेली 21 वर्षे भारतीय फलंदाजीची धुरा आपल्या खांद्यावर वाहणाऱ्या विश्वविक्रमी पराक्रम करणाऱ्या, नवनवीन रेकॉर्ड तयार करणाऱ्या भारतीयांचा लाडका सुपुत्र सचिन यांना त्यांनी बहाल केला. आपल्या कारकिर्दीत भारताने विश्वचषक जिंकावा अशी इच्छा सचिनने व्यक्त केली होती आणि सचिनचे हे स्वप्न भारतीय क्रिकेट संघाने पूर्ण करून सचिनला एक आगळीवेगळी विजयाची भेट दिली. सर्व खेळाडूंनी सचिनला उचलून घेऊन स्टेडियममध्ये विजय मिरवूणक काढली. तेव्हा स्टेडियममधील प्रेक्षकांना आनंदाचे उधाण आले.

सभापती महोदय, सन 2011 च्या वर्ल्ड कपमध्ये फलंदाजीच्या क्रमवारीत सचिनने 482 धावा काढून दुसरा क्रमांक पटकाविला व आपण अजूनही या वयात फीट असल्याचे तमाम क्रीडारसिकांना दाखवून दिले. सचिनला आपल्या कारकीर्दीत अनेक वेळा विविध दुखापतींनी त्रास दिला. पण या लढवय्या क्रिकेटपटूने त्या संकटांवर मात करून कसोटी व एक दिवसीय क्रिकेटमध्ये 99 शतके झळकावली. खरे म्हणजे 20-20 ओव्हरच्या मॅचेस झाल्या. त्यावेळी जो विजय आपण प्राप्त केला होता त्यासंबंधात खेळाडूंना बक्षिसे जाहीर करण्यात आली होती. मला या अभिनंदनाच्या ठराव्याच्या वेळी दु:खाने सांगावे लागते की, त्यातील अर्धेच पैसे त्यांना मिळाले आहेत. ही बाब श्री.अजितदादा पवार यांनी तपासून पहावी. ह्या फाईली कुठे फिरत आहेत ? असे भविष्यात होऊ नये एवढीच इच्छा मी येथे व्यक्त करतो. खरे म्हणजे त्या दिवशी सचिनचे शतक व्हायला पाहिजे होते. सर्व भारतीयांची तशी अपेक्षा होती. या वर्ल्ड कपमध्ये सचिनचे शतकाचे शतक पूर्ण व्हावे अशी सर्वांची अपेक्षा होती. तो विक्रम सचिन करेल असे 121 कोटी जनतेला वाटत होते. सर्वांची तशी इच्छा होती. परंतु ते स्वप्न अपूर्ण राहिले. अपूर्ण राहिलेले स्वप्न विश्वविक्रमी सचिन लवकर पूर्ण करेल याबद्दल कुणाच्याही मनात शंका नाही. विश्वविक्रमी सचिन याचा जन्म महाराष्ट्रात झाला आहे. महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला अभिमान वाटावा अशा क्रिकेटवीराला भारत सरकारने "भारतरत्न" या पुरस्काराने सन्मानित करावे, अशा प्रकारचा जो ठराव माननीय उप मुख्यमंत्री यांनी मांडला आहे त्याचे मी समर्थन करतो. तसा प्रस्ताव आपण केंद्र शासनाकडे पाठवावा अशी मी आपल्याला विनंती करतो. यासंबंधी महाराष्ट्राने लवकरात लवकर पाठपुरावा केला तरच त्याला लवकर यश येईल अशी अपेक्षा व्यक्त करतो. त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

दिवशी रोमहर्षक असा खेळ झाला. सचिन आणि सेहवाग आऊट झाल्यानंतर सर्व भारतीयांच्या मनामध्ये धाकधूक निर्माण झाली. ह्रदयाचे ठोके कमजोर व्हायला लागले. आता काय होणार असे सर्वांना वाटू लागले. परंतु त्या दिवशी टीमवर्क चांगले होते. खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. गौतम गंभीर ज्यावेळी खेळायला लागला त्यावेळी थोडीथोडी आशा पल्लवीत होत गेली. त्याचे रूपांतर यशात झाले. स्मरणात राहील अशा प्रकारचा सामना झाला. मी क्रिकेट संघातील सर्व खेळाडूंचे माझ्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने, विरोधी पक्षातर्फे अभिनदंन करतो आणि त्यांना शभेच्छा देतो.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : अध्यक्ष महाराज, सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी भारतीय संघाचे अभिनंदन करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडला आहे, त्याला समर्थन देण्याकरिता मी उभा आहे. भारतीय संघाने देदीप्यमान यश संपादन केले आहे. विजयाची गुढी उभारणे ही आपली परंपरा आहे. ती प्रथा आपण गेली अनेक वर्षे पाळत आहोत. विजयाची गुढी कशी असते हे प्रत्येक भारतीयाने काल अनुभवले.

यानंतर श्री.खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

दोन दिवस सातत्याने भारतातील सर्व जनतेला आनंदी ठेवणारा हा संघ आहे. त्यांनी हा विजय प्राप्त केला एवढ्यापुरताच हा विषय नाही. भारतातील प्रत्येक नागरिकांच्या जीवनात दोन दिवस आपले सर्व दु:ख बाजूला ठेवून आनंदी क्षण निर्माण करणे ही साधी गोष्ट नाही. म्हणून भारतीय संघाचे मी विशेष कौतुक व अभिनंदन करतो. आम्ही याची देही याची डोळा या अर्थाने त्या स्टेडियममध्ये बसून तो सामना पाहिला आहे. आम्ही ते सर्व अनुभवले आहे. उन्हामध्ये बसून आम्ही अनुभवले आहे. कारण आमदारांचे पासेस कोणाला देण्यात आले ते शेवटपर्यंत कळले नाही. आमदारांना दिले की नाही ते माहीत नाही. पण तो विषय नाही. जे लोक तेथे उपस्थित होते त्यांच्या जीवनामधील हे भाग्य आहे. आपल्या मातृभूमीमध्ये, हिंदुस्थानामध्ये आपल्या संघाचे जागतिक स्तरावरील देदीप्यमान यश अनुभवयास मिळाले.

परदेशात जे सामने होतात ते आपण दूरदर्शनच्या माध्यमातून पहात असतो. पण याची देही याची डोळा अनुभव घेणे, तो थरार अनुभवयास मिळणे हे भाग्यच आहे. ज्यांना याची आवड होती ते मिळेल त्या मार्गाने तेथे कसे पोहोचावयाचे हे एकच उद्दिष्ट ठेवून पोहोचले. त्यापैकी मी एक होतो आणि तेथील सर्व पहात होतो. काही झाले तरी 1.30 ते 2.00 च्या आत स्टेडियममध्ये जाऊन बसायचे असे मी ठरविले होते. कारण या वेळेत टॉस टाकला जाणार होता, तो सुध्दा आपल्याला अनुभवयास मिळाला पाहिजे असे वाटत होते. सत्व परीक्षा कशी असते तो अनुभव देखील अनुभवयास मिळाला. त्यावेळी टॉस टाकला गेला होता, पण कोणी काय म्हटले होते ते कोणाला ऐकावयासच आले नाही, असे पहिल्यांदाच घडले. खरे तर त्यावेळी ढोणीने टॉस जिंकला होता. पुन्हा दुसऱ्यांदा टॉस टाकल्यावर श्रीलंकेच्या कप्तानाने तो जिंकल्यावर भारताची सत्व परीक्षा सुरु झाली. त्या सत्व परीक्षेला भारतीय संघ पूर्ण शक्तीनिशी उतरला त्याचे प्रत्यक्ष वर्णन आपण सर्वांनीच अनुभवले आहे. त्यामुळे तेथे जे घडले त्याचे सर्व वर्णन येथे केले पाहिजे असे नाही. पण हृदयाचा ठोका ठपकन् कसा थांबतो हे तेथे उपस्थित असणाऱ्या प्रेक्षकांनी आणि वाहिन्यांद्वारे सामना पाहणाऱ्यांनी अनुभवले आहे. सेहवागची शून्यावर विकेट गेली त्यावेळी लोकांनी हायच खाल्ली होती की, आता काय होणार ? जे प्रेक्षक जेवणासाठी किंवा चहा पिण्यासाठी गेले होते, ते

2...

NTK/ KTG/

श्री.दिवाकर रावते...

परत येईपर्यंत एक विकेट गेली होती. त्यानंतर ताबडतोब सचिन तेंडुलकरची विकेट गेल्यावर हृदयाचा ठोका ठपकन् थांबला होता. पण त्यानंतर आलेल्या खेळाडूंनी केलेल्या खेळीमुळे प्रेक्षकांनी जो जल्लोष केला तो उपस्थितांनी अनुभवला असेल. प्रत्येक चेंडूनंतर किंवा प्रत्येक षट्कानंतर स्टेडियममध्ये गाणी वाजविली जात होती. 'वाजले की बारा' या मराठी गाण्यावर संपूर्ण स्टेडियममधील प्रेक्षक नाचू शकतात हे सुध्दा सर्वांनी अनुभवले. शेवटची ३ षटके असताना ते गाणे लावल्यावर संपुर्ण स्टेडियममधील प्रेक्षक नाचले होते. 'मुंबई', 'मुंबई' असे म्हणत ज्यावेळी जल्लोष केला जात होता, त्यावेळी या मुंबई शहराचा सर्वांनी जल्लोष ऐकला आहे. त्यावेळी 'बबली, बबली' वगैरे मला आजूबाजूला भेटली नाही. तेथे एका गाण्यावर सर्वजण नाचत होते. अशा प्रकारचे तेथे वातावरण होते, ते तुम्हाला, आम्हाला आनंद देणारे होते. त्यावर किती बोलावे तेवढे कमी आहे. पण त्या क्षेत्रातील लोकांनी भरभरुन बोलावे असा हा विषय आहे.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काही मुद्दे वाचून दाखविले. पण त्यांना मी सांगू इच्छितो की, आपण तेथे जे अनुभवले ते मुक्तपणे सांगितले पाहिजे. आपल्याला जे जमते तेवढेच सांगितले पाहिजे. या संबंधी तज्ज्ञांनी लिहून दिले ते आपण कशासाठी वाचावयाचे ? कुठला बॉल कसा पडला वगैरे वगैरे. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी बोलू शकत नाही, बोललो तर लगेच त्यांच्या बाजूचे सन्माननीय सदस्य बोलू लागतील. हा सगळा आनंदाचा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, त्यांच्या ज्या भावना आहेत त्या संपूर्ण देशवासियांच्या भावना आहेत. आदरणीय सभापतींच्या मुखातून त्या बाहेर पडणे हे त्या खेळाडूंकरिता सन्मानाचे आहे. भारताच्या विजयामुळे मला मनापासून आनंद झाला आहे.

सभापती महोदय, इतर लोकांना बक्षिसे मिळाली की नाही हा वेगळा विषय आहे. ऑलिम्पिक स्पर्धेतील जे बक्षिस विजेते आहेत, त्यांच्याबद्दल वेगळी चर्चा करता येईल.

यानंतर श्री.शिगम....

अस्पुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ KTG/ 13:35

श्री. दिवाकर रावते...

हा असा एकच क्षण देशातील प्रत्येक नागरिकाने रात्रभर अनुभवला. संपूर्ण देशभर रात्री एकच जल्लोष होता. लोकांनी गुढी उभारण्याचा खरा आनंद साजरा केला. मी भारतीय क्रिकेट संघाचे मन:पूर्वक अभिनंदन करीत असताना मला माननीय राष्ट्रपतींना देखील मनापासून धन्यवाद द्यायचे आहेत. सचिन तेंडुलकर एक वाक्य म्हणाला ते अतिशय महत्वाचे आहे. तो म्हणाला, "मी मराठी आहे आणि माझ्या या मुंबईमध्ये जागतिक कीर्तीचा विश्वचषक जिंकता आला हा माझ्या दृष्टीने जास्त आनंदाचा क्षण होता आणि म्हणून माझ्या डोळ्यामध्ये आनंदाश्रू होते". महाराष्ट्राच्या सुकन्या आज राष्ट्रपती पदी आहेत. त्यांनी भारताच्या राजधानीमध्ये क्रिकेट संघाचे कौतुक केले, त्यांचा सन्मान केला. महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील राज्यातील खेळाडूंना एक कोटी रुपये दिले. हे औचित्य देखील मोलाचे होते. आदरणीय शिवसेना प्रमुखांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याच भावना मी माझ्या पक्षाच्या वतीने व्यक्त केल्या आहेत. भारतीय क्रिकेट संघाचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. हा अभिनंदनाचा ठराव या सभागृहामध्ये पारित करण्यात येत असल्याबद्दल मी आपणा सर्वांना मनापासून धन्यवाद देतो. आम्ही आपल्या सर्वांच्या आनंदात एकरुपतेने सामील आहोत.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

05-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) EE-2

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे नेते आणि राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री यांनी या ठिकाणी महत्वपूर्ण असा ठराव मांडलेला आहे. विश्वचषक क्रिकेट सामन्यामध्ये भारतीय क्रिकेट संघाने जे अभूतपूर्व, देदिप्यमान अशा प्रकारची कामगिरी केली त्याबद्दल त्यांचा सन्मान व्हावा आणि महाराष्ट्रामध्ये क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर यांना सुध्दा भारतरत्न हा पुरस्कार मिळण्यासंबंधीची शिफारस केन्द्र शासनाकडे करावी अशा प्रकारचा प्रस्ताव सदनामध्ये माननीय उप मुख्यमंत्र्यांनी ठेवला. संपूर्ण देशाच्या दृष्टीकोनातून, महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून 2 एप्रिल 2011 ला विश्वचषकाचा अंतिम सामना वानखेडे स्टेडियमवर झाला. सर्व जगाचे लक्ष या अंतिम सामन्याकडे लागलेले होते. भारत विश्वचषक जिंकणार असा आत्मविश्वास भारतीय क्रिकेट संघाला होता आणि तसाच आत्मविश्वास भारतीयांना सुध्दा होता. विश्वचषक जिंकल्याबद्दल संपूर्ण देशाला आनंद झाला. महाराष्ट्रातील सर्व जनतेला विशेष आनंद झाला.

भारत विश्वचषक जिंकत असताना महाराष्ट्रातील एक नेतृत्व क्रिकेटच्या संपूर्ण क्षेत्रामध्ये आहे, ते म्हणजे आयसीसी जे अध्यक्ष श्री. शरद पवार आणि बीसीसीआयचे अध्यक्ष श्री. शशांक मनोहर. सचिन तेंडुलकर हे महाराष्ट्रातीलच आहेत. झहीर खान हे देखील महाराष्ट्रातीलच आहेत. झहीर खान यांनी या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये सर्वात जास्त विकेटस् घेतल्या.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

देशामध्ये क्रीडा सामन्यास एक भव्य स्वरुप प्राप्त झाले. भारताने आज क्रिकेटमध्ये विश्वचषक कप मिळविला. 1983 मध्ये भारताने क्रिकेटमध्ये विश्वचषक कप मिळविला होता. त्यावेळी प्रसार माध्यमे एवढी मोठी नव्हती. परंतु या वेळेला प्रसार माध्यमे मोठया प्रमाणात होती, त्या प्रसार माध्यमाच्या व्दारे शहरापासून ते खेडयांपर्यतच्या लोकांना क्रिकेट सामन्या विषयी माहिती दिली जात होती. हा सामना जिकल्यानंतर मुंबईतील जेवढया क्रिकेट प्रेमींना झाला असेल तेवढा आनंद प्रत्येक खेडयातील सर्व सामान्य नागरिकांना सुध्दा झाला. संपूर्ण देश या विश्वचषकाच्या शेवटच्या सामन्याकडे नजर लावून होता. आमच्या देशामध्ये होत असलेल्या विश्वचषक सामन्यांमध्ये आमचा देश अजिंक्य झाला पाहिजे. भारतीय क्रिकेट टीमचे जगामध्ये नाव झाले पाहिजे, अशी देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये इच्छा होती. हा अंतिम सामना वानखेडे स्टेडियममध्ये खेळला जात होता, त्यावेळेला प्रत्येक बॉलगणीक भारतीयांच्या मनामध्ये भारताची टीम जिंकली पाहिजे अशी एक जिद्द होती. दिनांक 2 एप्रिल, 2011 रोजी वानखेड स्टेडियमवर भारताच्या क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकला. भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकला या बाबत प्रत्येक मोठया शहरांतील, गावांमधील, खेडयांमधील लोकांनी आपापल्या पध्दतीने उत्साह साजरा केला. क्रीडा क्षेत्रातील कोणत्या सामन्याचा आनंद एवढया मोठया प्रमाणावर साजरा केला गेला असेल असे मला तरी वाटत नाही. हा विश्वचषक जिंकण्यामागे क्रिकेट संघाचे मोठे परिश्रम आहेत ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे. यामध्ये महाराष्ट्राचे योगदान हे विशेष महत्वाचे आहे.

सभापती महोदय, पहिल्या विश्वचषकाच्या वेळी माननीय एन.के.पी.साळवे अध्यक्ष होते. क्रिकेट क्षेत्रात अभिमान वाटावा अशा प्रकारची कामगिरी भारतीय क्रिकेट संघाने केलेली आहे. त्यांचे खरोखर अभिनंदन करणे गरजेचे आहे. तसेच क्रिकेटच्या खेळाडूंसाठी व्यापक अशी योजना आखणे गरजेचे आहे. आपण एखादा आनंदोत्सव साजरा करतो. तो साजरा करीत असताना या खेळाला अधिक महत्व कसे येईल, या बाबतीत शासनाला काही करता येईल काय याही गोष्टीचा विचार झ ाला पाहिजे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडूंना रणजी पर्यंत देखील खेळण्याची संधी मिळत नाही. त्या मुलांना देखील क्रिकेट खेळात संधी मिळाली पाहिजे. क्रिकेट खेळ हा महागडा आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये सगळयात जास्त आमची मुले क्रिकेटचा खेळ खेळत

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

असतात. 99 टक्क्े मुले क्रिकेटचा खेळ खेळतात व 1 टक्का इतर खेळ खेळतात. ग्रामीण भागातील 99 टक्के खेळत असलेल्या मुलांसाठी राज्य शासनास काही करता येईल काय, यासंदर्भात काही पावले उचलू शकतो काय या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, सदनाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकला, त्यांचा सन्मान करण्याच्या निमित्ताने अभिनंदनाचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडला आहे. क्रीडा क्षेत्रामधील सर्वोच्च सन्मान करण्याचे पद असेल ते देण्याची व्यवस्था आपण राज्य सरकार म्हणून केली पाहिजे. भारतीय क्रिकेट संघातील महाराष्ट्रातील खेळाडू श्री.सचिन तेंडुलकर असेल, तसेच श्री. झहीर खान असेल,

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.........

परंतु आज आपल्या देशाला क्रिकेट खेळातील विश्वचषक मिळवून देण्यासाठी ज्याने संघाचे नेतृत्व केले तो महेंद्रसिंग धोनी असेल, संघातील या सगळ्या खेळाडूंचा सत्कार समारंभ आयोजित करावा आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सांगितल्याप्रमाणे, सचिन तेंडूलकर याचा भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मान करावा अशी केंद्र शासनास शिफारस करावी. संघातील सर्व खेळाडूंचा सन्मान करणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपले आणि सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे आभार मानतो. या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेच्या भावना या प्रस्तावाद्वारे मांडल्या जात आहेत. गेले दीड महिना क्रिकेट कळत असो वा नसो, क्रिकेटचे तंत्र कळत असो वा नसो, प्रत्येक माणसाला एकच प्रश्न हैराण करीत होता, तो म्हणजे स्कोअर क्या हुआ? क्रिकेट हा फक्त खेळ नव्हे तर देशातील 121 कोटी जनतेच्या दिलाची धडकन आहे. म्हणून सारा भारत पूर्ण आनंदाने न्हाऊन निघाला, नाचून उठला. आपण संघातील त्या सर्व खेळाडूंचे अभिनंदन करीत आहोत. विश्वचषकाच्या निमित्ताने महेंद्रसिंग धोनीच्या टीमचे अभिनंदन करीत आहोत.

विश्वचषकाच्या विजयामध्ये सिंहाचा वाटा सचिन तेंडूलकरचा होता. केवळ आपण म्हणतो म्हणून नव्हे तर त्या संघातील प्रत्येक खेळाडू अगदी युवराजपासून झहीर खानपर्यंत सचिन तेंडूलकरसाठी खेळत होता. सचिन तेंडूलकर हा थोर खेळाडू आहे. त्याचे पाय जमिनीवर आहेत. तेंडूलकर काहीही म्हणो, त्याने महिनाभर ड्रेसिंग रुममध्ये व बाहेर जे कष्ट घेतले त्याला तोड नाही. देशात सगळ्या जाती, धर्म, पंथाच्या सीमा ओलांडून सचिन तेंडूलकर एकात्मतेचे प्रतीक बनला आहे. खेळाडू मोठे होतात, कलावंत मोठे होतात तेव्हा तुम्ही समाजाला काय दिले हा प्रश्न विचारला जातो. लता मंगेशकर यांनी गायचे आणि भारतीय जनतेने आनंदाने न्हाऊन निघायचे. सचिन तेंडूलकर याने खेळावे आणि आम्ही आनंदाने न्हाऊन निघावे. त्याची देण्याची दानत इतकी मोठी आहे की, त्याने त्याच्या उत्पन्नातील मोठा वाटा अनाथ मुलांसाठी दिला. 200 अनाथ मुलांचे पूर्ण जगणे आणि शिक्षण तो स्वत:च्या खर्चातून करीत आहे. इतके नव्हे तर त्याने आपल्या सासूबाई थोर समाजसेविका अनाबेल मेहता यांना भरभरुन आर्थिक मदत देऊन समाजसेवेच्या कार्याला हातभार लावला आहे. त्याचा कुठेही गवगवा होत नाही. दान देतो हे कोणाला तो कळू देत नाही हा त्याचा मोठेपणा आहे. आपण सचिन तेंडूलकरला भारतरत्न किताब द्यावा अशी शिफारस करीत आहोत ती उचित आहे. महाराष्ट्राची भावना या ठिकाणी व्यक्त होत आहे. मी या ठरावाचे समर्थन करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी हा एक अतिशय औचित्यपूर्ण ठराव सभागृहासमोर आज मांडला आहे. खरे म्हणजे या देशातील प्रत्येक माणसाची अवस्था गेले दोन तीन दिवसापासून 'आनंद पोटात माझ्या माईना' अशी झालेली आहे. प्रत्येक नागरिक आनंदाने बेहोष झालेला बघायला मिळतोय असा तो क्षण होता. ज्यावेळेला क्रिकेटच्या विश्वचषकावर भारताचे नाव कोरले गेले तो क्षण आपल्या देशाच्या दृष्टीने राष्ट्रीय एकात्मतेचा सर्वोच्च क्षण म्हणून इतिहास त्याची नोंद घेईल इतका उच्च दर्जाचा होता. तसे म्हटले तर हा खेळ आहे. खेळ म्हटले की, त्यामध्ये खेळाडू वृत्ती ही असलीच पाहिजे. कोण जिंकतो, कोण हरतो हा सगळा त्या वेळच्या खेळाचा भाग असतो. परंतु खेळाडू वृत्ती जपणे याचा नेहमी आदर्श संपूर्ण क्रिकेट विश्वात जर कोणी घालून दिला असेल तर तो केवळ सचिन तेंडूलकर यानेच घालून दिला आहे. आपण सगळ्यांनी वेस्ट इंडिज विरुध्दचा आपला पहिला सामना पाहिला. सचिन तेंडूलकर फलंदाजी करीत असताना चेंडू त्याच्या बॅटच्या कडेला लागून यष्टीरक्षकाकडे गेला. यष्टीरक्षकाने तो चेंडू झेलला. पंचांनी सचिन तेंडूलकरला बाद घोषित केलेले नव्हते.

नंतर 2एच.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ........

पण स्वत:च्या मनाची सचिनची खात्री इतकी प्रचंड होती आणि त्याची खिलाडू वृत्ती इतकी जबरदस्त होती की, कुठलाही विलंब न लावता, विचार न करता सचिन परत निघाला. ही जगातली सर्वात उत्कृष्ट दर्जाची खिलाडू वृत्ती जपणारा या मातीत रुजलेला, वाढलेला, संस्कृतीची जाण असणारा महान मराठी माणूस म्हणजे सचिन तेंडुलकर हा होय. तसेच क्रिकेटच्या माध्यमातून सबंध जगाला या व्यक्तिमत्वाची ओळख देणारा असा महान सुपुत्र आपल्या राज्यात असावा याचा अभिमान वाटतो.

महाराष्ट्राच्या राजधानीत विश्व चषक स्पर्धेचा अंतिम क्षण भारतीयांच्या मनात कोरला जावा आणि या सगळ्यांचे आयोजन आंतरराष्ट्रीय पातळीवर जी संस्था करते त्या संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. शरदराव पवार यांच्याकडे असावे हा त्या आनंद सोहळ्यातील परमोच्च बिंदू मानला पाहिजे. क्रिकेट हा केवळ खेळ म्हणून आता राहिलेला नाही तर सबंध देशाला एक प्रकारे गुंतवून टाकण्याचे सामर्थ्य देखील या खेळामध्ये निर्माण झालेले आहे. किती संकटे आली, पोलिसांकडून सुरक्षिततेच्या संदर्भात सूचना मिळाल्या, भीतीचे सावट निर्माण झाले, अतिरेकी हल्ला करतील, बाहेरचे लोक येतील अशा प्रकारे किती आव्हाने या सर्वांच्या समोर उभी राहिली होती. असे असताना जनतेने अत्यंत संयमाने, दृढ निश्चयाने सर्व भारतीयांना एक होऊन आपल्या संघाच्या मागे सर्व सदिच्छा उभ्या केल्या. त्या सदिच्छांचे पाठबळ तर प्रचंड होतेच पण असे म्हणतात की विजयाच्या शिखरावर पाय रोवणे हे कर्म महा कठीण असते. पण एकदा का आपला झेंडा त्या शिखरावर रोवला तर तो कायम टिकवून ठेवणे अथवा टिकून राहणे ही त्यापेक्षाही आव्हानात्मक परिस्थिती असते. मला खात्री आहे की, आपला भारतीय संघ, देशातील सर्व नागरिकांच्या वतीने जेव्हा त्याला शुभेच्छांचे पाठबळ मिळते तेव्हा तो त्याचे स्थान कायम टिकवून ठेवण्यासाठी निश्चित प्रयत्न करील आणि आपण त्यांना साथ देऊ. सन्माननीय श्री. सचिन तेंडुलकर यांना "भारत रत्न" पुरस्कार देणे म्हणजे अशा मोठ्या माणसाची माणुसकी जपणे ही आपली भावना अधिक महत्वाची आहे. एवढे बोलून मी माझ्या पक्षाच्या वतीने या ठरावाचे मन:पूर्वक स्वागत करुन त्रिवार अभिनंदन करतो व माझे भाषण संपवितो.

--------

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी सभागृहाच्या माध्यमातून भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन करण्यासाठी आणि महाराष्ट्राची अस्मिता असलेले, तसेच गेल्या 25 वर्षांपासून जागतिक पातळीवर क्रिकेट खेळणारे श्री. सचिन तेंडुलकर यांना "भारत रत्न" पुरस्कार मिळावा अशी शिफारस करणारा ठराव मांडलेला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

संपूर्ण राज्याला अभिमान वाटावा असा हा विषय आहे. मुंबईत शनिवार, दिनांक 2 एप्रिल, 2011 रोजी जो सामना झाला त्या सामन्याची वाट राज्यातील लोक जवळपास 15 दिवसांपासूनच पाहत होते. पण अंतिम सामन्यापूर्वी मोहाली येथे भारत-पाकिस्तानमध्ये सामना झाला तो देखील तितकाच अटीतटीचा होता. त्यापूर्वी भारत-ऑस्ट्रेलिया असाही सामना झाला होता. या मार्गात झ ाालेले सामने पाहिले तर आपल्याबरोबर झालेले सामने अविस्मरणीय असेच म्हणता येतील. भारतीय क्रिकेट संघातील खेळाडूंनी आपले अष्टपैलू कौशल्य त्या त्या वेळी दाखविलेले आहे. त्यामुळेच यावेळचा विश्वचषक आपणच जिंकू अशी संपूर्ण राज्याची भावना झाली होती. संपूर्ण भारताला अभिमान वाटावा असाच हा पराक्रम म्हणता येईल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ..

भारतातील सर्व जातीच्या, धर्माच्या बंधूना अभिमान वाटावा असा ऐतिहासिक विजय 2 एप्रिल 2011 रोजी भारतीय क्रिकेट संघाने खेचून आणला आहे. हा विजय सहजासहजी मिळणारा नव्हता. प्रत्येक क्षणी त्या दृष्टीने प्रयत्नांची पराकाष्ठा खेळाडू करीत होते. या प्रयत्नांच्या पराकाष्ठाच्या माध्यमातून त्यांनी विजय खेचून आणला असून त्यामुळे संपूर्ण जगात भारताची मान क्रिकेटच्या क्षेत्रात उंच झालेली असे मला वाटते. 28 वर्षापूर्वी श्री कपिल देव यांच्या नेतृत्वाखाली सुध्दा अशा प्रकारचा विजय भारतीय क्रिकेट संघाने मिळवला होता. त्यानंतर 28 वर्षाच्या तपश्चर्येनंतर हे यश 2 एप्रिल 2011 रोजी पुन्हा मिळालेले आहे.

भारतीय क्रिकेट संघाने अशा प्रकारे विश्व चषक मिळविल्यानंतर भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी विजयी क्रिकेट संघाचे कौतुक,स्वागत आणि अभिनंदन राजभवनावर केले होते. त्यावेळी महामहिम राष्ट्रपती यांच्या बरोबर राज्याचे महामहिम राज्यपाल, माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण ,आपले काही सहकारी उपस्थित होते.त्यावेळी ख-या अर्थाने आपणा सर्वाना त्याचा अभिमान वाटला होता. भारतीय क्रिकेट संघाने विश्व चषक मिळविल्यानंतर दुस-या दिवशी भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी मुंबईमध्ये थांबून विजयी क्रिकेटपटूचे स्वागत केले त्यांच्या आगळया वेगळया आपुलकीचे ते चित्र होते. त्याचबरोबर ख-या अर्थाने तो त्यांचा सन्मान होता.

भारतीय क्रिकेट संघाचे स्वागत करीत असतांना महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेच्या वतीने या सर्वोच्च सभागृहामध्ये सन्माननीय सभागृहाच्या नेत्यांनी हा ठराव मांडलेला आहे आणि त्याला माननीय विरोधी पक्ष नेते आणि इतर गट नेत्यांनी अनुमोदन दिले आहे. अशा प्रकारे आपण सर्वानी या ठरावाला अनुमोदन दिलेले आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी उभे राहून टाळयांच्या गजरात हा ठराव मंजूर करावा अशी मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो.

. ( सर्व सन्माननीय सदस्यांनी उभे राहून टाळयांचा गजर केला )

सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.अभिनंदनपर प्रस्ताव सभागृहाने सर्वानुमते मंजूर केला असून अभिनंदनाच्या प्रस्तावाची प्रत भारतीय क्रिकेट संघातील सर्व खेळाडूंकडे पाठविण्यात येईल तसेच केन्द्र शासनाकडे पाठविण्यात येईल.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.मु.शी.** तोंडी उत्तरे

**सभापती** : आता सर्व प्रथम दिनांक 29 मार्च 2011 रोजी राखून ठेवण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक 13363 चर्चेला घेण्यात येईल.

**अकोला जिल्हातील लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्यावर करावयाची कारवाई**

*13363डॉ. रणजित पाटील, श्री. भगवान साळुखे, श्री. केशवराव मानकर, श्री. पांडुरंग फुंडकर: सन्माननीय जलसंधारण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

1. अकोला जिल्हयातील लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभागाचे कार्यकारी अभियंता, 20 हेक्टरपेक्षा जास्त सिंचन क्षमता असलेल्या निकृष्ट दर्जाच्या 61 कोल्हापूरी बंधाऱ्यांचा पहाणी दौरा करण्यास व माहिती देण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ करीत असलेला मुद्दा उपस्थित झाल्याने कार्यकारी अभियंता, श्री. सोनडवले यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्याचा ठराव जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती सभेत दि. 12 जानेवारी, 2011 रोजी सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

2. असल्यास त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

3. असल्यास, कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

4. अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव देवकर,डॉ. नितीन राऊत यांच्याकारिता** (1) नाही.

(2) (3) व (4) प्रश्न उदभवत नाही.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, विदर्भामध्ये सिंचनाचा अनुशेष मोठया प्रमाणावर असतांना अकोला जिल्हयातील 61 कोल्हापुरी पध्दतीच्या बंधा-याच्या कामात झालेल्या गैर व्यवहारासंबंधीचा हा प्रश्न आहे. गेल्या चार पाच वर्षात तेथे 61 कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे बांधण्यात आले असून त्या कामाच्या संदर्भात जिल्हा परिषदेतील स्थानिक लोक प्रतिनिधी वांरवार तक्रारी करीत होते .गेल्या डिसेंबर महिन्यात जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या सभेत ही तक्रार मांडली होती. तसेच जानेवारी महिन्यात संबंधित कार्यकारी अभियंत्याच्या विरुध्द कारवाई करण्यासंबंधीचा ठराव स्थायी समितीच्या सभेत मंजूर करण्यात आला होता . जे वादातीत कार्यकारी अभियंता होते आणि ज्यांच्याकडून माहिती मिळावयास पाहिजे होते त्यांच्याकडून..

नंतर श्री.सरफरे

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13363....

डॉ. रणजित पाटील...

वेळोवेळी सभागृहाला चुकीची माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. खरी माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे. या अधिकाऱ्यांनी कामाची पहाणी करण्यासाठी दौरे करणे आवश्यक होते परंतु त्यासाठी आपल्याकडे वाहन उपलब्ध नाही असे सांगून ते सतत गैरहजर रहात आहेत. या करिता या अधिकाऱ्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, अकोला जिल्ह्यामध्ये लघु पाटबंधारे स्थानिक स्तर विभागाच्या माध्यमातून जवळपास 0 ते 100 हेक्टर क्षेत्रामध्ये 62 कामे झाली होती, आणि 101 ते 250 हेक्टर क्षेत्रामध्ये 4 कामे झाली होती. त्या संदर्भात कार्यकारी अभियंता श्री. सोनडवले यांनी कामाची पहाणी केली असून सर्व कामे चांगल्या स्थितीत असल्याचे दिसून आले आहे. तसेच, त्या तलावामध्ये पाणी साचले असून फळया टाकण्यात आल्या आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी अशा प्रकारे चांगले उत्तर देऊन या अधिकाऱ्याला वाचविण्याचा प्रयत्न केला आहे. अकोला जिल्हा हे माझे कार्यक्षेत्र आहे, या जिल्हयामध्ये 62 कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्यात आले. या बंधाऱ्याच्या बांधकामाबाबत प्रचंड तक्रारी आलेल्या आहेत, या बंधाऱ्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली आहेत तर काही ठिकाणी कामे झालेली नाहीत. आजच्या स्थितीत त्या बंधाऱ्यामध्ये एक थेंबही पाणी साचत नाही. आपल्याकडे अधिकाऱ्यांनी पाठविलेली माहिती चुकीची आहे. लोकप्रतिनिधींनी तक्रार केल्यानंतर त्यापैकी काही बंधाऱ्यांना गेट बसविण्यात आले तर काही बंधाऱ्यांना आजसुध्दा गेट बसविण्यात आले नाहीत. असे असतांना सुध्दा त्या अधिकाऱ्याला आपण प्रमाणपत्र देत आहात. जिल्हा परिषदेने या कार्यकारी अभियंत्याविरुध्द ठराव संमत केला आहे. जेव्हा जेव्हा जिल्हा परिषदेमध्ये या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचा विषय चर्चेला आला त्यावेळी हा अधिकारी जिल्हा परिषदेच्या सभेला उपस्थित राहिला नाही. यामुळे जिल्हा परिषदेने या अधिकाऱ्यावर तत्काळ कारवाई करण्यासंबंधीचा ठराव संमत केला. माझी आपणाकडे एकच मागणी आहे की, सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील हे या सभागृहाचे सदस्य असून ते एक जबाबदार लोकप्रतिनिधी आहेत. त्याचप्रमाणे मी सुध्दा या कामाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ ST/

ता.प्र.क्र. 13363....

श्री. पांडुरंग फुंडकर ....

माहिती घेतली असून यामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. म्हणून माझी मागणी आहे की, या केटीवेअरच्या बांधकामाची आपण उच्च स्तरीय अधिकाऱ्यामार्फत चौकशी करणार काय? चौकशीमध्ये संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास त्या विरुध्द कारवाई करणार काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे ताबडतोब उच्च स्तरीय अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्यात येईल आणि चौकशीमध्ये संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास त्या विरुध्द निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी जे उत्तर दिले आहे त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो. हा शेतकऱ्यांचा प्रश्न असून 61 पाझर तलावांमध्ये आज पाणी साचत नाही, त्यामुळे ते पाणी शेतकऱ्यांना मिळत नाही, पाण्यापासून ते वंचित आहेत. हे तलाव दुरुस्त करण्यासाठी लाखो रुपये खर्च केले जातात. या कामाची पहाणी करण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांकडे आहे ते अतिशय उर्मटपणे उत्तरे देतात. जिल्हा परिषदेच्या लोकप्रतिनिधींनी त्यांना विचारल्यानंतर सुध्दा माझ्याकडे वाहन नसल्यामुळे मी दौरा करु शकत नाही अशाप्रकारचे उर्मट उत्तर त्यांनी दिले आहे. त्याचप्रमाण् जिल्हापरिषदेच्या सभेला देखील ते गैरहजर राहिले आहेत. म्हणून या अधिकाऱ्यांना आपण ताबडतोब निलंबित करणार काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या बाबत उच्चस्तरीय चौकशी करण्यात येणार असून त्यामध्ये सर्व बाबी स्पष्ट होणार आहेत. तेव्हा यामध्ये दोष कुणाचा आहे,कुणावर कारवाई करावी लागणार आहे हे सर्व चौकशीमध्ये स्पष्ट होणार आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13363 . . . .

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, या सभागृहाचे दोन सन्माननीय सदस्य, त्याचबरोबर माननीय विरोधी पक्षनेते हे दोघेजण सदनाला माहिती देत आहेत की, लोकप्रतिनिधींबरोबर अधिकारी कशा प्रकारे वर्तन करतात. तरीदेखील माननीय मंत्री महोदय त्यांना वाचविण्याचा प्रयत्न का करीत आहेत ? माझी अशी मागणी आहे की, आजच्या आज संबंधितांना निलंबित करुन त्यांची चौकशी करणार आहात काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, याबाबतीत चौकशी करण्यात येईल हे अगोदरच मान्य केले आहे. याबाबत चौकशी होऊन त्याचा अहवाल आल्यानंतरच आपल्याला पुढील कार्यवाही करावी लागेल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आमचे म्हणणे असे आहे की, आपण जर संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणार नसाल तर त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात यावे. जर संबंधित अधिकारी तेथे राहिला तर चौकशी योग्य प्रकारे होऊ शकणार नाही. त्यामुळे संबंधितांना सक्तीच्या रजेवर पाठवून चौकशी करावी,तसे करणार काय ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, खरे पाहिले तर जिल्हा परिषद पंचायत समितीचा जो अधिनियम कंडक्ट ऑफ बिझनेस रुल्स आहे. यातील नियमानुसार सभाध्यक्षाच्या सही शिवाय ठरावाला कोणताही दर्जा प्राप्त होत नाही. याठिकाणी मी एवढेच सांगेन की, अजूनपर्यंत जिल्हा परिषदेने तसा प्रस्ताव पाठविलेला नाही. जिल्हा परिषदेचा प्रस्ताव आला तर निश्चितपणे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, तशा प्रकारचा ठराव आहे आणि ठरावावर सही झालेली आहे. यावर सचिवांची आणि उप कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची सही आहे. मी हे पेपर आपल्या माहितीसाठी पाठवितो.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सदरहू पेपर माझ्याकडे पाठवावेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, मला एवढेच सांगावयाचे आहे की, कंडक्ट ऑफ बिझनेस रुल्स् आहेत. त्यानुसार समितीचा अध्यक्ष आहेत. तसेच यासंबंधातील प्रस्तुत इतिवृत्त आहे ते जेव्हा अध्यक्ष,जिल्हा परिषद,अकोला यांच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आली त्यावर सदर विषय वगळून त्यांनी सही केलेली आहे आणि इतिवृत्त मान्य केले आहे.या इतिवृत्तामध्ये याच्याबाबत



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13363 . . . .

डॉ.नितीन राऊत . . ..

उल्लेख नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

डॉ.नितीन राऊत : माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला माहिती आहे की, याबाबत ठराव झालेला आहे. अशा पध्दतीने तांत्रिक बाब काढून जर तुम्ही संबंधित अधिकाऱ्यांना वाचविणार असाल तर मी याठिकाणी जबाबदारीने विधान करतो की, तेथील बंधाऱ्याच्या कामामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. याबाबत माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे काय आहे ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, याठिकाणी कोणालाही वाचविण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मघाशी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मागणी केली की, याबाबतीत उच्चस्तरीय चौकशी केली पाहिजे आणि आम्ही त्या चौकशीसाठी संमती दिलेली आहे. जर चौकशीमध्ये काही निष्पन्न झाले आणि त्यामध्ये जे कोणी दोषी अधिकारी असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : मी सन्माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सदनातील सन्माननीय सदस्यांना असे वाटते की, 61 कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्यात आले पण त्यामध्ये पाणी राहिले नाही. दुर्दैवाने राज्यामध्ये अशा प्रकारच्या अनेक बाबी समोर येत असतात. त्या कामाचे जरी टेक्नीक समजले नाही तरी देखील आपण अडचणीमध्ये येतो. सन्माननीय सदस्यांचे समाधान व्हावे यासाठी मला असे वाटते की, आपण या कामाची क्वॉलिटी कंट्रोल डिव्हीजनच्या सुपरीटेण्डींग इंजिनिअर कडून डिटेल तपासणी करुन घ्यावयास पाहिजे. त्यामुळे त्यात जे काही दोष असतील ते समजतील. कदाचित अधिवेशन संपेपर्यंत ही तपासणी पूर्ण होणार नाही.पण मुळातच तेथे जर पाणी साठत नसेल तर या कामामध्ये दोष असल्याचे 100 टक्के दिसून येईल. अशा वेळी संबंधितांवर कठोर कारवाई करण्याशिवाय दुसरा उपाय नाही.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

----

. . . .2 के-3



APR/ ST/ 14:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शिक्षण सेवक पदावर निवड झालेल्या 488 उमेदवारांना**
**नियुक्ती आदेश मिळण्याबाबत**

**(1) *13373 डॉ.रणजित पाटील,श्री.पांडुरंग फुंडकर,श्री.भगवान साळुंखे, श्री.केशवराव मानकर** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शिक्षण सेवक पदावर निवड झालेल्या 488 उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (अमरावती पदवीधर) यांनी दिनांक 12 जानेवारी, 2011 रोजी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे एक निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, व त्यानुसार सर्व 488 उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे काय,

(3) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (1) होय, हे खरे आहे.

(2) 488 पैकी जिल्हा निवड समितीने 424 उमेदवारांची कागद पत्र तपासणी नंतर पात्र ठरविलेल्या उमेदवारापैकी 50 उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आलेली आहे.

(3) उर्वरित 374 शिक्षण सेवक उमेदवारांना 31 मे, 2011 पर्यंत रिक्त होणाऱ्या पदावर नियुक्ती देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी केंद्रीय भरती निवड परीक्षेव्दारे एकदाच शिक्षण सेवकाची भरती प्रक्रिया दिनांक 02 मे 2010 रोजी सी.ई.टी.परीक्षा घेऊन राबविण्यात आली. हा प्रश्न यवतमाळ जिल्ह्यातील असून तेथे 488 शिक्षकांची गरज आहे असे निवड मंडळाला सांगितले होते. याबद्दल शासनाने एक वेळापत्रक तयार केले होते आणि महाराष्ट्र राज्यात गेल्या ऑगस्ट महिन्यामध्ये सगळीकडे शिक्षण सेवकांची भरती झालेली आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13373 ..... डॉ. रणजित पाटील ....

फक्त यवतमाळ जिल्हाच असा राहिलेला आहे की, ज्या ठिकाणी अजूनही ही प्रक्रिया पूर्ण व्हावयाची आहे. ही प्रक्रिया कधी पूर्ण केली जाईल आणि याला उशीर का होत आहे ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, जिल्हा परिषद, यवतमाळमध्ये मे, 2011 पर्यंत रिक्त होणाऱ्या शिक्षकांच्या जागांसाठी डिसेंबर, 2009 मध्ये मागणी नोंदविण्यात आली होती. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या वेळेला 496 जागा, त्यामध्ये 488 मराठी आणि 8 उर्दू सहाय्यक शिक्षकांच्या जागांची मागणी केलेली होती. त्या पध्दतीने सीईटी झाल्यानंतर परीक्षा परिषदेकडून 496 उमेद्‌वारांची यादी त्यांना पाठविण्यात आली. 496 पैकी 424 मराठी माध्यमाचे आणि 6 उर्दू माध्यमाचे असे 430 उमेदवार पात्र ठरले. ही गोष्ट सत्य आहे की, त्यापैकी 50 शिक्षकांना आतापर्यंत समाविष्ट करण्यात आले आहे अद्यापही 374 उमेदवारांना समाविष्ट करुन घ्यावयाचे आहे. मी आज सगळ्या गोष्टींचा आढावा घेत असताना एक गोष्ट लक्षात आली की, मुख्याध्यापक पदावर जे पदोन्नतीने रुजू व्हावयाचे आहेत अशा 202 मुख्याध्यापकांच्या रिक्त जागा आहेत. त्या शिवाय जे फेब्रुवारी आणि मार्च महिन्यामध्ये आंतरजिल्हा बदलीने बदली होऊन गेलेल्या 8 जागा आणि सेवानिवृत्त झालेले 3 शिक्षक अशा जवळपास 226 जागा तातडीने भरण्यात येतील. एक अत्यंत महत्वाची गोष्ट मी मान्य करतो की, त्या ठिकाणी मागणी करीत असताना जितकी मागणी करावयास पाहिजे त्यापेक्षा अधिक जागांची मागणी यवतमाळ जिल्हा परिषदेने केली. इतकेच नव्हे तर बिंदू नामावली न तपासता त्यांनी मागणी केलेली आहे. मी या बाबतीत आज दोन गोष्टी केलेल्या आहे. अमरावतीचे विभागीय आयुक्त श्री. प्रवीण परदेसी यांना आज आदेश दिलेले आहेत की, त्यांनी अशी चुकीची मागणी का केली आणि त्याला कोण कोण जबाबदार आहेत त्यांना तातडीने त्याबद्दल दोषी ठरवावे. त्याचबरोबर एक गोष्ट मी सभागृहाला सांगू इच्छितो की, निवड झ ाालले जितके उमेदवार आहेत त्यांच्यापैकी कोणालाही नियुक्तीपासून वंचित ठेवण्यात येणार नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, संबंधित जिल्ह्याकडून जी मागणी करण्यात आली होती ती रिक्त पदांच्या संदर्भात होती आणि माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले की, ती मागणी चुकीच्या पध्दतीने करण्यात आली त्यामुळे मागणीप्रमाणे शिक्षक गेले पण आता पदे रिक्त नाहीत.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13373... श्री. रामनाथ मोते...

एकूण 424 पैकी 50 उमेदवारांना नेमणुका दिलेल्या आहेत. आजही जवळजवळ 350 नियुक्त्या झालेले किंवा पात्र झालेले शिक्षक नोकरीपासून वंचित आहेत. आता माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, जशा जागा रिक्त होतील त्याप्रमाणे त्यांना सामावून घेऊ. चुकीची माहिती दिल्यामुळे हे झालेले आहे. अन्यथा हे उमेदवार मेरिट प्रमाणे, गुणवत्ता यादीनुसार दुसऱ्या जिल्ह्यामध्ये गेले असते. या ठिकाणी जागा रिक्त आहेत म्हणून ते या जिल्ह्यामध्ये आले. या जिल्ह्यात ते आल्यानंतर आता त्यांना नोकरी देण्यासाठी आपल्याकडे जागा नाहीत. या विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी ही चुकीची माहिती दिली त्यांच्यावर शासन तातडीने काय कारवाई करणार ? दुसरा प्रश्न असा की, ज्या ठिकाणी अद्यापही जागा रिक्त आहेत त्या जिल्ह्यामध्ये या सर्व उमेदवारांना सामावून घेणार का ? कारण ते नोकरीपासून वंचित आहेत आणि नियुक्तीसाठी पात्र आहेत.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न कारवाई करण्याबाबत विचारला. त्या बाबत मी स्वत: आज सकाळी अमरावतीचे विभागीय आयुक्त श्री. प्रवीण परदेसी यांना सांगितले आहे की, जे अधिकारी, मग मुख्य कार्यकारी अधिकारी असतील, शिक्षण अधिकारी असतील, ज्यांनी चुकीची मागणी नोंदविली त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. कारण त्यांनी रोस्टर न तपासता मागणी केलेली आहे. त्याचबरोबर त्या ठिकाणी जे शिक्षक गेलेले आहेत त्यांचे नुकसान होता कामा नये हा महत्वाचा मुद्दा आहे. त्या संबंधी मी अगोदरच सांगितले की, मुख्याध्यापकांच्या रिक्त असलेल्या जागा, फेब्रुवारी-मार्चमध्ये जे शिक्षक आंतरजिल्हा बदलीवर गेले त्या जागा तसेच मे महिन्यापर्यंत ज्या जागा रिक्त होणार आहेत त्या सगळ्या जागा आम्ही तातडीने भरु. त्या शिवाय सुदैवाने सर्व शिक्षा अभियानांतर्गत शिक्षणाच्या अधिकाराखाली काही जागा त्या जिल्ह्यासाठी आपल्याला मंजूर झालेल्या आहेत. त्या जागा त्यांनाच देण्यात येतील.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13373

श्री.राजेंद्र दर्डा....

या पद्धतीने यवतमाळ जिल्ह्याचा प्रश्न पूर्णपणाने मार्गी लावण्यात येईल.

.......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळांना इयत्ता 8 वीचा वर्ग जोडणेबाबत**

**(2) * 13606 श्री.संजय केळकर, श्री.रामनाथ मोते, श्री.भगवान साळुंखे, डॉ.रणजित पाटील, श्री.चंद्रकांत पाटील , श्री.दिवाकर रावते, डॉ.निलम गोऱ्हे , डॉ.दिपक सावंत , श्री.परशुराम उपरकर, श्री.विक्रम काळे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे : तारांकित प्रश्न क्रमांक 6817 ला दिनांक 16 जुलै, 2010 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) केंद्र शासनाने प्राथमिक शाळेची व्याख्या स्पष्ट केली असून इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वी पर्यंतच्या कोणत्याही विद्यार्थ्यास नापास (अनुत्तीर्ण) करावयाचे नाही, या मान्य धोरणानुसार इयत्ता 8 वी चा वर्ग प्राथमिक शाळेस जोडण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी 2011 मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्यातील बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 च्या तरतुदीमध्ये सुधारणा करावी यासाठी, मराठवाडा शिक्षण संस्था संचालक परिषदेने माहे नोव्हेंबर, 2010 मध्ये वा त्यादरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री तसेच अवर सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांना एका निवेदनाद्वारे विनंती केली हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर सर्वंकष मूल्यमापन पध्दतीमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी असून त्या दूर करण्याबाबत शासन स्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (1) होय.

(2) होय.

(3) सर्वकष मूल्यमापनांतील त्रुटी तपासण्यात येत आहेत.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय केळकर : अध्यक्ष महाराज, केंद्राने सक्तीचे आणि मोफत शिक्षणासंबंधीचा कायदा आणला आहे. त्यासंबंधी हा प्रश्न आहे. सदर कायदा राज्यात आणल्यानंतर त्याची अंमलबजावणी......

श्री.रामनाथ मोते : अध्यक्ष महाराज, ता.प्र.क्र.13606 आपण पुकारला आहात. ह्या प्रश्नातील प्रारूप चुकीचे आहे. ही तिसरी वेळ आहे. आम्ही असा प्रश्न दिलेलाच नाही. तीन वेळा ही बाब मी आपल्या निदर्शनास आणून दिलेली आहे. यासंबंधी आपण सचिवालयाला निदेश देखील दिले आहेत की, ज्या सदस्यांच्या नावाने प्रश्न लागेल, त्यांचे प्रारूप गृहीत धरण्यात यावे. प्रश्न आमच्या नावावर असला तरी प्रश्नाचे प्रारूप आमचे नाही. ही तिसरी वेळ आहे. त्यामुळे आपण हा प्रश्न राखून ठेवावा.

**सभापती** : मी सदर प्रश्न राखून ठेवत आहे.यात सदस्यांचा काहीही दोष नाही माझ्या विभागाचा दोष असेल तर तो हुडकला पाहिजे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंधुदुर्ग जिल्हयातील शिक्षण सेवक भरती प्रक्रियेमध्ये विभागनिहाय निवड मंडळे स्थापन करण्याबाबत**

**(3) * 14022 श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , डॉ.सुधीर तांबे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , प्रा.सुरेश नवले , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिक्षण सेवक भरती प्रक्रियेमुळे केंद्रीय भरतीपूर्व निवड परीक्षा पद्धती तसेच व्यवस्थापन गुणवत्ता पद्धत रद्द करून जिल्हा व विभागनिहाय निवड मंडळे स्थापन करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे जुलै, 2010 मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (1) होय.

(2) व (3) शिक्षण सेवक भरतीबाबत प्राप्त मागण्यांच्या अनुषंगाने करावयाच्या सुधारणा ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.राजन तेली : अध्यक्ष महाराज, शिक्षक सेवक भरती संबंधातील विषय हा वादातीत आहे. शिक्षक सेवकांची केंद्रीय भरती झाली. या भरतीमध्ये सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील उमेदवारांना संधी मिळाली नव्हती. कोकणातील डी.एड.चे शिक्षक विदर्भातील कोणत्याही जिल्ह्यात गेले व विदर्भातील शिक्षक सेवक कोकणात आले तर बोली भाषेचा गोंधळ उडतो. आपण शिक्षणाला महत्त्व देतो. बोली भाषेमुळे शिक्षणाचा पायाच आपण कच्चा करायला निघालो तर मग काय शिक्षणाचे काय होईल. बोली भाषा वेगळी असल्यामुळे दोन्ही शिक्षकांची अडचण होते. त्यामुळे ही जी अडचण आपण निर्माण केली आहे ती दूर करणार आहात काय ? पूर्वी जिल्हा निवड मंडळे होती. स्थानिक स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षण अधिकारी, समाजकल्याण अधिकारी, आदिवासी विभागाचा अधिकारी आणि शिक्षण सभापती असे मिळून निवड मंडळ होते. अशा प्रकारे पूर्वीची जी जिल्हा निवड मंडळे होती ती आपण पुनर्स्थापित करणार आहात काय ? मी मंत्री महोदयांना आणि मा.मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देतो. 50 टक्के स्थानिक उमेदवारांना संधी देणार अशा प्रकारची घोषणा केली आहे. ती प्रत्यक्षात कधी उतरणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. **14022**.........

श्री.राजेंद्र दर्डा : अध्यक्ष महाराज, 2000 साली शिक्षक सेवक ही योजना कार्यान्वित झाली. 2003 मध्ये सुधारित शिक्षक सेवक योजना कार्यान्वित झाली. सन 2008 मध्ये CET सुरू झाली. CET मध्ये जे उमेदवार यशस्वी होतात त्यांच्या पसंती क्रमानुसार, घटनात्मक व सामाजिक आरक्षण लक्षात घेऊन त्या त्या जिल्ह्याची गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. यावर्षी झालेल्या CET नुसार सर्व उमेदवार त्या त्या जिल्ह्यांमध्ये गेले व त्यांना सामावून घेण्यात आले. माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये स्थानिकांची अत्यल्प प्रमाणात निवड झाल्यामुळे भरती होऊ शकली नाही. ती भरती आता नुकतीच झालेली आहे. मी सर्व लोकप्रतिनिधींचा आभारी आहे. या सगळ्यांच्या सहकार्यामुळे महाराष्ट्र एकसंघ राहिला. कोल्हापूरची माणसे सिंधुदुर्गला जाऊ शकली. पुण्याची माणसे रत्नागिरीला जाऊ लागली. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. पूर्वी प्रमाणे जुनी विभागीय मंडळे होती तशी आता पुन्हा स्थापन करण्यात येणार आहेत काय,

यानंतर श्री.खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14022.... श्री.राजेंद्र दर्डा....

किंवा त्या ठिकाणचे जे स्थानिक विद्यार्थी आहेत त्यांना काय फायदा मिळेल असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. गुणवत्तेसाठीच शासनाने सीईटी पध्दत सुरु केली आहे. त्यामुळे विभागीय मंडळे स्थापन करण्याचा शासनाचा विचार नाही. मात्र त्या ठिकाणी जे विद्यार्थी असतात त्यांना काही प्रमाणात निश्चितपणे त्याच ठिकाणी नोकरी मिळावी या मताशी मी सहमत आहे. त्या संबंधी माझी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा झाली असून तसा प्रस्ताव येत्या काही दिवसात विभागाकडून आणला जाणार आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय मूळ प्रश्नाला बगल देत आहेत. मूळ प्रश्न बोली भाषेसंबंधी आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवावयाची आहे. महाराष्ट्रातील काही भागात मराठी भाषेपेक्षा वेगळी भाषा वापरली जाते. मग सिंधुदुर्ग जिल्ह्यातील असेल, नंदुरबार व धुळे जिल्हा असेल, झाडीपट्टीतील गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी भागातील लोकांचा मराठी भाषेशी सुतराम संबंध नाही इतक्या त्या दूरच्या आहेत. मग कोरकू किंवा माडीया भाषा असेल, तेथील मुलांना मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. त्यांना मराठी भाषा शिकविण्यासाठी मोठा खटाटोप करावा लागतो. ज्यांना स्थानिक भाषा किंवा बोली भाषा अवगत असेल त्याच भाषेतील शिक्षक देण्याची तरतूद आरटीमध्ये आहे आणि ती शासनावर बंधनकारक आहे. सीईटी घेण्याला हरकत नाही. पण सीईटी घेत असताना उमेदवारास स्थानिक व बोली भाषा अवगत आहे की नाही ही बाब विचारात घेतली पाहिजे. सिंधुदुर्ग किंवा गडचिरोली जिल्ह्यातील शिक्षकांच्या नोकरीचा प्रश्न नाही. पण ज्यांची मराठीपेक्षा स्वतंत्र भाषा आहे त्यांच्या शिक्षणाचा व हक्काचा मुद्दा आहे. त्याच्यापासून शासनाने दूर जाता कामा नये. हा प्रश्न नोक-यांचा नाही. स्थानिक बोली भाषा अवगत असणाऱ्या शिक्षकांना नेमण्याची अट घालून उमेदवारांची सीईटी घेणार काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी यापूर्वी सांगितले आहे आणि पुन्हा एकदा सांगतो. सीईटीची परीक्षा घेण्यात येणार आहेच. त्यामुळे विभागीय मंडळे स्थापन करण्याचा शासनाचा मानस नाही. प्रत्येक भागात वेगवेगळी भाषा बोलली जाते. मग कोरकू असेल, माडीया असेल. त्यामुळे त्या त्या भाषेतून शिक्षण मिळणार काय असा येथे प्रश्न विचारण्यात आला आहे. वेगवेगळ्या भागातील भाषा ह्या मराठी भाषेचा एक भाग आहेत, हे सन्माननीय सदस्यांनी मान्य केले पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

ता.प्र.क्र.14022....                                        श्री.राजेंद्र दर्डा....

पण त्यांनाही मराठी भाषा उत्तम प्रकारे आली पाहिजे. कारण हेच उमेदवार वेगवेगळ्या ठिकाणी नोकरीला लागतात.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझ्या प्रश्नासाठी वेगळा संदर्भ घेतला जात आहे. या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, मराठी भाषा येण्यासाठी शासनाला किती तरी खटाटोप करावा लागतो.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, शिक्षकांना मराठी भाषा आली पाहिजे, मराठी भाषेकडे त्यांनी चालत गेले पाहिजे. त्या त्या ठिकाणची वेगळी भाषा असेल त्याचा विचार करुन शासन नवीन आराखडा तयार करीत आहे. त्यामध्ये स्थानिक लोकांना स्थान मिळेल. ज्या शिक्षकांना स्थानिक भाषा अवगत आहे, जे मराठी भाषेकडे विद्यार्थ्यांना घेऊन जाऊ शकतात अशा शिक्षकांच्या नेमणुकीबद्दल निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मध्यंतरी शिक्षण सेवकांची भरती झाली होती त्या भरतीला माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी स्थगिती दिली आहे हे खरे आहे काय, सीईटीच्या परीक्षेतील 21 प्रश्न चुकीचे आहेत व 8 प्रश्नांची उत्तरे संदिग्ध आहेत अशा आशयाचे विद्यार्थ्यांनी शासनाकडे निवेदन दिलेले आहे असे विद्यार्थ्यांनी सांगितले आहे हे खरे आहे काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांनी माननीय ग्रामविकास मंत्री श्री.जयंत पाटील यांच्या नावाचा उल्लेख केलेला आहे. त्यावेळी त्यांनी कोणतीही स्थगिती दिलेली नाही. सीईटीच्या परीक्षेतील चुकीच्या प्रश्नांबाबत विद्यार्थ्यांनी निवेदन दिलेले आहे हे खरे आहे काय असे विचारले आहे. सीईटीच्या परीक्षेत काही चुका होत्या. या चुकांबाबत काही विद्यार्थी हायकोर्टात गेले होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 14:25

ता.प्र.क्र. 14022.... श्री. राजेंद्र दर्डा...

हायकोर्टाने असा निर्णय दिला होता की, यामध्ये जरी काही चुका झालेल्या असल्या तरी रिझल्ट लागलेला आहे, यामध्ये इतरांना पार्टी केलेले नाही त्यामुळे तो अर्ज खारिज करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासनाने सीईटीची घेतलेली परीक्षा हायकोर्टाने मान्य केलेली आहे.

---

. ...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## उच्च व तंत्र शिक्षण विभागातील शिक्षकेतरांना कालबद्ध पदोन्नतितील तफावत दूर होण्याबाबत

**(४) * १३११९ श्री.रामनाथ मोते, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार, श्री.संजय केळकर :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च व तंत्र शिक्षण विभागातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कालबध्द पदोन्नती संबंधी दिनांक १४ डिसेंबर, २००९ रोजी सभागृहामध्ये चर्चा झाली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.पिठासीन अधिकारी यांनी शासनास काही निर्देश दिले होते काय,
(३) मा.मंत्रीमहोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. डी.पी.सावंत, श्री.राजेश टोपे यांच्या करिता :** (१) होय.
(२) होय.
(३) मा.मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक आयोजित करण्यात आली.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रामनाथ मोते : या ठिकाणी उच्च व तंत्र शिक्षण विभागातील तंत्रमाध्यमिक विद्यालयामध्ये काम करणा-या शिक्षकेतर कर्मचा-यांच्या कालबद्ध पदोन्नतीचा हा प्रश्न आहे. शालेय शिक्षण विभागाने शिक्षकेतर कर्मचा-यांना ऑक्टोबर 1994 पासून कालबद्ध पदोन्नती लागू केली. तंत्र शिक्षण विभागाने मात्र हीच कालबद्ध पदोन्नती 1 जून 2004 पासून लागू केली. या संदर्भामध्ये मी अर्धा-तासाची चर्चा उपस्थित केली होती आणि त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. सभापती महोदय, आपणही शासनाला निर्देश दिले होते की "एकाच शाळेमध्ये काम करणा-या दोन शिक्षकेतर कर्मचा-यांवर अन्याय होत आहे. ही तफावत दूर करण्यासाठी तातडीने या संदर्भात कारवाई करावी. लवकरात लवकर या संदर्भातील प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांकडे सादर करावा, शक्य झाले तर हे अधिवेशन संपण्यापूर्वी या कर्मचा-यांना दिलासा देता येईल का हे देखील पहावे अशी सूचना मी आपणास करीत आहे." सभापती महोदय, अशा प्रकारचे निर्देश आपण 14.12.2009 रोजी दिलेले आहेत. मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, आम्ही तातडीने मुख्यमंत्र्यांची भेट घेतो आणि विषय मार्गी लावतो. परंतु याबाबतीत काहीही कारवाई झालेली नाही. आता असे उत्तर दिलेले आहे की, "माननीय मुख्यमंत्र्याकडे बैठक आयोजित करण्यात आली आहे." ही बैठक झालेली आहे की होणार आहे, झाली असल्यास, त्यामध्ये काय निर्णय झाला आणि हा झालेला अन्याय दूर केला आहे काय ?

..3..



MSS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 14:25

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13119...

श्री. डी.पी.सावंत : राज्यातील अशासकीय अनुदानित तंत्रमाध्यमिक शाळा तसेच +2 स्तरावरील अशासकीय अनुदानित संस्थातील विलक्षी आणि किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमातील जवळ जवळ 2084 शिक्षकेतर कर्मचा-यांचा हा प्रश्न आहे. हा प्रश्न तीन वेळा मंत्रिमंडळासमोर गेलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी हा प्रश्न डिसेंबर 2009 मध्ये विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना तत्कालीन राज्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, आम्ही मुख्यमंत्र्यांकडे हा प्रश्न घेऊन जाऊ. या अनुषंगाने मुख्यमंत्री कार्यालयाशी दोन तीन वेळा संपर्क साधल्यानंतर परवा 28.3.2011 रोजी आमच्या खात्याचे मंत्री महोदय, मी स्वत:,सचिव आणि सहसचिव आमची माननीय मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाली. त्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी असा निर्णय दिलेला आहे की, ही फाईल तीन वेळा मंत्रिमंडळासमोर येऊन गेलेली आहे. याबाबतीत निर्णय दिलेला आहे की, सुरुवातीच्या मंत्रिमंडळामध्ये 12.5.2004 साली निर्णय झालेला आहे. 1 जून 2004 पासून ही पदोन्नती लागू करण्याचा झालेला निर्णय तसाच ठेवण्याच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी निदेश दिलेले आहेत.

श्री. रामनाथ मोते : एकाच शाळेमध्ये 1979 ची नियमावली लागू केलेली आहे. एकाच शाळेतील दोन कर्मचा-यांमध्ये 10 वर्षाची तफावत आहे. ही तफावत सभापती महोदय, आपण देखील मान्य केलेली असून शासनानेही मान्य केलेली आहे. हे चुकीचे झालेले आहे हे शासनाने मान्य केलेले आहे. हा प्रश्न लागल्यानंतर 28 तारखेला बैठक झाली आणि उत्तर तेच दिलेले आहे. हा अन्याय झालेला असल्याचे मान्य केलेले असताना तो अन्याय दूर करण्याचा प्रयत्न शासन करणार नाही काय ? त्यासाठी आम्ही कोर्टात जायचे काय ? तेव्हा या बाबतीत शासनाने फेर विचार करुन तातडीने निर्णय घ्यावा. दोन कर्मचा-यांच्या पदोन्नतीमध्ये जी तफावत ठेवलेली आहे ती चुकीचे आहे, नैसर्गिक न्याय तत्वाच्या हे विरुध्द आहे. याचा शासनाने गांभीर्याने विचार करावा.

श्री. डी.पी.सावंत : मी सांगितल्या प्रमाणे हा विषय मंत्रिमंडळासमोर तीन वेळा गेला होता. मंत्रिमंडळामध्ये विचारांती आणि जाणीवपूर्वक निर्णय घेतलेला होता. 10 वर्षाची तफावत होती. 2004सालचा हा निर्णय आहे. जो निर्णय कागदावर आहे तो मी सांगितलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ ST/ प्रथम श्री.शिगम 14:30

ता.प्र.क्र.13119...

श्री. दिवाकर रावते : मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यमंत्री उपस्थित नसतात. संबंधित विभागाचे मंत्री उपस्थित असतात. त्यामुळे मंत्रिमंडळाच्या बैठकीत काय निर्णय झाला त्या बाबतची माहिती माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांना देऊ द्या.

श्री. राजेश टोपे : मी सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब यांना सांगू इच्छितो की, मंत्रिमंडळाच्या बैठकीत विभागाचा संबंध येतो, त्यावेळी माननीय राज्यमंत्री देखील उपस्थित असतात. त्यामुळे राज्यमंत्र्यांना विषयाची पूर्णपणे माहिती असते. या ठिकाणी माननीय राज्यमंत्री व्यवस्थितपणे उत्तर देत आहेत. त्यामुळे त्यांचे उत्तर सभागृहाने कृपया ऐकून घ्यावे.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे हा निर्णय तीन वेळा झालेला आहे. यावर फेरविचार करणे योग्य होणार नाही असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. 2084 शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पदोन्नती द्यावयाची असेल तर जवळ जवळ 2.65 कोटी रुपये एवढा शासनाच्या तिजोरीवर भार पडणार आहे. या संदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत जो निर्णय झालेला आहे, हा निर्णय अंतिम राहील असे माननीय मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिलेले आहेत.

श्री. रामनाथ मोते : हा विषय अतिशय महत्वाचा आहे. सभागृह हे प्रश्न सोडविण्याचे मोठे माध्यम आहे. या सभागृहामध्ये आम्ही विषय मांडतो आणि अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करतो. माननीय मंत्री महोदय, एक सारखेच उत्तर या ठिकाणी देत आहेत. या विषयाच्या संदर्भात आपण आपल्या दालनात बैठक घ्यावी अशी माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : या विषयाच्या बाबतीत मंत्रिमंडळाच्या बैठकीत जो निर्णय झालेला आहे, त्यात बदल होणार नाही असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे, असे निवेदन माननीय राज्यमंत्र्यांनी केलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेला निर्णय बदलला जाणार नाही ही काळ्या दगडावरची रेष आहे. विषय असा आहे की, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निर्णय घेणार नाही असे सांगितले जात आहे, तर शिक्षण संस्था चालवावयाच्या की चालवावयाच्या नाहीत. जे शिक्षक आहेत, त्यांच्याकडूनच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे काम करुन घेणार आहात. शिक्षकांची इतर कामे बंद केली. म्हणून त्यांच्याकडे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कामे करुन घेऊन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची गरज नाही असे शासनाला म्हणावयाचे आहे काय ? 2.65 कोटी रुपयांची रक्कम तुम्हाला जास्त वाटत नाही काय ? शिक्षकेतर कर्मचारी कामे करतात, त्या संबंधी काही वाटत नाही काय ? या बाबतीत शासनाने निर्णय घेऊन टाकलेला आहे, ही गंभीर गोष्ट आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13119....

**सभापती** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी या अनुषंगाने जे काही प्रयत्न केले, त्या बाबतची माहिती उत्तर देताना सांगितली. प्रश्न असा आहे की, शिक्षकेतर कर्मचारी आहेत, त्या कर्मचाऱ्याच्या पगारामध्ये आणि अलाउन्समध्ये काही फरक राहिलेला आहे. त्या बाबतीत हा प्रश्न निर्माण झालेला आहे असे मला वाटते. माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी आपल्या परीने प्रयत्न केले आहेत. मला असे वाटते की, माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी या संदर्भात पुन्हा एक वेळा प्रयत्न करावा. या प्रश्नाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्र्यांचा देखील उल्लेख झाला आहे. म्हणून या गोष्टीचा उल्लेख करीन की, हा दोन ते सव्वा दोन कोटी रुपयांचा प्रश्न आहे. हा प्रश्न सुटावा असा सदस्यांकडून प्रयत्न होत आहे. या संदर्भात 2004 या वर्षी निर्णय घेतलेला आहे. म्हणून या दृष्टीने आपणही सहानुभूतीपूर्वक विचार करावा व मी देखील याबाबतीत प्रयत्न करील.

श्री. राजेश टोपे : ठीक आहे.

----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ ST/ प्रथम श्री.शिगम 14:30

**सांगली जिल्ह्यात सर्व शिक्षण अभियानांतर्गत शाळा खोल्या**

**बांधकामात ६३ लाख रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(५) * १३४३० श्री.भगवान साळुंखे, श्री.चंद्रकांत पाटील, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात सर्व शिक्षण अभियानांतर्गत शाळा खोल्या बांधकामात ६३ लाख रुपयांचा गैरव्यवहार माहे डिसेंबर, २०१० च्या शेवटच्या आठवड्यात झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच चौदा शाळा खोल्यांच्या बांधकामावर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ३३ लाख रुपये जादा खर्च केले असून ही अनियमितता २००७-२००८ व २००८-२००९ या वर्षातील आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा :** (१) सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळा बांधकामात रूपये ३८.८४ लक्ष इतक्या रकमेची अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) १४ नवीन प्राथमिक शाळा बांधकामाकरिता व अतिरिक्त वर्गखोली बांधकामाकरिता मिळून एकत्रित रूपये १७.८६ लक्ष इतका अतिरिक्त खर्च झालेला आहे.

(३) व (४) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयामार्फत तांत्रिक लेखापरिक्षण करण्यात आलेले असून त्याचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

४...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, शासनाने या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे, त्यामध्ये काही गोष्टीला फाटा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सांगली जिल्हयात २००७-२००८ व २००८-२००९ मध्ये सर्व शिक्षण अभियानांतर्गत शाळा खोल्या बांधण्यात आल्या. त्या बांधकामामध्ये सुमारे ६३ लाख रुपयांची अतिरिक्त रक्कम वापरली गेली आहे. शासनाची मंजुरी न घेता तसेच सर्व शिक्षण अभियानाची बांधकामाच्या संदर्भात समिती असते. त्या समितीच्या सदस्यांना विश्वासात न घेता, त्यांना अंधारात ठेवून ही अतिरिक्त रक्कम खर्च केली गेली. या बांधकाम खर्चामध्ये अनियमितता झाली आहे असे शासनाने मान्य केले आहे. शासनाची मान्यता न घेता अशा प्रकारे रक्कम खर्च करावयाची हा एक नवीन पायंडा अधिकाऱ्यांमध्ये पडत चालला आहे. एका हेडची रक्कम शासनाचे मार्गदर्शन न घेता खर्च करावयाची हा एक गंभीर प्रकार आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13430......... श्री.भगवान साळुंखे.....

प्रश्न असा आहे की, अशा प्रकारची अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, 14 प्राथमिक शाळांच्या बांधकामासाठी 2003-04 मध्ये मंजुरी मिळाली होती. 2008 पर्यंत या शाळांसाठी जागा मिळू शकली नाही. मध्यंतरीच्या काळात बांधकाम साहित्याचे दर वाढले, मजुरीचे दर वाढले, त्यामुळे या 14 प्राथमिक शाळांचे बांधकाम ठरलेल्या किंवा मजुरी दिलेल्या रक्कमेत पूर्ण करणे शक्य नव्हते. बांधकाम उपसमितीला अधिकार नसताना या समितीच्या माध्यमातून पुनर्विनियोजनेद्वारे 14 शाळांसाठी 17.86 लाख इतका अतिरिक्त निधी मिळविला. त्याचबरोबर 2007-08 मध्ये 80 व 2008-09 मध्ये 42 अशी एकूण 122 छोटी कामे केली. ही कामे एकत्र करुन रु.20.98 लाख इतका अतिरिक्त निधी पुनर्विनियोजनातून घेण्यात आला. रु.38.84 लाख रुपये इतका निधी घेत असताना अनियमितता केली. अपहार केला असे म्हणता येणार नाही. परंतु अनियमितता झाली. असे करणे योग्य नाही. खरे म्हणजे या निधीतून शाळांचे बांधकाम पूर्ण झाले हे सत्य आहे आणि 122 उर्वरित कामे पूर्ण झाली. परंतु अनियमितता झालेली आहे. या खर्चाची रक्कम ग्राम शिक्षण समितीने द्यायला पाहिजे. त्यामुळे त्यांच्याकडून आतापर्यंत 6.06 लाख रुपये वसूल केले आहेत. 31 मे, 2011 च्या आत उर्वरित 19.40 लाख रुपये वसूल करण्यात येतील. त्याचबरोबर त्यांना समज देण्यात येईल. त्यांनी जरी चांगल्या भावनेतून काम केलेले असले तरी अनियमितता केलेली आहे. अशी अनियमितता होणे योग्य नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 14 प्राथमिक शाळांच्या बांधकामाचे मूळ अंदाजपत्रक काय होते? 2008 साली बांधकाम पूर्ण झाले, त्यावेळी तरतूद अपुरी होती. ज्यावेळेला नव्याने बांधकाम करावयाचे होते त्यावेळी सुधारित अंदाजपत्रक का केले नाही? सुधारित अंदाजपत्रक न करता ज्यांनी बांधकाम पूर्ण केले त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात?

श्री.राजेंद्र दर्डा : 14 प्राथमिक शाळांचे बांधकाम 2003-04 मध्ये मंजूर झाले होते. ही गोष्ट खरी आहे की, पाच वर्षे या शाळांच्या बांधकामासाठी जागा मिळाली नाही. मध्यंतरीच्या काळात साहित्याचे दर वाढले किंवा खर्च वाढला. अनियमितता झाली आहे याचे कारण म्हणजे त्यांनी योग्य मार्गाने मंजुरी घेतली नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13430........

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न बांधकाम खात्याशी संबंधित आहे. शिक्षण खात्याने बांधकाम खात्याला निधी वर्ग करावयाचा आणि बांधकाम खात्याने बांधकाम करावयाचे असते. वर्ग केलेला निधी बांधकाम खात्याकडे प्राप्त झाला होता. त्यांनी सुधारित अंदाजपत्रक तयार न करता काम केले. जुन्या एस्टीमेटप्रमाणे काम करुन अतिरिक्त निधी घेतला. यामुळेच भ्रष्टाचार होतो. एस्टीमेटपेक्षा 20 ते 25 टक्के अधिक किंमतीचे काम केले जाते. बांधकाम विभागाच्या ज्या अधिकाऱ्यांनी जुन्या एस्टीमेटप्रमाणे काम केले त्यांच्यावर कोणती कारवाई केली जाईल?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सुरुवातीला प्रत्येक शाळा खोलीच्या बांधकामाची किंमत 1.45 लाख रुपये होती. 2008-09 मध्ये ही किंमत 3.10 लाख रुपये झाली. मध्यंतरी पाच वर्षाचा काळ उलटून गेला. हा प्रश्न सांगली जिल्हा परिषदेशी संबंधित आहे. शेवटी हे सर्व काम पूर्ण इ ालेले आहे. तेथील ग्राम शिक्षण समितीकडून रक्कम वसूल करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब तपासून घेण्यात येईल.

---

नंतर 2आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यातील सर्व लघुदाब यंत्रमाग धारकांना इंधन समायोजन आकारासह वीजदर लागू करणेबाबत

**(6) *14055 श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.धनंजय मुंडे** : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात सुताची सातत्याने होणारी दरवाढ, सट्टेबाजी, नफाखोरी यासाठी जबाबदार असणाऱ्या सूत व्यापाऱ्यांमुळे यंत्रमाग वस्त्रोद्योग लयास जाण्याची भीती निर्माण झाल्यामुळे राज्यातील 11 लाख यंत्रमाग धारक व कामगारांनी दिनांक 29 डिसेंबर, 2010 रोजी वा त्यासुमारास संप करून राज्यातील सर्व लघुदाब यंत्रमागधारकांसाठी इंधन समायोजन आकारासह एकूण 1.80 पैसे प्रति युनिट वीजदर लागू करावा अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्यातील यंत्रमाग धारकांच्या मागण्यांविषयी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.मोहम्मद आरीफ (नसीम) खान यांच्याकरिता** : (1) होय.

(2) व (3) सूताच्या किंमतीत होणारी वाढ नियंत्रित करण्याची बाब राज्य शासनाच्या अखत्यारितील नाही. सुताच्या दर वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कापूस व सूताच्या साठ्याची योग्य मर्यादा ठरविण्याबाबत मा.मुख्यमंत्री स्तरावरुन केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

श्री. एस. क्यु. ज़मा : सभापति महोदय, महाराष्ट्र में करीब 11-12 लाख पावरलूम धारक तथा कर्मचारी हैं. उनकी स्थिति बहुत दिनों से खराब चल रही है. मंत्री महोदय ने उत्तर दिया है कि धागे के दाम नियंत्रित करना राज्य शासन के कार्यक्षेत्र में नहीं, बल्कि केंद्र सरकार के कार्यक्षेत्र में आता है. इसलिए धागे के दाम नियंत्रित करने के लिए माननीय मुख्यमंत्री स्तर पर केंद्र सरकार से विनती की गयी है.

मैं बताना चाहूंगा कि टैक्सटाइल पॉलिसी बनाने के लिए जो आवाडे कमेटी बनायी गयी है, उस कमेटी की रिपोर्ट कब तक बनकर पूरी हो जाएगी ? दूसरी बात यह है कि हमारी महाराष्ट्र स्टेट हेंडलूम कारपोरेशन बंद हो गयी है, सिर्फ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा...

आफिस ही वहां पर चालू है. मुझे पूछना है कि क्या उस आफिस और स्टाफ के माध्यम से आप पावरलूम बुनकरों को सब्सिडाइज्ड रेट पर धागा उपलब्ध करा सकते हैं ?

एक बात यह है कि सब्सिडाइज्ड रेट पर बिजली देने के लिए माननीय वित्त मंत्री महोदय ने सन् 2011-12 के बजट में 500 करोड़ रुपए का प्रावधान किया है. पावरलूम संघटनों की मांग है कि 1.80 रुपए प्रति यूनिट के हिसाब से पावरलूम को बिजली उपलब्ध करायी जाये, क्या सरकार पावलूम संघटनों की इस मांग को मान्य करेगी ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, सध्या शासनाकडून 27 हॉर्स पॉवर यंत्रमाग धारकांना 2.50 पैसे युनिट या दराने वीजपुरवठा केला जातो. तर त्यावरील यंत्रमाग धारकांना 2.30 पैसे दराने विजेचा पुरवठा करण्यात येतो. या दोन्ही यंत्रमाग धारकांना जो वीज पुरवठा केला जातो त्यातील तफावत म्हणजे 27 हॉर्स पॉवरपर्यंतचा आपला दर 5.10 पैसे युनिट एवढा आहे तर त्यावरील दर 7.10 पैसे इतका आहे. याचा अर्थ 27 हॉर्स पॉवर यंत्रमाग धारकांना आपण 50 टक्के सवलत देतो तर त्यावरील यंत्रमाग धारकांना 67 टक्के वीज दरात सवलत देतो. अशा प्रकारे हा आकार 1.80 पैसे पर युनिट करावा ही मागणी धोरणात्मक बाबीशी पर्यायाने वित्त विभागाशी संबंधित आहे.

श्री. एस. क्यु. ज़मा : सभापति महोदय , मुझे पूछना है कि क्या आप सब्सिडाइज्ड रेट पर बुनकरों को धागा उपलब्ध करा सकते है या नहीं ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, यंत्रमाग धारकांना शासन जवळपास 500 कोटी रुपये भार सहन करुन विजेच्या दरात सवलत देत असल्याने नंतरची मागणी मान्य करता येणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, टेक्टाईल पॉलिसीमध्ये फक्त यंत्रमाग धारकांचाच विचार केला गेला आहे. पण राज्यातील जवळपास 16 जिल्ह्यांमध्ये जिनिंग अँड प्रेसिंग युनिट्स कार्यरत आहेत, तेथूनच कच्च्या मालापासून पक्का माल तयार होतो. त्यांचा विचार शासन या सवलतीसाठी करणार आहे काय ?

श्री. नसीम खान : महोदय, अजून शासनाचे नवीन टेक्स्टाईल धोरण जाहीर झालेले नसून ते शेवटच्या टप्प्यात आहे. ज्या ज्या ठिकाणी कापूस उत्पादक क्षेत्र आहे त्या त्या सर्व क्षेत्रात जिनिंग, प्रेसिंग अँड स्पिनिंग मिल्सची व्यवस्था करण्याचा शासनाचा मानस आहे. येणाऱ्या काळात यासंबंधी प्रयत्न केला जाईल.

यानंतर श्री. गायकवाड....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14055..

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, स्पिनिंग मिलच्या संदर्भात धोरण जाहीर केलेले आहे. विदर्भ आणि मराठवाडयामध्ये स्पिनिंग मिल्स नाहीत तर तेथे जिनिंग ॲन्ड प्रेसिंग युनिट आहेत.तेव्हा माननीय मंत्र्यांनी शासनाचा मानस काय आहे हे न सांगता निश्चित पणाने जिनिंग ॲन्ड प्रेसिंग युनिटचा समावेश धोरणात केला जाईल अशा प्रकारचे स्पष्ट आश्वासन माननीय मंत्र्यांनी दिले पाहिजे. सध्या स्पिनिंग मिल्ससाठी धोरण करण्याचे शासनाने ठरविलेले आहे परंतु त्याचा उपयोग ग्रामीण भागासाठी होणार नाही. ग्रामीण भागातच कापसावर प्रक्रिया करण्याची सुरुवात जिनिंग ॲन्ड प्रेसिंग युनिटपासून सुरु होत असते. त्यामुळे त्याचा समावेश यामध्ये करण्यात यावा अशी माझी मागणी आहे.तेव्हा शासनाचा मानस काय आहे हे न सांगता विदर्भ मराठवाडयातील जिनिग ॲन्ड प्रेसिंगचा समावेश करण्यात येईल असे स्पष्ट आश्वासन माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री.नसीम खान : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या प्रत्येक मुद्यावर सविस्तर चर्चा सुरु असून त्याबाबत शासन बारकाईने विचार करीत आहे. संपूर्ण राज्याच्या हितासाठी शासन निर्णय घेणार आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की यासंबंधीचे धोरण जाहीर झालेले आहे परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, अशा प्रकारचे कोणतेही धोरण जाहीर झालेले नाही. अजून धोरण जाहीर व्हावयाचे असून ते काम प्रगतीपथावर आहे. त्या धोरणामध्ये कोण कोणता उल्लेख करावयाचा आहे आणि कोण कोणत्या बाबीसंबंधीचा निर्णय घेणार आहोत यासंबंधी निर्णय होण्या पूर्वी आश्वासन देणे योग्य होणार नाही. परंतु मी एवढेच आश्वासन देऊ इच्छितो की, कापूस ते कापडापर्यतचे जे सर्व संबंधित युनिटस आहेत त्यांना संलग्न करुन, लोकांच्या हिताचा विचार करुन योग्य ते करण्यात येणार येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, धोरण जाहीर झाल्यानंतर जर त्याचा उल्लेख धोरणात नसेल तर ते बरोबर होणार नाही. त्यामुळे राज्य शासनाने जे धोरण तयार करावयाचे ठरविलेले आहे त्या संदर्भातील भूमिका मांडत असतांना विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशमधील जिनिंग ॲन्ड प्रेसिंग मोठया प्रमाणावर आहेत. तेव्हा कापूस ते कापड या व्यवसायामध्ये जिनिंग ॲन्ड प्रेसिंगचा समावेश होणे आवश्यक आहे.धोरण तयार करीत असतांना त्याचा देखील समावेश

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होईल यासाठी राज्य शासन नक्की दखल घेईल व त्याबाबतीत आग्रह धरील असे उत्तर माननीय मंत्र्यांनी दिले पाहिजे.धोरण जाहीर झाल्यानंतर त्यासंबंधी खुलासा केला तर त्याचा काहीही उपयोग नाही.तेव्हा धोरण जाहीर होण्या पूर्वी खुलासा होणे आवश्यक असल्यामुळे धोरण जाहीर होण्यापूवीच शासनाने जागे झाले पाहिजे. जेथे कापूस पिकतो अशा विदर्भ आणि मराठवाडयामध्ये जिनिग ॲन्ड प्रेसिंग युनिटस आहेत आणि कापड मात्र पश्चिम महाराष्ट्रात तयार केले जाते तेव्हा जिनिग ॲन्ड प्रेसिंग युनिटचा समावेश धोरणामध्ये करण्यात येऊन त्यांना योग्य तो मान आणि सन्मान देण्याकरिता तसेच त्यांना सवलत देण्याकरिता राज्य सरकार आग्रही राहील अशा प्रकारे उत्तर माननीय मंत्री देणार आहेत काय ?

श्री.नसीम खान : ही बाब विचाराधीन आहे.

श्री एस. क्यु. जमा : सभापति महोदय, यहां पर माननीय विरोधी पक्ष नेता श्री फुंडकर जी तथा माननीय सदस्य श्री रावते जी ने भी कहा कि पूरे देश में जितना कपास पैदा होता है, उसका 20 प्रतिशत उत्पादन हमारे महाराष्ट्र में पैदा होता है. हमारे महामहिम राज्यपाल महोदय ने भी इस बात का उल्लेख अपने अभिभाषण में किया है कि टैक्सटाइल उद्योग के माध्यम से 10 लाख लोगों को रोजगार दिया जा सकता है. हमारा कहना है कि हमारे विदर्भ और मराठवाडा में जीनिंग, प्रेसिंग और प्रोसेसिंग की एक भी यूनिट काम नहीं कर रही है. मुझे पूछना है कि जो नयी टैक्सटाइल पॉलिसी बन रही है उसके माध्यम से आप इस व्यवसाय में ज्यादा रोजगार उत्पन्न करने के लिए क्या प्रावधान करेंगे ?

श्री.नसीम खान :सन्माननीय सदस्यांचा प्रश्न मूळ प्रश्नाशी संबंधित नाही तरी सुध्दा त्याबाबतीत निश्चित विचार करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.प्रश्नोतरांसाठी 19 मिनिटांचा जास्त वेळ मी दिलेला आहे.

----

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत म्हणून मी आपणाकडे हा औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी आग्रह धरला आहे. मराठी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्यासंबंधीच्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा झाली आहे. आपणही त्या विषयावर आपली चांगली भूमिका मांडली आहे. शासनाने देखील त्या शाळेमध्ये एक मुलगा असला तरी त्या शाळेला मान्यता देऊ असे सांगितले. त्यावेळी आपल्या अधिकाऱ्यांनी जे सांगितले होते ते अयोग्य होते म्हणून उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद येथील खंडपीठाने असा निर्णय दिला होता की, याची आपण पूर्ण छाननी करुन 31 मार्चपर्यंत योग्य तो निर्णय घेण्यात यावा. अशाप्रकारचा निर्णय संभाजीनगरच्या खंडपीठाने दिला आहे. या संदर्भात आझाद मैदानामध्ये काल गुढी पाडव्याच्या दिवशी लोक उपोषणाला बसले असतांना मी त्या ठिकाणी स्वत: जावून आलो आहे. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, या संदर्भातील आपल्या खात्याची मानसिकता तातडीने बनविली पाहिजे. महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये मराठी माध्यमाच्या शाळांकरिता उपोषणाला बसावे लागते ही बाब शासनाला भूषणावह आहे काय हे आपण पहावे. त्यामध्ये कोल्हापूरच्या एका शिक्षकाला त्याने मराठी शाळा काढली म्हणून आठ दिवस तुरुंगामध्ये जावे लागले. हातभट्टया लावणारा तुरुंगात जात नाही, कर्ज चुकविणारा तुरुंगात जात नाही, गुन्हे करणारा तुरुंगात जात नाही परंतु शाळा काढली म्हणून शिक्षक आठ दिवस तुरुंगामध्ये गेला ही या राज्याला भूषणावह बाब नाही. सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना आपणामार्फत विनंती करतो की, आपण त्यांच्या शिष्टमंडळाला ताबडतोब भेट द्यावी, आणि त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन आपण कबूल केल्याप्रमाणे याच अधिवेशनामध्ये धोरण जाहीर करावे. मी त्यांच्या भेटीची अपेक्षा व्यक्त करतो, त्यांनी आम्हाला भेट दिल्यास त्यांच्याबरोबर चर्चा करता येईल एवढेच या निमित्ताने सांगू इच्छितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्दयासंदर्भात मला माझे विचार व्यक्त करावयाचे आहेत. आज त्या ठिकाणी उपोषणाला बसलेल्यांमध्ये आदिवासींची लहान बालके सुध्दा आहेत. महाराष्ट्र विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना हे उपोषण सुरु आहे. त्यांची मागणी एवढीच आहे की, "मराठी शाळा टिकू द्या, मराठीतून शिकू द्या" आज मराठीमधून शिक्षण घेणे हाच गुन्हा झालेला आहे. मी त्या लोकांना भेटायला गेलो असतांना तेथील लोकांनी मला सांगितले की, या पूर्वीचे मंत्री आम्हाला असे म्हणाले की, "बस्स झाले मराठी, आता तो जमाना गेला, आता इंग्रजी शाळा काढा". इंग्रजी शाळांना सर्व सवलती दिल्या जातात. महाराष्ट्रामध्ये मराठी शाळा काढणे, मराठीमध्ये शिक्षण घेणे हा गुन्हा झाला आहे. त्यांची मागणी साधी आहे की, गेल्या पाच वर्षापासून जवळपास 200 शाळांमध्ये आदिवासींची गरीब मुले शिक्षण घेत आहेत. बहुजन समाजाला शिकवावे असे स्वर्गीय यशवंतराव चव्हाण आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सांगितले. तरी सुध्दा मराठी शाळांवर बंदी घालण्याचे काम सुरु आहे ते अतिशय चुकीचे आहे. तेव्हा महाराष्ट्रामध्ये यापुढे अनुदानित मराठी शाळा म्हणून त्यांना मान्यता दिली पाहिजे अशी आमची मागणी आहे. किमान या शाळांना आपण ताबडतोब मान्यता ध्यावी. त्याचप्रमाणे शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांना मराठी बोलता येत असतांना ते त्या शिक्षकांशी मुद्दाम इंग्रजीमध्ये बोलत होते. अशाप्रकारे मराठी भाषेचा व्देष बाळगणारे अधिकारी या विभागामध्ये असतील तर ही लांच्छनास्पद बाब आहे असे मी समजतो. या सर्व बाबींची आपण तात्काळ चौकशी करुन त्या शिक्षकांना न्याय द्यावा अशी मागणी करतो.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, एका अतिशय महत्वाच्या विषयाकडे मी आपल्या माध्यमातून या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. सभापती महोदय, महेंद्रसिंग धोनी याच्या नेतृत्वाखालील टीमने नुकताचा विश्वकप जिंकला आहे. एका बाजूला सचिन तेंडुलकर यास "भारतरत्न" पुरस्कार देण्याबाबत देशभरामधून मागणी होत आहे. या निमित्ताने माझी एवढीच मागणी आहे की, सचिन याने आपल्या स्वत:च्या घरामध्ये व्यायाम शाळा करण्याबाबत शासनाकडे एफएसआय वाढवून मागितला होता तो आपण नाकारला आहे ही बाब शासनाला शोभादायक नाही. म्हणून माझी आपणामार्फत शासनाला विनंती आहे की, सचिनने मोठया मनाने तो प्रस्ताव माघारी घेतला असला तरी शासनाने तो प्रस्ताव पुन्हा मागवून घ्यावा. सभापती महोदय, आज या राज्यामध्ये मोठया प्रमाणावर एफएसआयचे घोटाळे होत आहेत, कोटयवधी रुपयांचे भ्रष्टाचार सुरु आहेत आणि दुसऱ्या बाजूला या देशाचा नावलौकिक मोठा करणाऱ्या सचिन तेंडुलकर सारख्या प्रामाणिक क्रिकेटपटूला आपण एफएसआय नाकारीत आहात ही बाब आपल्याला शोभादायक नाही. या करिता माननीय मुख्यमंत्र्यांनी या बाबत तात्काळ लक्ष घालून सचिन तेंडुलकर याची फाईल मागवून घेऊन त्याला व्यायाम शाळेसाठी एफएसआय तात्काळ वाढवून द्यावा अशी या औचित्याच्या मुद्दयाव्दारे मागणी करतो.

**सभापती** : सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर. पाटील साहेब आपण स्वत: यामध्ये लक्ष घालून सन्माननीय मुख्यमंत्र्यांना या भावना सांगाव्यात.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, होय.

**सभापती** : त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी औचित्याच्या मुद्दयाव्दारे या ठिकाणी जी सूचना केली आहे

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ ST/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:55

**सभापती** . . . .

त्याबाबत मी सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील साहेब यांना सांगू इच्छितो की, याठिकाणी आतापर्यंत माननीय शिक्षण मंत्री उपस्थित होते, परंतु ते आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्यांनी मघाशी सांगितल्याप्रमाणे आझाद मैदानामध्ये उपोषणासाठी बसलेले जे मराठी शिक्षक आहेत, त्यांचा प्रश्न दिवसेंदिवस तीव्र होत आहे. तसेच हा प्रश्न भावनेचा असल्यामुळे आपण माननीय शिक्षण मंत्र्यांना आपल्या दालनामध्ये बोलवावे आणि त्यांच्याबरोबर . . .

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, आता माननीय मुख्यमंत्र्यांनी उपोषणकर्त्यांना चर्चेसाठी बोलावून घेतलेले आहे आणि त्याकरिताच माननीय शिक्षण मंत्र्यांना देखील बोलावून घेण्यात आले आहे. त्याबाबत चर्चा सुरु आहे.

**सभापती** : जर माननीय शिक्षण मंत्री सदनामध्ये तसे सांगून गेले असते तर अधिक चांगले झाले असते आणि ते सिनिअर मंत्री महोदय असल्याने, त्यांनी तसे सांगून जाणे गरजेचे होते.

----

. . . .2 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनवणे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, विधिमंडळाच्या अधिवेशनात उपस्थित राहण्यासाठी माननीय सदस्यांसाठी रेल्वेची खास बोगी लावण्यात आलेली असते. चालू अधिवेशनात देखील ही व्यवस्था भारतीय रेल्वेच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. दि.04-04-2011 रोजी विदर्भ एक्सप्रेसला नागपूर येथून माननीय आमदारांसाठी स्वतंत्र बोगी असतांना त्या बोगीत माननीय आमदारांना प्राधान्य न देता इतर प्रवाशांना प्राधान्य देणे, लोकप्रतिनिधींना साईड बर्थ देणे, त्यांच्या सोबत प्रवास करीत असलेल्या नातेवाईकांसाठी आरक्षण न मिळणे, टीसीला विचारणा केली असता आम्हाला सर्वच प्रवासी सारखेच आहेत असे उर्मटपणे बोलून लोकप्रतिनिधींना अपमानास्पद वागणूक मिळणे, तसेच सदर बोगी ही इंजिनच्या जवळ न लावता शेवटी लावणे, त्यामुळे चढण्यास-उतरण्यास गैरसोयीचे होणे, तसेच मुंबई सीएसटी स्टेशनपासून आमदार निवासापर्यंत येण्यासाठी टॅक्सीचालकांनी टाळाटाळ करणे, प्रसंगी टॅक्सीत बसलेले असताना उतरण्यास सांगणे, यावर पोलिसांचे नियंत्रण नसणे, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना याबाबत मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

----

. . . . .2 यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ ST/ KTG/ 14:55

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, पूर्वीपासून छत्रपती शिवाजी टर्मिनलवर ट्रेन येण्यापूर्वी तेथे आतापर्यंत बसची व्यवस्था करण्यात येत होती. पण गेल्या दोन वर्षापासून आमदारांसाठी बसची व्यवस्था करण्यात येत नाही. त्यामुळे अशा प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. दुसरी बाब म्हणजे रेल्वेला आमदारांसाठी शेवटी बोगी लावली जाते, त्याच्या बाजूला जनरल डबा असतो.काही सन्माननीय सदस्य नक्षलवादी एरियातील आहेत ते व इतर भागातील सन्माननीय सदस्य ट्रेनने प्रवास करीत असतात. अशावेळी उद्या जर त्या डब्यामध्ये नक्षलवादी किंवा दरोडेखोर शिरले तर सर्व आमदारांची मोठ्या प्रमाणात फजिती होणार आहे. त्यामुळे आमदारांसाठी बोगी शेवटी न लावता मध्ये लावण्यात यावी किंवा इंजिनच्या बाजूला लावावी. प्रत्यक्षात आम्हाला गाडीतून खाली उतरता येत नाही किंवा गाडीमध्ये नीट चढताही येत नाही अशा विचित्र ठिकाणी बोगी लावली जाते. त्यामुळे या बाबतीत निश्चितपणे विचार करण्याची आवश्यकता आहे असे मला सांगावयाचे आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, अधिवेशन काळामध्ये लांब अंतरावरुन येणाऱ्या जवळपास सर्व गाडयांना एक विशेष अतिरिक्त डबा जोडला जातो. पण लातूर-मुंबई एक्सप्रेसला अशा प्रकारचा कोणताही डबा जोडला जात नाही. त्यामुळे त्या भागातील तीन जिल्ह्यातून मोठ्या संख्येने आमदार महोदय प्रवास करतात, त्यांची गैरसोय होते. अर्थसंकल्पीय अधिवेशन संपेपर्यंत याबाबत सोय होणार नाही पण किमान पुढील अधिवेशनाच्या कालावधीमध्ये लातूर-मुंबई एक्सप्रेसला एक अतिरिक्त ए.सी.डबा जोडण्यात यावा अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करीत आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी रेल्वेच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करताना विदर्भ एक्सप्रेसबाबत आणि लातूर-मुंबई एक्सप्रेसबाबत सांगितले. तशाच प्रकारे कोल्हापूर येथून महालक्ष्मी एक्सप्रेस येते, त्याबाबतीत सुध्दा हीच अडचण असते. एकदा आम्ही दहा आमदार प्रवास करीत होतो. त्यावेळी दहापैकी नऊ आमदारांना गाडीमध्ये वरचा बर्थ देण्यात आला होता. सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांना साईडचा वरचा बर्थ दिला होता. त्यावेळी इतरही सन्माननीय सदस्य होते. याबाबतीत आम्ही चौकशी केल्यावर असे सांगण्यात आले की, हे असेच चालणार आहे. आम्हाला सगळे पॅसेंजर सारखे आहेत. सर्व आमदारांना वरचा बर्थ देण्यात आला होता. सन्माननीय सदस्य श्री.संभाजी पवार साहेब हे पडता-पडता वाचले. अशा प्रकारे जर लोकप्रतिनिधींकडे दुर्लक्ष होणार असेल तर आपण हा गंभीर विषय आहे असे समजून संबंधितांना





निर्देश द्यावेत. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी यामध्ये स्वत: लक्ष देईन. या संदर्भात मी रेल्वेच्या उच्च अधिकाऱ्यांना माझ्या कार्यालयामध्ये बोलावून घेईन आणि त्यावेळी काही सन्माननीय सदस्यांना देखील बोलविण्यात येईल. या बाबतीत सांगावयाचे तर सुरुवातीला काही दिवस व्यवस्था चांगल्या प्रकारे केली जाते. नंतर रेल्वेचे काही लोक अशा प्रकारच्या गोष्टी करतात. त्यामुळे या बाबतीत मी स्वत: लक्ष घालेन.

यानंतर श्री.भारवी . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, जनलोकपाल विधेयकासाठी महाराष्ट्राचे थोर समाजसेवक श्री.अण्णा हजारे जंतरमंतर दिल्ली येथे बेमुदत उपोषणाला बसले आहेत. आज पासून त्यांचे उपोषण सुरू झालेले आहे. लोकमान्यतेतून जनलोकपाल विधेयकाचा मुसदा तयार करण्यात यावा अशी त्यांची मागणी आहे. माझी मा.मुख्यमंत्र्यांना आणि राज्य सरकारला विनंती आहे की,अण्णांच्या वतीने आपण केंद्र शासनाकडे रदबदली करावी. अण्णांची मागणी न्याय व रास्त आहे. त्या मागणी मध्ये आपण स्वत: लक्ष घालावे. केंद्राकडे रदबदली करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

**सभापती** : माननीय मंत्री महोदय, श्री.आर.आर.पाटील यात आपण स्वत: लक्ष घालावे व मा.मुख्यमंत्र्यांना सदनाच्या भावना जरूर कळवाव्यात.

-----------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मनोरा आमदार निवास येथील उपाहारगृहातील खालावलेला खाद्यपदार्थांचा दर्जा**

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, खेड्यातील बरेच सन्माननीय सदस्य मनोरा आमदार निवास येथे राहतात. अधिवेशन सुरू झाल्यानंतर चमत्कार झालेला आहे. सगळ्या खाद्यपदार्थाचे भाव दुपटीपेक्षा जास्त वाढले आहेत. पण पदार्थांचा दर्जा खालावलेला आहे. आम्ही आमच्या घरामध्ये पिठले भाकर खाऊन सुखी होतो. इथे येऊन पोटाला त्रास पडणार असेल तर कसे चालेल. माझ्या माहितीप्रमाणे मनोरा उपाहारगृहातील अन्न खाल्ल्यामुळे अनेकजण आजारी पडले आहेत. येथील खाद्यपदार्थांचे भाव देखील अचानक कसे काय वाढले ? महागाईच्या नावावर काय काय भानगडी केल्या हे मला माहित नाही.

श्री.जैनुद्दीन झव्हेरी : सभापती महोदय, दरवाढ झाली हे खरे आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, खाद्यपदार्थाचे दर ठरविण्याचे काम विधान मंडळाची आहार व्यवस्था समिती करते. महागाई वाढल्यामुळे पदार्थांचे दर वाढविण्यात आले असे समर्थन केले आहे. वाढती महागाई लक्षात घेऊन थोड्या वेळेसाठी आम्ही हे मान्य केले तरी त्या पदार्थांचा दर्जा सुधारला पाहिजे. दरवाढ केल्यानंतर पदार्थाचा दर्जा वाढला पाहिजे. त्यामुळे आपल्या दालनात संबंधित कंत्राटदारांना बोलावून सूचना दिल्या तर ते योग्य होईल.

**सभापती** : आहार या विषयावर आहार समिती लक्ष देत असते. मी स्वत: आणि माननीय अध्यक्ष यात लक्ष घालून सर्व कॅटरर्सना माझ्या दालनात बोलावून घेतो व त्यांच्याशी सविस्तर चर्चा करतो. पदार्थांचा दर्जा चांगला राखला गेला पाहिजे ही आपली भावना आहे. तेथे शक्यतो चांगली क्वालिटी असेल असे मला वाटते. आमदार निवास उपाहारगृहातील पदार्थांचे दर कमी करता येतील काय ह्या दृष्टीने आम्ही जरूर बघू.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. तरी देखील एक सूचना मी आपल्याला करणार आहे. कुठल्याही आमदार निवासातील उपाहारगृहात ज्वारीची भाकरी मिळत नाही. ती मिळण्याची व्यवस्था करावी व याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे असे मला वाटते.

**सभापती** : क्वांटीटी आणि क्वालिटी याकडे लक्ष देण्यात येईल. कोकणातील लोकांना तांदळाची भाकरी आवडते. माझ्या सारख्या माणसाला बाजरीची भाकरी आवडते. तर श्री.विक्रम काळे यांना ज्वारीची भाकरी आवडते. तर मध्ये असलेल्या लोकांना गहू आवडतो. त्या दृष्टीने सगळी चर्चा कंत्राटदाराशी करण्यात येईल.

--------

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्र सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे, आदेश, 1994 च्या कलम 7 अन्वये महाराष्ट्राचे मा.राज्यपाल यांचे वार्षिक योजना 2011-2012 मधील प्रदेशनिहाय नियत वाटपाबाबतचे दिनांक 10 मार्च 2011 रोजीचे निदेश सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : निदेश सभागृहासमोर ठेवण्यात आले.

यानंतर श्री.खंदारे.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्ती महामंडळाचा सन 2008-09 चा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.डी.पी.सावंत ( उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन 2008-09 चा एकोणिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचा सन 2008-09 चा एकोणिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.35 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 3.05 ते 3.35 मध्यंतर )

----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर व नागो गाणार यांनी "माध्यमिक शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांच्या नियुक्त्यांना मान्यता देण्याचे अधिकार तसेच मान्यता देण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्याचे अधिकार जिल्हा शिक्षणाधिकारी यांना असणे, परंतु मान्यता देण्यासाठी पैशांची मागणी करणे अशा अनेक तक्रारी जिल्हा शिक्षण अधिकारी, ठाणे यांच्या विरोधात असून त्याबाबत शासनाने दखल घेण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे व रामनाथ मोते यांनी "मौजे वाढाणे, ता. बारामती, जिल्हा पुणे येथील पद्मावती पाझर तलावाच्या सांडवा दुरुस्तीचे काम ठेकेदारी पध्दतीने करण्यास मंजुरी देणे, सदर कामाची रक्कम ठेकेदारास न मिळता ती सरपंच व ग्रामसेवक यांनी परस्पर घेऊन केलेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "तेल्हारा नगरपरिषद, जिल्हा अकोला येथील जिल्हा परिषदांच्या 3 शाळा नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी "पुणे येथून 15 वर्षीय मुलीला जळगांव शहरातील निखेडी शिवारातील चंदूअण्णानगर येथे राहणा-या काजल उर्फ कलाबाई नारायण शिरसाट हिने जळगांवात आणून वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणे, अशा प्रकारे अल्पवयीन मुलींना वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणा-या टोळ्यांना अटक करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, संजय केळकर व रामनाथ मोते यांनी "मौजे कांबा, ता. कल्याण, जि. ठाणे येथील श्री. विष्णू लक्ष्मण फडके यांची जमीन 1987 मध्ये श्री. शहा यांनी व इतरांनी विकत घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील व श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "जवळा बुद्रूक, तालुका शेगांव, जिल्हा बुलढाणा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत इयत्ता 8वी ते 10 वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांच्या जागा रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता व पांडुरंग फुंडकर यांनी "जीवन विकास शिक्षण संस्थाद्वारा संचलित पुनोती, ता. बार्शीटाकळी, जिल्हा अकोला येथील नथ्थुजी काकड विद्यालयात गैरकायदेशीर नेमणुका होत असल्याची घटना, परिणामी नथ्थुजी काकड विद्यालयातील गैरप्रकार प्रकरणी संचालकांवर कारवाई करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील व कपिल पाटील यांनी " मौजे मालवणी (मालाड, मुंबई) येथील गावठाण नभूक्र. 1363 व 1364 येथील भूखंडावर रामगल्ली येथे नव्याने बांधण्यात येणा-या 21 मजली अनधिकृत इमारतीबाबत तेथील स्थानिक मालवणी मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी यांनी मा. आयुक्त,मनपा, मुंबई व अन्य सर्व संबंधितांना सदरहू बांधकाम थांबविण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, संजय केळकर व सय्यद पाशा पटेल यांनी "राज्यात स्वस्त धान्य वितरणाच्या योजनेत मोठ्या प्रमाणावर बोगस शिधापत्रिका असल्याचे उघडकीस येणे, अशा अनेक प्रकारच्या पुरवठा खात्यातील अनागोंदी कारभारामुळे राज्य शासनाचे कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसान व त्याबाबत चौकशी करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "मुंबई सांताक्रुझ येथील एअर इंडिया मॉडर्न स्कूल मधील सहा. शिक्षक श्री. मोरेश्वर पाटील यांना वैद्यकीय उपचाराचे बिल वेळेवर न मिळाल्याने त्यांच्या प्रकृतीची झालेली हेळसांड तसेच मृत्यूनंतरही पगाराची थकबाकी न मिळणे, परिणामी माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी मेडिक्लेम योजना सुरु करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी " रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील देवापाडा, चिंचवली, वाघेवाडी, उंबरवाडी,गिरेवाडी व शेंडेवाडी या गावांना नळ योजनेद्वारे अपूर्ण पाणी पुरवठा होत असताना येथील "रामबाग" या फार्म हाऊसने पाणी खाजगी वापरात आणणे, त्यामुळे ग्रामस्थांना निर्माण झालेल्या पाण्याच्या टंचाईबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ दीपक सावंत यांनी "हिमोफेलिया आजाराचे राज्यात 15 हजाराहून अधिक रुग्ण असूनही फक्त 3 हजार रुग्णांची नोंद हिमोफेलिया सोसायटीत असणे, या आजारात द्यावी लागणारी लस अतिशय महाग असल्यामुळे रुग्णांना न परवडणे, अशा रुग्णांना मोफत उपचार देण्याबाबत करावयाची कार्यवाही" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4..



उप सभापती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपकर यांनी "सिंधुदुर्ग तालुक्यातील वेंगुर्ले नगरपरिषदे कडून सीआरझेड 1 क्षेत्रात खारफुटी जंगलाच्या ठिकाणी कोकण पॅकेज अंतर्गत हाती घेतलेली विकास कामे, या बांधकामास स्थगिती देण्याबाबत पाठविण्यात आलेली नोटीस" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...नंतर श्री. गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री संजय केळकर, धनंजय मुंडे, पाशा पटेल यांनी " गोंदिया शहरातील (जि. गोंदिया) जानेवारी 2011 च्या सुमारास नव्याने बांधकाम करण्यात आलेल्या दुकाने आणि निवासस्थानांना वीज कनेक्शन देताना कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर सुध्दा एखाद्या कागदपत्रासाठी विद्युत विभागाकडून टाळाटाळ करणे, तसेच उपरोक्त प्रकरणी गोंदिया विद्युत विभागाचे अधिकारी आणि ग्राहकांना रसीद देऊन विद्युत बिलाची रक्कम न भरणाऱ्या कर्मचाऱ्यांवर करावयाची कार्यवाही " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी " वन खात्यामार्फत ठाणे जिल्हयातील मुरबाड येथे दुर्मिळ वनस्पती व वनस्पती उद्यान उभारण्यात आले असून शासनाने गेल्या 5 वर्षात कोणतीही आर्थिक तरतूद न केल्यामुळे पाण्याअभावी वनौषधी करपून जाणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई गिरणी कामगारांना परवडणाऱ्या दरामध्ये घरे देणे राज्य सरकारने घेणे.

**मु. शी.** : मुंबई गिरणी कामगारांना परवडणाऱ्या दरामध्ये घरे देणे याबाबत डॉ.नीलम गो-हे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मुंबई गिरणी कामगारांना परवडणाऱ्या दरामध्ये घरे देणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या धरांसंदर्भात नियम 93 अन्वये सूचना दिली आहे, त्या सूचनेच्या अनुषंगाने दिलेल्या निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, गिरण्यांच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या घरांसाठी गिरणी कामगारांची पात्रता ठरविणे. कामगारांची पात्रता ठरवितांना कोणते निकष लावलेले आहेत ? निकष लावत असताना जे कामगार कामगार कामावरच नाहीत,त्यांना घरांचे पैसे भरणे हे कितपत शक्य आहे. या गोष्टीबद्दल मानवतावादी विचार ठेवून त्यांना कमीत कमी खर्चामध्ये किंवा अल्प किंमतीमध्ये घरे उपलब्ध करुन देण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ? एक संपूर्ण पिढी यामध्ये बदबाद झालेली आहे. त्यामुळे गिरणी कामगारांना घरे कधी मिळणार ?  ज्या गिरण्याच्या जमिनी सरकारच्या ताब्यात आलेल्या नाहीत. गिरणी मालकांनी गिरण्याच्या जमिनी कमर्शियल हेतूने दिलेल्या आहेत. त्या जमिनी ताब्यात घेऊन तेथेही घरांची योजना राबविण्यासाठी शासनाने काय पावले उचललेली   आहेत ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मुळामध्ये या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. सर्व कामगार संघटने बरोबर चर्चा करुन एकंदरीत दर काय असावेत आणि निकष काय असावेत हे ठरविण्यात येत आहे. त्यात काही कामगार संघटनाचे म्हणणे आहे की, 1982 च्या संपामध्ये सर्वच गिरणी कामगार उद्‌ध्वस्त झाल्यामुळे त्यात सर्वच कामगारांचा समावेश करावा. काही संघटनेचे म्हणणे असे आहे की, 2004 नंतरची पात्रता ठरवावी. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीमध्ये सर्व कामगार नेत्यांना एकत्रित करुन या अनुषंगाने निर्णय घेणे अपेक्षित आहे. दराच्या बाबतीत देखील चर्चा महत्वाची आहे. शासनाने 10.50 लाख रुपये दर आकारलेला आहे. गिरणी कामगारांचा दराच्या बाबतीत देखील आक्षेप आहे. गिरणी कामगार एवढे पैसे देऊ शकत नाही.. जेएनयूआरएमच्या माध्यमातून किंवा बीएसयुपी च्या माध्यमातून व काही केंद्र शासनाचे अनुदान आणि राज्य शासनाचे अनुदान एकत्र करुन कमीत कमी दर करता येईल काय या बाबतचा अभ्यास करावा अशा मुख्य सचिवांना सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे या बाबतीत मुख्य सचिवांना पुन्हा सूचना देण्यात येतील. एका महिन्यात या संदर्भातील निर्णयाला अंतिम स्वरुप आणावे अशी एक सूचना या निमित्ताने दिली जाईल. 6948 घरांचे बांधकाम जुन, जुलै पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. येणाऱ्या दिवाळीच्या अगोदर गिरणी कामगारांना घरे देण्याची तयारी राज्य शासनाची आहे.



श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, गिरणी कामगारांचे नेते मंत्री पदावर बसले आहेत. आता तरी आपल्याला न्याय मिळेल अशी गिरणी कामगारांची अपेक्षा आहे. शासनाने मुख्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली, परंतु त्या समितीतील आयएएस् अधिकाऱ्यांसमोर गिरणी कामगारांची समस्या कोणी तरी मांडेल अशी अपेक्षा आहे. लोकांचा अनुभव काय आहे हे मला माहिती नाही. शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. ते स्वत: गिरणी कामगारांचे नेते असताना त्यांना असे का करावे लागते आहे हे मला समजत नाही. मला असे विचारावयाचे आहे की, घरांची किंमत 10.50 लाख रुपये काढली आहे....

यानंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

कन्स्ट्रक्शन रेट 1200 ते 1500 रुपयांपेक्षा जास्त असू शकत नाही, हे बांधकाम पाहिल्यानंतर लक्षात येते. या दरानुसार प्रत्येक सदनिकेची किंमत 3.5 लाख रुपये होते. त्यापैकी 2 लाख रुपये केंद्र सरकारकडून दिले जाणार आहेत. 1.5 लाख रुपयात कामगारांना घरे परवडू शकतात. ही वस्तुस्थिती मंत्री महोदयांना माहित आहे. त्याप्रमाणे सरकार आदेश काढणार आहे का? मध्यंतरी नगरविकास राज्यमंत्र्यांनी विधानसभेत जाहीर केले होते की, गिरणी कामगारांना मोफत घरे दिली जातील. नंतर त्यांनी त्यांचे वक्तव्य मागे घेतले. त्यांच्यावर कोणाचा दबाव आला हे मला माहिती नाही. न्यायास विलंब म्हणजे न्याय नाकारणे आहे. गिरणी कामगार आझाद मैदानात येऊन उपोषण करीत आहेत, निदर्शने करीत आहेत. हायकोर्टाने आदेश दिले आहेत. गिरणी कामगारांना परवडतील अशा 3.5 लाख रुपये या दरात सरकार घरे देणार आहे का?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, गिरणी कामगारांसाठी घरे बांधण्याचे काम सुरु ठेवले आहे. दर कमी केले जात नाहीत म्हणून काम थांबविले असे नाही. म्हाडाच्या माध्यमातून 800 कोटी रुपये खर्चून बांधकाम केले जात आहे. जून-जुलै महिन्यात हे बांधकाम पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. दरम्यानच्या काळात मुख्य सचिवांची समिती नेमली आहे. ज्या समितीमध्ये कामगारांच्या सर्व संघटनांचे प्रतिनिधी एकत्रितपणे येऊन सदनिकेची किंमत निश्चित करता येईल. म्हाडाने सदनिकेचे बांधकाम करण्यासाठी कॉन्ट्रॅक्ट देण्याची भूमिका घेतली. सदनिकेचे दर बाजारभावाप्रमाणे 1476 रुपये प्रती चौ.फूट होते, ते आता 1771 रुपये प्रती चौ.फूट इतके झाले आहेत. त्यामध्ये प्रती चौ.मी. इन्फ्रास्ट्रक्चरसाठी 56 रुपये, 15 टक्के कामगारांच्या कामावरील टॅक्स एकत्रित करुन दर निश्चित केले आहेत. राज्य शासनाने स्पष्ट केले आहे की, आम्हाला हे दर मान्य नाही. हे दर गिरणी कामगारांना परवडणार नाहीत. एका व्यक्तीवर याची जबाबदारी सोपवून एकमत करणे गरजेचे आहे. म्हणून मुख्य सचिवांना सूचना देण्याचे काम केले आहे. कालच काही कामगार संघटनांनी वेगवेगळी आंदोलने केली, काही शिष्टमंडळे आणल्यानंतर मी स्वत: पुढाकार घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक घेऊन या प्रश्नावर न्यायनिवाडा करण्याची भूमिका राज्य शासनाच्या माध्यमातून घेऊन त्या कामगारांना न्याय देण्याचे काम केले जाईल.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : गिरण्याच्या उर्वरित जागांवर विकास कामे करुन कोट्यवधी रुपये कमावण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे रिक्त जागा ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केले जातील काय? अन्यथा तेथे गिरणी कामगारांची घरे न बांधता कमर्शियल विकास केला जाऊन गिरणी कामगारांना हक्काच्या घरापासून वंचित ठेवले जाईल.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, 31 मार्च ही डेडलाईन दिली होती, ती चार दिवसांपूर्वीच पूर्ण झाली आहे. नगरविकास विभागाच्या माध्यमातून अध्यादेश काढून 1/3 जागा शासनाला हस्तांतरित करावी लागेल अशी भूमिका घेतली आहे. काही गिरणी मालकांचे म्हणणे आहे की, आम्ही आता विकास करु इच्छित नाही, त्यामुळे आमच्यावर हा आदेश बंधनकारक नाही. परंतु नगरविकास विभागाने अध्यादेश काढला आहे. तुम्ही आज जागेचा विकास करा अथवा सहा वर्षांनी करा. परंतु 31 मार्चच्या आत 1/3 जागा राज्य शासनाकडे हस्तांतरित करावी लागेल असा निर्णय घेण्यात आला आहे. उद्यापासून संबंधित लोकांनी जागेचा विकास करण्याच्या संदर्भात 1/3 जागा दिली नाही तर त्यांच्या कामकाजावर बंदी घालून संबंधित जागा ताब्यात घेण्याबाबत राज्य शासन कार्यवाही करेल.

-------

**उप सभापती** : नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील क्रमांक 63 उद्या चर्चेला घेण्यात येईल.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुणे शहरात पाकिस्तानी गुप्तचर संस्थेसाठी हेरगिरी करणाऱ्या तरुणाला झालेली अटक.

**मु.शी.**: पुणे शहरात पाकिस्तानी गुप्तचर संस्थेसाठी हेरगिरी करणाऱ्या तरुणाला झालेली अटक यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुणे शहरात आयएसआय या पाकिस्तानी गुप्तचर संस्थेसाठी हेरगिरी करणा-या विषंभर ताराचंद अगरवाल या तरुणाला दि.२.२.२०११ रोजी वा त्यासुमारास करण्यात आलेली अटक, या आरोपीची चौकशी केली असता ब्रिजेशकुमार सिंग नावाच्या लष्करी जवानाशी संबध असल्याचे निष्पन्न होणे, पुणे शहरात लष्कराची २० महत्वाची केंद्रे असल्याने पुणे शहर हे नेहमीच पाकिस्तानच्या आयएसआयच्या हिटलिस्टवर असणे, याकरिता या लष्करी जवानास अटक करण्याची आवश्यकता, अद्याप पर्यंत त्यांस अटक न केल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे व घबराटीचे वातावरण, याबाबत शासनाने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, जो संशयित आरोपी पकडला गेला त्याची मानसिकता सदर्न कमांडकडून हेडलीला ताब्यात घेतले तेव्हा स्पष्ट झाली होती. पुणे शहर आणि सदर्न कमांड आयएसआयच्या रडारवर आहे. पूर्वी जे काही अतिरेकी पकडले गेले तसेच 2008 मध्ये मुंबई पोलिसांनी काही अतिरेकी पकडले त्यातील तीन पुण्याचे रहिवासी होते. त्यासोबत रियाज भटकळ हा चार वर्षे पुण्यामध्ये वास्तव्यास होता. तो राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्राध्यापक म्हणून काम करीत होता.

नंतर 3ए.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ........

या प्रकरणाशी संबंधित व्यक्ती सापडली आहे. तसेच उत्तरात म्हटले आहे की, या व्यक्तीवर आरोप पत्र दाखल केले आहे. हे दोन आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. या अनुषंगाने मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, अगोदर पुण्यात जर्मन बेकरीत झालेल्या स्फोटाबाबत किंवा अन्य ज्या घटना घडलेल्या आहेत त्या घटनेतील आरोपी अजुनही सापडले नाहीत. अशा वेगवेगळ्या घटनांचा विचार केला तर पुणे शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच अतिरेक्यांच्या लिंकेज रोखण्याच्या दृष्टीने एटीएस सारखी यंत्रणा निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती पावले उचलली आहेत ? त्याचबरोबर राज्यातील काही मुख्य शहरांबरोबरच पुणे शहरासाठी आर्थिक तरतूद काय करण्यात आली आहे ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, राज्यातील जी जी गांवे अथवा शहरे अतिरेक्यांच्या रडारवर आहे तेथे कायमस्वरुपी सुरक्षेची संपूर्ण व्यवस्था पोलिसांमार्फत केलेली आहे. एक तर अशा घटनेची माहिती लवकर मिळावी म्हणून पोलीस दल सक्षम करणे जेथे जेथे आवश्यक आहे तेथे सक्षम करण्यात येईल. तसेच ज्या ज्या शहरांमध्ये एटीएस स्थापन करण्याची गरज असेल तेथे लवकरच एटीएस स्थापना करुन त्या त्या प्रमाणात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच काही शहरांची लोकसंख्या मधल्या काळात मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्या तुलनेत पोलीस दलाची संख्या मात्र वाढलेली नाही. म्हणून शासनाने दरवर्षी 11 हजार पोलीस भरती करण्याचा निर्णय घेतला व त्याप्रमाणे गेल्या चार वर्षात आपण 44 हजार पोलिसांची पदे निर्माण केली आहेत. त्यानुसार आता सर्वात अधिक पोलिसांची संख्या आपल्या राज्यात आहे. अशा प्रकारे शासनाने चार वर्षापूर्वी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे या वर्षी आणखी 11 हजार अतिरिक्त पोलीस निर्माण करुन ते सुरक्षा व ट्राफिक यंत्रणांना पुरविले जाणार आहेत. या घटनेतील जे संशयित आरोपी आहेत त्यांची काही माहिती पोलिसांना मिळाली होती. मिलिटरीतील एका जवानाबरोबर लागेबांधे जोडून त्यांचे फोटोग्राफ्स घेणे आणि आयएसआयला पुरविणे असा हा कट असावा अशी माहिती पोलिसांना मिळाल्यावर पाळत ठेवून श्री. अगरवाल आणि मिलिटरीतील जवान यांना अटक करण्यात आले. त्याच्याकडून मिलिटरीच्या संदर्भातील सर्व माहिती पोलिसांनी जप्त केली आहे. अशा प्रकारे काही करण्यापूर्वीच पोलिसांनी त्यांचा कट उघडकीस आणला व दोघांनाही पकडण्यात आले. पुढील तपास सुध्दा पोलिसांमार्फत चालू आहे.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, पुणे शहराच्या सुरक्षेसाठी शासनाने कोणती पावले उचलली असा माझा प्रश्न होता. तसेच जर्मन बेकरीतील आरोपी अद्याप पकडले गेले नाहीत. केंद्रीय गृह सचिव सांगतात की, जे आरोपी मिळाले ते जर्मन बेकरीच्या संदर्भातील नाहीत. अशा वेळेस नागरिकांची सुरक्षा म्हणून पुण्याच्या पोलिसांना सक्षम करण्यासाठी एटीएसची पदे शासनाने भरली आहेत काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, हा वेगळा प्रश्न आहे. तरी देखील मी सांगू इच्छितो की, शासनाने क्यूआरटीची काही पदे भरली आहेत. त्या अनुषंगाने आवश्यक त्या रॅपिड ॲक्शन फोर्स व क्वीक रिस्पॉन्स अशा दोन टीम्स तयार केल्या आहेत. तसेच आतंकवाद्यांचा धोका लक्षात घेऊन पुणे शहराच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच जर्मन बेकरीच्या संदर्भातील मुख्य आरोपी जरी पकडला नसला तरी अन्य आरोपींना पकडण्यात आलेले आहे.

---------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : महाड (जि. रायगड) भागात मोठ्या प्रमाणात होत असलेले उत्खनन

**मु. शी**. : महाड (जि. रायगड) भागात मोठ्या प्रमाणात होत असलेले उत्खनन यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, सय्यद पाशा पटेल, डॉ. रणजित पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"तालुका-महाड, जि.रायगड येथील बिरवाडी,वाळण,पाडवी या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात डोंगरातून माती, दगड, या गौण खनिजाचे होत असलेले उत्खनन भविष्यकाळात या ठिकाणी दरडी कोसळण्याचे निर्माण झालेले संकट, पर्यावरणाला निर्माण झालेला धोका, महाड शहरात मोठ्या प्रमाणात भरावाची सुरु असलेली कामे, महसूल विभागाकडून कमीतकमी ब्रासची परवानगी घेऊन हजारो ब्रास माती व दगडाचे करण्यात येत असलेले उत्खनन, यामुळे तालुक्यातील डोंगर उध्वस्त होणे, बेसुमार उत्खनन रोखण्यासाठी ठेवण्यात आलेली भरारी पथके भ्रष्ट असल्याने अनधिकृत उत्खनन वाढणे, तसेच अतिवृष्टी झाल्यास मोठ्या प्रमाणात होणारी मनुष्य व वित्तहानी याबद्दल स्थानिक जनतेमध्ये व्यक्त होत असलेली भीती, त्यामुळे सदर अवैध उत्खनन थांबविण्यात यावे अशी होणारी मागणी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

यानंतर श्री. गायकवाड ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, त्या ठिकाणी सगळे काही आलबेल आहे अशा प्रकारे निवेदनामध्ये सांगण्यात आलेले आहे. मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन तेथील परिस्थिती पाहून आलो आहे. माझ्याकडे तेथील ग्रामपंचायतींनी पाठविलेली पत्रे सुध्दा आहेत. महाड शहरामध्ये 1989 पासून दर दोन वर्षानी पावसाळयात पाणी साचत असते. केवळ उत्खननामुळे तेथे पाणी साचते असे मला म्हणावयाचे नाही. परंतु आजूबाजूला डोंगराळ भाग असून वाळण ,बिरवाडी,
निझामपूर या गावाजवळील डोंगरामध्ये उत्खनन करण्याचे काम सुरु आहे.या निमित्ताने मला माननीय मंत्र्यांना तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. वाळण गावाजवळ निझामपूरच्या हद्दीमध्ये पाटबंधारे खात्यामार्फत एका धरणाचे काम सुरु असून एफ. ए.कन्स्ट्रक्शन कंपनीला हे काम देण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी निझामपूर ग्रामपंयायत आहे परंतु या ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी न घेता एफ.ए.कन्स्ट्रक्शन कंपनीकडून मातीचे उत्खनन करण्याचे काम सुरु आहे.तेव्हा एफ.ए.कन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे तेथे उत्खननाचे काम सुरु आहे काय , त्यांना परवानगी देण्यात आली आहे काय ? वाळण कोंडी मंदिराच्या जवळ नदीतून मोठया प्रमाणावर वाळूचे उत्खनन केले जाते. त्याबाबतीत तेथील ग्रामस्थ्ांनी अनेकदा तक्रारी केल्या आहेत त्या तक्रारी शासनाकडे पोहोचल्या आहेत किंवा नाही हे मला माहीत नाही परंतु माझ्याकडे त्यांनी वेळोवेळी तक्रारी केल्या आहेत तेव्हा वाळण कोंडी मंदिराच्या जवळील नदीतून मोठया प्रमाणावर वाळू काढण्यात येते हे खरे आहे काय आणि असल्यास संबंधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ? त्याचप्रमाण्ें महाडच्या बाजूला औद्योगिक वसाहत असून त्या भागातील कंपन्यांनी भराव टाकण्यासाठी माती,दगड उत्खननाचे काम सुरु केले आहे . त्याकरिता कोणतीही रॉयल्टी भरलेली नाही वा कोण्ंतीही परवानगी घेतलेली नाही तेव्हा मी उपस्थित केलेली ही तीनही प्रकरणे तपासून पाहावीत अशी मला माननीय मंत्र्यांना विनंती करावयाची आहे.सगळया राज्यामध्ये वाळू माफिया , रेती माफिया आहेत आणि महाडच्या परिसरामध्ये मात्र सर्व काही आलबेल आहे असे उत्तर देण्यात आलेले आहे. या निवेदनात असे म्हटलेले आहे की, वीट भट्टीसाठी 60 ब्रास माती उत्खनन करण्यास परवानगी दिली आहे. वीट भट्टयांसाठी जर ही परवानगी दिली असेल तर मला काही म्हणावयाचे नाही. दरड कोसळण्याचा प्रकार झालेला आहे असे मी लक्षवेधी सूचनेमध्ये म्हटलेलेच नाही. मी फक्त एवढेच म्हटले आहे की, डोंगरातून मोठया प्रमाणावर दगड व माती उत्खननाच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ....

प्रकारामुळे दरड कोसळू शकते. तेथील डोंगर जर पाहिले तर मोठया प्रमाणावर दगड व मातीचे उत्खनन झालेले आहे.तेव्हा मी उपस्थित केलेल्या तीनही प्रकरणामध्ये सखोल चौकशी करण्यात येणार आहे काय आणि संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ?

.श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी निझामपूर ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये काळखुंभे जलविद्युत प्रकल्पाच्या संदर्भात पहिला प्रश्न विचारलेला आहे.2008 साली 68 लाख रुपये,2009 साली 2 कोटी 33 लाख रुपये 2010 साली 1 कोटी 52 लाख रुपये,2011 साली 64 लाख अशी मिळून एकूण 5 कोटी 11 लाख रुपयांची रॉयल्टी संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात आली आहे. वळणकोंडी मंदिराच्या जवळ नदीतून वाळूचे उत्खनन केले जाते त्याचबरोबर महाड जवळील औद्योगिक वसाहतीच्या भरावासाठी मातीचे व दगडांचे उत्खनन केले जाते असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे.त्यांनी सभागृहात दिलेली माहिती खरी आहे असे मानून दोन्ही प्रकरणांची चौकशी निश्चितपणे करण्यात येईल आणि चौकशी अंती दोषी असलेल्या व्यक्तीविरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,निवेदनात असे म्हटलेले आहे की," वीट भट्टीसाठी 60 ब्रास मातीचे उत्खनन करण्याची परवानगी देण्यात आली होती परंतु त्या व्यतिरिक्त बिरवाडी आणि पडवी या गावात उत्खनन झाल्याचे दिसून आलेले नाही." या बाबतीत माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की ही बाब जर शासनाच्या निदर्शनास आलेली नाही असे शासनाने म्हटलेले आहे .

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

याचा अर्थ असा की, ही लक्षवेधी सूचना लागल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी या बाबत चौकशी केली असावी. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, ही चौकशी कुणी केली, केव्हा केली आणि त्या चौकशीचा अहवाल केव्हा प्राप्त झाला? दुसरा प्रश्न असा की, अशाप्रकारे गौण खनिजाचे अनधिकृतपणे उत्खनन केल्याबद्दल मागील एक वर्षामध्ये महाड तालुक्यातील किती लोकांवर कारवाई करण्यात आली आणि किती लोकांकडून दंड वसूल करण्यात आला?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना लागल्यानंतर त्या त्या विभागाचे तलाठी आणि मंडल अधिकाऱ्यांमार्फत पहाणी करण्यात आली. तरी सुध्दा माननीय सदस्यांनी जाहीर केलेली माहिती खरी मानून या प्रकरणी पुन्हा चौकशी करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : त्या ठिकाणी स्पॉट व्हेरिफिकेशन होणे महत्वाचे आहे...

श्री प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी औद्योगिक वसाहतीबाबत उल्लेख केला आहे.त्या ठिकाणी स्पॉट व्हेरिफिकेशन करुन चौकशी करण्याचे आदेश दिले जातील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महादयांनी 5 कोटी 68 लाखाच्या महसुली दंडाची रक्कम वसूल केल्याचे सांगितले...

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, नाही. प्रकल्पाबाबत माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला होता त्या संदर्भात सांगितले. ती रक्कम दंडाची नसून स्वामित्व धनाची वसूल केलेली रक्कम आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, तेथील ठेकेदारांनी बेकायदेशीरपणे उत्खनन केल्याबद्दल त्यांच्याकडून किती दंड वसूल करण्यात आला? दुसरा प्रश्न असा की, अशाप्रकारच्या उत्खननावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाजवळ भरारी पथक आहे काय, असल्यास त्यांनी या भागामध्ये किती धाडी टाकल्या आहेत?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने रॉयल्टीची रक्कम मिळाल्याचे सांगितले आहे.त्यांनी रॉयल्टी शासनाजवळ भरली असल्यामुळे ते उत्खनन अवैध होत नाही. शासनाजवळ भरारी पथक अस्तित्वात आहे.परंतु या संदर्भात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून, नागरिकांकडून आणि पत्रकारांकडून तक्रारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. प्रकाश सोळंके....

करण्यात आल्यानंतर स्पॉट व्हेरिफिकेशन करण्यात येऊन चौकशी करण्यात आली. या करिता तेथील तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांवर विशेष जबाबदारी टाकली असून त्यांनी त्यांच्या भागामध्ये निश्चितपणे काळजी घ्यावी असे सांगण्यात आले आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय,माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी दिलेली माहिती खरी मानून चौकशी करु असे आपण सांगितले त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. आपण निवेदनामध्ये दरडी कोसळण्याचा कोणताही प्रकार निदर्शनास आलेला नाही असे म्हटले आहे. आता मार्च महिना संपून एप्रिल महिना सुरु झालेला आहे. त्या ठिकाणी मातीचे सारखे उत्खनन होऊन तेथील माती ठिसूळ होते व त्यानंतर पावसाळयामध्ये दरडी कोसळण्याचे प्रकार होतात. त्यामुळे या ठिकाणी आपणास चुकीची माहिती देऊन आपले अधिकारी मूर्खपणाचे धंदे करीत असतील तर आपण त्यांच्यापासून सावध राहिले पाहिजे. माननीय सदस्य श्री.संजय केळकर हे स्वत: तेथील तीन ते चार गावांना भेटी देऊन आले आहेत. ज्या एफए कंस्ट्रक्शनला धरणाचे काम दिले आहे त्या ठिकाणी एका डोंगराचा भाग तोडून पुनर्वसनाचे काम सुरु केल आहे. त्याबद्दल तेथील ग्रामपंचायतीने त्याला हरकत घेतली आहे अशी विस्तृत माहिती आहे. आपले अधिकारी सकाळी येऊन पाचच मिनिटात घाई घाईत ब्रिफिंग करुन निघून जातात. तेव्हा त्यांच्या माहितीमधील प्रत्येक वाक्याकडे आपण बारकाईने लक्ष दिले पाहिजे. मराठवाडयातील मंत्री आहेत त्यांना कोकणातील माहिती नसावी त्यामुळे वाटेल तशी माहिती देऊन टाकली असे त्यांना वाटत असावे. त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे हे निवेदन करण्यात आले. परंतु माननीय मंत्री श्री. प्रकाश सोळंके साहेब आमच्याबरोबर कोकणात भरपूर फिरले आहेत हे अधिकाऱ्यांना एकदा समजले पाहिजे.

सभापती महोदय, महाड हे क्षेत्र असे आहे की, त्या ठिकाणी दर दोन-तीन वर्षांनी सारखा पूर येतो त्यामध्ये नागरिकांचे नुकसान होते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . ..

दरडी कोसळतात. 2005 मध्ये दासगावला ज्या दरडी कोसळल्या, त्या उत्खननामुळेच कोसळल्या होत्या. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांना बरोबर घेऊन माननीय मंत्री महोदयांनी या सर्व भागाला भेट द्यावयास पाहिजे. कारण महाड तालुक्यात यासंबंधात निवेदने देण्यात आली त्याठिकाणी "स्टार माझा" च्या रिपोर्टरच्या अंगावर गाडी घालण्यात आली ही माहिती तर आली असेल की नाही ? मग याबाबत भरारी पथकाने दखल घेतली काय ? पण असे सांगण्यात येते की, असे काहीच झाले नाही. त्यामुळे हे सर्व काही वरवरचे आहे असे दाखविण्याचा प्रयत्न होतो. त्यामुळे माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी प्रत्यक्ष एकदा महाड येथे भेट द्यावी. माननीय मंत्री महोदयांनी जर अशा प्रकारे महाड येथे भेट दिली तर आम्ही सगळया भानगडी आपल्यासमोर ठेऊ शकतो. त्याप्रमाणे आपण भेट देणार आहात काय ?

श्री.प्रकाश साळुंखे : सभापती महोदय, होय.

-----

3 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 व 5 बाबत**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत कोण उत्तर देणार आहे? कारण सदनामध्ये संबंधित माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत उत्तर देण्यासाठी संबंधित माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नसल्याने मी सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलत आहे. जर आता माननीय मंत्री महोदय सदनामध्ये आले तर ही लक्षवेधी सूचना लगेच चर्चेसाठी घेण्यात येईल.

श्री.सुधीर तांबे : सभापती महोदय, सदरहू लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जे निवेदन देण्यात आले आहे, त्यामुळे माझे समाधान झालेले आहे.

**उप सभापती** : ठीक आहे.

अनेक सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, आमचे समाधान झालेले नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना ही आता सभागृहाची प्रॉपर्टी आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी तुमचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

एक गोष्ट नक्की आहे की, लक्षवेधी सूचना सदनामध्ये आली म्हणजे ती सभागृहाची प्रॉपर्टी झाली हे मला मान्य आहे. सन्माननीय सदस्यांना काय म्हणावयाचे होते हे मला अगोदर माहिती नव्हते. समजा सभागृह सुरु असताना या दोन्ही लक्षवेधी सूचनांच्या संबंधातील माननीय मंत्री महोदय जर उपस्थित झाले तर मी सन्माननीय सदस्यांना त्यावर प्रश्न विचारण्यासाठी परवानगी देईन.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 5 बाबत उत्तर देण्यासाठी संबंधित माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात यावी.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, हे काय चालले आहे ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण माननीय मंत्री महोदयांना समज द्यावयास पाहिजे. माननीय मंत्री महोदय सदनामध्ये उपस्थित रहात नाहीत.

**उप सभापती** : आता मी समज देऊन-देऊन थकलो आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या दोन्ही लक्षवेधी सूचनांच्या बाबतीत काय करावयाचे?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ ST/ 16:05

**उप सभापती** : मी या लक्षवेधी सूचना राखून ठेवतो.

श्री.विनोद तावडे : अगोदरच लक्षवेधी सूचना कमी लागतात....

**उप सभापती** : सभागृहामध्ये संबंधित माननीय मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे मी या लक्षवेधी सूचना राखून ठेवतो.

-----

. . . .3 डी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ.शी.**: रत्नागिरी जवळ निवळी फाट्यानजिक ताम्रयुगापासून तगून असलेला दगडावर कोरलेला प्रागैतिहासिक काळातील नकाशा संपुष्टात येणे

**मु.शी.**: रत्नागिरी जवळ निवळी फाट्यानजिक ताम्रयुगापासून तगून असलेल्या दगडावर कोरलेला प्रागैतिहासिक काळातील नकाशा संपुष्टात येणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"रत्नागिरी जवळ हातखंब्याजवळ निवळी फाट्यानजिक ताम्रयुगापासून तगून असलेल्या दगडावर कोरलेला प्रागैतिहासिक काळातील नकाशा काळाच्या ओघात संपुष्टात येण्याच्या मार्गावर असणे, "कॅटेराईट" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दगडावर कोरलेला हा नकाशा संपूर्ण भारतात दुर्मिळ असून सिंधु,मोहंजोदडो संस्कृती अस्तित्वात असल्यापासून आतापर्यंतची जी संस्कृती आहे त्याबद्दलच्या पूर्वीच्या नोंदी त्यामध्ये आहेत. तत्कालीन महाराष्ट्र भूमीतील संस्कृतीची ओळख पटवून देणारा हा नकाशा आहे. सुमारे अडीच हजार वर्षानंतरही त्यांचे अस्तित्व टिकून असल्याने त्यांचे संवर्धन करणे गरजेचे असतानांच भविष्यात मुंबई-गोवा हायवे रुंदीकरणाचे काम करीत असताना त्याचे जतन करणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाने यामध्ये लक्ष घातले पाहिजे. आपण पहातो की, बोरीवलीतील मागेठाणे लेण्यापासून अनेक ठिकाणी असलली लेणी दुर्लक्षित आहेत. हा ऐतिहासिक ठेवा नामशेष होण्याची भीती निर्माण झाली आहे. अशा वेळी हा ताम्रपट नष्ट होऊ नये यादृष्टीकोनातून विशेष उल्लेखाव्दारे पुरातत्व विभागाचे लक्ष वेधत आहे. याबाबत शासनाने लक्ष घालून त्यांचे जतन करण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

-----

. . . .3 डी-5



**पृ.शी.**: मुंबई शहरामध्ये स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी लेखण्याच्या मानसिकतेमध्ये होत असलेली वाढ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: मुंबई शहरामध्ये स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी लेखण्याच्या मानसिकतेमध्ये होत असलेली वाढ याबाबत श्रीमती अलका देसाई वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आणि सुशिक्षितांचे व सुधारिक शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई शहरामध्ये स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी लेखण्याची मानसिकता दिवसेंदिवस सर्वात जास्त वाढली आहे असे राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात आढळून आले आहे. दर हजार पुरुषांमध्ये केवळ 799 स्त्रिया अशी तफावत असल्याची धक्कादायक माहिती या अहवालात आढळून आली आहे. आदिवासी बहुल गोंदिया जिल्ह्यात 1000 पुरुषांमागे 1005 स्त्रिया असल्याने मुंबई सारख्या सुधारक व प्रगत शहराला या जिल्ह्याने लाजविले आहे. यामुळे सुधारक व प्रगत मुंबई शहरातील स्त्रियांच्या घटत असलेल्या प्रमाणाला आळा घालण्याची व त्यांना दिवसेंदिवस कमी लेखण्याची मानसिकता थांबविण्याची नितांत गरज आहे. अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

-----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे जिल्ह्यातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डंपिंग ग्राऊंडसाठी जागा ठेवणे तसेच खत प्रकल्प उभारणे

**मु. शी.** : ठाणे जिल्ह्यातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डंपिंग ग्राऊंडसाठी जागा ठेवणे तसेच खत प्रकल्प उभारणे या बाबत श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□□य सदस्य श्री. संजय केळकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"ठाणे जिल्ह्यात सात महापालिका व पाच नगरपालिका आहेत. सध्या ठाणे जिल्ह्यात मिरा-भाईंदर 8 लाख, ठाणे शहर 20 लाख, भिवंडी व उल्हासनगरमध्ये प्रत्येकी 10 लाख, नवी मुंबई 15 लाख व कल्याण-डोंबिवलीमध्ये 12 लाख एवढी अंदाजित लोकसंख्या असून सर्व शहरांमध्ये दररोज साठणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण वाढले आहे. दररोज जमा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डंपिंग ग्राऊंडसाठी आरक्षण ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत जागा मिळेल तेथे कचरा टाकला जातो. यामुळे दुर्गंधी व रोगराई पसरुन आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. पावसाळ्यात यापेक्षाही भयानक परिस्थिती निर्माण होणार आहे. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने विकास आराखड्यात डंपिंग ग्राऊंडसाठी जागा आरक्षित ठेवावी व कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी खत प्रकल्प उभा करावा, असे आदेश शासनाने तातडीने द्यावेत, यासाठी सदरची बाब मी विशेष उल्लेखाच्या मुद्याव्दारे सभागृहात मांडत आहे."

सभापती महोदय, आताच झालेल्या जनगणनेनुसार ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या 1 कोटी 10 लाख झालेली आहे. ठाणे जिल्हा हा देशातील आणि महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे. देशातील कोणत्याही जिल्ह्यामध्ये जेवढ्या महानगरपालिका नाहीत तेवढ्या 7 महानगरपालिका व

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. संजय केळकर .....

5 नगरपालिका ठाणे जिल्ह्यामध्ये आहेत. सध्या ठाणे जिल्ह्यातील भाईंदर, ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, नवी मुंबई, वसई-विरार या सगळ्या महानगरपालिकांमधील वाढते नागरीकरण लक्षात घेता या शहरात दररोज साठणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण सुध्दा फार मोठे आहे. दररोज जमा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणत्याही महानगरपालिका क्षेत्रात डंपिंग ग्राऊंडसाठी आरक्षण नसल्यामुळे महानगरपालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधी हे दोन्ही अडचणीमध्ये आहेत. केंद्राच्या आदेशाप्रमाणे, कोर्टाच्या आदेशाप्रमाणे डंपिंग ग्राऊंडची व्यवस्था आवश्यक आहे. एमएमआरडीए वेळोवेळी जरी सांगत असले की आम्ही 4-5 ठिकाणे डंपिंग ग्राऊंडसाठी बघितलेली आहे पण सध्या अशी परिस्थिती आहे की त्या ठिकाणी डंपिंग ग्राऊंडची व्यवस्था नाही. त्यामुळे त्या ठिकाणी रोगराई तर वाढतच आहे पण दुर्गंधी पसरुन आरोग्याचा देखील प्रश्न निर्माण झालेला आहे. पुढच्या पावसाळ्यात यापेक्षाही भयानक परिस्थिती निर्माण होणार आहे. म्हणून यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने विकास आराखड्यात डंपिंग ग्राऊंडसाठी एक वेगळी व्यवस्था करावी. एमएमआरडीएच्या माध्यमातून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी निरनिराळे प्रकल्प, मग खत प्रकल्प असतील किंवा वीज प्रकल्प असतील असे प्रकल्प उभारावेत परंतु या संदर्भात शासनाने कोणती ना कोणी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. ही बाब शासनाने करावी यासाठी मी ही बाब या विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे.

---

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बीड जिल्ह्यातील गेवराई शहरात शासनाची व्यायामशाळा निर्माण करणे

**मु. शी.** : बीड जिल्ह्यातील गेवराई शहरात शासनाची व्यायामशाळा निर्माण करण्याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्या ॲड. उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"बीड जिल्ह्यातील गेवराई शहरात शासनाच्या उदासीन धोरणामुळे सन 2011 पर्यंत एकही व्यायाम शाळा निर्माण करण्यात न येणे, परिणामी शहरातील युवकांना खाजगी महागड्या व्यायाम शाळांचा आधार घ्यावा लागणे तसेच गरीब व होतकरु युवकांना शासनाच्या व्यायाम शाळा नसल्याने रात्रीच्या वेळी व पहाटे शाळा-महाविद्यालयांच्या मैदानांचा वापर करावा लागणे, शहरातील युवकांचे आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी शहरात लोकसंख्येच्या प्रमाणात व्यायाम शाळा निर्माण करण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) येथे औषधांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा असणे

**मु. शी.** : नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) येथे औषधांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा असण्याबाबत श्री. केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) येथे औषधांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा असणे, औषधांच्या तुटवड्यामुळे दूरवरुन येणाऱ्या रुग्णांना अनेक संकटांना सामोरे जावे लागणे, तसेच तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सुध्दा रुग्णांना तोंड द्यावे लागणे, त्यामुळे आरोग्य विभागाबाबत रुग्णांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, सदर रुगणालयात मुबलक प्रमाणात औषधांचा साठा उपलब्ध करण्याची रुग्णांची तसेच रुग्णांच्या नातेवाईकांची कळकळीची मागणी, या बाबत तेथील डॉक्टरांनी माननीय वैद्यकीय संचालकांकडे केलेली तक्रार, परंतु सदर तक्रारीवर संबंधित अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष असणे, त्यामुळे दि. 22 फेब्रुवारी, 2011 रोजी मेडिकल मधील डॉक्टरांनी औषधे नसल्याचा धिक्कार करीत शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी निदर्शने करणे, सोबतच निवासी डॉक्टरांना अनेक महिन्यापासून विद्यावेतन मिळाले नसल्याची तक्रार करुन विद्यावेतनाचे सुमारे तीन कोटी रुपयांची थकबाकी शासनाकडे असल्याचे निदर्शनास आणणे, परंतु अद्याप शासनाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, त्यामुळे सदर रुग्णालयात मुबलक प्रमाणात औषधांचा तात्काळ पुरवठा करणे आणि शासनाकडे थकीत असलेल्या विद्यावेतनाचे तीन कोटी रुपये तातडीने उपलब्ध करुन देण्याची मागणी लक्षात घेता शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया."

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पू. शी.** : कोल्हापूर शहरातील रंकाळ्याचा अविभाज्य भाग असलेल्या परताळ्यात बांधकामास दिलेली परवानगी स्थगित करणे

**मु. शी.** : कोल्हापूर शहरातील रंकाळ्याचा अविभाज्य भाग असलेल्या परताळ्यात बांधकामास दिलेली परवानगी स्थगित करण्याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"कोल्हापूर शहरातील रंकाळ्याचाच अविभाज्य भाग असलेल्या परताळ्यात बांधकाम करण्यास कोल्हापूर महानगरपालिकेने परवानगी नाकारणे, परंतु या परताळ्यात एका माजी मुख्यमंत्र्यांना बांधकामास परवागनी देणे, यामुळे अशी बांधकामे झाल्यास परताळ्याबरोबरच रंकाळ्यातील जैवविविधता संपुष्टात येणे, त्याला इकॉलॉजिकल (परिस्थितीकीय) धोका निर्माण होण्याची भीती वाटणे, अनेकदा रंकाळा संवर्धनासाठी केंद्राकडे निधी मागणे, त्या प्रस्तावात परताळ्याचा उल्लेख अनेकदा करणे, यामुळे या परताळ्यातील बांधकामांना पर्यावरणप्रेमीच नव्हे तर रंकाळाप्रेमी सुध्दा या बांधकामाला विरोधी करण्याची शक्यता असणे, परताळयाच्या बांधकामास दिलेल्या परवानगीस स्थगिती देण्याची व परवानगी नाकारण्याची होत असलेली मागणी."

सभापती महोदय, कोल्हापूर शहराचे रंकाळा हे वैशिष्ट्य आहे. रंकाळ्याच्या परताळ्यामध्ये आतापर्यंत कधीही बांधकामाला परवानगी दिलेली नव्हती. त्या परताळ्यामुळे जगभरातील अनेक प्रकरचे पक्षी त्या ठिकाणी येतात. त्या सर्व जैवविविधतेला धोका निर्माण करणारा, परताळ्यात बांधकामाची परवानगी देणारा निर्णय आता महानगरपालिकेने घेतलेला आहे. मंत्रालयातून दबाव आल्यामुळे अशी परवानगी द्यावी लागत आहे असे महानगरपालिकेचे म्हणणे आहे. त्यामुळे मोठे आंदोलन सुरु झाले आहे. कोल्हापूरचे वैशिष्ट्य असलेल्या रंकाळ्याच्या परताळ्यातील बांधकामे थांबवावीत याकडे मी या विशेष उल्लेखाव्दारे आपले लक्ष वेधत आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : ता.संगमनेर,जि.अहमदनगर येथे असलेल्या शासकीय आदिवासी वसतिगृहांमध्ये सेवा-सुविधांचा अभाव

**मु. शी**. : ता.संगमनेर,जि.अहमदनगर येथे असलेल्या शासकीय आदिवासी वसतिगृहांमध्ये सेवा-सुविधांचा अभाव यासंबंधी डॉ.सुधीर तांबे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"संगमनेर ता,जि.अहमदनगर येथे असलेल्या शासकीय आदिवासी वसतिगृहांमध्ये सेवा सुविधांचा अभाव असून मुलांचे वसतिगृहात छतास लागलेली गळती, मार्च २०१० पासून या वसतिगृहातील मुलांना मासिक भत्ताही न मिळणे, विद्यार्थ्यांच्या गरजा न पाहता शासन आपल्या पद्धतीने काम पहात असल्याने विद्यार्थ्यांना होणारा त्रास , सेवा सुविधांचा अभाव यामुळे ११ वी ते पदवी पर्यंतचे महाविद्यालयातील शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागणे, त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना लक्षात घेता शासनाने त्वरित या प्रकरणी करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच शासनाची याबाबतची प्रतिक्रिया."

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, शासनाच्या लेखी उत्तराने माझे समाधान झाले आहे. शासनाने शासकीय वसतिगृहाचे बांधकाम सुरू केले आहे ते या वर्षी पूर्ण होईल काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ते बांधकाम वर्षभरात पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, लक्षवेधीचे उत्तर वाचल्यानंतर तेथे अतिशय गंभीर परिस्थिती होती हे लक्षात येते. वसतिगृह गळत होते त्या ही पेक्षा तेथील स्नानगृह आणि स्वच्छतागृह चोक अप झाले होते. ते पाणी झिरपल्यामुळे भिंत ओली झाली. त्यामुळे तेथे राहणाऱ्या मुलांच्या आरोग्याचे काय ? त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, स्नानगृह व स्वच्छतागृह चोकअप केव्हा झाले होते, सदर बाब केव्हा नजरेस आली, सदर कामाची दुरूस्ती केव्हा केली ? सदर वसतिगृहाला दिनाक 4.3.2010 रोजी मान्यता मिळाली आहे. वसतिगृहाच्या बांधकामासाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात आली आहे असे नमूद करून देखील सुद्धा सदर काम सुरू करण्यात आल्याचे निवेदनात नमूद केलेले नाही. सदर काम केव्हा सुरू करणार आहात ? असे माझ ो दोन प्रश्न आहेत.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, अनेक वसतिगृहे सुरू करण्यात आलेली आहेत. येथील वसतिगृह उत्तम चालले आहे. अशा प्रकारे गळती होत आहे असे 3-4 आठवड्यापूर्वी लक्षात आले होते. ही बाब लक्षात आल्यानंतर मूळ मालकाच्या निदर्शनास ही बाब आणली. तरी देखील त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे मुलांना शिफ्ट करून ताबडतोब दुरूस्ती करून घेण्यात आली आहे. आता काही काळजी नाही. या वसतिगृहासाठी आता पैसे मंजूर झाले असून जागा देखील उपलब्ध आहे. माननीय सदस्यांनी जागा उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे एक वर्षाच्या आत काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. हा विषय सन्माननीय सदस्यांच्या मतदार संघातील आहे. आता जागा उपलब्ध असल्याने एक वर्षामध्ये वसतिगृह बांधण्यात येईल.

डॉ.दीपक सवंत : सभापती महोदय, माझा मंत्री महोदयांना पहिला प्रश्न असा आहे की, किती वसतिगृहे भाड्याच्या जागेत आहेत तसेच राज्य शासनाचे स्वत:च्या जागेमध्ये वसतिगृह बांधण्याचे प्रस्तावित केले आहे काय ? वसतिगृहात डिसेंबर 2010 पर्यंतचा देय असलेला निर्वाह भत्ता देण्यात आलेला आहे आणि उर्वरित निर्वाह भत्ता मार्च अखेर पर्यंत देण्यात येईल, असे लेखी निवेदनात म्हटले आहे. आता मार्च महिना संपला असल्यामुळे सदर निर्वाह भत्ता मुलांना देण्यात आला आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, भत्त्यासंबंधी व्यवस्था केली आहे. खाली पी.ओ.पर्यंत पैसे पोहोचलेले आहेत. भत्ता देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. कुणाला भत्ता देण्याचे राहून गेले असेल तर तो देण्यात येईल. आमच्याकडून सूचना गेल्या आहेत, पैसे गेलेले आहेत. आदिवासींच्या मुलांनी शहरात येऊन शिकावे व त्यांची शिक्षणातील अडचण दूर व्हावी म्हणून चांगली योजना आखण्यात आली आहे. 495 वसतिगृहांना मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे 464 शासकीय आदिवासी वसतिगृहे सुरू झालेली आहेत. न सुरू झालेल्यांची संख्या 32-33 इतकी आहे. ज्याप्रमाणे मागणी येईल त्याप्रमाणे आता आपण वसतिगृह निर्माण करणार आहोत. शासकीय इमारतीमध्ये वसतिगृह सुरू असल्याची संख्या 60 आहे. 396 वसतिगृह भाड्याच्या जागेत आहेत. यासाठी आता आपण टप्प्याटप्प्याने कामाला सुरूवात करणार आहोत. कारण वसतिगृहाची आज आवश्यकता आहे.

ग्रामीण भागातील मुले शिक्षणासाठी पुढे येत आहेत. त्यामुळे त्यांच्या राहण्याची आणि शिक्षणाची व्यवस्था करणे गरजेचे आहे. बांधकाम झालेल्या वसतिगृहाची संख्या 69 आहे. बांधकामासाठी जमीन प्राप्त झालेल्याची संख्या 163 आहे. बांधकामासाठी जमीन अप्राप्त असलेली संख्या जास्त नसली तरी शासकीय जमीन किंवा खाजगी जमीन आपण रेडीरेकनर प्रमाणे खरेदी करायला तयार आहोत. यासंबंधी देखील आपण एक परिपत्रक काढले आहे. वसतिगृहासाठी खाजगी जमीन लागत असेल तर त्यासाठी आम्ही पी.ओ.ला अधिकार दिलेले आहेत. रेडीरेकनर पेक्षा 25 टक्के दर जास्त असेल तर ती जागा घ्यावी. त्यापेक्षा जास्त दर असेल तर त्यांनी आयुक्तांना कळवावे. 50 टक्क्यापेक्षा जास्त दर असेल तर त्यांनी शासनाला कळवायचे आहे. त्यापेक्षा जास्त किंमत असेल तर आम्ही निर्णय घेणार आहोत. त्यामुळे आम्ही जमीन घेण्यामध्ये पुढाकार घेतलेला आहे.

यानंतर श्री.खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते....

बहुतेक जमिती नगरपालिका किंवा नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये आहेत. त्यामुळे जमिनी मिळत नाहीत. त्यामुळे सरकारी जमिनी घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मग पुणे, असेल नाशिक असेल. नाशिकमध्ये 2-3 जमिनी घेतल्या आहेत, अशा प्रकारे जमिनी घेण्याच्या दृष्टीने कार्यक्रम सुरु आहे. जेथे जमीन मिळेल तेथे मुले व मुलींसाठी चांगले स्वतंत्र वसतिगृह बांधण्याचा कार्यक्रम शासनाने सुरु केला आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी संगमनेर येथील वसतिगृहाचा उल्लेख केला आहे, त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री महोदयांनी या वसतिगृहांची मंजूर प्रवेश क्षमता 525 इतकी आहे, पण तेथे प्रत्यक्षात 339 विद्यार्थी आहेत असे सांगितले आहे. उर्वरित जागा भरण्यासाठी विद्यार्थी मिळाले नाहीत की तेथे भौतिक सुविधा नाहीत म्हणून रिक्त राहिल्या आहेत ?

श्री.बबनराव पाचपुते : तेथे जेवढी मुले येतात तेवढ्यांना प्रवेश दिला जातो. तेथे मुले प्रवेशासाठी आली नाहीत म्हणून जागा रिक्त राहिल्या आहेत. त्या ठिकाणी जर आणखी मुले आली तरी त्यांची व्यवस्था केली जाईल.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट/सेटमधून सूट दिलेल्या प्राध्यापकांनी पदोन्नती व वेतन निश्चितीचे लाभ मिळण्याची केलेली मागणी

**मु. शी.**: विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट/सेटमधून सूट दिलेल्या प्राध्यापकांनी पदोन्नती व वेतन निश्चितीचे लाभ मिळण्याची केलेली मागणी यासंबंधी सर्वश्री विक्रम काळे, सतीश चव्हाण, हेमंत टकले, ॲड.उषा दराडे, श्री.रमेश शेंडगे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक होणेसाठी नेट/सेट व पीएचडीची पात्रता शासनाने विद्यापीठ अनुदान आयोग व केंद्र शासनाच्या शिफारशीनुसार राज्यातील महाविद्यालयातील प्राध्यापकांना ही अट लागू करणे, परंतु दि. 11 डिसेंबर, 1991 पूर्वी अनुदानित महाविद्यालयामध्ये सेवेत रुजू झालेल्या प्राध्यापकांना ही अट लागू नसणे, तसेच त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट/सेट मधून सूट देणे, अशाप्रकारच्या सूट दिलेल्या व दि.11 डिसेंबर, 1991 पूर्वी सेवेत आलेल्या सर्व प्राध्यापकांना पदोन्नती व वेतन निश्चितीचे लाभ नियुक्ती दिनांक ग्राह्य धरुन देण्यात यावेत या मागणीसाठी राज्यातील प्राध्यापकांनी 42 दिवस संप करणे, शासनाने हा प्रश्न लवकरच विद्यापीठ अनुदान आयोगाकडे जावून सोडवू असे सभागृहातही वारंवार आश्वासन देवून सुद्धा अद्यापही याचा निर्णय न होणे, परिणामी, प्राध्यापकांचे दरमहा होणारे हजारो रुपयांचे नुकसान व गेली 20 वर्षे हा प्रश्न सोडविण्यास शासन अपयशी ठरल्यामुळे उच्चशिक्षण क्षेत्रात व प्राध्यापकात निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यातील खाजगी अनुदानित महाविद्यालयात सन 1991 ते 2000 या कालावधीत जे अधिव्याख्याते सेवेत आले होते त्यांना युजीसीने नेट/सेटमधून सूट दिली आहे. त्या सर्व अधिव्याख्यात्यांच्या सेवा त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून गृहीत धरुन त्यांना इतर अनुषंगिक लाभ मिळावा यासाठी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. गेल्या 20 वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. त्यामुळे मी वारंवार हा विषय मांडलेला आहे. दिनांक 17.12.2008 रोजी, त्यानंतर दिनांक 12 जून, 2009 रोजी, त्यानंतर दिनांक 8.4.2010 रोजी मी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावेळी मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन केले होते. हे खाते पुन्हा त्यांच्याकडे आल्यावर मी त्यांचे अभिनंदन केले होते. गेल्या 20 वर्षापासून आजतागायत हा प्रश्न अनिर्णितावस्थेत आहे. त्या प्राध्यापकांना सहावा वेतन लागू झाला नसल्यामुळे दरमहा 20-25 हजाराचे नुकसान होत आहे. डिसेंबर, 2008 मध्ये मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, नेट/सेटमधून युजीसीने सूट दिलेली आहे, अशा प्राध्यापकांच्या सेवा त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून गृहीत धरण्याबाबत जेवढी प्रकरणे असतील ती दोन महिन्यात निकाली काढण्यात येतील.

ज्या प्राध्यापकांना नेट/सेटमधून युजीसीने सूट दिलेली आहे, अशा प्राध्यापकांच्या सेवा त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून गृहीत धरुन त्यांना पदोन्नती व वेतन निश्चितीचे लाभ देण्याचे आदेश संबंधितांना किती दिवसात निर्गमित केले जातील आणि राज्यातील वेगवेगळ्या विद्यापीठातील 2000 ते 2500 प्राध्यापकांची नेट/सेट मधून सूट मिळण्याबाबतची प्रकरणे प्रलंबित आहेत, त्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:25

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी हा प्रश्न या सदनामध्ये अनेक वेळा विचारलेला आहे हे मला मान्य आहे. परंतु राज्य सरकारच्या कक्षेत जे काम आहे ते राज्य सरकारने केलेले आहे हे मला सभागृहाला आवर्जून सांगायचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे हे माझ्या बरोबर दिल्लीला मिनिस्ट्री ऑफ ह्युमन रिर्सोस डेव्हलपमेंटचे मंत्री महोदय श्री.कपिल सिब्बल यांना भेटण्यासाठी आले होते. या बाबतीत राज्य शासनाची भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. नोटिफिकेशनच्या आधारे सूट देण्याचा अधिकार युजीसीला आहे. त्यामुळे जे सूट दिलेले लोक आहेत त्यांच्या बाबतीत कंडिशन्स घालून, तारखा निश्चित करुन जी काही सूट युजीसी देईल, युजीसी जे काही म्हणेल ते शासनाला मान्य आहे अशा प्रकारचे उत्तर राज्य शासनाने वारंवार या प्रश्नाच्या संदर्भात दिलेले आहे. ज्या काही सूट दिलेल्या आहेत त्या बाबतीत एक महत्वाचा लॅक्युना राहिलेला आहे. ही सूट कोणत्या तारखेपासून द्यायची हा प्रश्न आहे.नेटसेट मधून सूट दिली तर ती डेट ऑफ अपॉईण्टमेण्ट पासून द्यायची की डेट ऑफ एक्झम्पशन पासून द्यायची, ज्या तारखेपासून सूट दिली त्या तारखेपासून त्यांना कॅस लागू करायचा का हा त्यातील महत्वाचा मुद्दा आहे. या संदर्भात मधल्या काळात एमफुक्टोचा संप झालेला होता. त्यांची एक समिती गठीत करण्यात आलेली होती. या प्रश्नाच्या बाबतीत आणि अनिर्णित राहिलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात ही समिती पाठपुरावा करीत आहे. या बाबतीत शासनाकडून पाठपुरावा केला जाईलच. परंतु मी स्वत: एचआरडी मिनिस्ट्रीकडे पाठपुरावा केलेला आहे. युजीसीकडेही अनेकदा पाठपुरावा केलेला आहे. या निमित्ताने माझे एवढेच सांगणे आहे की, ज्या प्राध्यापकांना सूट देण्यात आलेली आहे त्यांना सूट दिलेल्या तारखेपासून कॅस लागू करण्याच्या संदर्भात राज्य शासन अनुकूल असून वित्त विभागाची, वित्त मंत्र्यांची सहमती घेऊन मान्यता देण्याच्या बाबतीत एक महिन्याच्या आत तातडीने कारवाई करु या. ज्या प्राध्यापकांना ज्या तारखेपासून सूट मिळालेली आहे त्या तारखेपासून पुढील कार्यकाळामध्ये त्यांना कॅसचे बेनिफिट देण्याच्या दृष्टीकोनातून वित्त विभागाची मान्यता घेऊन निश्चितपणे करवाई करण्यात येईल. सूट घेण्याच्या बाबतीत जी काही प्रकरणे अजून प्रलंबित आहेत त्याबाबतीत मी स्वत: आणि जी कमिटी गठीत करण्यात आलेली आहे त्या कमिटीच्या माध्यमातून प्रयत्न करुन सूट देण्या बाबतची जी प्रलंबित प्रकरणे आहेत त्यांच्या बाबतीत युजीसी कडून लवकरात लवकर निर्णय घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे : सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न अनेक वेळा या सदनामध्ये उपस्थित केलेला आहे. मंत्री महोदयांनी याबाबतीत कार्यवाही करु असे सांगितले. ही कार्यवाही एक वर्षाने दोन वर्षाने केली जाते. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या प्रश्नासंबंधी मंत्री महोदय एक महिन्याच्या आत निर्णय घेतील काय ?

श्री. राजेश टोपे : मी आताच सांगितले की, कोणत्याही परिस्थितीमध्ये ज्यांना सूट दिलेली आहे त्यांच्या बाबतीत एकच कळीचा मुद्दा राहिलेला आहे की जे काही बेनिफिट त्यांना द्यायचे आहेत ते नेमणुकीच्या तारखेपासून द्यायचे की सूट दिलेल्या तारखेपासून द्यायचे. त्यांना नेमणुकीच्या तारखेपासून बेनिफिटस् द्यायचे असतील तर त्यांची जी एकूण संख्या आहे त्यासाठी 400ते 500 कोटी पेक्षा जास्त खर्च येऊ शकेल. त्यामुळे मी एवढेच सांगेन की, माझ्या विभागाच्या वतीने ज्या तारखेला सूट दिलेली आहे त्या तारखेपासून पुढे कॅस बेनिफिट लागू करण्याच्या बाबतीत वित्त विभागाची मान्यता घेऊन एक महिन्याच्या आत हा प्रश्न निकाली काढण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : शिक्षण संचालकांचे दिनांक 19.8.2002 चे पत्र आहे. राज्यातील सर्व प्राचार्य आणि संचालकांना उद्देशून हे पत्र लिहिलेले आहे. की, खाजगी महाविद्यालयामध्ये केलेली सेवा स्थान निश्चितीसाठी ग्राह्य धरण्यात येईल का यासंबंधी मुद्दा क्रमांक 7मध्ये असे म्हटलेले आहे विहित निवड समिती मार्फत निवड झालेली असल्यास खाजगी महाविद्यालयात केलेली तदर्थ अखंडित सेवा स्थान निश्चितीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. म्हणजे एवढे धुतल्या तांदळासारखे स्पष्ट नमूद केलेले असताना आपण ही सेवा नियुक्ती दिनांकापासून गृहीत धरुन त्यांना कॅसचे बेनिफिट द्यावयास पाहिजेत ही मूळ मागणी आहे. म्हणून एक महिन्याच्या आत अधिवेशन संपण्यापूर्वी वित्त विभागाकडे जाऊन याबाबत ठोस निर्णय घेणार काय, या पूर्वी ज्या लोकांना नियुक्ती दिनांक गृहीत धरुन बेनिफिट देण्यात आलेले आहेत, ते आपल्याच अधिका-यांनी दिलेले आहेत,

...नंतर श्री. गिते...

श्री. विक्रम काळे...

त्या समितीमध्ये शासनाचा प्रतिनिधी असतो. त्या समितीमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधी असतात. त्या समितीने त्यांना बेनिफीट दिले. संचालकांच्या दोन ओळीच्या पत्रान्वये बेनिफीटचे आदेश दिले आहेत, ते मागे घ्या असा शासनाने जो आदेश दिलेला आहे, तो आपण थांबविणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी सूट दिलेल्या तारखेपासून पुढे कॅसचे बेनिफीट लागू करु अशा प्रकारचे मी आश्वासन दिलेले आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर या बाबतची कार्यवाही करता येईल. नेमणुकीच्या तारखे पासून सेवा ग्राहय धरली जाईल काय असा सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, या बाबतीत जी काही नेमणुकीची तारीख असेल, ज्याला आपण रिटायरमेंट बेनिफीट म्हणू किंवा पेन्शन बेनिफीट म्हणू, त्यासाठीची सेवा ग्राहय धरण्याच्या प्रॉझिटीव्ह प्रस्ताव आमच्या विभागाकडून वित्त विभागाकडे मान्यतेसाठी पाठवू. वित्त विभागाच्या मान्यते नंतर नेमणुकीच्या तारखेपासून सेवा गृहीत घरुन दिलेल्या सुटच्या तारखेपासून बेनिफीट देण्याच्या संदर्भात निर्णय घेतला जाईल. मागच्या संचालकांकडून नियमबाहय काम झाले असेल तर अशी सेवा त्याच तारखेपासून ग्राहय धरणे हे चुकीचे होईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सांगितले की, काही लोकांना तत्कालीन संचालकांनी अशा पध्दतीच्या सवलती दिल्या असतील व त्या नियमबाहय असतील तर त्याबाबत वसूली करणे किंवा थांबविणे आवश्यक आहे. मी एवढेच सांगतो की, या सगळया बाबी तपासून बघण्यात येतील आणि जे काही उचित असेल तेच केले जाईल.

श्री. वसंतराव खोटरे : माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे आठ दिवसात पाठवतील काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सांगितले की, एका महिन्याच्या आत या संदर्भातील निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

-----------

2...

पृ.शी. : राज्यातील असंघटित कामगारांच्या वाढत असलेल्या समस्या.

मु.शी. : राज्यातील असंघटित कामगारांच्या वाढत असलेल्या समस्या या विषयावर सर्वश्री. माणिकराव ठाकरे, हेमंत टकले,वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. माणिकराव ठाकरे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

" राज्यात असंघटित कामगारांच्या संख्येत होत असलेली वाढ, त्याचप्रमाणे त्यांच्या वाढत असलेल्या समस्या, राज्यात घरकामगारांची संख्या 30 लाखांपेक्षा जास्त असणे, त्यांचे आयुष्य अत्यंत कष्टमय असणे, त्यांना हक्काची रजा, निश्चित पगार, नोकरीतील स्थैर्य, यापैकी काहीच सुविधा न मिळणे, शारीरिक व मानसिक छळ सहन करावा लागणे, शहराचे आरोग्य जपणाऱ्या व शहराची स्वच्छता राखणाऱ्या, कचरा वेचणाऱ्या कामगारांचे जगणे कठीण होऊन बसणे, समाजात आजही हीनपणाची वागणूक मिळणे, कचरा वेचताना हातमोजे किंवा आरोग्याच्या सुरक्षेसाठी आवश्यक अन्य साहित्य त्यांच्याकडे उपलब्ध नसणे, दररोज नाक्यावर रोजगारांसाठी ताटकळत उभे राहणाऱ्या नाका कामगारांचाही प्रश्न गंभीर असणे, दररोज काम मिळण्याची खात्री नसल्याने उदरनिर्वाहाचा निर्माण झालेला प्रश्न, भूमिहीन शेतमजूर व निराधार यांना देखील कामाची श्वाश्वती नसणे, दररोज घरोघरी वृत्तपत्रे टाकणा-या, ऑटेल, बार या ठिकाणी काम करणाऱ्या अपंग व बेवारस या घटकांना तसेच गावकुसाबाहेर राहणाऱ्या मागासवर्गीय, आदिवासी यांना रोजगारांची शश्वती नसणे, त्यासाठी करावी लागणारी वणवण, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची होत असलेली आबाळ, हे सर्व घटक संघटीत नसल्यामुळे त्यांच्यावर होत असलेला अन्याय, अत्याचार, या सर्वांना संघटित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. भोगले...

अधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

सभापती महोदय, राज्यातील दुर्लक्षित घटकाच्या संदर्भात विधानपरिषद नियम 260 अन्वये या ठिकाणी मांडलेल्या प्रस्तावावर चर्चा होत असताना अनेक संघटित वर्गाविषयी सदनामध्ये सातत्याने चर्चा झालेली आपण पाहिली आहे. परंतु समाजामध्ये असा एक घटक आहे, ज्या घटकाकडे आमचे पुरेसे लक्ष जात नाही. ज्या वर्गाला खऱ्या अर्थाने न्याय देण्याची गरज आहे, त्यांना आम्ही न्याय देऊ शकलेलो नाही. समाजातील पुढारलेल्या वर्गाविषयी या ठिकाणी प्रश्न मांडले जातात. परंतु जे दुर्लक्षित राहिले आहेत त्यांची खूप मोठी संख्या आहे हे आपल्या सर्वांना मान्य करावे लागेल. दुर्लक्षित घटकावर मोठया प्रमाणात अन्याय होतात, अत्याचार होतात. त्यांचे शारीरिक व मानसिक छळ केले जातात. असा वर्ग हुडकून काढून त्यांच्या समस्या सोडविल्या पाहिजेत. त्यांचे जे जे प्रश्न समोर येतील ते सोडविण्याच्या दृष्टीकोनातून गंभीरपणे पावले टाकण्याची गरज आहे. या प्रश्नांसंबंधी या सदनामध्ये चर्चा व्हावी, त्या चर्चेमधून समोर येणाऱ्या सूचनांचे संकलन करुन त्यावर शासनाने ठोस पावले उचलावीत या हेतूने ही चर्चा उपस्थित केली आहे.

सभापती महोदय, या दुर्लक्षित घटकांचे प्रश्न कोणी एक व्यक्ती या ठिकाणी मांडू शकणार नाही. वेगवेगळया क्षेत्रात काम करणारी मंडळी या सभागृहात लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत आहेत. कामगार क्षेत्रात माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, एस.क्यू.ज़मा काम करीत आहेत. विरोधी पक्षातील अनेक माननीय सदस्य कामगार क्षेत्रात काम करीत आहेत. त्यांनी या सदनात अनेकदा या घटकाचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु चर्चेतून अपेक्षित परिणाम झाल्याचे दिसून आले नाही. या चर्चेच्या निमित्ताने अपेक्षित परिणाम घडून यावेत अशा प्रकारची अपेक्षा बाळगून हा प्रस्ताव मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. घरेलू कामगार वर्गाची आपणा सर्वांना माहिती आहे. राज्यात या वर्गाची फार मोठी संख्या आहे. घरेलू काम करणाऱ्या महिलांना आपण किती संरक्षण देऊ शकतो? पूर्वी या प्रश्नासंबंधी चर्चा केलेली आहे, अनेकदा बैठका झाल्या आहेत, त्या माध्यमातून दिलेल्या आश्वासनांची कितपत पूर्तता करु शकलो?

सभापती महोदय, चर्चेच्या माध्यमातून आपण कायदा केला. त्या कायद्याचे परिणाम या दुर्लक्षित समाजाचे प्रश्न सुटण्यामध्ये दिसून यावेत अशा प्रकारची अपेक्षा या सदनाची आणि राज्यातील जनतेची सुध्दा आहे. 2004 मध्ये राज्याने घरेलू कामगारांसंबंधी कायदा केला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

कायद्यामध्ये आवश्यक त्या तरतुदी केल्या आहेत. परंतु त्याचे परिणाम कितपत दिसून आले हे पाहण्याची गरज आहे. 2004 मध्ये कायदा मंजूर करताना असे सांगितले होते की, सर्व घरेलू कामगारांना ओळखपत्र देऊ. काही प्रमाणात त्या दृष्टीने प्रयत्न केले गेले असतील. परंतु कितपत यशस्वी ठरलो? कायद्यामध्ये तरतूद केली आहे. परंतु आपण कुठे कमी पडतो हे सुध्दा पाहिले पाहिजे. कायदा केल्यानंतर विषय नजरेआड निघून जातो. सदनामध्ये लोकप्रतिनिधींनी कायदा मंजूर केल्यानंतर अधिकाऱ्यांमार्फत त्या कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी व्हावी अशी अपेक्षा असते. परंतु कायद्यात तरतूद करुनही अद्याप घरेलू कामगारांना ओळखपत्र दिलेली नाहीत. हा घरेलू कामगार वर्ग फार मोठया प्रमाणात विखुरलेला आहे. या सर्वांना विशिष्ट काळात एकत्रित कसे करता येईल?

नंतर 3 के.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .........

या सर्व वर्गाला ओळख पत्र देणे जिकिरीचे काम आहे तरी देखील त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने असे ओळख पत्र दिले पाहिजे. त्याचप्रमाणे या कायद्यात तसे बंधन सुध्दा टाकलेले आहे. मग त्यात घरात काम करणारी मोलकरीण असेल तर तिला बाळंतपणाची रजा देण्याचीही तरतूद आहे. शासनाने या असंघटित कामगारांसंबंधी कायदा केला असला तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होते की नाही हे पाहणेही तितकेच आवश्यक आहे. कारण या लोकांना जर कोणी नातेवाईक नसतील तर ती जबाबदारी कोणी उचलावी याची तरतूदही कायद्यात केली आहे पण प्रत्यक्षात अंमल होणे महत्वाचे आहे. त्या माध्यमातून या दुर्लक्षित व असुरक्षित वर्गाला कायद्यानुसार सुरक्षा प्रदान करणे व त्यांच्या हक्कांची जपणूक करणे, त्यांना न्याय मिळवून देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. वास्तविक मोलकरीण ही घरात काम करणारी असली तरी तिचे वास्तव्य कुठे तरी झोपडपट्टीत वगैरे असते. त्यात जर तिला मुले-बाळे वगैरे नसतील तर कोणाच्या तरी आश्रयाने रहावे लागते, पोटाची खळगी भरण्यासाठी कुठे तरी काम करावे लागते अशा लोकांना खऱ्या अर्थाने संरक्षण देण्याची गरज असून शासनाने विशेष लक्ष द्यावे असा माझा आग्रह आहे.

महोदय, दुसरा एक वर्ग म्हणजे उकिरड्यावरील कागद, प्लास्टिक अथवा काचेच्या बाटल्या गोळा करुन एखाद्या व्यापाऱ्याकडे विकून आपली उपजिविका करणे. असा माल व्यापाऱ्याकडे दिल्यानंतर तो कशा प्रकारे त्यांची फसवणूक करतो याचा अनुभव सुध्दा त्या लोकांना येत असतो. या वर्गाची परिस्थिती पाहिली तर चीड निर्माण होते पण त्याकडे कोणाचेही लक्ष नसते. या क्षेत्रात काही सामाजिक संस्था काम करीत असून त्यांच्या काही मागण्या आहेत. असा वर्ग संख्येने किती आहे, कोणत्या ठिकाणी काम करतो, कोठे राहतो याची मोजदाद केली जात नाही. त्यामुळे राज्य स्तरावर असलेल्या कामगारांमध्ये त्या वर्गाचा अंतर्भाव होत नाही. त्यासाठी महापालिका अथवा नगरपालिकेमध्ये अशा प्रकारचा जो दुर्लक्षित वर्ग आहे, ज्याच्या अंगावरील कपडे सुध्दा फाटलेले असतात असे लोक शहरातील टाकाऊ वस्तू जमा करतो. तसेच उकिरड्यावरील वेस्टेज कागद, प्लास्टिक किंवा काचेच्या बाटल्या विकून एक प्रकारे प्रदूषण कमी करण्यास मदत करतो त्याचा विचार होणे आवश्यक आहे. कारण हा वर्ग संपूर्णत: बेरोजगार असून त्याचा विचार शासनाने करावा, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.उषा दराडे )**

श्री.माणिकराव ठाकरे ...

इतर कोणत्याही वर्गा पेक्षा या वर्गाला पोटाची खळगी भरण्यासाठी जास्त त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे महानगरपालिकाकडे आणि नगरपालिकांकडे कचरा वेचणा-या व्यक्तींची नोंदणी झाली पाहिजे. त्याचबरोबर राज्य स्तरावर कामगाराला ज्या काही सवलती दिल्या जातात त्या सवलती कामगार म्हणून या कचरा वेचणा-या व्यक्तींना मिळाल्या पाहिजेत. एखाद्या गरीब कुटुंबामध्ये दुसरी व्यक्ती कमावणारी नसेल तर त्या कुटुंबातील लहान लहान मुले कचरा वेचण्याचे काम करीत असतात. एखाद्या घरात विधवा असेल व तिच्या कडे दुसरे कोणी कमावणारे नसेल तर शाळेत न जाता त्या घरातील लहान लहान मुले फाटके कपडे घालून कचरा गोळा करण्याचे काम करीत असतात. अशा गरीब मुलांपुढे भीक मागण्या पलीकडे दुसरा पर्याय शिल्लक राहत नाही परंतु भीक मागणे जर त्यांना योग्य वाटत नसेल तर ती मुले कचरा गोळा करण्याचेच काम करतात व त्यात जमा झालेल्या वस्तू विकून आलेल्या पैशातून आपला उदरनिर्वाह करीत असतात.

सभापती महोदया, पुण्याच्या संदर्भामध्ये मध्यंतरी वर्तमानपत्रात अशी बातमी प्रसिध्द झाली होती की, जवळजवळ 300 अल्पवयीन मुले कचरा गोळा करण्याचे काम करीत आहेत अर्थात ही संख्या कमी आहे असे मला वाटते. मुंबई सारख्या मोठया शहरामध्ये वा इतर शहरामध्ये सुध्दा कचरा गोळा करणारी आणि भीक मागणारी जी लहान लहान मुले आहेत त्यांच्या संदर्भात शासनाने विचार करण्याची गरज आहे असे मला सांगावयाचे आहे.या मुलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण कसे मिळेल, त्यांना चार पैसे कसे मिळतील या दृष्टीने विचार होणे आवश्यक आहे. रस्त्यावर भीक मागणारी जी मुले असतात त्यातील काही जणांचे हात वा पाय कापलेले असतात अशा प्रकारे हा अत्यंत दुर्लक्षित असा वर्ग असून कचरा गोळा करणा-या लहान मुलांना विविध प्रकाराचे रोग जडलेले असतात अशा प्रकाराचे काम करणा-या वर्गाला न्याय देण्याची नितांत गरज आहे.

सभापती महोदया, असंघटित वर्गामध्ये शेतकरी, शेतमजूर हा सुध्दा महत्वाचा घटक आहे. शेतमजुरांमध्ये बाल मजुरांची संख्या मोठया प्रमाणावर आहे.एखादी महिला शेतामध्ये जाऊन मजुरी करते परंतु ते पैसे पुरेसे नाहीत म्हणून घरातील दोन लहान मुलांनासुध्दा शेतामध्ये काम करण्यास ती घेऊन जाते. तेव्हा ही लहान मुले शेतामध्ये काम करण्यासाठी का जातात , त्यांचा उदरनिर्वाह वेगळया पध्दतीने शासन करु शकते काय , शेतात काम केल्यामुळे ते शिक्षणा पासून वंचित राहतात काय ? याचा विचार होणे आवश्यक आहे.एकूण देशातील बालमजुरांची संख्या मोठया



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे ...

प्रमाणावर आहे . संपूर्ण देशात 67 टक्के शेतावर काम करणारे बालमजूर आहेत. शेतात काम करणा-या मजुरांचा विचार केला तर 62 टक्के मुली काम करतात. ज्या वयात त्यांनी शिक्षण घ्यावयाचे असते वा खेळावयाचे असते त्या वयात त्या मुली वा मुले शेतामध्ये काम करीत असतात.या मुंला मुलीचे जर शिक्षण झाले तर त्यामुळे त्यांचे चांगले भविष्य घडू शकेल तेव्हा या वर्गाला अधिक कार्यक्षम होण्यासाठी शासन कशा प्रकारे मदत करु शकेल याचा विचार करण्यात यावा असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, असंघटित वर्गात काम करणा-या सामाजिक कार्यकर्त्यांना मी महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीचा अध्यक्ष या नात्याने एकत्रितपणे चर्चेसाठी बोलावले होते. जवळजवळ असंघटित कामगारांचे 32 वर्ग आहेत त्या सर्वाच्या समस्या मी जाणून घेतल्या होत्या. त्याचबरोबर त्यासंबंधीची पुस्तिका तयार केली होती. त्यातील कोणत्या सामस्या सुटू शकतील यासबंधी देखील मी त्यांच्याशी चर्चा केली होती.अशा पध्दतीने एकंदर सात दिवस ही चर्चा चालू होती. असंघटित कामगारांच्या समस्यांचे संकलन करण्यात आले असून त्या समस्या सोडविण्यात आल्या पाहिजेत असे मी त्यावेळचे सन्माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांना सांगितले होते. या दृष्टीने माननीय मुख्यमंत्र्यांनी वर्षा बंगल्यावर एक दिवस बैठकसुध्दा घेतली होती.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

त्या ठिकाणी सचिवांना उपस्थित राहण्यास सांगण्यात आले. त्या दिवशी 20 ते 22 संघटनांच्या संदर्भात एक दोन महत्वाचे निर्णय घेण्यात आले. आणखीन दहा ते बारा संघटनांबाबत निर्णय करण्यासंबंधी माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांकडे विनंती करण्यात आली आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर एक दिवस बसून त्या विषयावर चर्चा करुन ते प्रश्न निकालात काढण्याच्या दिशेने पावले टाकावीत असे त्यांना सांगण्यात आले आहे. परंतु हा असंघटीत, दुर्लक्षित वर्ग आहे त्यावर अन्याय, अत्याचार होत आहेत त्या वर्गासंबधी सर्वत्र चर्चा होणे, सर्वांमध्येच ही भावना निर्माण होणे आवश्यक आहे. राजकीय दृष्टया फार मोठा प्रभाव पाडू शकेल असा हा वर्ग नसल्यामुळे आपण त्या वर्गासंबंधी फार चर्चा करीत नाही. परंतु या शेवटच्या घटकाकडे अधिक लक्ष केंद्रीत केले पाहिजे व त्याला न्याय दिला पाहिजे या करिता लोक प्रतिनिधी आणि सरकारची इतकेच नव्हेतर सर्वांची जबाबदारी आहे.

आज मोठया प्रमाणात एक मागणी करण्यात येते की, आपल्या कोठारामध्ये धान्य पडलेले असतांना कुणीही उपाशी रहाता कामा नये. त्यांच्यापर्यंत धान्य पोहोचविण्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या नेत्या माननीय श्रीमती सोनिया गांधी यांनी देखील एकदा उल्लेख केला. त्या प्रमाणे कायद्याचा एक मसूदा तयार करण्यात आला. त्याचप्रमाण् देशाचे अर्थमंत्री माननीय श्री. प्रणव मुखर्जी साहेबांनी लोकसभेमध्ये अंदाजपत्रक मांडतांना उल्लेख केला आहे, माननीय पंतप्रधानांनी सुध्दा उल्लेख केला आहे. किमान जे लोक धडपड करतात, प्राणांतिक प्रयत्न करतात त्यांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांच्यापर्यंत अन्न पोहोचले पाहिजे म्हणून अशा प्रकारचा कायदा आणण्याचा केद्र सरकारचा दृष्टीकोन आहे. त्यापध्दतीने त्यांना न्याय देण्यासाठी आपल्यासमोर अनेक विषय आहेत व त्यासाठी प्रयत्न सुध्दा सुरु आहेत. परंतु हा वर्ग दुर्लक्षित होता कामा नये यासाठी माजी मुख्यमंत्री माननीय बॅ. ए.आर. अंतुले साहेबांनी त्यावेळी निर्णय घेऊन निराधार लोकांसाठी योजना आणली. आज त्यावर आपण बरीच चर्चा करीत आहोत. आम्हाला अधिकार द्या, आम्हाला निधीचे वाटप करा म्हणून या ठिकाणी वाद घालीत आहोत. तेव्हा तो निर्णय सुध्दा माजी मुख्यमंत्री माननीय बॅ. अंतुले साहेबांनी घेतला होता. जो गरीब, अपंग, दुर्लक्षित माणूस असेल आणि एका ठराविक वयापेक्षा त्याची जास्त वयोमर्यादा झाली असेल त्याला न्याय देण्याबाबत आपले प्रयत्न सुरु आहेत. त्यामध्ये सुध्दा काही घटक असे आहेत की,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.माणिकराव ठाकरे.....

त्यांना न्याय देण्यासाठी चर्चा घडवून आणण्यासाठी एखादी परिषद आयोजित केली पाहिजे. वेगवेगळया विषयाच्या संदर्भात परिषदा होत असतात. कामगारासंदर्भात, बाल कामगारांसंदर्भात परिषदा घेण्यात आल्या. परंतु हे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासनाने त्या दिशेने पावले उचलावीत. त्या करिता या सभागृहामध्ये चर्चा घडवून आणावी, झालेल्या चर्चेमधून ज्या सूचना समोर येतील त्यांचे एकत्रितपणे संकलन करुन त्याबाबत शासनाने एखादी बैठक बोलावून त्या माध्यमातून या सर्व विषयांवर चर्चा घडवून आणावी अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी अत्यंत दुर्लक्षित अशा विषयासंबंधी हा प्रस्ताव मांडलेला आहे आणि या विषयाबाबत चर्चा करण्याची निश्चितच गरज आहे. आपण असे सांगितले की, या विषयाच्या अंमलबजावणीसाठी काही निर्णय घेण्यात आले आहेत. मग त्याची अंमलबजावणी का होत नाही हा खरा मुद्दा आहे आणि मला त्याबद्दल मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त करावीशी वाटते. मला असे वाटते की, सन्माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफजी या प्रस्तावाच्या संबंधात उत्तर देणार आहेत. यापूर्वी देखील ऊस तोड कामगारांच्या प्रश्नाबाबत विषय उपस्थित झाला होता. त्यावेळी त्यांनी अतिशय सुंदर भाषण केलेले होते. परंतु त्याची अंमलबजावणी शून्य म्हणजे मोठे शून्य म्हणावे लागेल अशी स्थिती आहे. याबाबत वर्षावर निर्णय घेतले जातात ही आनंदाची गोष्ट आहे. कोणतेही सरकार असले तरी निर्णय झालेच पाहिजेत. परंतु खरा प्रश्न असा निर्माण होतो की, त्याची अंमलबजावणी का होत नाही, त्या निर्णयांच्या बाबतीत पुढे काय झाले याची कोणी विचारणा करीत नाही काय? मला या विषयाच्या बाबतीत नकारात्मक बोलावयाचे नाही. म्हणून मी सूचना आणि त्याची अंमलबजावणी याबाबत बोलणार आहे.

सभापती महोदया, याठिकाणी सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.हेमंतजी टकले उपस्थित आहेत. माननीय मंत्री महोदय हे त्यांच्या विभागामध्ये सर्वोच्च आहेत.पण प्रत्येक पक्षामध्ये उत्तरदायित्व नावाची गोष्ट असावयास पाहिजे म्हणजे आपण ज्या घोषणा केलेल्या आहेत, त्याची अंमलबजावणी का होत नाही याबाबत उत्तरे मिळणे गरजेचे आहे असे मला वाटते. मी याबाबत विचारुन-विचारुन कंटाळले आहे. कोल्हापूर येथे गेल्यावरही विचारले तसेच बैठकीच्या वेळी, प्रश्नांच्या माध्यमातून विचारले. आम्ही स्वत: त्यांची भेट घेतली, निवेदनेही दिली, पण याबाबत अंमलबजावणी होत नाही. मला पहिला मुद्दा असा मांडावयाचा आहे की, कामगार विभागाकडे मिनिमम वेजेस इन्स्पेक्टरची जी पदे होती, ती सर्व भरण्यात आली असतील तर तेथे किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी होते की नाही हे जर प्रत्येक शहरामध्ये तपासलेच जात नसेल तर याबाबतीत कोणत्या पध्दतीने मालकांवर वचक बसणार आहे. तसेच मिनिमम वेजेस इन्स्पेक्टर कोणती कामे करतात आणि कोणती करीत नाहीत याचा जर आपण विचार करु लागलो तर प्रत्यक्षात सगळयांचे संगनमत झालेले आहे की काय अशी शंका निर्माण होते. म्हणून किमान वेतनाची मर्यादा वाढविणे गरजेचे आहे.याबाबतीत केंद्र शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावयास पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी माननीय श्रीमती सोनिया गांधी यांचा .....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उल्लेख केला. पण माझे असे सांगावयाचे आहे की, आता "दारिद्र्य रेषेखालील" या शब्दाची व्याख्याच बदलली पाहिजे हा विषय चर्चेत आहे. कारण जरी गरीब माणसाला 60 रुपये मिळाले तरी त्या रुपयाची किंमत कमी झालेली आहे आणि आपण कागदोपत्री दारिद्र्य रेषेखालील लोकांची व्याख्या करतो, त्या व्याख्येनुसार ते लोक जरी दारिद्र्य रेषेच्यावर आले तरी सुध्दा प्रत्यक्षात त्यांची दारिद्र्याची स्थिती अजून गंभीर झालेली आहे. म्हणून केंद्र शासनाकडून दारिद्र्य रेषेच्या व्याख्येची पुन्हा आखणी करून घेणे आवश्यक आहे. तसेच आपल्या राज्यामध्ये सुध्दा परत एकदा दारिद्र्य रेषेखालील लोकांची मोजदाद करण्यासाठी पावले उचलणे गरजेचे आहे.

सभापती महोदया, आपणही महिला चळवळीतून आलेल्या आहात. 1975 मध्ये सरकारने स्टेटस् ऑफ विमेन्स् कमिटी रिपोर्ट नेमला, त्याला आता 35 वर्षे झालेली आहेत. त्यातील पहिला जो निर्णय होता ती बाब सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई यांच्याही लक्षात असेल. त्यामध्ये डॉ.वीणा मुजूमदार यांची एक सूचना होती की, मॅटर्निटी बेनिफीट फंड, प्रसुतीच्या रजेसाठी आपण मालकांवर आर्थिक जबाबदारी टाकू शकत नाही. अशा वेळी सरकारचे हे काम आहे की,कामगार विभागातील असंघटित क्षेत्रातील महिला कामगारांना प्रसुतीची रजा मिळण्यासाठी मॅटर्निटी बेनिफीट फंड उभा केला पाहिजे जेणेकरुन ज्या स्त्रियांची नोंदणी झालेली आहे,त्यांना प्रसुतीच्या काळामध्ये दोन महिने,तीन महिने किंवा सहा महिन्यापर्यंत वेतन मिळू शकेल. तसेच त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारीही घेतली जाईल यादृष्टीने पावले उचलली पाहिजेत. परंतु मला एका गोष्टीचे वाईट वाटते की, सन्माननीय विभागाच्या ज्या सचिव आहेत, त्यांना आम्ही अतिशय कार्यक्षम म्हणून ओळखत होतो. परंतु सर्व ठिकाणी चांगली माणसे असूनही याबाबत अंमलबजावणी का होत नाही? हा प्रश्न आहे. म्हणून मॅटर्निटी बेनिफीट फंडाबाबत माननीय मंत्री महोदयांनी जरुर विचार करावा.

सभापती महोदया, चौथा प्रश्न हा घर कामगारांबाबत असून यासंदर्भात खूप मोठी यादी दिलेली आहे. त्या सगळया तपशीलामध्ये जाता येणार नाही. परंतु शासनाने घर कामगारांसाठी यावर्षी अर्थसंकल्पामध्ये साडेनऊ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे आणि ही गोष्ट निश्चितपणे चांगली आहे.तसेच घर कामगारांसाठी काम करणाऱ्या कामगार संघटना आहेत. आता सदनामध्ये सन्माननीय मंत्री डॉ.विजयकुमार गावितजी आलेले आहेत. ते देखील घर कामगारांच्या कार्यक्रमा-साठी स्वत: आले होते. अशा वेळी घर कामगार संघटनांना सामाजिक,राजकीय प्रतिष्ठा मिळाली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तर ते अधिक चांगले काम करु शकतील. त्यामुळे सरकारने सुध्दा त्यांची अशा प्रकारे दखल घेणे आवश्यक आहे.मला अशी विनंती करावयाची आहे, ते सगळे आमच्या पक्षातील लोक आहेत अशातला भाग नाही. पण बिगर पक्षीय काम करणाऱ्या ज्या संघटना आहेत, त्यांना सुध्दा राजकीय कामांमध्ये बरोबर घेऊन घर कामगारांच्या प्रश्नावर कार्ड नोंदणीसाठी ताबडतोब यंत्रणा उभी रहावयास पाहिजे.याबाबतीत मी माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांना स्वत: भेटून सूचना केली होती आणि अर्थातच त्याची अंमलबजावणी झालेली नाही. मी असे सुचविले होते की, श्री.शायनी या अभिनेत्याकडून बलात्काराची घटना घडल्यानंतर आम्ही एक शिष्टमंडळ नेले होते आणि सांगितले होते की, जेव्हा घर कामगार महिलांवर अत्याचार होतात, त्यावेळी त्यांना कायद्याची मदत कोण देणार आहे? अशा वेळी त्यांना पोलिसांकडे जाण्यामध्ये ज्या अडचणी येतात त्यातून मार्ग काढण्यासाठी आपल्या प्रत्येक कामगार कार्यालयामध्ये शासन मदत सेवा निर्माण करु शकत नाही का ? हा प्रश्न आहे. जेणेकरुन जे घर कामगार असतील, असंघटित क्षेत्रातील कामगार असतील त्यांना जर अशा प्रसंगी पोलीस स्टेशनमध्ये जाण्यासाठी अडचण आली तर ते कायद्याची माहिती देऊ शकतील आणि हे कामगार विभागाचे काम आहे असे मला वाटते.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

जेवढे ते काम महिला व बालकल्याण विभागाचे आहे त्यापेक्षाही जास्त कामगार विभागाचे काम आहे. कामगार विभागाने यामध्ये कायद्याचा सेल निर्माण करणे गरजेचे आहे.

ऊसतोड कामगारांच्या संदर्भात मी असे म्हणेन की, ऊसतोड कामगारांच्या संदर्भात काय धोरण आहे हेच शासन सांगत नाही. त्याच ठिकाणी राहण्यासाठी वसतिगृहे बांधावयाची आहेत का ? ऊसतोड कामगार वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये जातात. त्या ठिकाणी फिरत्या शाळांमधून प्रत्येक जाणाऱ्या मुलांच्या शाळेची सोय करणार का ? त्यांच्या ज्या मुली आहेत त्यांच्या सुरक्षिततेसाठी शासन काय पावले उचलणार आहे ? हा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाकडून आलेला आहे. पण ऊसतोड कामगारांबाबत शासनाने कृती कार्यक्रम जाहीर केला पाहिजे आणि तो कृती कार्यक्रम पुढच्या तीन महिन्यांमध्ये राबविला गेला पाहिजे. त्या दृष्टीने शासनाने पावले उचलावीत.

दुसरा एक मुद्दा ऑक्युपेशनल हजार्डसच्या संदर्भात आहे. कामाच्या ठिकाणी अपघात होतात. बॉयलरचे स्फोट होतात, त्यामध्ये कामगार मृत्युमुखी पडतात. इमारत बांधकामाचा उद्योग सगळीकडे उभा आहे. विकासक आणि जे कामावर मजूर ठेवतात ते ठेकेदार यांच्यामध्ये जो एमओयू किंवा करार होतो त्यामध्ये, जर अपघात झाला तर त्या अपघातासाठी विकासकाची काय जबाबदारी आहे, त्या दृष्टीने हा करार कोणी तपासतात का ? त्यांची जी मुले आहेत त्यांच्यासाठी शाळांची अंमलबजावणी किती विकासक करतात, त्यांच्यासाठी स्वच्छतागृहांची सोय करण्याबाबत किती विकासक जबाबदारी पार पाडतात ? कामगार चळवळीत काम करणारे कार्यकर्ते या सभागृहात आहेत. एमओयू करीत असताना विकासकांवर हे बंधन घातले पाहिजे की, आपण जे कामगार नेमाल त्या कामगारांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात, ज्या महिला मजूर आहेत त्यांच्या प्रसूती रजेच्या संदर्भात आपण त्यांना संरक्षण दिले पाहिजे. हे बंधन जोपर्यंत विकासकांवर आणत नाही तोपर्यंत काही कार्यवाही होणार नाही. या ठिकाणी श्री. राजेंद्र दर्डा यांनी एकदा सांगितले होते की, आम्ही एक नवीन कायदा आणणार आहोत. तो कायदा कोठे गेला, त्याची चर्चा नाही. प्रत्येक वेळी इमारतीच्या ठिकाणी अपघात झाला की आम्ही विचारणा करतो तेव्हा शासन आम्हाला सांगते की आम्ही नवीन कायदा करु. परंतु ठिकठिकाणी लोक अपघातामध्ये मृत्युमुखी पडतात परंतु त्यांना संरक्षण देण्यासाठी कोणतीही पावले उचलली जात नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ ST/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

सभापती महोदया, मॅटर्निटी बेनिफिट फंड तसेच कायदा मदत कक्षाबाबत मी सूचना केली. सरकारची कामगार कल्याण मंडळे आहेत. माथाडी कामगार मंडळ आहे. या सगळ्या कामांमध्ये शासनाने कोठे ना कोठे आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त स्तरावर संस्था, संघटना, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांना बरोबर घेऊन पारदर्शक पध्दतीची अंमलबजावणी करावी. दर तीन महिन्यांनी नाही तरी निदान सहा महिन्यांनी बैठक घ्यावी. तेथील लोकांच्या ज्या तक्रारी आहेत त्याचा आढावा घेऊ शकता. त्यांना बरोबर घेण्याचा प्रयत्न करु शकता. सगळ्यांनी मंत्रालयापर्यंत येऊन तक्रारी केल्या तरी त्या तक्रारी कचऱ्याच्या टोपलीत जातात. म्हणून महसुली विभागांच्या ठिकाणी या असंघटित कामगारांच्या प्रश्नावर जर नियमितपणे सुसंवाद झाला तर त्याची अंमलबजावणी होऊ शकेल. याकडे मला शासनाचे लक्ष वेधावेसे वाटते.

कचरा वेचकांचा उल्लेख या प्रस्तावामध्ये केलेला आहे. कचरा वेचकांचे सगळे प्रश्न जरी सुटले नसले तरी पुणे-मुंबई सारख्या काही महानगरपालिकांनी कचरा वेचकांना ओळखपत्रे दिलेली आहेत. त्यांनी भंगार मालाच्या वस्तू ठेवल्यावर त्यांना पाच मिनिटे स्वस्थ बसून पाणी पिता येईल, त्या ठिकाणी महिलांसाठी स्वच्छता गृहे असतील, अशा रेस्ट रुम्स पुणे आणि मुंबई महानगरपालिकांनी केलेल्या आहेत. परंतु कचरा वेचक महिलांच्या अरोग्याच्या दृष्टीने त्या संघटनांना अनुदान देणे गरजेचे आहे. महानगरपालिकेने द्यावे हे ठीक आहे परंतु हे काम करणारे जे लोक आहेत त्या लोकांसाठी सुध्दा संरक्षणाची आवश्यकता आहे. आपण इला भट यांचे नाव ऐकले असेल. त्यांची 'सेवा' नावाची संस्था अहमदाबाद येथे काम करते. त्यांनी असंघटित क्षेत्रातील महिलांचे विविध प्रश्न मोठ्या प्रमाणात मांडलेले आहेत आणि त्यानुसार केंद्र सरकारला अहवाल देखील सादर करण्यात आलेले आहेत. मी आपल्याला सांगन की यासाठी इक्वल अपॉर्च्युनिटी कमिशन, राज्य महिला आयोगाचा जरी बट्ट्याबोळ झाला असला तरी असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी, असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी एखादा खास आयोग स्थापन करावा की जो या विषयाकडे सातत्याने लक्ष देण्यासाठी धोरणात्मक काय करावयास पाहिजे यासाठी पाठपुरावा करील यासंदर्भात पावले उचलली जाणे गरजेचे आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, या ठिकाणी नियम 260 अन्वये एक चांगला प्रस्ताव मांडल्याबद्दल मी सर्वप्रथम सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे तसेच सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांचे आभार मानतो. या प्रस्तावामध्ये राज्यात घर कामगारांची संख्या 30 लाखांपेक्षा जास्त असणे तसेच घरोघरी वृत्तपत्रे टाकणारे, हॉटेल, बार येथील कामगार, भूमिहीन शेतमजूर यांना कायद्याचे संरक्षण मिळावे या दृष्टीने आपण बोलत आहोत.

यानंतर श्री. ओटवणेकर ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

यासाठी कायदा बनविणे गरजेचे आहे. कायदा बनल्यानंतर कायद्याची अंमलबजावणी कठोरपणे होणार आहे काय ? याचा देखील विचार होणे गरजेचे आहे. त्याही पेक्षा मी आणखी दुसरा एक मुद्दा मांडू इच्छितो. देशामध्ये आजही 33 टक्के असंघटित कामगार आहेत. कामगारांची संख्या मोठी आहे. देशामध्ये संघटित कामगारांची संख्या ही 3 टक्क्यांपेक्षा जास्त नाही. कामगार आयुक्तांकडे सर्व पक्षांच्या युनियनची आलेली संख्या 3 कोटी पेक्षा जास्त नाही. त्यामुळे मांडलेल्या प्रस्तावापेक्षा ही संख्या जास्त आहे. आपण कुशल, अकुशल, मध्यम कामगार म्हणतो त्यांच्यातील देखील संख्या असली तरी आजही असंघटित कामगार किती आहेत हे आपल्या निदर्शनास येऊ शकेल.

जय जवान जय किसान अशी घोषणा लालबहादूर शास्त्री यांनी केली. ज्यांच्यामुळे हा देश सुरक्षित आहे व ज्यांच्यामुळे देशातील लोकांचे पोट भरले जात आहे अशांचा उल्लेख त्यांनी या घोषणेमध्ये केला. विकसनशील देश किंवा राज्य म्हणून आपण बघतो तेव्हा आपल्याला वेगळी घोषणा करावी लागेल. कारण आपल्या देशातील चांगले पूल, रस्ते, धरणे कोणी बांधली असतील तर ती कामगारांनी. यासाठी त्यांचे योगदान सर्वात जास्त आहे. म्हणून मग आपल्याला म्हणावे लागेल की, जय जवान, जय किसान, जय कामगार. तरच या देशाची कुठे तरी प्रगती झाली असे म्हणता येईल.

विकसनशील देशामध्ये हायर ॲण्ड फायरची सिस्टीम आहे. कामावर कधीही ठेवा आणि कधीही काढून टाकावे. आपल्याकडे ग्लोबलायझेशन आल्यानंतर तिच सिस्टीम आपण ॲडॉप्ट केली. यासाठी कायदे आहेत. पण त्याची अंमलबजावणी शून्य होते, असे पुष्कळ ठिकाणी नजरेस आले आहे. ज्या देशात हायर ॲण्ड फायर सिस्टीम आहे, त्यांच्याकडे बेकारीचा भत्ता मिळतो. आपल्या देशात बेकारीचा भत्ता मिळत नाही. त्यांच्याकडे मेडिकल कार्ड असते. त्याला स्मार्ट कार्ड देखील म्हणतात. आजही सिंगापूरमध्ये गेल्यानंतर पहायला मिळते की, कामगार रूग्णालयामध्ये दाखल झाल्यानंतर त्याला फॉर्म वगैर कुठलीही प्रोसेस करावी लागत नाही. त्याने त्याचे कार्ड दिल्यानंतर सगळी ट्रीटमेंट त्याला मिळते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

दक्षिण कोरियातील एका ग्लास फॅक्टरीला मी स्वत: भेट दिलेली आहे. त्या कामगार बाईचे लहान मूल ठेवण्यासाठी देखील तेथे चांगली व्यवस्था होती. त्यामुळे त्या मुलाची आई प्रॉडक्शनचे काम चांगले करीत असते. तेथे एक शिस्त आहे. त्या मुलाच्या संगोपनाची सुविधा त्या मालकाकडून पुरविली जात आहे. आपण त्या देशाशी आपली तुलना करतो. ग्लोबलायझेशन नंतर त्यांचे नियम पाळतो. हायर ॲण्ड फायरवर जी राज्ये चालली आहेत ती राज्ये कशा सुविधा देतात हे देखील पहावे. आपल्याकडे तशा प्रकारच्या सुविधा दिल्या जात नाहीत.

पूर्वी अशी पद्धत होती की, 260 दिवस पूर्ण केल्यानंतर त्या कामगाराला सेवेत कायम घेतले जात असे. पण आज 20 वर्षे झाली तरी तो कामगार कायम होत नाही. ही परिस्थिती आजही चालू आहे. शासनाच्या आरोग्य व्यवस्थेमध्ये देखील हा प्रश्न आहे. आजच सकाळी आरोग्याच्या विषयावर हा प्रश्न मांडण्यात आला होता. हॉटेल्स, हॉस्पिटल्स, एअरपोर्ट, सरकारी, निमसरकारी कार्यालयांमध्ये कंत्राट पद्धती सुरू झाली. विकसनशील देशात ही पद्धत चालली म्हणून ती आपल्या देशात आणली. पण कॉन्ट्रॅक्ट पद्धतीवर त्या कर्मचाऱ्याला आपण किती दिवस ठेवणार आहात, 2 वर्षे, 3 वर्षे, 5 वर्षे, 10 वर्षे त्याला ठेवणार आहात काय, तो चांगल्या आस्थापनेमध्ये काम करीत आहे. पण त्याचा पी.एफ.कधी जमा होणार आहे, ग्रॅट्युएटी कधी जमा होणार आहे, निवृत्ती नंतर 4 पैसे जमा होणार आहेत काय ? वर्षानुवर्षे कामगार कंत्राटी म्हणून राहिला तर नैरोबीमध्ये जी परिस्थिती आहे ती आपल्याला देखील भोगावी लागेल. सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत सगळेजण तेथे नशेत फिरत असतात. दिवसाची सुरूवात नशेपासून होत. तेथील सरकारच सांगते की, रात्री कोणी फिरू नये. तुमच्या हातातील घड्याळ, अंगठ्या काढून घेतल्या जातील. ही परिस्थिती बेकारीची आहे.

यानंतर श्री.खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

मुंबई शहर हे औद्योगिक नगरी म्हणून ओळखले जाते. परंतु हे शहर कंत्राटी पध्दतीने पोखरले गेले आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. त्यासाठी एका नियमाची गरज आहे. जो नियम लावला जाईल त्याची खरोखर अंमलबजावणी होते का ते पाहिले पाहिजे. यापूर्वी कोणत्याही आस्थापनामध्ये करार करीत असताना 10 ते 20 टक्के कर्मचारी कंत्राटी पध्दतीचे असतील अशी एक धारणा होती. पण आज तेथे गेलो तर परमनण्ट कामगारांची संख्या 10 ते 20 टक्के आहे असे दिसते. हॉटेलमध्ये तर सर्वच कामगार कंत्राटी पध्दतीचे आहेत. कंत्राटी पध्दतीचे कामगार कधीही काम सोडून जातात. त्यामुळे सभागृहात असे सांगितले जाते की, मोठया प्रमाणात लोकांना नोक-या उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामुळे लोक आमच्याकडे टिकत नाहीत, लवकर निघून जातात. त्या आस्थापनेबरोबर त्या कामगारांचे संबंध चांगले रहात नाहीत. ही कंपनी माझी आहे, या कंपनीसाठी काम केले पाहिजे अशी धारणा यापूर्वी होती ती आता रहात नाही असे दिसून येते. म्हणून कंत्राटी पध्दतीसाठी शासन काही नियम बनविणार आहे काय, एखाद्या आस्थापनेमध्ये जर 1000 कामगार असतील तर किती टक्के कामगार कंत्राटी पध्दतीचे असावेत, किती कामगार परमनण्ट असावेत, कंत्राटी पध्दतीच्या कामगारांना किती वर्षे कंत्राटावर ठेवू शकतो ते ठरविले पाहिजे. यासाठी मी मुंबई एअर पोर्टचे उदाहरण देतो. जेट एअरवेज कंपनी मोठी झाली. जेट एअरवेज कंपनीतील कंत्राटदार बदलला की तेथे काम करणारे कामगार 3-4 वर्षांनी निघून जातात. दुसऱ्या कंत्राटदाराला आणले जाते. त्या जागी दुसरे कामगार आणले जातात. त्यामुळे ते कामगार कायदेशीररित्या कोर्टापर्यंत जाऊ शकत नाहीत. कारण कंपनीचे असे स्पष्ट म्हणणे असते की, आम्ही कामगाराला काढलेले नाही तर आम्ही फक्त कंत्राटदाराला बदलले आहे. कंत्राटदाराला बदलले की, त्याच्या बरोबर असलेली संपूर्ण टीम बदलली जाते. कोर्टात त्यांना स्टे ऑर्डर मिळत नाही. कायद्याप्रमाणे जर कोर्टाचे दरवाजे ठोठावयास गेलो तर लेबर कमिशनर त्याला इंटर्विन करु शकत नाहीत. अशा कामगारांसाठी शासन काही करणार आहे का, जर केले जाणार असेल तर त्याची अंमलबजावणी होण्यासाठी काय करणार आहे हा माझा सवाल आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

सभापती महोदय, या शहराला औद्योगिक नगरीचा दर्जा कोणी दिला असेल तर तो गिरणी कामगारांनी दिला आहे. त्यावेळी गिरण्या जोरदार चालल्या होत्या. या मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात गिरणी कामगार होते म्हणून या शहराची ओळख झाली. गावागावातून, परदेशातील लोक येथे नोकरीसाठी येऊ लागले. या गिरणी कामगारांचा लढा मागील 28 वर्षांपासून सुरु आहे. या लढ्यामध्ये पुन्हा तोच प्रकार आहे. ज्यावेळी 1982 साली आपल्याकडे संप झाला त्यावेळी परमनण्ट कामगार किती होते आणि कंत्राटी कामगार किती होते हा विषय उपस्थित झाला आहे. परमनण्ट कामगार असतील तर त्यांना घरे मिळतील किंवा सुविधा मिळतील असे सांगितले जाते, पण त्यावेळी परमनण्ट नव्हते त्यांना कोणत्या सुविधा मिळणार आहेत असा दुहेरी प्रश्न अनेक वर्षांपासून सुरु आहे. मी शासनाला अशी विनंती करतो की, ज्या गिरण्यांच्या जागेवर आज मॉलची संस्कृती उभी राहिली आहे. त्या मॉलमध्ये गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरी मिळेल किंवा त्यांना प्रशिक्षण दिले जाईल असे कोणत्याही प्रकारचे काम चालू झाल्याचे मला दिसत नाही. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरी मिळण्यासाठी शासनाने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, आम्ही युनियन लीडर म्हणून काम करीत असताना आम्ही नेहमी असे म्हणत असतो की, महेंद्र ॲण्ड महेंद्र या कंपनीच्या कामगारांना जास्त पगार आहे. कारण त्या कंपनीला नफा जास्त होतो. लार्सन ॲण्ड टुब्रो मधील कामगारांना जास्त पगार आहे. कारण त्यांची बॅलन्सशीट हेवी आहे,म्हणून त्या कंपनीचा कामगार सुखी आहे. एका कंपनीतील टर्नर फिटर 5 हजार रुपयाची नोकरी करतो तर एल ॲण्ड टी मधील टर्नर फिटरला 30 हजार रुपये पगार मिळतो. ही जाणीव तो ज्या कंपनीत काम करतो त्या आस्थापनेमुळे त्याला होते. तोच प्रकार असेल तर या मुंबई शहरामध्ये सर्वात जास्त नफ्यात कोणता उद्योग चालत असेल तर तो बांधकाम व्यवसाय हा आहे. या बांधकाम व्यवसायामधील जे मालक आहेत, मॅनेजमेण्टस् आहेत त्याचा नफा पाहिला तर त्या ठिकाणी काम करणा-या कामगारांना या पध्दतीने खरोखर मोबदला दिला जातो का हे पाहण्याची गरज आहे. कारण प्रत्येक टॉवरच्या बांधकामामध्ये रिस्क आहे. तेथे

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

एखादा अपघात झाला तर 10 कामगार मरण पावले, 20 कामगार मृत्यूमुखी पडले अशी बातमी समजते. कोठे लिफ्ट कोसळल्याचे प्रकार होतात, कोठे भिंत कोसळण्याचे प्रकार होतात. बांधकाम व्यवसायात कामगारांची संख्या जास्त आहे. हे कामगार बाहेरच्या प्रदेशातून आलेले आहेत. राज्यात बांधकाम व्यवसायात सर्वात जास्त नफा आहे. सेफ्टी व सुक्यिरिटीबाबत बोलावयाचे झाले तर बांधकाम व्यवसाय सोडून इतर कोणत्याही व्यवसायातील कामगारांना कोणत्याही प्रकारची शाश्वती मिळत नाही. या व्यवसायात सेफ्टी बेल, हेल्मेट अशा सुविधा दिल्या जातात असे बोलले जाते. पण सुरक्षा विषयक सुविधा केवळ कागदावर राहिल्या आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 17:15

श्री. किरण पावसकर...

शहरातील लोकांना मलेरियाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून महानगरपालिकेला सांगून बांधकामाच्या ठिकाणी औषधांची फवारणी केली गेली. परंतु बांधकाम व्यवसायामध्ये काम करणा-या कर्मचा-यांसाठी शासनाने काय केलेले आहे ? बांधकाम व्यवसायामध्ये कुशल तसेच अकुशल कामगारांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात, त्यांच्या रोजगाराच्या संदर्भात शासनाने काही नियम बनवावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : तालिका सभापती महोदया, माझा पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. हा असंघटित कामगारांचा प्रश्न आहे. काही सन्माननीय सदस्यांनी बोलत असताना संघटित कामगारांचा देखील उल्लेख केला. संघटित कामगारांचा प्रश्न देखील चिंताजनक आहे. परंतु असंघटित कामगार हा दुर्लक्षित विभाग आहे. माझी अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी असंघटित कामगार याच एका विषयावर आपले विचार मांडले आणि सूचना केल्या तर ते जास्त परिणामकारक होईल आणि त्यामधून काही तरी फलित निष्पन्न होईल. कामगारांच्या प्रश्नासंबंधी या सदनामध्ये फारशी चर्चा झाल्याची मला माहिती नाही. अन्य सर्व प्रश्नावर या ठिकाणी चर्चा होत असते. कामगारांच्या, कष्टक-यांच्या प्रश्नाला पुरेसा वेळ दिला जात नाही. या चर्चेसाठी योग्य वेळ द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

डॉ. नीलम गो-हे : असंघटित कामगारांचे प्रश्न सोडून अन्य विषयावर कोणी सन्माननीय सदस्य बोलले नाहीत. आम्ही देखील असंघटित कामगारांच्या प्रश्नावरच बालला आहोत.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी नियम 260 अन्वये असंघटित कामगारांच्या संदर्भात मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी या प्रस्तावाच्या माध्यमातून असंघटित कामगारांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. या असंघटित कामगारांच्या संदर्भात शासनाने कायदा करावा अशी जी अपेक्षा त्यांनी व्यक्त केलेली आहे त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. या असंघटित कामगारांची सांख्यिकी माहिती देतांना त्यांनी 30 लाखापेक्षा जास्त असंघटित कामगार असल्याचे सांगितले. ही आकडेवारी कदाचित शासकीय पातळीवर उपलब्ध झालेली असू शकेल. प्रत्यक्षात पाहिले तर या असंघटित कामगारांची संख्या 1 कोटीच्या घरामध्ये देखील जाऊ शकेल अशी राज्यातील स्थिती आहे. जसजसे निरनिराळया प्रकारचे तंत्रज्ञान विकसित होत आहे तसतशी निरनिराळया कामगारांची क्षेत्रेही विकसित होत आहेत. मोबाईल फोन बाजारात आल्यानंतर तो आता तुमच्या आमच्याकडे, सर्वांकडे आलेला आहे. त्यामुळे मोबाईल फोनचे दुकान चालविणारा वर्ग आला, तो रिपेअर करणारा वर्ग आला. गेल्या 10-15 वर्षामध्ये संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणावर व्हायला लागल्यापासून संगणक दुरुस्त करणारा वर्ग निर्माण झाला, हार्डवेअर, सॉफ्टवेअर तयार करणारा वर्ग निर्माण झाला, संगणकाचे प्रशिक्षण देणारे क्लासेस निर्माण झाले, विक्री केन्द्रे आली. अशा त-हेचे हे सगळे असंघटित कामगार आहेत.

मघाशी रियल इस्टेटचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. अलीकडे कॉण्ट्रॅक्ट पध्दतीने कामगार पुरविण्याची नवीन पध्दत आलेली आहे. मी एसएससी बोर्डाचा मेंबर असताना त्यावेळी उत्तर पत्रिकांना घड्या घालण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिले जात होते. शंभर-दोनशे कामगार आम्ही दोन दोन, तीन तीन महिने कामासाठी बोलवत होतो. काम करणारे कामगार गोरे की काळे हे माहीत नसते, मात्र कॉण्ट्रक्टर माहीत असतो. तो कॉण्ट्रॅक्टर कामगारांकडून काम करुन घेत असतो. ज्याच्या कडून काम करुन घेतले जाते तो देखील माणूस असतो आणि त्यालाही भावना असतात. त्यालाही काही हक्क असतात. परंतु त्या हक्कांचे संकुचिकरण होते. कंत्राटी पध्दतीमध्ये कामगाराचे सर्वच बाजूनी प्रचंड प्रमाणावर आर्थिक शोषण होत असते. या निमित्ताने मी शासनाला विनंती करु इच्छितो की आपल्या राज्यामध्ये असंघटित कामगारांची संख्या शहरी भागामध्ये किती

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे आणि ग्रामीण भागामध्ये किती आहे, कोणकोणत्या क्षेत्रामध्ये ते काम करीत आहेत याची पहिल्यांदा मोजदाद करावी. तसेच हे कामगार कोणत्या प्रकारे काम करतात, किती काम करतात त्याचीही माहिती घ्यावी लागेल. आपण आता अकुशल कामगार आणि मिनिमम वेजेस या परिभाषेत बोलतो. या परिभाषेत बोलून या असंटित कामगारांचे कल्याण होईल अशातला भाग नाही. त्याच्या मानवी हक्कापासून त्याचे शोषणच होईल आणि तो पुन्हा विघटित राहील. म्हणून या असंघटित कामगाराकडे बघत असताना त्याच्या कामाचा दर्जा,त्याचे काम, त्याला मिळणारे दाम, त्याला मिळणारी सेवाशाश्वती आणि त्याच्या उत्तर आयुष्यात त्याला मिळणारे आनुषंगिक लाभ याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. आज तुम्ही आम्ही सर्वजण पेन्शन घेणारे आहोत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे...

या असंघटित कामगारांची "वापरा आणि फेकून द्या" अशी अवस्था झाली आहे.

एक साधी गोष्ट या ठिकाणी सांगू इच्छितो. हायवेच्या बाजूला मोठया प्रमाणात धाबे आहेत. त्या ठिकाणी जी मुले काम करतात, त्यांचे जीवन अतिशय वाईट आहे. त्या धाब्यांवर दिवस-रात्र लोकांचे खरकटे काढून आपले जीवन जगत आहेत. आपण धाब्यावर जेवणाचा आस्वाद घेत असतो. परंतु आपण त्या ठिकाणी कामगाराकडे बघत नाही. त्यांच्या समस्या कधी जाणून घेत नाही. असंघटित कामगारांची मोजदाद चांगल्या पध्दतीने करणे, त्यांच्या कामाची व्याप्ती समजून घेणे आणि त्यांना योग्य रितीने न्याय कसा देता येईल याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. शासनाच्या अभिपत्याखालील, शासनाच्या अखत्यारितील कामगारांना न्याय कसा द्यावयाचा त्या बाबतीत काही पध्दती घालून दिलेल्या आहेत. मी उदाहरणादाखल सांगू इच्छितो की, मी विकासक आहे आणि माझ्याकडे दहा कामगार आहेत. त्या कामगारांवर बंधन न घालणे, तसेच त्या संदर्भात कोणतीही प्रकारची पळवाट न ठेवणे असे कायद्याने बंधनकारक असले पाहिजे. आपण कायदे करतो परंतु दुर्देवाने त्या कायद्यामध्ये मोठया पळवाटा ठेवतो. त्या पळवाटांचा फायदा मालक मंडळीकडून घेतला जातो. आपण पॉलिसी मेकर्स आहात, धोरण ठरविणारे आहात, म्हणून आपणाकडे हतबलतेने बघावे लागते. ती वेळ शासनावर येऊ नये म्हणून मी एवढीच सूचना करीन की, या संदर्भात एक अभ्यास समिती गठीत केली जावी. त्या अभ्यास समितीसमोर असंघटित कामगारांच्या संख्या, तसेच त्यांच्या कामाची व्याप्ती इत्यादी बाबी त्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्या अभ्यास समितीला सुध्दा कालमर्यादा घालून देण्यात यावी. समितीने केलेला अभ्यास सर्वांना अभ्यास करण्यासाठी खुला करुन द्यावा आणि त्यानंतर त्यास अंतिम स्वरुप देऊन, त्याचे कायद्यात रुपांतर करावे, अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदया, कॉंगेस पक्षाचे आदरणीय अध्यक्ष श्री. माणिकराव ठाकरे यांनी अतिशय महत्वाच्या आणि उपेक्षित असलेल्या घटकाच्या संबंधामध्ये या ठिकाणी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यामुळे सर्व प्रथम त्यांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो. मी सुरुवातीला म्हटले आहे की, या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. त्यामुळे सभापती महोदया, मला समजून घेतले तर आनंद वाटेल. त्याचे कारण असे आहे की,

**तालिका सभापती (ॲड. उषा दराडे )** : या प्रस्तावावरील चर्चा आपल्याला उत्तरासह अडीच तासात संपवावयाची आहे. या प्रस्तावाच्या चर्चेला सुरुवात होऊन एक तास होऊन गेला आहे. या प्रस्तावावर अजून 21 सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. आपणास बोलण्यासाठी जेवढा वेळ ठरवून दिलेला आहे, तेवढया वेळतच कृपया आपण आपले मनोगत पूर्ण करावे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, असंघटित कामगार हा उपेक्षित घटक आहे. या घटकावर नेहमीच अन्याय होत आलेला आहे. या विषयाला सभागृहात बऱ्याच दिवसानंतर वाचा फुटलेली आहे. म्हणून तो विषय उपेक्षित ठेवू नका अशी माझी विनंती आहे. या सभागृहात अनेक प्रश्नांवर वेळ वाढवून दिलेली आहे. काही विषयांच्या बाबतीत मंत्री महोदयांना त्याच दिवशी उशिरा किंवा दुसऱ्या दिवशी उत्तर देण्यास सांगितले आहे. हा असंघटित घटक आहे. देशात ऑर्गनाईज सेक्टर फक्त 6 टक्के आहे. आम्ही 94 टक्के कष्टकऱ्याची चर्चा करतो. त्यासाठी पाच ते दहा मिनिटांमध्ये विचार मांडावयाचे झाले तर या घटकास न्याय मिळेल असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, मला कै.कवी नारायण सुर्वे यांच्या एका कवितेतील पंक्ती मला आठवतात.

" कामगार आहे मी
तळपती तलवार आहे मी
सारस्वतांनो माफ करा
थोडासा गुन्हा करणार आहे मी. "

सभापती महोदय, त्याचे कारणच असे आहे की, मी कामगार आहे, हा माझा दोष आहे काय ? आज या ठिकाणी कामगाराच्या संदर्भात चर्चा उपस्थित झालेली असताना ऑर्गनाईज

3...



श्री. भाई जगताप...

सेक्टरमध्येही प्रचंड प्रश्न आहेत. या देशाचे आणि राज्याचे जवळपास 50 कायदे आहेत. या सेक्टरसाठी किती कायदे आहेत ? या राज्याने फक्त एकमेव कायदा केलेला आहे. 1996 साली बांधकाम विभागातील कामगारांसाठी केंद्राने जो कायदा केला, तसा कायदा महाराष्ट्र राज्याने 2008 साली केला.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.........

2008 साली राज्याने त्या कायद्याचा स्वीकार केला, परंतु 2011 पर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. याची कारणे काय आहेत? हा अतिशय महत्वाचा विषय आहे. जर आपण रोजगार निर्मिती करणार नसू तर या कामगारांनी जायचे कुठे? रस्त्यावर 20 जण बसले म्हणून हा एकविसावा कामगार तिथे जाऊन बसणार. त्यांच्याबरोबर जाणार. रंगकाम करणारे असतील तर त्यांच्यापैकी कोणाचा तरी रंगाचा डबा हातात घेऊन आपली उपजीविका करणारे हजारो कामगार आहेत. हातावर पोट असलेले हे कामगार आहेत, त्यांच्यासाठी कोणतेही कायदे नाहीत. ख-या अर्थाने देशाच्या विकासात सहभागी होणारे हे कामगार आहेत. आमचा देश विकसनशील आहे असे आपण म्हणतो. मग विकास कसा होणार? मोठमोठे उड्डाणपूल उभारताना कामगारांचा हातभार महत्वाचा ठरतो. वांद्रे-वरळी सेतू उभारताना संघटित कामगार होते का? इंजिनिअर्स कामगारांमध्ये मोडत नाहीत. देशाच्या विकासामध्ये अतिशय महत्वाची भूमिका बजावणारे जे असंघटित कामगार आहेत त्यांच्या दृष्टीने ही चर्चा होत असल्यामुळे या चर्चेला सरकारने सुध्दा न्याय दिला पाहिजे.

सभापती महोदय, संदर्भ देत असताना पृथ्वीचे उदाहरण दिले जाते. पृथ्वी ही शेषनागाच्या फण्यावर उभी आहे असे सांगितले जाते. प्रत्यक्षात तसे नाही. पृथ्वी कामगारांच्या हातावर उभी आहे. ज्या कामगारांनी पृथ्वीला पेलून धरले आहे, त्या कामगारांसाठी 1996 साली झालेल्या कायद्याची 2008 मध्ये आम्ही अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेऊनही अद्याप अंमलबजावणी होत नाही. असंघटित कामगारांसाठी हा एकमेव कायदा झालेला आहे. अद्याप अनेक पल्ले गाठायचे आहेत. ही सुरुवात झालेली आहे. या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. शासन या दृष्टीने भविष्यात कोणती पावले उचलणार आहे याचे उत्तर मंत्री महोदयांनी सभागृहाला दिले पाहिजे.

सभापती महोदय, असंघटित क्षेत्र म्हणतो त्यावेळी त्यामध्ये अनेक विभागांचा समावेश होतो. मोलकरणी काम करतात त्या घरेलू कामगार, नाका कामगार, बाल मजूर, शेत मजूर, ऊस तोड कामगार असे अनेक प्रकारचे कामगार असंघटित क्षेत्रात मोडतात. यापूर्वी उल्लेख झाल्याप्रमाणे आय.टी.सेक्टर सुध्दा असंघटित क्षेत्रात मोडते. त्यांच्यासाठी सुध्दा कायदा असावा. त्यांनाही प्रोटेक्शन दिले पाहिजे, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु घटनेने काही संकेत घालून दिले आहेत. घटनेने आपल्यावर काही बंधने घातलेली आहेत. घटनेचे 24 वे कलम काय

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...........

सांगते? बाल मजूर ही संकल्पना घटनेला मान्य नाही. 14 वर्षाखालील मुलांना काम करता येणार नाही, असे घटनेत म्हटले आहे. या कलमाचे आम्ही किती पालन करतो?

सभापती महोदय, मध्यंतरी शासनाने एक मोहीम हाती घेतली होती. त्यासाठी कामगार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली 2005 मध्ये एका टास्क फोर्सची निर्मिती केली होती. 2005 पासून आजपर्यंत या टास्क फोर्सने काय केले याचा उल्लेख मंत्री महोदयांनी केला तर आमच्या ज्ञानात भर पडू शकते. सभागृहात आम्ही पोटतिडकीने प्रश्न मांडतो. त्या चर्चेतून निर्णय होत असतात. सभागृहात निर्णय झाल्यानंतर शासन पातळीवर बैठका घेऊन निर्णयाची अंमलबजावणी कितपत होते याची पाहणी करण्याची गरज आहे. टास्क फोर्सकडे संघटित आणि असंघटित अशा दोन्ही क्षेत्राबाबत जबाबदारी सोपविली होती. संघटित क्षेत्राची काही प्रमाणात अधिक जबाबदारी दिलेली होती. तरी देखील मुंबईमध्ये काही महिन्यापूर्वी एक लिफ्ट पडून सहा कामगारांचा मृत्यू झाला. टास्क फोर्सचे काम प्रभावी असते तर ही घटना घडली नसती. दुर्दैवाने या घटनेनंतर अशाच प्रकारच्या चार घटना या मुंबईमध्ये घडल्या.

नंतर 3यू.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ......

मग आम्हाला जाग केव्हा येणार आहे ? केवळ या ठिकाणी चर्चा करुन, कायद्याचा मसुदा तयार करुन किंवा घोषणा करुन चालणार नाही तर त्याची गांभीर्याने अंमलबजावणी सुध्दा झाली पाहिजे, अशी मंत्री महोदयांना माझी विनंती आहे. या विभागाचे दोन्ही मंत्री हे या असंघटित कामगारांच्या बाबतीत तसे संवेदनशील आहेत. कारण त्यांनी अनेक बैठका यासंदर्भात घेतल्या व आम्ही त्यात ज्या ज्या सजेशन्स केल्या त्यांचा स्वीकार सुध्दा केला पण त्या खालपर्यंत पोहचलेल्या नाहीत हे दुर्दैव आहे. म्हणून मी या निमित्ताने मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देणार आहे की, मधंतरीच्या काळात या सगळ्या कामगारांना स्मार्ट कार्ड देण्याच्या योजनेचा माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले पण किती लोकांना असे स्मार्ट कार्ड मिळाले याचे उत्तर आपल्याकडून अपेक्षित आहे. मी अजून युआयडीवर आलेलो नाही तर केवळ आपल्या राज्याने जाहीर केलेल्या स्मार्ट कार्ड योजनेवरच आहे, त्याबाबतीत शासनाने लक्ष द्यावे.

महोदय, यातील आणखी एक महत्वाचा गाभा म्हणजे हे घरेलू किंवा असंघटित कामगार हे कामगार संज्ञेत मोडत नाहीत. कारण कामगार संज्ञेत मोडले तर देशात जो कामगार कायदा आहे त्याचा फायदा या लोकांना मिळू शकेल, याबाबतीत शासन काय करणार आहे याचाही खुलासा झ ााला पाहिजे. या अनुषंगाने यापूर्वी सभागृहात मी तारांकित प्रश्न उपस्थित करुन चर्चा घवून आणली होती. त्या प्रश्नाला मंत्री महोदयांकडून गोलगोल उत्तरे देण्यात आली. पण शासनाला बदलत्या काळानुसार व परिस्थितीनुसार काही पावले उचलावी लागतील. वास्तविक समाजात या घटकाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. देशात हे प्रमाण 14.7 लक्ष आहे तर राज्यात 8 लाख असंघटित कामगार आहेत. पण जर या सर्वांनी ठरविले की दोन दिवस कामच करावयाचे नाही तर सर्वात जास्त वाईट परिस्थिती तुमची आणि माझी होईल, या कामगारांचे मात्र काही होणार नाही. यातील जवळपास 75 हजार कामगार हे आमच्या झेंड्याखाली आहेत. त्यांच्यासाठी शासनाने सन 1996 मध्ये जो कायदा केला तो करण्यास आमचाही वाटा आहे. तसेच देशाच्या पातळीवरील अनेक कामगार संघटनांनी पुढाकार घेतला होता.

माननीय विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री असताना त्यांनी षण्मुखानंद हॉलमध्ये जाहीर घोषणा केली होती की, घरेलू कामगारांना आठवड्यातून एक सुट्टी देण्यात येईल. पण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ...........

केवळ घोषणा करुन चालत नाही तर त्याची अंमलबजावणी होणेही तितकेच महत्वाचे असते. शासनाने घोषणा केली असली तरी शासनाचे त्यावर नियंत्रण नसल्याने ती केवळ घोषणाच राहिली. मला कबूल आहे की, कामगार विभागाकडे आवश्यक मनुष्यबळ यासाठी नाही. असे असेल तर आम्ही कितीही तावातावाने सांगू की याबाबतचे इन्स्पेक्शन झाले पाहिजे तरी त्याला अर्थ नाही. तसेच शासनाला सुध्दा मनुष्यबळ नाही अशी सबब सांगून आपल्या कर्तव्यापासून दूर जाता येणार नाही. अशा प्रकारे फक्त 6 टक्के लोक 94 टक्के असंघटित कामगारांच्या कायद्याची अंमलबजावणी करु शकत नाही, ही शोकांतिका आहे. मी खालच्या सभागृहात सदस्य असताना हा विषय उपस्थित केला होता. त्या चर्चेच्या उत्तरात मंत्री महोदयांनी उत्तरात अशा असंघटित कामगारांसाठी स्वतंत्र बोर्ड तयार करण्यात येईल असे सांगितले होते. पण नंतरच्या काळात या बोर्डाचे काय झ ाले, कोणती प्रगती झाली याचाही खुलासा उत्तरात करण्याची गरज आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप ...

सभापती महोदया, यानंतर मला बाल कामगारांसंबंधीचा एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे.बाल कामगाराची प्रथा नष्ट करण्या मागचे उद्दिष्ट काय आहे हे समजावून घेण्याची गरज आहे. केन्द्र सरकारने शिक्षणाचा अधिकार देण्यासंबंधीचा कायदा पास केला आहे. तेव्हा या बालकमागारांना शिक्षण मिळावे याकडे शासनाला अधिक लक्ष द्यावे लागणार आहे. वेगवेगळया दुकानांवर वा हॉटेल्सवर धाडी टाकून त्या ठिकाणी असलेल्या बाल कामगारांना ताब्यात घेतले जाते व त्यांना बाल सुधारगृहात ठेवण्यात येते. त्या ठिकाणी बाल गुन्हेगारसुध्दा राहत असतात त्यामुळे बाल कामगारांना बाल सुधारगृहात ठेवण्यात आल्यामुळे तेथून बाहेर आल्यानंतर ते आयुष्यातून उद्ध्वस्त झालेले असतात किंवा नको ते शिक्षण घेऊन बाहेर पडलेले असतात. तेव्हा या मुलांना चांगले शिक्षण कसे मिळेल याकडे लक्ष देण्याची गरज आहे. त्या मुलांसाठी जवळजवळ 1 हजार 400 शाळा आहेत हे मला माहीत आहे. परंतु त्याच्याकरिता निवासी शाळा असण्याची आवश्यकता आहे. असे मला सांगावयाचे आहे.अशा प्रकारे जे बालमजूर पकडले जातील त्यांची रवानगी तुरुंगात करता कामा नये कारण मजूर म्हणून काम करण्यामध्ये त्यांचा काहीही दोष नसतो.आठ दहा वर्षाची मुले बाल कामगार म्हणून काम करीत असतात त्यामध्ये त्यांचा काय दोष आहे ? म्हणून या बाल कामगारांना बाल सुधार केंद्रात वा तुरुंगात न ठेवता निवासी शाळांमध्ये ठेवण्यात यावे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, एक गोष्ट मला मुद्दाम सांगावयाची आहे.मंडणगड हा माझा तालुका असून रोजगार हमी योजनेच्या एका रस्त्याच्या कामावर तेथील ठेकेदाराने जवळजवळ दहा ते पंधरा बाल कामगार खडी फोडण्यासाठी वा खडी पसरविण्यासाठी ठेवले असल्याबद्दल मी तक्रार केली होती .शासनाकडे तक्रार केल्यानंतर संबंधित कंत्राटदाराविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. मी तक्रार देऊन जवळजवळ दीड ते दोन महिने होऊन गेले आहेत. अजून काही कारवाई केलेली नाही. मी हे एकच उदाहरण देतो अशातला भाग नाही. राज्यातील इतर भागातही अशा प्रकारची अनेक उदाहरणे आपल्या निदर्शनास आली असतील. परंतु त्याबाबतीत तक्रार आली नाही म्हणून कारवाई करण्यात आली नाही असे कदाचित सांगण्यात येईल. संबंधित कामगार विभागाचा अधिकारी वा तेथील जिल्हाधिकारी यांना आपण

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप ...

जबाबदार धरणार आहात किंवा नाही असे मला माननीय मंत्र्यांना विचारावयाचे आहे.ज्या स्पेसिफिक तक्रारीवर जर कारवाई केली जाणार नसेल तर मग नक्की कारवाई कोणा विरुध्द होणार आहे ? असा मला माननीय मंत्र्यांना प्रश्न विचारावयाचा आहे.

सभापती महोदया, असंघटित कामगारामध्ये महिला, शेतमजूर,ऊस तोड कामगार ,बाल कामगार इत्यादी येतात. बालकामगार हा मानवतेला एक सामाजिक शाप आहे असे मला दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. बाल कामगाराचे निराकरण करीत असतांना त्या कुटुंबाची स्थिती काय आहे हे सुध्दा विचारात घेण्याची गरज आहे. असंघटित क्षेत्रामध्ये फक्त अशिक्षित लोक आहेत असे आपण समजता कामा नये. माझ्याकडे 75 हजार कामगार आहेत त्यात रंगकाम करणारे काही कामगार पदवीधर आहेत इतकेच नव्हे तर त्यातील काही कामगार पदव्युत्तर शिक्षण घेतलेले देखील आहेत परंतु पोटाची खळगी भरण्यासाठी रंगाचा डबा घेऊन इमारतीला रंग देण्याचे काम त्यांना करावे लागते.

सभापती महोदया, मला या चर्चेच्या निमित्ताने शासनाला विनंती करावयाची आहे की या विषयावरील चर्चा एवढयाच भूमिकेतून त्याकडे न पाहता कामगारामधील अडचणी काय आहेत याकडे सुध्दा पाहिले पाहिजे. या कामगारांच्या अडचणी काय आहेत या विषयी मला दिवसभर बोलता येईल परंतु तेवढे मी बोलणार नाही.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

आम्ही त्यांच्या मागण्या अनेक वेळा या सभागृहामध्ये मांडल्या आहेत. परंतु त्याबाबत फारशी कार्यवाही झाल्याचे माझ्या तरी ऐकिवात नाही. या चर्चेच्या माध्यमातून मी आपणास विनंती करतो की, या घटकांना विशेषत: त्यामध्ये महिला असतील, नाका कामगार असतील त्यांना पिवळे कार्ड देण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. त्यांना रेशनिंगसाठी आवश्यक असलेल्या पिवळया कार्डाचे वाटप झाले पाहिजे आणि त्या असंघटित कामगाराला वाटले पाहिजे की, हे सरकार माझे आहे, हे सरकार माझ्यासाठी आहे. आपण आज त्याला स्वस्त धान्य दुकानामधून पिवळया कार्डाच्या आधारावर धान्य उपलब्ध करुन देतो त्याप्रमाणे आपल्याकडे शेतमजुरांकरिता असलेली श्रावण बाळ योजना या लोकांकरिता कां लागू करीत नाही? या योजनेकरिता आवश्यक असलेला निधी आपल्याजवळ आहे, त्यामुळे या योजनेच्या माध्यमातून देखील आपण त्यांना आधार दिला पाहिजे. अशाप्रकारे एक व्यापक दृष्टीकोन समोर ठेवून त्यांच्याकरिता पिवळे कार्ड देण्याबरोबरच श्रावण बाळ योजना लागू करण्याबाबत शासनाने आपली भूमिका जाहीर केली तर बरे होईल असे मी याठिकाणी सांगू इच्छितो.

सभापती महोदया, नाका कामगारांच्या बाबतीत सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली आहे. परंतु त्या चर्चेनंतर पुढे काय झाले याची मला माहिती नाही. घरेलु कामगारांच्या बाबतीत आणि बिल्डिंग कंस्ट्रक्शनमध्ये काम करणाऱ्या कामगारांकरिता आपण एक मंडळ स्थापन केले असल्याचे सांगत असतो. या बाबत माझी आपणास अशी विनंती आहे की, या सर्व क्षेत्रामधील असंघटित असलेल्या कामगारांकरिता एक मोठया प्रमाणात मंडळ स्थापन करता येईल काय? त्याबाबत असलेल्या कायद्याची निश्चित कक्षा आपल्याला माहीत नसली तरी या ठिकाणी बिल्डिंग कंस्ट्रक्शनमध्ये काम करणाऱ्या कामगारांचा उल्लेख करण्यात आला, घरेलू काम करणाऱ्या कामगारांचा उल्लेख करण्यात आला त्याप्रमाणे नाक्यावर काम करणाऱ्या कामगारांसाठी सुध्दा एक मंडळ असावे. अशाप्रकारे वेगवेगळया क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी सहा ते सात मंडळे तयार करण्याऐवजी अन्ऑर्गनाईज सेक्टरसाठी एकच मोठे मंडळ तयार करता येईल काय याबाबत शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, मी शेवटी एका गोष्टीचा उल्लेख करणार आहे. मघाशी भाषण करीत असतांना देशामध्ये जनगणनेचे काम सुरु असून भारताची लोकसंख्या अमुक इतकी असल्याचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/

श्री.भाई जगताप.....

सांगण्यात आले. परंतु आपण देशाचा विचार सध्या बाजूला ठेवू या. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील कामगार विभागाला माझी विनंती आहे की, या राज्यामध्ये अन्ऑर्गनाईज कामगारांची संख्या किती आहे याचे आपल्याला एकदा मूल्यांकन करता येईल काय, त्यांची नोंद करता येईल काय? या कामगारांचा खरा मालक कोण आहे, हा तुमच्या आणि आमच्यासमोर महत्वाचा प्रश्न आहे. हा यामधील सर्वात मोठा अडथळा आहे. या कामगारांची योग्य नोंद होत नसल्यामुळे शासनाच्या योजनांचा त्यांना फायदा उचलता येत नाही. या करिता त्यांची नोंद आपल्याला कशाप्रकारे करता येईल यासाठी मार्गदर्शक तत्वे ठरविणारी भूमिका शासन घेणार आहे काय? तशा प्रकारची भूमिका शासनाने घ्यावी. सभापती महोदया, आपण या अतिशय महत्वाच्या प्रस्तावर बोलण्याकरिता मला अधिक वेळ वाढवून दिल्याबद्दल आपले आभार मानतो. या प्रमाणे माझ्या सहकाऱ्यांना देखील या प्रस्तावावर बोलण्याकरिता अधिक वेळ द्यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र, जय कामगार.

**तालिका सभापती** : सदस्यांची अधिक वेळ बसण्याची तयारी असेल तर वेळ वाढवून देण्यास माझी हरकत नाही.

----

**(यानंतर श्रीमती रणदिवे)**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदया, याठिकाणी नियम 260 अन्वये आदरणीय श्री.माणिकराव ठाकरे साहेबांनी अतिशय महत्वाच्या विषयावर प्रस्ताव मांडलेला आहे.

सभापती महोदया, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, या राज्यामध्ये आणि देशामध्ये सर्वात जास्त असंघटित कामगारांची संख्या आहे. ऑर्गनाईज सेक्टर पेक्ष अन्-ऑर्गनाईज् सेक्टरमध्ये त्यांचे प्रमाण प्रचंड आहे आणि अनेक ठिकाणी असंघटित कामगार आहेत. केवळ हॉटेल, कॅन्टीन, कचरा वेचणारे, सिनेमा क्षेत्रामध्ये बॅक स्टेजमध्ये काम करणारे तसेच नाटकाच्या बॅक स्टेजमध्ये काम करणारे कामगार, निरनिराळया टी.व्ही.सिरिअलच्या वेळी बॅकस्टेजला काम करणारे कामगार, छोट्या-मोठ्या स्टुडिओमधील कामगार तसेच महापालिका, नगरपालिका येथील कामगार, वीट भट्टीमध्ये काम करणारे कामगार अशा प्रकारे यांची संख्या फार मोठी आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये सुध्दा शिक्षक सेवक म्हणून काम करणारे जे आमचे शिक्षक आहेत ते सुध्दा कामगारांसारखे वेठबिगारीचे काम करीत आहेत अशा प्रकारे असंघटित कामगारांचे प्रमाण जास्त आहे. सरकारी, निम-सरकारी कार्यालयामध्ये कंत्राटी पध्दतीने काम करणारे कामगार देखील असंघटितच आहेत. त्यांना आज कोणी वाली नाही अशी स्थिती आहे.या कामगारांकडून काम करुन घेतले जाते, त्यांचे शोषण केले जाते. खरे म्हणजे हा कष्टकरी माणूस आहे, तो भीक मागत नाही. परंतु त्याला त्यांच्या कष्टाचे वेतन सुध्दा दिले जात नाही. याठिकाणी आमच्या जिल्ह्याचे माननीय मंत्री डॉ.विजयकुमार गावित साहेब उपस्थित आहेत. त्यांनी सांगून सुध्दा संबंधित विभाग या कामगारांना पैसे देत नाही. सरकारी यंत्रणेने सांगितले की, 31 तारखेपर्यंत पैसे देऊ.पण मी माननीय मंत्री डॉ.विजयकुमार गावित साहेबांना सांगू इच्छितो की,त्या कंत्राटी कामगारांना अजूनही एकही पैसा मिळालला नाही. त्यामुळे कोणी कोणावर कंट्रोल ठेवावयाचा अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, महापालिकेमध्ये आऊट सोर्सिंग मोठया प्रमाणात आहे की, तेथील कॉन्ट्रॅक्टर या कामगारांचे प्रचंड प्रमाणात शोषण करीत आहेत. याबाबतीत मोठे रॅकेट तयार झालेले आहे आणि यामध्ये कॉन्ट्रॅक्टर, महापालिकेतील अधिकारी या मंडळींकडून कंत्राटी कामगार, असंघटित कामगार, घंटा गाडीवर काम करणारे कामगार, सफाई कामगार यांचे शोषण केले जाते. त्यांना कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा दिल्या जात नाहीत अशी स्थिती आहे. नगरपालिकांमध्येही असे कामगार काम करतात. खाजगी कार्यालयांमध्ये सुध्दा शोषण होत असते, सरकारी कार्यालयां-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

मध्ये देखील शोषण होते. तसेच हॉस्पिटलमध्ये देखील कामगारांचे शोषण होते हा महत्वाचा भाग आहे. मागच्या अधिवेशनामध्ये असे सांगण्यात आले होते की, या कामगारांना चेकव्दारे पगार दिला जाईल हे मला आठवते आणि माझ्याकडे त्याचे रेकॉर्ड आहे. सरकारकडून अशा प्रकारच्या घोषणा केल्या जातात. परंतु या घोषणांना पायदळी तुडविण्याचे कामही करण्यात येते. आज आपण किती कामगारांना चेकव्दारे पगार देतो, किती कामगारांना वेळेवर पगार देतो, किती कामगारांना किती महिने पगार दिलेला नाही असे अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे हा कामगार असुरक्षित आहेच, पण निरनिराळया ऑर्गनायझेशनमध्ये या असंघटित कामगाराचे निरनिराळया प्रकारे शोषण केले जाते. कंत्राटी कामगारांची पी.एफ.ची रक्कम सूचना देऊन सुध्दा कापली जात नाही.

सभापती महोदय, सकाळी आपण नियम 260 अन्वये गरिबांना आरोग्य सेवा उपलब्ध होण्याच्या बाबतीत चर्चा केली. ई.एस.आय.च्या बाबत सांगावयाचे तर ही सगळी गरीब माणसे आहेत. त्यांना काही आजारपण आले किंवा त्यांच्या कुटुंबियांना आजारपण आले तर त्यांच्याकडे ई.एस.आय.चे कार्ड नसल्यामुळे त्यांना कुठेही औषधांच्या बाबतीत सवलत मिळत नाहीत.त्यामुळे जर कोणाला आजारपण आले तर त्यांच्या पोटामध्ये धडकी भरते अशी स्थिती आहे.याठिकाणी 2008 मध्ये घरेलू कामगारांच्या बाबतीत कायदा करण्यात आला. त्यानुसार आतापर्यंत किती घरेलू कामगारांची नोंदणी झाली, किती जणांना ओळखपत्रे देण्यात आली ? सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितल्याप्रमाणे हे घरेलू कामगार तुमच्या-आमच्या घरामध्ये, तसेच विविध गृह संकुलामध्ये मोठया प्रमाणात काम करीत असतात. हे खरे आहे की, जर या लोकांनी काम करावयाचे नाही असा निर्णय घेतला तर तुम्हा-आम्हाला काम करणे देखील कठीण होईल अशी स्थिती आहे.मग वर्तमानपत्र टाकणारी मुले असतील, दूध पोहोचविणारी मुले असतील, छोटे-मोठे फर्निचरचे काम करणारी माणसे असतील, घरामध्ये इलेक्ट्रीफीकेशनचे काम करणारी माणसे असतील किंवा घरामध्ये दुरुस्ती करणारे कामगार असतील, किती कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे हा प्रश्न आहे. आपण याबाबतीत कायदा करतो पण त्याची अंमलबजावणी होत नाही, कायदा करुनही त्यांना ओळखपत्र देण्यात येत नाही. त्यांच्याकडे ओळखपत्र नसल्यामुळे त्यांना कोणी आधार देत नाही अशी असंघटित कामगारांची स्थिती झालेली आहे.त्यामुळे शासन घरेलू कामगार कायद्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करणार आहे हे देखील या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे. कारण आज कायदा केलेला असला तरी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

त्याला कोणी वाली नाही. शेवटी या असंघटित कामगाराने आपला हक्क मागण्यासाठी कोणाकडे जावयाचे असा प्रश्न आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या असंघटित कामगाराने जरी 10 रुपयाच्या ॲफीडेव्हीटवर लिहून दिले तर आपल्याकडे त्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची काही यंत्रणा आहे काय ? हा प्रश्न आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ...

मी एखाद्या ठिकाणी कामगार आहे, माझ्यावर अन्याय होतो, माझे शोषण होते, वेतन वेळेवर मिळत नाही, मला कोणत्याही प्रकारची सुविधा मिळत नाही अशा परिस्थितीमध्ये मी कोणाकडे जावयाचे ? आलेल्या तक्रारीचे निराकरण तातडीने कसे होईल हे पाहणे शासनाचे काम आहे. कारण हा शोषित माणूस असल्यामुळे त्याला तातडीने न्याय देण्याचे काम आपल्या खात्यातर्फे झाले पाहिजे.

सभापती महोदया, विटभट्टीवर काम करणारे कामगार आहेत. आमच्या भागात 6-7 आदिवासी तालुके आहेत. तेथील माणूस विटभट्टीवर काम करण्यासाठी जातो. त्याला जर कोठे चालला असे विचारले तर तो जगायला चाललो असे सांगतो. तो विटभट्टीवर काम करतो किंवा दुस-या जिल्ह्यामध्ये जाऊन मजूर म्हणून काम करतो. इकडे त्याच्या घराला कुलूप असते. परंतु त्याच्या सुरक्षिततेसाठी, त्याचे जे शोषण होते त्याला या कायद्याच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारचे संरक्षण मिळालेले नाही. त्यामुळे या असंघटित कामगारांच्या संदर्भामध्ये अनेक सेक्शनमध्ये यांचे शोषण चालू आहे. मासे विक्रेत्या महिला आहेत त्या असंघटित आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही. त्यांना ओळखपत्र देण्याचे कबूल करण्यात आले होते. त्यांना कोणत्याही खात्याचे ओळखपत्र मिळालेले नाही. त्यांना मत्स्य व्यवसाय विभागाचे ओळखपत्र मिळणार होते. कोठे काही दुर्घटना घडली तर मत्स्य व्यवसाय करणारे जसे अडचणीत येतात त्याच प्रमाणे मत्स्य विक्रेत्या महिला सुध्दा अडचणीत येतात. त्यांना नुकसानभरपाई द्यावयाचे असेल तर ओळखपत्र पाहिजे. परंतु या असंघटित लोकांना अशा प्रकारचे कोणतेही ओळखपत्र दिले गेलेले नाही. एखादा असंघटित कामगार वर्षानुवर्षे एखाद्या ऑर्गनायझेशनमध्ये काम करीत असतो पण कायद्याच्या एवढ्या पळवाटा असतात की, त्याला ब्रेक दिला जातो आणि नंतर पुन्हा कामावर घेतले जाते. त्याला कायम स्वरुपी करु नये या दृष्टीने ती पळवाट असते. अशा प्रकारच्या पळवाटांवर मात करण्याकरिता आणि त्याला कायम स्वरुपी नेमण्याकरिता यामध्ये काही सुधारणा शासन करणार आहे का, हे दखील या निमित्ताने फार महत्वाचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदया, केंद्र शासनाने सामाजिक सुरक्षा कायदा केलेला आहे. जसा आपण घरेलू कामगार कायदा केला आहे तसा केंद्राने जो कायदा केलेला आहे त्याला सामाजिक सुरक्षा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

कायदा असे नाव दिलेले आहे. परंतु या कायद्याची अंमलबजावणी जर झाली नाही तर त्यांना न्याय मिळू शकत नाही आणि त्यांचे शोषण कमी न होता ते वाढत जाणार आहे. आता या आऊटसोर्सींगच्या जमान्यामध्ये कोणी कोणाला कायम स्वरुपी कामावर ठेवावयास तयार नाही. साधा ड्रायव्हर असेल, घरात काम करणारी महिला असेल, घरेलू कामगार असेल, कोणीही त्याला कायमस्वरुपी ठेवण्यास तयार नसतात. हा सर्वात दुर्लक्षित आणि शोषित घटक आहे. त्याला न्याय देण्यासाठी सरकार म्हणून काही तरी ठोस उपाययोजना करावयास पाहिजे, असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. कारण त्याचा मूलभूत हक्कच धोक्यात आलेला आहे. अनेक वेळा आपण महामंडळ स्थापन करतो. असंघटित कामगारांसाठी आम्ही महामंडळ स्थापन करु अशी घोषणा शासन करते. महामंडळ स्थापन केले तर निधी दिला जात नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे उपस्थित आहेत. शेळी-मेंढी महामंडळ स्थापन केले पण कित्येक वर्षापासून निधीची मागणी करुनही निधी दिला जात नाही. या असंघटित कामगारांसाठी जरी आपण महामंडळ स्थापन केले पण त्याला निधी दिला नाही तर काही होणार नाही. हा सर्वात दुर्लक्षित घटक आहे. हे असंघटित कामगार ग्रामीण आणि शहरी भागामध्ये मोठ्या प्रमाणावर काम करीत आहेत. सरकारी असो, निमसरकारी असो किंवा खाजगी असो सगळीकडे हे कामगार आहेत. सगळीकडे या असंघटित कामगारांची अशीच स्थिती आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे तो अतिशय महत्वाचा आहे. समाजातील अतिशय दुर्लक्षित घटकाला आधार देण्यासाठी, त्याला न्याय देण्यासाठी, त्याचे शोषण थांबविण्यासाठी हा प्रस्ताव आणलेला आहे. त्यामुळे शासनाने या संदर्भात ठोस उपायोजना उत्तरामध्ये सांगावी अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री. ओटवणेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे व सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्यांनी राज्यात असंघटित कामगारांच्या संख्येत होत असलेली वाढ, त्याचप्रमाणे त्यांच्या वाढत असलेल्या समस्या यासंबंधीचा प्रस्ताव मांडलेला आहे. राज्यात घरेलू कामगार असतील, शेतमजूर असतील, ऊस तोड असतील यासह सर्वच क्षेत्रातील कामगारांच्या समस्या ह्या नवनव्यने वाढतच आहेत. तसेच ज्या जुन्या समस्या आहेत त्या तशाच प्रलंबित आहेत. प्रलंबित असलेल्या समस्या व त्यावर योजलेले उपाय, त्यांच्या बाबतीत न झालेली अंमलबजावणी, नवीन असंघटित कामगारांची वाढलेली संख्या व त्यांच्या नवीन समस्या या बाबीकडे शासनाने पाहणे आवश्यक आहे असे मला वाटते. कंत्राटी कामगार, असंघटित कामगार हा वर्ग शापित असल्यासारखा काम करताना तुम्हा-आम्हाला दिसतो आहे. त्यांना कुठल्याही प्रकारचा पाठिंबा नाही, आधार नाही, शाश्वती नाही. सकाळी घरातून निघाल्यानंतर मला काम मिळेल की नाही, रोजंदारी मिळेल की नाही आणि मिळालेली रोजंदारी ही किती असणार आहे याची शाश्वती त्यांना नसते. मिळालेल्या रोजंदारीतून जो मोबदला मिळणार आहे त्यातून माझ्या कुटुंबाचे पोट भरणार आहे की नाही, कुटुंबाच्या जेवणासाठी आवश्यक असणाऱ्या किमान गोष्टी बाजारातून घेता येतील की नाही अशा प्रकारच्या समस्या असंघटित कामगारांना भेडसावित असतात.

असंघटित कामगारांच्या बाबतीत व्यवस्थापन नेहमीच नैराश्यपूर्ण धोरण स्वीकारते. शासनाच्या माध्यमातून, विविध संघटनेच्या माध्यमातून या कामगारांनी संघटित व्हावे, व्यवस्थापनामध्ये त्यांचा समावेश व्हावा, त्यांना कायम करण्यात यावे यासाठी प्रयत्न केला जातो. पण बऱ्याच वेळा असे दिसून येते की, माझ्याकडे असलेला कामगार कंत्राटी म्हणून काम करीत असतो तो पर्यंत तो चांगले काम करीत असतो. त्याला मी माझ्या कंपनीमध्ये कायम केले तर तो माझ्या अपेक्षेप्रमाणे काम करत नाही, अशा प्रकारची आत्मविश्वास गमावलेली भावना व्यवस्थापनात निर्माण होते. अन्न, वस्त्र, निवारा देणे ही शासनाची प्रामुख्याने जबाबदारी आहे. तशीच रोजंदारी

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

देणे ही देखीलशासनाची जबाबदारी आहे. कंत्राटी कामगारांना कायम करण्यासाठी व्यवस्थापन टाळाटाळ का करीत आहे, व्यवस्थापन त्यांना का नाकारत आहे, याचा सुद्धा अभ्यास शासनाने करणे आवश्यक आहे. कामगार संघटना, असंघटित कामगार व व्यवस्थापन यांना एकत्र बसवून आत्मविश्वास निर्माण करून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला तर शासनाला त्यात चांगल्या प्रकारचे यश येईल असे मला वाटते. या प्रस्तावामध्ये 30 ते 40 लाख कामगार असंघटित क्षेत्रामध्ये काम करीत आहेत असे नमूद केले आहे. पण त्या पेक्षा अधिक संख्येने असंघटित कामगार विविध क्षेत्रामध्ये काम करीत असल्याचे चित्र दिसत आहे. संपूर्ण देशात संघटित क्षेत्रामध्ये काम करणारे 2 कोटी व असंघटित क्षेत्रामध्ये काम करणारे 26 कोटी कामगार आहेत. सुरक्षा व आरोग्य यांच्या अंमलबजावणीसाठी 1400 सुरक्षा अधिकारी 1154 कारखाने निरीक्षक व 27 वैद्यकीय निरीक्षक, असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी काम करीत असतात. हा अधिकारी वर्ग फारच कमी आहे. आपल्या देशात संघटित क्षेत्रात व्यावसायिक आजारामुळे मागील वर्षी सुमारे 1626 कामगार मृत्युमुखी पडले.

असंघटित क्षेत्रात देखील हजारो कामगार मृत्यूमुखी पडत असतात. रासायनिक क्षेत्रात काम करणाऱ्या असंघटित कामगारांना तर कुठल्याही प्रकारचा औषधोपचार व सुविधा मिळत नाही किंवा आरोग्याचा विचार करताना दिसत नाही. आपण कामगारांसाठी कामगार मंडळे सुरू केली. आपल्या राज्यात 13 कामगार मंडळ आहेत. यापैकी 4 ते 5 कामगार मंडळ बंद पडली आहेत. योग्य असे व्यवस्थापन नाही. आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्याची तेथे व्यवस्था नाही. असलेल्या कामगारांचे प्रश्न या मंडळामार्फत सोडविले जात नाहीत. म्हणून कामगारांनी कामगार मंडळांचा राजीनामा द्यायचा, नाव काढून घ्यायचे व परत असंघटित कामगार म्हणून काम करण्याचे धोरण अवलंबिले आहे. आज या कामगार मंडळामध्ये कोणत्याही प्रकारचा ताळमेळ दिसून येत नाही. या कामगार मंडळातील कामगार दुसरा कामगार मंडळामध्ये जातात किंवा दुसऱ्या कामगार मंडळाचे कामगार तिसऱ्या मंडळामध्ये जातात, अशा प्रकारे असंघटित कामगारांमध्ये सुद्धा संघर्ष पहायला मिळत आहे.

यानंतर श्री.खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

आज मुंबई बंदरामध्ये असंरक्षित कामगारांचे क्लिअरिंग ॲण्ड फॉवर्डिंग बोर्ड आहे. हे बोर्ड म्हणजे मुंबई बंदरामध्ये किंवा आजूबाजूच्या बंदरात जो माल येतो, जो आयात-निर्यात होणारा माल आहे त्या मालाची हाताळणी करणारा हा कामगार वर्ग आहे. हे बोर्ड 1992-93 साली स्थापन झालेले आहे. आज या कामगार मंडळाची स्थिती अशी आहे की, मुंबई बंदरात व जेएनपीटीमध्ये माल येतो. आयात-निर्यात होणारा माल सीएसएफच्या माध्यमातून वेगवेगळ्या कंटेनर यार्डमध्ये त्याची हाताळणी होते. मालाची चढणी व उतरणी होते. पण या कामगार मंडळाला त्या कार्यक्षेत्रात काम करता येत नाही. जेएनपीटीमध्ये 3 हजार कामगार रजिस्टर्ड होते. परंतु जेएनपीटीत सुट्टा माल येण्याचे कमी झाले, त्याऐवजी कंटेनर्समधून माल येऊ लागला. कंटेनर्समधून येणारा माल सीएसएफकडून हाताळला जाऊ लागला. सीएसएफने मात्र या कामगारांना कोणतीही परवानगी दिलेली नाही. माथाडी मंडळामध्ये रजिस्टर्ड झालेल्या जेएनपीटीतील 3 हजार कामगारांमध्ये पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यातून आलेले गोरगरीब कामगार आहेत. त्यापैकी 2350 कामगारांना राजीनामा द्यावा लागला. उर्वरित 650 कामगारांना हे माथाडी मंडळ एकही रुपयाचे काम देऊ शकत नाही. उलट हे 650 कामगार सीएसएफमध्ये रोजंदारीवर काम करण्यासाठी जात आहेत. तसे पाहिले तर सीएसएफमध्ये जर आयात-निर्यात होणाऱ्या मालाची हाताळणी होत असेल तर क्लिअरिंग ॲण्ड फॉवर्डिंग बोर्डाचे तेथे काम चालले पाहिजे. पण त्या एरियामध्ये ग्रोसरी बोर्ड काम करीत आहे. ग्रोसरी बोर्ड हे त्याच्याशी संबंधित असलेल्या क्षेत्रात कार्यरत असावयास पाहिजे. पण ग्रोसरी बोर्ड या क्लिअरिंग ॲण्ड फॉवर्डिंग बोर्डाला काम करु देत नाही. मुंबई बंदरामध्ये या बोर्डाचे कार्यक्षेत्र आहे, पण मुंबई बंदराचे व्यवस्थापन या कामगार मंडळाच्या कामगारांना आत येण्याची परवानगी देत नाही. त्यांना कोणतेही पासेस मिळत नाहीत. शासनाने ही मंडळे स्थापन केलेली आहेत. त्या त्या क्षेत्रातील कामगार मंडळांना त्या मंडळात नोंदणी झालेल्या कामगारांसाठी शासनाने काम केले पाहिजे, त्यांना मदत दिली पाहिजे. त्या कामगार मंडळांनी सुध्दा कामगारांचे इंटरेस्ट जपण्यासाठी मोठ्या प्रमाणात काम केले पाहिजे असे मला वाटते.

2...

श्री.रमेश शेंडगे....

तसेच रेल्वे बोर्ड आहे, ग्रोसरी बोर्ड आहे अशी विविध बोर्डस् आहेत, ती एकमेकांचे काम खेचून घेत असून त्यांच्यात स्पर्धा सुरु आहे. म्हणून शासनाने कामगार मंडळांची कार्यक्षेत्र ठरवून दिली पाहिजेत. कामगारांच्या वेगवेगळ्या संघटना असतात, या संघटनांच्या माध्यमातून वेगवेगळ्या कामांवर अतिक्रमण होत आहे. सन 2005 या वर्षानंतर 7-8 सीएसएफ मुंबई बंदर व जेएनपीटीत आलेले आहेत. त्यावेळी अतिरिक्त कामगार आयुक्त श्री.गजरे हे होते. त्यांनी हायकोर्टात असे ॲफिडेव्हिट केलेले आहे की, जे नवीन सीएसएफ येत आहेत त्यामध्ये क्लिअरिंग ॲण्ड फॉवर्डिंग बोर्डाच्या कामगारांना समाविष्ट केले जाईल. म्हणजे 3 हजार कामगारांना त्यात समाविष्ट करुन घेतले जाईल. परंतु त्या ॲफिडेव्हिटची कसलीही अंमलबजावणी झालेली नाही. त्याची अंमलबजावणी त्वरित होणे आवश्यक आहे. असंघटित कामगार म्हणजे कंत्राटदाराकडे काम करणारे कामगार.

सभापती महोदय, मी मुद्दाम सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, जर प्रामाणिकपणे प्रयत्न केले, सामाजिक बांधिलकीच्या भावनेने काम केले तर असंघटित कामगार सुध्दा व्यवस्थापनात जाऊन चांगल्या प्रकारे पैसे कमवू शकतात हे दिसून येईल. वर्धा येथे एफसीआयचा एक डेपो आहे. तेथे 1 लाख टन मालाची चढ उतारणी होते. त्या डेपोत 250-300 कामगार कंत्राटीपध्दतीने काम करीत होते. या कामगारांना व्यवस्थापनात घेण्यासाठी आम्ही प्रयत्न केला होता. त्यावेळी आम्हाला एफसीआयने साथ दिली नव्हती. म्हणून आम्ही कामगारांची सोसायटी स्थापन केली. सोसायटीच्या माध्यमातून आम्ही तेथील टेंडर पध्दत रद्द केली. त्यानंतर 7-8 वर्षापूर्वी एफसीआयला संपाची नोटीस दिली होती. परंतु त्यानंतर व्यवस्थापनाबरोबर करार करण्यात आल्यामुळे ते सर्व कामगार आता व्यवस्थापनामध्ये काम करीत आहेत. सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांना व सभागृहाला आश्चर्य वाटेल की, 10 वर्षापूर्वी 10 ते 12 हजार रुपये पगार घेणाऱ्या कंत्राटी कामगारांना व्यवस्थापनात सहभागी झाल्यामुळे कायम केलेले आहे. यासाठी मी 1986-87 साली स्वत: वर्धा येथे मुक्कामाला राहिलो होतो. त्यावेळी सोसायटीच्या माध्यमातून मी प्रयत्न करीत होतो. दोन कामगार संघटनांमुळे माझ्यावर हल्ला सुध्दा झाला होता. त्यावेळी माझा खून सुध्दा होण्याची शक्यता होती. माझ्या वडिलांनी मला असे सांगितले होते की, रमेश

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

काही झाले तरी ते कामगार तेथे कायम झाले पाहिजेत. मगच परत यावयाचे. आज ते कामगार कायम झालेले आहेत. कंत्राटी पध्दतीचा कायम झालेला एक कामगार आज 70-80 हजार रुपये पगार घेत आहे. शासन हे तपासून पाहू शकते. त्यांनी 1 लाख 87 हजार रुपये आयकर भरलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:05

श्री. रमेश शेंडगे...

येणा-या महिन्याचा पगार माझ्या कामगाराला 92 हजार रुपये इतका मिळणार आहे. मागील चार-पाच वर्षापासून अशा प्रकारचा पगार माझे कामगार घेत आहेत. माझे कामगार मारुती आणि क्वॉलीस गाड्या घेऊन फिरत आहेत. 130 कामगारांनी स्वत:चे बंगले बांधलेले आहेत. म्हणून मी सांगतो की, आपल्याकडे एक प्रकारची इच्छा शक्ती असेल, सामाजिक बांधिलकी असेल तर या क्षेत्रामध्ये आपण चांगले कार्य करु शकतो.

मंत्री महोदय श्री. हसन मुश्रीफ यांचा कामगार क्षेत्राशी चांगला संबंध आहे. त्यांनी कामगारांच्या विविध प्रकारच्या समस्या सोडविलेल्या आहेत. आज जगामध्ये चीन आणि भारत हे देश आपली औद्योगिक आणि आर्थिक प्रगती वेगाने करीत आहेत. औद्योगिक प्रगती यशस्वी होण्यासाठी कामगारांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. कामगार आणि व्यवस्थापनामध्ये चांगल्या प्रकारचे वातावरण निर्माण करण्यामध्ये आपण यशस्वी झालो तर मला खात्री आहे की, या पुढच्या काळात आपल्याला अपेक्षित यश मिळेल. माथाडी कामगारांना घरे देण्याचे शासनाने जाहीर केलेले आहे. माथाडी कामगारांना घरे देत असताना सर्व माथाडी कामगारांना घरे मिळतील हे पहायला पाहिजे. काही कामगार संघटना असे सांगत आहेत की, आमच्या कामगार संघटनेचे सभासद झ ााल्यानंतरच तुम्हाला घरे मिळतील, असे प्रकार होत आहेत. त्यामुळे अन्य माथाडी कामगारावर अन्याय होणार नाही याची काळजी शासनाने घ्यावयास पाहिजे. 1 मे हा कामगार दिन आणि महाराष्ट्र दिन म्हणून साजारा केला जातो. तेव्हा महाराष्ट्रामध्ये असणारा असंघटित कामगार असेल, अन्य क्षेत्रातील कामगार असेल त्यांना संघटित करुन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करुन त्यांना चांगल्या प्रकारे सहकार्य करावे अशी विनंती करतो. धन्यवाद.

-----

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी असंघटित कामगाराच्या संदर्भात जो नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माझ्या पूर्वीच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी असंघटित कामगारांचे अनेक प्रश्न या ठिकाणी मांडलेले आहेत. त्यामुळे मी जास्त खोलात जाऊ इच्छित नाही. या निमित्ताने मी शासनाला काही महत्वाच्या सूचना करणार आहे. राज्यातील असंघटित कामगारांसाठी राज्य शासनाने एक हेल्पलाईन उपलब्ध करुन द्यावी. जर कोणत्याही असंघटित कामगाराला त्याच्यावर अन्याय होत आहे असे वाटत असेल, त्याच्या हक्कावर गदा येत असेल तर त्याबाबतीत तो हेल्पलाईनवरुन आपली तक्रार सांगू शकेल आणि त्याला शासनाची तात्काळ मदत मिळू शकेल. तेव्हा या कामगारांसाठी हेल्पलाईनची व्यवस्था करावी.

सभापती महोदय, माझी दुसरी सूचना अशी आहे की, ज्या प्रमाणे आपण शेतक-यांना कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देतो त्याप्रमाणे या असंघटित कामगारांना कर्ज उपलब्ध करुन दिले तर ते आपला स्वत:चा व्यवसाय करु शकतील. वडापावची गाडी टाकू शकतील,ज्यूस सेंटर टाकू शकतील. तेव्हा या माझ्या सूचनेचा शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, माझी तिसरी सूचना अशी आहे की, या कामगारांना लिगल असिस्टंट देणे आवश्यक आहे. आपण आधार कार्ड योजना सुरु केलेली आहे. या कामगारांसाठी अशा प्रकारच्या कार्डची व्यवस्था केली तर हा कामगार कोठे काम करतो, कोणत्या प्रकारचे काम करतो याची माहिती उपलब्ध होऊ शकेल. हे असंघटित कामगार घरकाम देखील करतात. ज्या घरामध्ये वयस्क मंडळी असतात त्यांना त्यांच्या घरामध्ये काम करणा-या अशा कामगारांची भीती वाटत असते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन...

कुठे खून झाला, फ्लॅटमध्ये चोरी झाली. वयोवृद्ध घर मालकावर चाकूने वार केले, असे प्रकार घरात काम करणाऱ्या व्यक्तींकडून मोठया प्रमाणात होतात. घरकाम करणाऱ्या कामगारांकडून आपल्या जीवाला सुध्दा धोका असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा गोष्टींना आळा बसावा यासाठी शासनाने काही तरी नियोजन करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, आपण खाद्य पदार्थ खरेदी करतो, त्यावर लिहिलेले असते की, राईट-ग्रीन. हा पदार्थ व्हेजिटेरियन आहे की नॉन व्हेजिटेरियन आहे. यासंबंधीचा उल्लेख केलेला असतो. आपण विजेवर चालणारी उपकरणे खरेदी करतो. उदाहरणार्थ ए.सी., रेफ्रिजेरटर, वॉशिंग मशीन, इत्यादी वस्तू खरेदी करतो, त्यावर लिहिलेले असते की, BEE. वन, टू.,थ्री ॲन्ड फोर असे स्टॅन्डर्ड दिलेले असतात. खाद्य पदार्थांच्या कारखान्यात चाईल्ड लेबर नाहीत अशा प्रकारचे सर्टिफिकेशन दिले तर त्या वस्तूची निर्मिती चांगली होईल आणि ती लोकांपर्यंत जाईल. खाद्य पदार्थ असो, जीवनावश्यक वस्तू असो, कपडे असो, यांच्या कारखान्यांमध्ये सदर वस्तू तयार करताना चाईल्ड लेबरच्या माध्यमातून तयार केलेल्या नाहीत असे त्या वस्तूंवर नमूद करणे बंधनकारक करावे.

सभापती महोदय, मी नाशिक येथून जळगांवकडे चाललो होतो, त्यावेळी नाशिक येथे चहा घेण्यासाठी एका ठिकाणी थांबलो. त्या ठिकाणी शेतकरी, त्याची पत्नी यांचे अधिकाऱ्यांसमवेत भांडण चालू होते. "मैने जब यह जानने की कोशिक की कि साथ वाले खेत मे झगड़ा क्यों चल रहा है, तो मुझे पता चला कि वहां पर सरकारी अधिकारी एक बच्चे को बाल-मजदूर कायदे के अंतर्गत पकड़ रहे थे और उस बच्चे के माँ-बाप पर यह कर कर केस कर रहे थे कि वे अपने बच्चे से मजदूरी करा रहे हैं." मी तेथे मध्यस्थी केली आणि त्या अधिकाऱ्यांना विचारले की, तुम्ही कोणत्या कायद्यान्वये कारवाई करता आहात ? त्या अधिकाऱ्याने मला सांगितले की, आम्हाला अशा केसेस करण्यासंबंधी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी टारगेट दिलेले आहे. ते टारगेट मला पूर्ण करावयाचे आहे. असे प्रकार होत आहेत, त्यावर शासनाने नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आभार व्यक्त करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

-----

2...

05-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4C-2

ABG/ प्रथम श्री.शिगम 18:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ( नामनियुक्त ) : सभापती महोदया, आदरणीय श्री. माणिकराव ठाकरे यांनी नियम 260 अन्वये अतिशय महत्वाचा प्रस्ताव सभागृहात आणला आहे, त्या प्रस्तावावर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदया, मुंबई शहर आणि महाराष्ट्रामध्ये वेगवेगळे असंघटित कामगार आहेत. घरकाम करणारे कामगार, नाक्यावर रोजगार मिळविण्यासाठी ताटकळत बसणारे कामगार, कचरा वेचक सफाई कामगार, शेतकरी, शेतमजूर हा सर्व असंघटित वर्ग आहे. या संदर्भात कचरा वेचक कामगारासंबंधीचे उदाहरण या ठिकाणी सांगते. कचरा वेचकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आमची महाराष्ट्र महिला परिषद अशी एक छोटीशी संस्था कार्यरत आहे. ही संस्था कचरा वेचकांच्या प्रश्नावर जागरुक असते. या संस्थेत मी आहे, श्रीमती नीला लिमये आहेत. कचरा वेचक कामगारांमध्ये पुरुष आणि महिला या दोघांचा समावेश आहे. परंतु मी या ठिकाणी ज्या कचरा वेचक भगिनी आहेत, त्यांच्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, ज्यावेळेस कचऱ्याच्या गाडया येतात. तेव्हा कचऱ्याच्या गाडीमागे हे कामगार धावत असतात. डंपींग ग्राऊंडमध्ये कचऱ्याची गाडी खाली केल्यानंतर त्यांना चांगल्या प्रकारचा कचरा मिळाला तर त्यातून त्या भगिनींना दोन पैसे मिळत असतात. त्या पैशांवर त्यांची उपजीविका चालते. माझी या संदर्भात शासनाकडे मागणी आहे की, कचरा वेचक कामगार हे असंघटीत आहेत. अजून त्यांच्या संघटना म्हणाव्या तेवढया झालेल्या नाहीत. कचरा वेचक कामगार सुरक्षित रहावे म्हणून त्या कामगारांना हातात घालण्यासाठी हातमोजे, पायात घालण्यासाठी बूट दिले गेले पाहिजेत. या गोष्टी त्यांना उपलब्ध करुन दिल्या तर ते आपला जीव व्यवस्थितपणे सांभाळतील. म्हणून कचरा वेचक कामगारांना हातमोजे आणि पायातील बूट देण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी माझी या निमित्ताने छोटीशी मागणी आहे.

सभापती महोदय, डंपीग ग्राऊंडवर कचरा वेचणारे कामगार आहेत, शेतावर काम करणारे शेतमजूर आहेत, त्यांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून आपण वस्ती शाळा सुरु करणार आहात की नाही....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई..........

आपण या वस्त्यांच्या पातळीवर, त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सुधारणा करणे गरजेचे आहे. त्यांची मुले शिकली पाहिजेत, त्यांचे आरोग्याचे प्रश्न सोडविले पाहिजेत......

**तालिका सभापती** (ॲड.उषा दराडे) : या प्रस्तावावरील चर्चा व मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदया, या कामगारांना संरक्षण देण्याची गरज आहे. हॉटेलमध्ये काम करणारे बाल मजूर, बारमध्ये काम करणारे स्त्री-पुरुष कामगार यांना सुरक्षिततेची कोणतीही हमी नाही. आपण या सभागृहात खूप चर्चा करतो, परंतु त्या चर्चेच्या माध्यमातून शासनाने धोरण निश्चित केले पाहिजे. मी 1972 सालापासून कामगारांच्या प्रश्नाशी निगडित आहे. गोदरेज कंपनीतील असंघटित कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी लढा दिला होता तेव्हापासून ते गिरणी कामगारांना अन्न, वस्त्र, निवाऱ्याची पोकळ घोषणा करणाऱ्या मंडळीच्या विरोधात आम्ही संघर्ष केला होता. या कामगारांच्या मागे आम्ही ठामपणे उभे होतो. परंतु या कामगारांच्या दृष्टीने हिताच्या गोष्टी होताना दिसून येत नाहीत. या प्रश्नाची चौकट निश्चित करण्यासाठी अभ्यास गट निर्माण केला पाहिजे. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे विषयाची मांडणी केली. परंतु त्यांच्या प्रयत्नांना अद्याप यश आलेले नाही. असंघटित कामगारांच्या प्रश्नासाठी अभ्यास गट तयार करुन सरकारला धोरण निश्चित करण्यासाठी भाग पाडले पाहिजे. सरकारला या प्रश्नासंबंधी धोरण जाहीर करावे लागेल, यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन कटिबध्द आहे असे दिसून आले तरच या चर्चेतून काहीतरी निष्पन्न झाले असे म्हणता येईल. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपविते.

-----

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदया, या प्रस्तावावर बोलण्यासारखे खूप आहे. अगोदरच्या वक्त्यांनी अनेक गोष्टींना स्पर्श केला आहे, सविस्तर चर्चा केलेली आहे. खास करुन असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिला, मुली, मुले यांना कोणतीही सुरक्षितता नाही. घरकाम करण्यासाठी ते जेव्हा जातात तेव्हा त्यांच्यांवर कोणते अत्याचार होतील याची त्यांना कल्पना नसते. घरामध्ये काम करणाऱ्या मोलकरणींना प्रथम संरक्षण दिले पाहिजे. दिवसाकाठी चार-पाच घरांमध्ये धुणी, भांडी, स्वयंपाक करणे, मुलांना सांभाळणे, वयोवृध्दांना सांभाळणे अशी कामे करताना स्वत:चे घर वाऱ्यावर सोडून आपल्या संसाराला त्या हातभार लावण्याचे काम करीत असतात. त्यांची शारीरिक अवस्था अत्यंत वाईट झालेली असते. कपडे धुण्यामुळे साबण व डिटर्जंटचा परिणाम होऊन त्यांच्या हातापायाची बोटे कुजतात. त्यांना आठवड्याला किंवा महिन्याला एकही सुट्टी दिली जात नाही.

सभापती महोदया, नागपूर येथे घरेलू कामगारांकरिता श्रीमती रुपा कुळकर्णी या चांगले काम करीत आहेत. घरेलू कामगारांच्या अनेक संघटना आंदोलने करीत आहेत. त्या संघटनांच्या प्रतिनिधींना शासन दरबारी बोलावून त्यांच्या सूचना ऐकून घेतल्या पाहिजेत. त्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना केल्या पाहिजेत. कचरा वेचणारे बाल मजूर, गटारे किंवा नाले सफाई कामगार, वीट भट्टीवर काम करणारे कामगार, मुंबई महापालिकेचे सफाई कामगार यांना खूप मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. त्यांची राहण्याची योग्य सोय होत नाही. मुंबई महापालिकेकडून गटारे किंवा नाले सफाईचे कॉन्ट्रॅक्ट दिले जाते. त्या कामावर करोडो रुपये खर्च केले जातात. कॉन्ट्रॅक्टरमार्फत लहान लहान मुलांकडून नाले सफाईचे काम करुन घेतले जाते.

नंतर 4 इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ........

त्या मजुरांना फक्त 50 ते 60 रुपये मजुरी दिली जाते. एका बाजूला बालमजूर नको म्हणून शासन कायदा करते पण त्यांच्या बाबतीत इतर गोष्टींचा मात्र विचार करीत नाही. त्यात सर्व शिक्षा अभियान सारख्या योजनेतून या लहान मुलांना, जे बालमजुरी करुन पोट भरतात त्यांना शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे, पण ती घेतली जात नाही. तसेच त्यांच्या खाण्या-पिण्याची व पालन पोषणाचीही जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे.

महोदया, मानखुर्द आणि गोवंडी भागातील सुधार गृहात अडीच ते तीन हजार अनाथ मुले व बालमजूर होते. तेथे आता फक्त 200 मुले आहेत. तसेच हे सुधार गृह बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे मी ऐकले. म्हणजे शासन बोलते एक आणि करते मात्र दुसरे अशातला भाग आहे. शासनाला जर बालमजूर नको असतील तर त्याला पर्यायी व्यवस्था सुध्दा केली पाहिजे. केवळ बालमजूर नको म्हणून चालणार नाही, असे सांगून प्रश्न सुटणार नाही तर त्यासाठी प्रयत्न करणेही तितकेच गरजेचे आहे. या बालमजुरांना शासनाच्या कोणत्याही योजनांचा फायदा मिळत नाही. सभागृहात आपण केवळ त्याबाबतची चर्चा करतो पण अशा प्रकारे चर्चा करुन किंवा कायदे करुन भागणार नाही, त्यांचे प्रश्न सुटणार नाही तर त्यांच्या मूलभूत गरजा जाणून घेतल्या पाहिजेत. खरे तर हा प्रचंड विरोधाभास आहे की कायदे आपणच करणार आणि नियम सुध्दा आपणच बनवितो. अंमलबजावणी होते की नाही याकडे मात्र दुर्लक्ष होते अशी परिस्थिती आहे. आज या असंघटित कामगारांना शासनाच्या नियमानुसार बीपीएलचे रेशन कार्ड मिळत नाही. कारण काय तर त्यांच्या घरात फॅन आहे, गॅस आहे म्हणून रेशन कार्डाच्या निकषात बसत नाही. पण घरात गॅस आणि फॅन असणे म्हणजे श्रीमंतीचे लक्षण आहे काय, याचाही विचार होणे आवश्यक वाटत नाही काय ? तसेच रणरणत्या उन्हात काम करुन आपल्या झोपड्यात विसाव्यासाठी पंखा लावला म्हणजे ती बाब ऐषआरामाची झाली असे शासनाचे म्हणणे आहे काय, किंवा स्वयंपाकाचा गॅस मिळाला म्हणजे ऐष झाली काय, याचा कुठे तरी विचार होणे आवश्यक आहे. जर रेशनिंगचे कार्डच नसेल आणि त्यामुळे रॉकेल मिळत नसेल तर बाहेरुन 25 रुपये लिटरप्रमाणे रॉकेल विकत घेऊन स्टोव्हवर स्वयंपाक करणे त्या मजुराला शकय नसते म्हणून गॅस घेतलेला असतो, तर ती ऐष म्हणता येणार नाही, याचाही विचार होणे आवश्यक आहे. तसेच अशा योजनेचे फायदे मिळण्यासाठी जो 15 हजार रुपये वार्षिक उत्पन्नाचा निकष आहे त्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ..........

विचार केला तर एखादी मोलकरीण दिवसातून चार-पाच घरचे काम करीत असेल तर ती सुध्दा तीन ते चार हजार रुपये कमाविते, अर्थात महिनाभर तेवढेही कमीच पडतात, ती सुध्दा निकषात बसत नाही, असे शासनाचे नियम आहेत. अशा प्रकारे जसे कायदे बनवितो त्याप्रमाणे नियम सुध्दा आपणच बनवितो. असे नियम बनवित असताना त्यात ज्या पळवाटा राहून जातात त्याकडे मात्र कोणाचे लक्ष नसते आणि त्यामुळे अशा कामगारांना त्रास होतो याकडे लक्ष दिले पाहिजे.

महोदया, या सर्व गोष्टींचा अशा असंघटित कामगारांना त्रास तर होतोच पण त्याचबरोबर त्यांच्या राहण्याचाही प्रश्न गंभीर आहे, त्याकडे लक्ष दिले पाहिजे. हे लोक झोपडपट्टीतून राहत असतात त्यांना शासनाने घरे उपलब्ध करुन दिली पाहिजेत. कारण अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा पुरविण्याची जबाबदारी शासनाची असते. पण त्यांना एक तर रेशन कार्ड देत नाहीत. अंगावरील कपडे फाटके असतात म्हणून त्यांचा तिरस्कार करतो आणि निवारा देण्याचाही विचार होत नाही, याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे.

महोदया, मुंबई शहराचा तसेच अन्य शहरांचाही विकास फार झपाट्याने होत असल्याचे आपण पाहतो. अशा शहराचा विकास होत असताना मग रस्ते, पूल किंवा मोठमोठे टॉवर्स व मॉल्स असतील त्यांचे बांधकाम करणारे हेच लोक असतात. पण त्यांना स्वत:ला घर नाही हे त्यांचे दुर्दैव आहे, अशा लोकांना नाईलाजाने झोपडृयांतून आसरा शोधावा लागतो. म्हणून जेव्हा शहराचा विकास आराखडा तयार केला जातो तेव्हा या लोकांचाही विचार होऊन त्यांना घरे दिली पाहिजेत.

महोदया, शासनाच्या अनेक विमा योजनार आहेत. त्यांचा फायदा सुध्दा या लोकांना मिळत नाही. माझी अशी विनंती आहे की, असंघटित कामगारांसाठी शासकीय विमा योजनेचा फायदा होईल यादृष्टीने त्यांचा अंतर्भाव केला पाहिजे. केवळ तिरस्कार करुन अथवा शहराचे सौंदर्य खराब करणाऱ्या झोपड्यांमध्ये राहणारे लोक समजून त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन त्यांची घरे उद्ध्वस्त करुन चालणार नाही तर त्यांच्या घरांचा प्रश्न सोडविला पाहिजे. अश प्रकारे शहराचा विकास करताना हे लोक म्हणजे आपली गरज आहे हे शासनाने ओळखले पाहिजे. पूर्वी इंग्रजांच्या बंगल्याच्या मागील बाजूस आऊट हाऊस असायचे. त्यात त्यांचा ड्रायव्हर, खानसामा तसेच बागकाम करणाऱ्या माळी लोकांची जबाबदारी सुध्दा ते लोक घेत होते.

यानंतर श्री. गायकवाड.......

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ...

त्यांची पूर्ण जबाबदारी इंग्रज लोक घेत होते इंग्रजाकडून आपण ही चांगली गोष्ट शिकली पाहिजे. परंतु आपण त्यांच्याकडून फक्त बुलडोझर चालवावयाचे शिकलो आहोत. या शहरांचा ज्या वेळी आपण विकास करतो तेव्हा श्रमिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्या पाहिजेत. श्रमिकांची जी वस्तुस्थिती आहे ती प्रथम शासनाने समजावून घेतली पाहिजे. या श्रमिकांच्या मूलभूत गरजा समजावून घेऊन त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज आपण त्याच्या संदर्भातील जी काही चर्चा करीत आहोत त्यातून काही तरी चांगले निष्पन्न व्हावयास पाहिजे असे मला वाटते. अनेक नियम करुन सुध्दा त्यांच्या गरजा आज पूर्ण् होऊ शकत नाहीत त्यामुळे किमान अन्न, वस्त्र निवारा, आरोग्य व शिक्षण या सारख्या मूलभूत सुविधा त्यांना मिळाल्या पाहिजेत. महानगरपालिकेच्या वा शासकीय रुग्णालयामध्ये हे कामगार लोक औषधोपचारासाठी जातात परंतु तेथील दर वाढविण्यात आलेले आहेत. जो माणूस शारीरिक श्रम करतो अशा व्यक्तीची तीन महिन्यातून एकदा अशा रुग्णालयांमध्ये नियमित तपासणी करण्यात आली पाहिजे, त्याचे आरोग्य कसे आहे, त्याला कोणत्या औषधांची गरज आहे हे पाहिले पाहिजे. त्या कामगारांचे खाणे व्यवस्थित नसते तसेच दिवसभर त्यांना कष्ट करावे लागते त्यामुळे या कामगारांच्या, लहान मुलांच्या आणि महिलांच्या आरोग्याची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे. तेव्हा या संदर्भात शासन काय करणार आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. तो प्रश्न जर सोडवावयाचा असेल तर जेवढया शासकीय योजना आहेत त्या योजनांचे नियम थोडे शिथिल करुन या सर्व घटकाना त्या योजनातील सर्व सुविधा शासनाने दिल्या पाहिजेत एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे यांनी एका महत्वाच्या विषयावर नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदया, असंघटित कामगार हा समाजातील अत्यंत महत्वाचा घटक असून या विषयावर चर्चा घडवून शासनाने त्यांच्या संदर्भात काही घोषणा कराव्यात यासाठी सन्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे यांनी जो प्रयत्न केला आहे त्याबद्दल सर्व प्रथम मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदया, या प्रस्तावावरील चर्चा खूप पसरट झालेली आहे असे मला वाटते.असंघटित कामगारामधील कौशल्य असणारा जो कामगार आहे तो पुरेसे पैसे कमावत असतो. सुतार, गवंडी, ड्रायव्हर, प्लंबर इत्यादीकडे कौशल्य असल्यामुळे जेवढे पैसे मागेल तेवढे पैसे देऊन त्यांच्याकडून आपल्याला काम करुन घ्यावे लागत आहे.त्यामुळे त्या वर्गाचा तातडीने विचार केला पाहिजे असे मला वाटत नाही परंतु असंघटित कामगारामधील कचरा गोळा करणारा जो कामगार आहे , घरोधर जाऊन वर्तमानपत्र टाकणारी मुले किंवा दूध पोहोचविणारी मुले,घरेलू कामगार इत्यादीच्या बद्दल सामाजिक दृष्टया जास्त चिंता व्यक्त केली पाहिजे. घरकाम करणारी महिला असो वा घरकाम करणारा पुरुष असो त्यांच्याकडे कौशल्य नसल्यामुळे त्यांना पाहिजे जेवढे पैसे मिळत नाहीत म्हणून त्यांना किमान पैसे मिळण्याची शाश्वती निर्माण केली पाहिजे.

सभापती महोदया, कचरा गोळा करणारा एक महत्वाचा घटक असून मुंबई शहरामध्ये त्यांची संख्या लाखांमध्ये आहे आणि कोल्हापूरमध्ये त्यांची संख्या शेकडयांमध्ये आहे. संपूर्ण राज्याचा विचार केला तर कचरा गोळा करणा-यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. ही मंडळी कचरा गोळा करुन जमा झालेला कचरा ज्या ठेकेदाराकडे जमा करतात तो ठेकेदार त्यांना पुरेसे पैसे देत नाही. त्यांना कमी पैसे देऊन त्यांचे शोषण करीत असतो. कचरा गोळा करणे व त्या पासून काही वस्तू तयार करणे याला उद्योग म्हणून मान्यता दिली पाहिजे. त्यातून मोठया प्रमाणावर पैसे गोळा होऊ शकतात त्याचे मी आपल्याला एक उदाहरण देतो.

सभापती महोदया, लातूर शहरामध्ये कांबळे नावाचा एक तरुण असून 70-80 तरुण तरुणींच्या माध्यमातून तो कचरा गोळा करीत असतो. त्याचे सॉर्टीग करुन त्यातील भंगार मोठया


VTG/ प्रथम श्री.खर्चे 18.25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील..

प्रमाणावर विकतो आणि जो कोरडा कचरा असतो त्यापासून पांढरा कोळसा तयार करीत असतो .जमिनी खालील कोळसा हळूहळू संपत जाणार आहे. त्यामुळे पांढरा कोळसा तयार करण्याची आवश्यकता आहे. जळावू कोळसा म्हणून या कोळश्याचा वापर करता येऊ शकेल, त्याचबरोबर वीज निर्मितीसाठी देखील त्याचा वापर करता येऊ शकेल. आता कोरडया कच-यापासून सुध्दा पांढरा कोळसा तयार व्हावयास लागला आहे त्याचबरोबर ओल्या कच-यापासून गॅस तयार व्हावयास लागला आहे.हा गॅस वापरुन इलेक्ट्रीसीटी वाचवता येईल. कचरा गोळा करणारा जो ठेकेदार आहे तो लहान मुला मुलींना कमी पैसे देऊन स्वत: जास्त पैसे कमवत असतो.

नंतर श्री.सरफरे`

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील...

हा कचरा आपोआप गोळा होत आहे, अशा भूमिकेतून याकडे न पहाता कचरा गोळा करण्याच्या व्यवसायामधून तो खूप पैसे कमावित आहे म्हणून त्याच्या व्यवसायाला इंडस्ट्रीचा दर्जा देऊन मान्यता दिली पाहिजे. या व्यवसायाकरिता लायसन्स निर्माण करुन लायसन्स घेणाऱ्या व्यक्तीवर कचरा गोळा करणाऱ्या कामगाराला किमान सुविधा दिल्या जातील अशाप्रकारची बंधने घातली गेली पाहिजेत आणि त्या दृष्टीकोनातून या उद्योगाकडे आपण पाहिले पाहिजे.

सभापती महोदया, मघाशी माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी सांगितले की, महाराष्ट्रामध्ये ठाणे जिल्ह्याची सर्वात जास्त लोकसंख्या आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये सात महानगरपालिका असल्यामुळे त्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट कशी लावावी, तो कुठे डम्प करावा असा आमच्यापुढे प्रश्न निर्माण झाला आहे. खरे म्हणजे कचरा हा आपल्या समोरील प्रश्न नसून ते एक उत्पन्नाचे मोठे साधन झाले आहे या भूमिकेतून सरकारने कधीही याकडे पाहिले नाही. नागपूर महानगरपालिकेमध्ये सांड पाणी शुध्दीकरण प्रक्रियेमधून दरवर्षी 18 कोटींचा महसूल मिळविला असतांना दुसरीकडे कोल्हापूर जिल्ह्यामधील सांडपाण्याचे काय करावे असा आमच्या पुढे प्रश्न निर्माण झाला आहे. अशाप्रकारे कचऱ्याच्या ढीगामध्ये बसून जी मुले त्यामधील भंगार शोधत असतात त्यांच्याबद्दल समाजामध्ये सहानुभूती निर्माण झाली पाहिजे. या असंघटित लोकांवर सरकारने जास्त लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

सभापती महोदया, या ठिकाणी माननीय सदस्यांकडून एक-दोन मुद्यांचा उल्लेख करण्यात आला असला तरी त्याची पुनरुक्ती करुन ते मुद्दे मला अधोरेखित करावयाचे आहेत. यामध्ये घरेलू कामगारांच्या बाबतीत सर्वात महत्वाचा मुद्दा असून माननीय सदस्य श्री संजय केळकर आणि श्री. भाई जगताप यांनी त्याचा उल्लेख केला आहे. सन 2008 मध्ये या संबंधी आपण कायदा संमत केला असून त्याची अंमलबजावणी कशी करणार आहात? मंत्री महोदयांनी या संदर्भात आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये या कामगारांना आपण कसा न्याय देणार आहोत, त्यांच्याकरिता बजेटमध्ये साडे नऊ कोटींची करण्यात आलेली तरतूद कशाप्रकारे खर्च करणार आहोत हे स्पष्ट करावे. कोल्हापूर शहरामध्ये 8 हजार घरेलू कामगार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने घरकाम करणाऱ्या कपडे धुणाऱ्या, भांडी घासणाऱ्या ज्या महिला आहेत त्या काम करीत असलेल्या घराचा मालक त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.चंद्रकांत पाटील.....

किती तासाचे किती पैसे देतो याबद्दल आपण नियमावली तयार केली आहे काय, नियमावली तयार केली असेल तर ती पाळली जात आहे की नाही हे आपण पहाणार आहोत काय, घरामध्ये काम करणाऱ्या त्या महिलेला घर मालक पैसे देणार असेल तर आपण तरतूद केलेल्या साडे नऊ कोटींचे काय करणार आहात? त्यांच्यासाठी घरे बांधून देणार आहात काय, किंवा त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्थेमध्ये मॉनिटरींग करणाऱ्या स्टाफचा पगार त्यामधून देणार आहात काय? हे पैसे आपण कशासाठी वापरणार आहात हे स्पष्ट केले पाहिजे. या करिता एक बोर्ड स्थापन झाले असून त्यासाठी निधीचे वाटप करण्यात आले आहे काय? या घरेलू कामगारांना न्याय देण्यासाठी आपण कोणता विचार केला आहे हे एकदा स्पष्ट केले पाहिजे. या कामगारांना किमान वेतन मिळाले पाहिजे, त्यांना सुरक्षितता मिळाली पाहिजे या करिता शासन कायदे करते. त्या कायद्याची अंमलबजावणी उद्योजकांनी केली पाहिजे.

उदा. मी जर एखादा उद्योग चालवीत असेल तर त्यामध्ये काम करणाऱ्या कामगाराला किती पगार द्यावयाचा हे सरकार ठरविणार आहे. परंतु या सरकारचे बहुतेक सर्व विभाग आज कॉट्रॅक्ट बेसिसवर चालले आहेत. कोल्हापूर महानगरपालिकेचा कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा पूर्ण ठेका हैद्राबादच्या रानकी नावाच्या ठेकेदाराला मिळाला आहे. परंतु तो रानकी आपल्या कामगारांना किमान वेतन देतो की नाही हे पाहिले पाहिजे. कायद्यातील तरतुदीनुसार एखादे सब कॉट्रॅक्ट दिले जाते त्यावेळी कॉट्रॅक्टरने आपल्या कामगारांना किमान वेतन दिले नाही तर महानगरपालिकेने ठेका दिला म्हणून ठेकेदाराला द्यावयाच्या बिलामधून कामगारांच्या वेतनाचे पैसे कापून ते कामगारांना दिले पाहिजेत. अशा प्रकारच्या कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये होत नाही. कोल्हापूर महानगरपालिका ही जर सरकारचाच एक भाग असेल तर ती कंत्राटदाराकडे काम करणाऱ्या कामगारांबाबत असलेली जबाबदारी कशी झटकू शकते? महानगरपालिकेकडून कंत्राट स्वीकारतांना कामगारांना किमान वेतन देणे, ग्रॅज्युईटी देणे वगैरे बाबी ठेकेदाराने म्हणजे रानकीनेच पहावयाच्या आहेत. जर त्या रानकी कंत्राटदाराला यामध्ये को-ऑर्डिनेट केले नाही तर तो कामगारांचे शोषण करीत राहील. अशाप्रकारे कॉट्रॅक्ट दिल्यानंतर जर सरकार आपली जबाबदारी झटकावयास लागले तर बाकीच्या लोकांकडून अपेक्षा धरण्याचे कोणतेही कारण नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. चंद्रकांत पाटील....

सभापती महोदया, आज महाराष्ट्रामध्ये गेल्या 20 वर्षापासून अंशकालीन कर्मचाऱ्यांचा प्रश्न अनुत्तरीत राहिला आहे. हे अंशकालीन कर्मचारी मफतलाल, टाटा किंवा रेमंडच्या मालकाने नेमले नाहीत तर सरकारने नेमले आहेत. त्यांना प्रतिदिन 200 रुपये मजूरी देऊन त्यांच्याकडून कामे करुन घेण्यात आली. अशा या अंशकालीन कर्मचाऱ्यांना कायम करावे म्हणून गेल्या 20 वर्षापासून ते झगडत आहेत. तेव्हा या अंशकालीन कर्मचाऱ्यांना आपण पहिल्यांदा कामावर घेऊन त्यांचे पगार नियमित केले पाहिजेत. मला आपल्याला असे विचारावयाचे आहे की, लोकांसाठी जो नियम आपण तयार केला आहे तो नियम सरकारलाही लागू आहे काय? सरकारच्या सेवेत असलेल्या असंघटित कामगारांसाठी हे सरकार काय करणार आहे? या सर्व गोष्टींचा आपण विचार करावा. माननीय सदस्यांनी मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे आज आपल्या राज्याचे महसुली उत्पन्न लक्षात घेतले तर आपण खूप काही गोष्टी करु शकतो. तेव्हा याबाबत सरकारने ज्यांचे कमी उत्पन्न आहे त्यांना किमान पाच गोष्टी दिल्या पाहिजेत. यामध्ये त्याला दोन वेळचे जेवण मिळाले पाहिजे, त्याला रहायला घर मिळाले पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील . . . .

त्याला अंगभर पुरणारा, त्याची लाज राखणारा कपडा मिळाला पाहिजे, चांगले आरोग्य आणि शिक्षण देखील मिळाले पाहिजे. तुम्ही या असंघटित कामगाराला कार्ड देऊन या सर्व आवश्यक गोष्टी द्यावयास सुरुवात केली पाहिजे. मग त्याला पैसे दिले नाही तरी तो मुद्दाच येणार नाही. जर त्याला दोन रुपये किलो प्रमाणे तांदूळ, गहू मिळाला आणि कोणत्याही हॉस्पिटलमध्ये गेल्यावर कार्ड दाखविल्यानंतर त्याला आरोग्याची सेवा उपलब्ध झाली, त्याच्या मुलांना मोफत शिक्षण मिळाले तर मग तुम्ही बाकी काही करु नका.

सभापती महोदय, मला असे वाटते की, महसुलाच्या बाबतीत चांगली परिस्थिती निर्माण झालेली असेल तर मग आपण असंघटित कामगाराला अशा प्रकारच्या सुविधा देऊ शकतो. मग बाकीच्या गोष्टी झाल्या नाहीत तरी चालतील. म्हणून सगळ्या प्रकारच्या असंघटित कामगारांचा विचार न करता केवळ ज्यांच्याकडे कौशल्य नाही आणि त्यामुळे त्यांना पुरेसे पैसे मिळत नाहीत अशा असंघटित कामगारांसाठी आपण काय करणार आहोत हा प्रश्न आहे. त्याच प्रमाणे स्पेसिफीकली सांगावयाचे तर ज्या कामगारांची फार मोठी चिंता करण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे, ज्यांच्याकडे पहावत देखील नाही अशा कचरा गोळा करणाऱ्या ज्या तरुण-तरुणी आहेत, त्यांच्यासाठी आपण काय करणार आहोत हा प्रश्न आहे. तसेच प्रामुख्याने आपण ज्याविषयी कायदा केला अशा घरेलू कामगारांसाठी गेल्या दोन वर्षामध्ये काय केले याचा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये उल्लेख करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

. . . .4एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सदस्य श्री.माणिकरावजी ठाकरे यांनी अतिशय चांगल्या विषयाला हात घातलेला आहे. खरे म्हणजे कामगार चळवळ ही देशामध्ये सुरु झाली असे म्हणण्याऐवजी ती महाराष्ट्र राज्यामध्ये सुरु झाली.कारण महाराष्ट्र राज्यात मुंबईमध्ये प्रथम उद्योगधंदे आले. तसेच कलकत्ता येथेही उद्योगधंदे आले. महाराष्ट्र राज्यामध्ये महात्मा फुले यांच्या विचारातून श्री.लोखंडे यांनी कामगार चळवळ सुरु केली. त्यावेळेला सकाळी गिरणी कामगार कामावर जावयाचा, तो रात्री 12-12 ,1-1 वाजेपर्यंत काम करीत असे.कधी-कधी तर तो तेथेच पायरीवर झोपत असे.त्यावेळी एवढी वाईट अवस्था होती. याच्या विरोधामध्ये लोकांना संघटित करुन बरेच कायदे करण्यात आले आणि त्यातून 8 तासाचे काम, आठवड्याला सुटी, वर्षातून काही अर्न-लिव्ह, बोनस, घरांची व्यवस्था, औषध-पाण्याची व्यवस्था या गोष्टी अंमलात आल्या.

सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण गेल्या इतक्या वर्षामध्ये जे मिळविले, त्याच्या उलटा प्रवास सुरु झालेला आहे. ग्लोबलायझेशनच्या नावाने सर्रासपणे इंडस्ट्रीशी संबंधित असलेले लोक कायदा मानावयासच तयार होत नाहीत. याठिकाणी माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत आणि त्यांना हे सर्व माहिती आहे. त्यावेळी कामगारांना संरक्षण देणारे, हक्क देणारे जे कायदे केले आहेत ते मोडीत काढण्याच्या दृष्टीने संबंधितांवर सतत प्रेशर येत असे. मात्र सदर कायदे चांगले करावेत यासाठी मुळीच प्रेशर नव्हते.कारण सतत अशी चर्चा असते की, कामगार काम करीत नाहीत, कामगार असे करतो, तसे करतो. संबंधित विभागाचे सचिव सुध्दा असेच बोलतात. पूर्वी मी कामगार मंत्री असताना कामगारांचे नेमके प्रश्न काय आहेत हे समजून घेण्यासाठी सर्व कामगार नेत्यांची एक बैठक घेतली होती. त्याठिकाणी उद्योग विभागाच्या सचिवांनी सांगितले की, चायना में मजदूर कैसे काम करता है? चायना मैंने मजदूर डॉरमेटरी में सोता है. मैंने सचिव को कहा कि आप को कुछ अक्ल है क्या? त्यावेळी मी मंत्री असल्यामुळे बोलू शकत होतो. मैं सचिव को बोला कि आप भी यहां मजदूर को डॉरमेटरी दो, आप क्यों नहीं देते ? याठिकाणी एका बैठकीच्या खोलीमध्ये आमचे 20-25 कामगार रहातात आणि पाळीपाळीने झोपतात. तुमच्या मनामध्ये कधी याचा विचार येतो काय ? सर्व बाबतीत सुरक्षित असलेले लोक हे असुरक्षित लोकांच्या आणि कामगारांच्या विरोधात सतत बोलत असतात.

सभापती महोदय, याठिकाणी सफाई कामगारांच्या बाबतीत चर्चा झाली. मुंबई महानगर पालिकेने सफाई कामगारांना हक्क द्यावेत म्हणून माननीय श्रीमती सोनियाजी गांधी यांनी माझ्याकडे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लोकांना पाठविले. श्री.अय्यर साहेबांनी मला निरोप दिला. लाल निशाणचे लोक होते. मग मी याबाबतीत काय करता येईल याबाबत त्या सर्वांच्या बरोबर चर्चा केली. मी मुंबई महानगरपालिकेला अनेक वेळा सांगितले. माझ्याकडे आयएएस अधिकारी आले आणि त्यांनी सांगितले की, कांट्रेक्ट पद्धति से ही काम होगा. मी विचारले की, ऐसा क्यों ? त्यावर त्यांनी सांगितले की, वे लोग काम नहीं करते. मग मी त्यांना विचारले की, आप लोग काम करते हो क्या ? याठिकाणी सगळे आय.ए.एस.अधिकारी दुपारी जेवणासाठी घरी जातात, वामकुक्षी घेतात आणि मग कार्यालयामध्ये येतात आणि लोक काम करीत नाहीत याबाबत बोलतात. माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांना हे पटलेच असेल की अधिकारी वर्ग कामच करीत नाही.

**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)**

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई ...

एखाद्या कामगार पुढाऱ्याने जर तक्रार केली की अमक्या अमक्या ठिकाणी असे असे चालले आहे किंवा फॅक्ट्री इन्स्पेक्टरला पत्र लिहिले तर फॅक्ट्री इन्स्पेक्टर एकदम खूश होतो. मिशीवर ताव मारतो. त्या मालकाकडून गाडी मागवतो. त्या ठिकाणी जाऊन बघतो आणि खिसे भरुन परत जातो. मी कामगार क्षेत्रामध्ये काम केले आहे. मला अनेक फॅक्ट्रीच्या मालकांनी सांगितले की, मेहरबानी करुन तुम्ही काही सांगू नका, तुमच्या काही तक्रारी असतील तर तुम्ही या, आपण बसून त्या तक्रारी सोडवू, तुम्ही तर आम्हाला सोडतच नाही. तो फॅक्ट्री इन्स्पेक्टर एकदम खिसे भरुन निघून जातो. हा भ्रष्टाचार कमी करण्याच्या दृष्टीने सुध्दा काहीतरी करावे. पूर्वी कामगार आयुक्त ही एक मोठी पोस्ट होती. आता ते आहेत की नाहीत हेच कळत नाही. कामगारांसाठी कामगार आयुक्तालयाची इमारत बांधणार होते त्याचे काय झाले ? ती इमारत झाली की नाही याची मला कल्पना नाही. इमारत बांधली असेल तर चांगली गोष्ट आहे. एकंदरीत हा जो उलटा प्रवास सुरु आहे तो ताबडतोबीने थांबविला पाहिजे. लोखंडे यांचे नाव घेऊन थांबविला पाहिजे. या महाराष्ट्रामध्ये कॉम्रेड डांगे झाले, आंबेकर झाले, बगाराम तुळपुळे झाले, जॉर्ज फर्नांडीस झाले, इसाक कुलकर्णी तसेच उषा मेहता झाल्या. अशा कित्येक लोकांनी कामे केलेली आहेत. त्यातून आपण जे काही मिळविले ते आता घालवायचे कसे या संबंधात सरकारच विचार करते, हे अतिशय चुकीचे आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप जे म्हणाले ते बरोबर आहे. हा महाराष्ट्र कोणी घडविला, ही मुंबई अंबानीने घडविली आहे का ? ही मुंबई ज्या कष्टकऱ्यांनी घडविलेली आहे त्यांची काय स्थिती आहे ? मी ज्या वेळी गिरणी कामगारांच्या गेटवर भाषण करीत असे त्या वेळी पावणेतीन लाख कामगार होते. बॅलन्स शीट सांगणार म्हटल्यानंतर खूप गर्दी व्हावयाची. छोट्याशा टेबलावर लोक दीड-दीड तास थांबलेले असावयाचे. तेथून उतरायचे कसे असा प्रश्न निर्माण व्हावयाचा. बॅलन्स शीट समजावून सांगावयाचे म्हटल्यानंतर सगळे लोक हजर राहावयाचे. कारण कामगार हा हुशार असतो. त्याचे हितसंबंध त्याला माहीत असतात. तो कामगार आज उद्ध्वस्त झालेला आहे. एक काळ असा होता की, त्यावेळी संघटित उद्योग होता. कॉम्पोझिट

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई ....

मिल्स होत्या. आता उलट झालेले आहे. आता चायनामध्ये अमुक बनते, तमक्या ठिकाणी तो पार्ट बनतो, अमक्या ठिकाणी अमुक पार्ट बनतो, त्याचे असेम्बलींग इकडे करा असे चालले आहे. उद्योगधंदा बदलला आहे, इंडस्ट्रीज बदलली आहे, हे मान्य आहे. त्या मानाने आपले कायदे सुध्दा बदलले पाहिजेत. कायदे बदलावयाचे असतील तर आपण अधिकाऱ्यांवर अवलंबून राहून चालणार नाही. कायदे कसे बदलावयाचे याचा आपण स्वत:च विचार केला पाहिजे. सन्माननीच सदस्य श्री. भाई जगताप यांनी जो उल्लेख केला त्याच्याशी मी पूर्ण सहमत आहे. संघटित उद्योगामध्ये 5-6 टक्के लोक आहेत. त्यांच्या युनियन्स फारच कमी आहेत. ते सुध्दा हल्ली बाहेरच्या लोकांना घ्यायला तयार नाहीत. कायदाच असा केला आहे की, बाहेरचे लोक युनियनमध्ये असता कामा नये. त्यांनीच युनियन करावी. त्या लोकांना खिशात घातले की त्यांचे काम झाले. बाहेरचा जो राजकीय नेता असतो तो खऱ्या अर्थाने नेतृत्व देत असतो. तो त्या ठिकाणी येऊ नये यासाठी सर्व खटाटोप केले जातात, हे अतिशय चुकीचे आहे.

कॉन्ट्रॅक्ट लेबरच्या संदर्भामध्ये कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट आहे. तो चांगला कायदा आहे. सन्माननीय सदस्यांनी त्याचा उल्लेख केला. जो मूळ मालक आहे त्याच्यावर सगळी जबाबदारी आहे. पण तो काहीही जबाबदारी घेत नाही. आता सगळ्या तऱ्हेचे आऊटसोर्सींग चालू आहे. बुध्दीचे सुध्दा चालू आहे. कोणाला काही करावयाचे नाही. प्रत्येक गोष्ट दुसऱ्यावर टाकावयाची आणि तिथून ती करुन घ्यावयाची आणि त्याने काय करावयाचे असेल ते करावे, असे सगळे चालले आहे. अमुक कारखाना अमक्या महिला संघटनेला बटना लावण्याचे काम देतो आणि आम्ही महिलांना काम देतो असे सांगितले जाते. तुम्ही त्यांना काम देता म्हणजे मालकाचे भले करता. त्यांचे काम तुम्ही कमी किमतीमध्ये करुन घेता. शोषणाची प्रक्रिया वेगवेगळ्या स्तरावर फार जबरदस्तपणे चाललेली आहे. यामध्ये सगळ्यात मोठी चूक जर कोणाची असेल तर ती सरकारी उद्योगांची आहे. सरकारी उद्योगच आता कॉन्ट्रॅक्ट लेबर आणावयास लागले आहेत. आपण शिक्षकाला महिन्याला 3 हजार रुपये देतो म्हणजे दिवसाला 98 रुपये पगार देतो. मग इतरांनी कशाला जास्त द्यावयाचे ? पगाराची बोली तीन हजार रुपयांपासून चालू होते. पुढे जर तो जास्त

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. हुसेन दलवाई ....

पगार मागावयास लागला तर त्याच्या ऐवजी दुसरा माणूस आणावयाचा असे केले जाते.. हे जर थांबवावयाचे असेल तर काही तरी ठोस उपाययोजना केली पाहिजे. आपण अंब्रेला लॉच्या संदर्भात बोललो होतो. तो कायदा झाला की नाही माहीत नाही. ते घरेलू कामगारांच्या पुरते मर्यादित ठेवण्याचे कारण नाही. जे लोक असंघटित उद्यागांमध्ये काम करतात, मग ड्रायव्हर असेल, रिक्शा चालक असेल,

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई....

बारमध्ये काम करणाऱ्या बारबाला असतील. डान्सबार बंद करून आमच्या गृह मंत्र्यांनी पुष्कळ प्रसिद्धी मिळवून घेतली. डान्सबार करून त्या मुली थोडेसे पैसे कमवित होत्या. आज त्या मुलींना त्याच बारच्या बाहेर वेश्या व्यवसाय करावा लागत आहे. यात कुठलाही विचार केलेला दिसत नाही. पश्चिम महाराष्ट्रातील श्रीमंत मुलगा येथे येऊन बार गर्लवर पैसे उडवतो म्हणून डान्स बार बंद करण्यात आले. हे केले ठीक आहे. पण त्या मुलींना पर्याय काय दिला ? तो शासनाने दिला नाही. अशा प्रकारे सर्वजण आपल्या पुरता विचार करीत आहेत. मालक आपल्या पुरता विचार करीत आहे. सगळेजण आपल्या पुरता विचार करीत आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : अध्यक्ष महाराज, माझी सन्माननीय सदस्यांच्या विधानाला हरकत आहे. माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी पूर्णपणे चुकीचे विधान केले आहे. तेथे चांगला व्यवसाय सुरू होता. बारबालांचे पोट भरत होते असे असताना हा व्यवसाय बंद केला अशा प्रकारच्या विधानावर माझी हरकत आहे. डान्सबारमध्ये जाऊन मध्यमवर्गीय आपला पगारच्या पगार उडवत होते. डान्सबारमुळे तरूण मुले आणि मध्यमवर्गीय कुटुंबे उद्‌ध्वस्त होत होती. त्यामुळे शासनाने घेतलेला तो निर्णय अगदी योग्य होता. तेव्हा सर्व महिलांनी त्याचे स्वागत केले होते. तो निर्णय श्री.हुसेन दलवाई यांच्या दृष्टीने चुकीचा असेल. पण तसा निर्णय घेतल्यामुळे सर्वसामान्य महिलांना अतिशय आनंद झालेला आहे. प्रसिद्धी मिळविण्यासाठी मंत्र्यांनी निर्णय घेतला हे सन्माननीय सदस्यांचे विधान चुकीचे आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, श्री.हुसेन दलवाई हे ज्येष्ठ सदस्य आहेत. ते चळवळीतून आलेले आहेत. श्री.आर.आर.पाटील यांनी जो निर्णय घेतला तो चांगला आहे व त्याला त्यांचा पाठिंबा आहे, असे त्यांना म्हणावयाचे होते असे मला वाटते.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, हा विषय नाही. मी माझे शब्द मागे घेतो. मी या विषयावर पुन्हा कधी तरी बोलेन. त्यावेळी नेमकी काय स्थिती आहे ती सांगेन.

**तालिका सभापती** : श्री.काळे साहेब आपल्याला काही अजून मत मांडावयाचे आहे काय ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे ते म्हणणे आपण रेकॉर्डवरून काढून टाकावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : तपासून बघून जे अनावश्यक असेल ते विधान काढून टाकण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी आपले विधान मागे घेतले आहे. त्यामुळे अनावश्यक असेल ते विधान काढून टाकण्यात येईल.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मी माझे विधान मागे घेतले आहे. या विषयावर माझी मुलगी पी.एचडी. करीत आहे. नंतर मी या विषयासंबंधी ताईंशी बोलेन. माथाडी कामगारांचा कायदा झाला.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई आता म्हणाले की, मी ताईंशी बोलेन. येथे मुस्कटदाबी करू नये.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मला डॉ.नीलम गोऱ्हे यांना विचारावयाचे आहे की, डान्सबारला त्यांचा विरोध आहे काय ?

**तालिका सभापती** : या विषयावर पडदा पडलेला आहे. हा विषय संपलेला आहे. श्री.हुसेन दलवाई आपण आपले भाषण सुरू करावे.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, आपण माथाडी कायदा केला. श्री.यशवंतराव चव्हाणांनी तो कायदा केला. हा कायदा नसता तर माथाडींची अवस्था अतिशय वाईट असती. आज माथाडी कामगार बऱ्यापैकी जीवन जगत आहे.

यानंतर श्री.खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई....

बऱ्याच ठिकाणी त्यांची घरे झालेली आहेत, त्यांच्यासाठी हॉस्पिटल्स आहेत. अशी व्यवस्था इतर क्षेत्रातील कामगारांसाठी झाली पाहिजे. हे कामगार असंघटित राहिलेले नाहीत. सगळा उद्योग असंघटित झालेला असताना त्यासंबंधी शासनाने काम केले पाहिजे.

सभापती महोदय, राज्यात कामगार कल्याण केंद्रे आहेत. या कामगार कल्याण केंद्राकडे असंघटित कामगारांचे रजिस्ट्रेशनचे काम दिले पाहिजे. दर महिन्याला त्यांच्या पगारातून पैसे काढले पाहिजेत. जो मालक असेल त्या मालकाने सुध्दा काही कॉन्ट्रिब्यूशन दिले पाहिजे. जेणे करुन त्याला सेवानिवृत्तीनंतर सन्मानाने जगता येईल. आज असंघटित उद्योगात काम करणारा जो कामगार आहे त्याला कसलाही सन्मान नाही. म्हणजे गिरणी कामगारांमध्ये जातू कामगार व बदली कामगार अशी पध्दत होती. त्या बदली कामगाराला सुध्दा संरक्षण होते. आज असंघटित उद्योगामध्ये जो काम करीत आहे त्यात कंत्राटी पध्दतीने कामगारांना घेतले जाते. ही पध्दत चुकीची आहे. मंत्री महोदयांनी छाती ठोकपणे सांगितले पाहिजे की, मी कामगार मंत्री म्हणून असे पर्यंत कंत्राटीचे कामगार असणार नाहीत. जे उद्योग असतील त्यांनी कामगारांना कायमचे कामावर घेतले पाहिजे. ही भूमिका धेतली तर मोठ्या प्रमाणात काम होईल. मला मंत्री महोदयांच्या मर्यादांबद्दलची माहिती आहे. कारण मी सुध्दा त्यातून गेलो आहे. तरी सुध्दा त्यांनी काही गोष्टींबाबत आग्रह धरला तर त्यात सुधारणा होऊ शकते. कारण कामगारांचे कायदे इतर कायद्याप्रमाणे नाहीत, हे कायदे सामाजिक आहेत. या विभागाने चांगले काम केले तर कामगारांना न्याय मिळवून देता येतो, ब-याच ठिकाणचे संप मिटविता येतात. अनेक कामगारांना बरेच काही मिळवून देता येते. ते मिळवून देण्याच्या दृष्टीने विभागाने काम केले पाहिजे.

सभापती महोदय, मी एकच उदाहरण देऊन माझे भाषण संपविणार आहे. एका फाईव्ह स्टार हॉटेलमधील कामगार त्यांचा प्रश्न घेऊन माझ्याकडे आले होते. हॉटेल मालकाने त्या कामगारांना बेकायदेशीररित्या कामावरुन काढून टाकले होते. त्यामुळे मी त्या हॉटेल मालकाशी चर्चा करतो असे त्या कामगारांना म्हटले होते. त्या संदर्भात मी हॉटेल मालकाबरोबर 3 वेळा बैठक बोलविली होती. परंतु एकाही बैठकीला तो आला नाही. त्यानंतर मी स्वत: पुण्याला गेलो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.हुसेन दलवाई....

येण्याचे कबूल केल्यावर मी पुणे येथे एक बैठक ठरविली. त्या बैठकीला सुध्दा तो आला नाही. त्यानंतर मी पुण्याच्या पोलीस आयुक्तांना फोन करुन सांगितले की, मी एक मंत्री आहे. हॉटेल मालक मी बोलविलेल्या बैठकीला येत नाही, त्यामुळे मी हा माझा अपमान समजतो. आपण एका डीसीपींना त्याच्याकडे पाठवून त्या मालकाला जीपमध्ये घालून आणावे असे सांगितले होते. त्या मालकाला त्यांनी जीपमध्ये घालून आणल्यावर त्याला भयंकर राग आला. त्याने मोठा गोंधळ घातला. त्याला मी सांगितले की, तुम्हाला हे करावे लागेल. त्याप्रमाणे त्याने केले होते. त्यामुळे त्या कामगारांना न्याय मिळवून देण्याचे काम माझ्याकडून झाले. मनात आणले तर करता येते, परंतु त्याला सुध्दा मर्यादा आहेत. शेवटी कायद्याने करता येते, ते वैयक्तिकरित्या करता येत नाही. सर्व कायदे धाब्यावर बसविण्याऐवजी किंवा ते रद्द करण्याऐवजी प्रचलित कायद्यात सुधारणा कशी करता येईल याचा शासनाने जरुर विचार करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, राज्यात असंघटित कामगार किती आहेत, त्यांचे या राज्यात योगदान किती आहे, सन 2008 मध्ये केंद्र सरकारने असंघटित कामगारांसाठी कोणता कायदा केला त्या अनुषंगाने राज्यामध्ये किती अंमलबजावणी झाली, या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली असती तर या कामगारांना काय काय फायदे मिळाले असते, या कामगारांनी किती मोर्चे काढले, त्यांच्या शिष्टमंडळांना माननीय कामगार मंत्री असतील किंवा माननीय मुख्यमंत्री असतील त्यांनी कोणकोणती आश्वासने दिली अशा अनेक गोष्टींबाबत चर्चा झाली आहे, यापूर्वीही झालेली आहे. आज जग कोणत्या शतकात आहे. जगाची कोणत्या स्तरावर स्पर्धा गेली आहे, परंतु आपण हा चांगला विषय आहे असे म्हणून येथे चर्चा करीत आहोत मला वाटते की, हीच चिंतेची बाब आहे. यावरुन कामगारांबाबत शासन किती उदासीन आहे ते दिसून येते.

सभापती महोदय, या असंघटित कामगारांनी नुकताच 16 मार्च रोजी एक मोर्चा काढला होता. त्यांच्या शिष्टमंडळाला माननीय मुख्यमंत्र्यांनी या कामगार कल्याण मंडळाची स्थापना करुन या अधिवेशनामध्ये त्याची अंमलबजावणी केली जाईल असे आश्वासन दिलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंवतराव जाधव...

मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, आदरणीय मुख्यमंत्र्यांनी 16 मार्च रोजी जे काही आश्वासन दिलेले आहे त्याची अंमलबजावणी हे शासन करणार आहे की नाही ? या कामगारांसाठी कल्याण मंडळ स्थापन करणार असे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले आहे. हे कल्याण मंडळ स्थापन करीत असताना या कल्याण मंडळाला आपण किती अधिकार देणार आहात, या कल्याण मंडळाच्या स्थापनेमुळे कामगारांना कोणकोणते लाभ मिळणार आहेत ? असंघटित कामगारांच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळे मुद्दे मांडलेले आहेत. 1996मध्ये इमारत व बांधकामासंबंधीचा कायदा करण्यात आला. इतकी वर्षे उलटल्यानंतरही त्या कायद्याची अंमलबजावणी आपण करीत नाही ही खरोखरच शरमेची बाब आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाली असती तर या क्षेत्रामध्ये काम करणा-या कामगारांना विम्याची काही तरी रक्कम मिळाली असती, त्यांना किमान वेतन मिळाले असते, त्यांच्या वेतनातून काही रक्कम पेन्शनसाठी वर्ग केली असती तर त्यांना पेन्शन देखील मिळाली असती. परंतु या पैकी कोणतीही गोष्ट होऊ शकलेली नाही. शासन याबाबतीत निरुत्तर आहे. ज्या काही गोष्टी करायला पाहिजेत त्या वेळीच करणे आवश्यक असते. पाण्याचे वेळीच नियोजन केले तरच आपल्याला पाणी मिळू शकते. जेव्हा पाणी अडवायला पाहिजे तेव्हा ते अडविले जात नाही आणि नंतर ते कशा पध्दतीने अडवायला पाहिजे यावर मात्र आपण चर्चा करीत असतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे काही लोक कचरा वेचून आपला उदरनिर्वाह करतात. या कचरा वेचणा-या भागाकडे इंडस्ट्री म्हणून बघितले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना स्वागतार्ह आहे.

सभापती महोदय, आज आपल्या राज्यामध्ये साखर कारखानदारी फार मोठ्या प्रमाणावर आहे. साखर कारखानदारी हा फार मोठा उद्योग आहे. गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रातील राजकारण हे या साखर कारखान्यांच्या अवतीभोवतीच फिरत आहे. या साखर कारखान्यांच्या माध्यमातून अनेक महानुभवांनी राजकारण केलेले आहे. ऊसतोड कामगार जेव्हा ऊस तोडतात त्याच वेळी या साखर कारखान्यांना ऊस उपलब्ध होतो. असे असताना या साखर कारखान्यांनी या ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची, त्यांच्या राहाण्याची कोणेतीही सोय केलेली नाही





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव...

किंबहुना तसे करण्यासाठी शासनाने देखील या साखर कारखान्यांवर काही निर्बंध घातले नाहीत. आज हे ऊसतोड कामगार कोठे तरी पाल टाकून राहातात, कसा तरी आपला उदरनिर्वाह करतात, ऊसतोडीचे काम संपले की दुसरीकडे कामासाठी निघून जातात.

या ठिकाणी घरेलू कामगारांचा विषय मांडण्यात आला. या घरेलू कामगारांच्या बाबतीत आपण स्वत:पासूनच सुरुवात करु या. आपण आपल्या गाडीच्या ड्रायव्हरचा हेल्थ इन्शुरन्स भरतो का, घरात काम करणा-या बाईसाठी काही करतो का, तिचे आरोग्य चांगले रहावे म्हणून काही करतो का ? अशीही काही कुटुंब आहेत की, जर ती बाई आजारपणामुळे तीन-चार दिवस कामावर येऊ शकली नाही तर तिचा तेवढया दिवसांचा पगार देखील कापून घेतला जातो. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितले की, हे असंघटित कामगार, घरकाम करणारे कामगार दोन चार दिवस सुट्टीवर गेले तर काय होईल ? खरे म्हणजे हे कामगार सुट्टीवर जाऊच शकत नाहीत. कारण त्यांनी सकाळी काम केले नाही तर संध्याकाळी त्यांच्या घरची चूल पेटू शकणार नाही. त्यामुळे हे कामगार सुट्टीवर जाण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. या विषयावर चर्चा होत असताना मिनिमम वेजेस कायद्याचा उल्लेख करण्यात आला. आज जे कामगार ठेकेदाराकडे काम करीत आहेत त्यांची तर फार दयनीय अशी परिस्थिती आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत जाधव...

त्या कामगारांच्या व्हावचरवर सहया करुन घेतल्या जातात. त्या कामगारास प्रतिदिन 100 रुपये पगार असेल तर, 100 रुपयांच्या व्हावचरवर सही घेऊन, त्या कामगारांच्या हातात फक्त 70 रुपये एवढाच पगार ठेवला जातो. अशा परिस्थितीमध्ये आज असंघटित कामगार काम करीत आहेत. त्या कामगारांना न्याय मागण्यासाठी कोठेही जागा नाही. ते कामगार न्याय मागण्यासाठी गेले तर त्यांना कामावरुन कमी केले जाते, अशी त्यांची परिस्थिती आहे.

सभापती महोदय,ऊस तोड कामगार, पॉवर लूममध्ये काम करणारे कामगार यांचे कुटुंब हे पिढयानुपिढया कामगार म्हणून काम करीत आहेत. कामगार आणि मजूर यांची व्याख्या ठरविण्याची गरज निर्माण झालेली आहे. कामगार आणि मजूर यांच्यातील फरक काय आहे हे शासनाला ठरवावे लागेल. एखाद्या ऊस तोड कामगारांचा मुलगा डॉक्टर झाला, इंजिनिअर झाला हे अपवादाने आपल्याला बघावयास मिळते. ज्याचे वडील ऊस तोड कामगार होते, त्याचे आजोबा ऊस तोड कामगार होते, आता सुध्दा त्याचा मुलगा ऊस तोड कामगार म्हणूनच काम करीत आहे. यांच्यामध्ये अवेअरनेस निर्माण करण्याची गरज आहे असे मला वाटते. शिक्षणाची महिती जी आहे, ती त्यांच्यात चांगल्या प्रकारे निर्माण करावी लागेल.

सभापती महोदया, सर्वात महत्वाचा विषय मला असा वाटतो की, कुटुंब नियोजनाचे ज्ञान त्यांना देणे गरजेचे आहे. त्यांच्या कुटुंबात चार,चार, पाच,पाच मुले आहेत. एका मुलाचे पालन पोषण करण्याची आर्थिक क्षमता नसताना फक्त अज्ञानामुळे या कुटुंबाच्या संख्येत वाढ होत आहे.पर्यायाने असंघटित कामगार आणि मजूर वाढत चालले आहेत. या कामगारांना शासनाच्या योजनेचा लाभ देतांना कुटुंब नियोजनाच्या बाबतीत काही गोष्टी करुन घेतल्या तर माझ्या मते ही एक अतिशय चांगली गोष्ट होईल.

सभापती महोदय, मी नाशिक महानगरपालिकेतील एक मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. माननीय नामदार श्री. भुजबळ साहेब हे उप मुख्यमंत्री असताना नाशिक महानगरपालिकेमध्ये 1266 रोजंदारी कामगारांना कायम केले. राज्य शासनाच्या एकाच आदेशानुसार 1266 रोजंदारी कामगार कायम होण्याची राज्यात एकमेव गोष्ट आहे. 1266 कामगार कायम झाले, त्यावेळी तेथील चार कामगार अपघाताने गैरहजर होते. इलेक्ट्रीकच्या पोलवर काम करीत असताना खाली पडला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 19:00

श्री.जयंत जाधव...

त्यामुळे त्याचा पाय फॅक्चर झाला होता, त्यामुळे तो रुग्णालयात दाखल झालेला होता. दोन कर्मचारी गार्डनमध्ये काम करीत होते, त्यामधील एका कर्मचाऱ्याला साप चावला होता, व दुसऱ्यास फावडा लागल्याने त्याचा हात तुटला होता. अजून एक कर्मचारी देखील अशाच अवस्थेतील होता. रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्याची प्रोसेस चालू होती, त्या दरम्यान गैरहजर होते. म्हणून ते कर्मचारी कायम होऊ शकले नाही. या संदर्भात महानगरपालिका प्रशासनाकडे मागणी केली. महानगरपालिकेने एक फाईल तयार करुन ती राज्य शासनाकडे पाठवून दिली. राज्य शासनाने ती फाईल पुन्हा नाशिक महानगरपालिका प्रशासनाकडे पाठविली व नमूद केले की, आपण आपल्या स्तरावर उचित निर्णय घ्यावा. या संदर्भात माननीय मंत्री महोदयांकडे विचारणा केली, त्यावेळी महानगरपालिका प्रशासनाने लिहून दिले की, आमच्याकडून अनावधानाने हे चार कर्मचारी कायम करण्याचे राहून गेले आहेत. गेल्या आठ वर्षापासून मंत्रालय स्तरावर अनेक वेळा चर्चा होऊन सुध्दा अजून पर्यंत सदर कर्मचारी कायम होऊ शकले नाही. तर असंघटित कामगारांचे काय होत असेल याची कल्पना करणे कठीण आहे. या संदर्भात अतिशय गंभीर पावले उचलून या कामगारांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

------------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.माणिकरावजी ठाकरे यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मालक आणि नोकर यामधील संबंध, यामधील नाते ठरविण्यासाठी कोणता दृष्टीकोन आपण स्वीकारला पाहिजे यावर या विषयाचे खरे आकलन होऊ शकेल. जर आपण भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या आधारे आपल्या दृष्टीकोनाची दिशा ठरविणार असू तर अन्याय, अत्याचार आणि छळ हे त्याचेच अपत्य असल्यामुळे ते भोगावे लागणारच आहे. कामगार हा माणूस आहे. तो गुलाम नाही, वेठबिगार नाही. त्याला स्वतंत्र भारतामध्ये जीवन जगण्याचा हक्क आहे. त्याच्याजवळ जीवन जगण्यासाठी शारीरिक श्रमाशिवाय दुसरे काही नाही. म्हणून तो श्रम विकतो आणि ज्याच्याजवळ विकत घेण्याची आर्थिक शक्ती आहे तो ते विकत घेतो, त्याचे शोषण करतो. सरकारचे पालक म्हणून याकडे लक्ष असले पाहिजे की, त्या कामगाराला संरक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी कायदे केले पाहिजेत. त्याच्या कामाचे स्वरुप पाहून कायद्याची निर्मिती करणे आणि त्या कायद्याची अंमलबजावणी करणे हे सरकारचे काम आहे. संघटित कामगारांनी संघर्ष केला म्हणून जगामध्ये त्याला चांगले दिवस पहावयास मिळाले. असंघटित कामगार संघर्ष करु शकला नाही म्हणून त्याची आजची दुरवस्था गाई-म्हशी, जनावरांपेक्षा वाईट आहे. ही स्थिती बदलावयाची असेल तर सरकारला पालकत्वाची खरी भूमिका पार पाडावी लागेल. त्यासाठी सर्वंकष कायदे तयार करण्याचे धोरण स्वीकारुन त्या दृष्टीने व्यवस्था करावी लागेल, कायद्याची रचना करावी लागेल. माझी नम्र विनंती आहे की, असंघटित कामगारांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार कसा देता येईल या विचाराने हा विषय सोडवावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

---------

नंतर हिंदी भाषण.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यु. जमा : ( विधान सभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, विधान परिषद नियम 260 के अंतर्गत माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे तथा श्री हेमेंत टकले जी ने असंगठित मजदूरों के बारे में जो चर्चा यहां पर रखी है उस पर विचार रखने के लिए आपने मुझे समय दिया, इसके लिए सब से पहले मैं आपको धन्यवाद देना चाहूंगा. अपने विचार रखते समय एक बात मैं यहां पर यह जरुर कहना चाहूंगा कि इस विषय पर बोलने के लिए मैंने अपना नाम काफी पहले दिया था, लेकिन बोलने का मौका मुझे सबसे आखिर में मिला है. ऐसा होना ठीक नहीं है, यह बात बहुत ही नम्रता पूर्वक मैं आपके ध्यान में लाना चाहता हूं.

सभापति महोदय, अनेक माननीय सदस्यों ने बहुत अच्छे सुझाव यहां पर दिए हैं, मुझे किसी से कोई शिकायत नहीं है. इस विषय पर चर्चा करते समय मैं यहां पर यह जरुर कहना चाहूंगा कि हम यहां पर संगठित मजदूरों की चर्चा ज्यादा कर रहे हैं. जबकि यह विषय उन मजदूरों से संबंधित है जो बिल्कुल असंगठित हैं, असुरक्षित हैं और जिनको किसी प्रकार का कोई प्रोटेक्शन सरकार की ओर से प्राप्त नहीं है.

हम सभी जानते हैं कि महाराष्ट्र में बहुत सारे कानून पहले से ही बने हुए हैं और श्रमिकों से संबंधित ये सभी अच्छे कानून सन् 1990-1995 से पहले बनाए गए हैं. हमारे यहां पर अंग्रेजी में एलपीजी शब्द बहुत प्रचलित है यानी लिब्रलाइजेशन, प्राइवेटाइजेशन एण्ड ग्लोबलाइजेशन.

सभापति महोदय, मैं पिछले 38 सालों से ट्रेड यूनियन का काम कर रहा हूं. मैं मजदूर संगठनों को महाराष्ट्र में ही डील कर रहा हूं. मैं खुद भी कामगार था, मैं खुद कोयला मजदूर था. यहां पर एक माननीय सदस्य बता रहे थे कि वे खुद भी श्रम मंत्री थे. मैंने ट्रेड यूनियन के अपने कई साथियों को महाराष्ट्र में श्रम मंत्री बनते हुए देखा है. मुझे यह मालूम है कि हमारे वर्तमान श्रम मंत्री ट्रेड यूनियन से संबंध नहीं रखते हैं. लेकिन इनसे पहले बहुत सारे ट्रेड यूनियन के लीडर हमारे महाराष्ट्र राज्य में श्रम मंत्री बन चुके हैं और श्रम मंत्री बनने के बाद हमारे सभी मंत्री हमारी शासकीय और प्रशासकीय व्यवस्था के शिकार हो जाते हैं. हमारे एक साथी गाणार साहब ने कहा कि दृष्टिकोण बदलने की जरुरत है. 1990-91 के बाद जब नई आर्थिक नीति आयी तो हमारे जैसे ट्रेड यूनियन कार्यकर्ता या जो कार्यकर्ता इंटक से जुड़े थे, उन सभी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा...

को ऐसा लग रहा था कि अब मजदूरों का शोषण होगा, मजदूर बेकार होंगे. उद्योग धंधे बंद होंगे. इसीलिए केंद्र सरकार ने समय-समय पर बहुत सारी अच्छी योजनाएं और कानून बनाए. सरकार ने समय-समय पर मजदूरों को संरक्षण देने का काम किया. मैं अपनी पार्टी की सरकार की ही बात नहीं कर रहा, बल्कि केंद्र में किसी भी पार्टी की सरकार रही हो, सभी ने मजदूरों को प्रोटेक्शन दिया. उन्होंने इस बात पर ध्यान दिया कि यह जो आर्थिक बदलाव आ रहा है उसकी वजह से मजदूर वर्ग इसका शिकार न होने पाये. इसलिए सरकार ने मानवीय दृष्टिकोण रखते हुए मजदूरों का बचाव करना चाहा. लेकिन दुर्भाग्य की बात यह है कि 1995 के बाद से, जब से हमारी मिली जुिली सरकार बनी है, मैं दावे के साथ कह सकता हूं कि सरकार का सबसे कम ध्यान श्रम मंत्रालय की तरफ ही है. महाराष्ट्र सरकार का सबसे उपेक्षित विभाग यदि कोई है तो वह श्रम विभाग ही है.यह बात मैं कामगार प्रतिनिधि होने के नाते कह रहा हूं. यह बात मैं यहां पर आंकड़े बताकर सिद्ध कर सकता हूं . लेकिन आंकड़े देकर मैं सभागृह का समय लेना नहीं चाहता. मैं पूरी जानकारी दे सकता हूं कि श्रम मंत्रालय को कितना बजट या फंड मिलता है. मैं यह भी बता सकता हूं कि इस विभाग में कितने कर्मचारी और कितने अधिकारी हैं, इस विभाग में कितने कार्यालय हैं और वहां पर काम करने वाले लोगों का दृष्टिकोण कैसा है. यह सब जानकारी मैं आपको यहां पर दे सकता हूं. उस विभाग में होने वाले भ्रष्टाचार की बात मैं यहां पर करना नहीं चाहता. लेकिन मैं यहां पर सिर्फ इतना ही बताना चाहता हूं कि सब से कम महत्व हमारे श्रम विभाग को ही दिया जाता है.

श्रम विभाग से संबंधित चाहे केंद्र के कानून हों या राज्य सरकार के कानून हों ये सभी कानून 1995 से पहले ही बनाए गए हैं. यहां पर हमारे एक साथी श्रम वेल्फेयर बोर्ड की बात कर रहे थे. सन् 1953 में हमारी सरकार ने लेबर वेल्फेयर फंड एक्ट बनाया. शॉप इस्टेब्लिशमेंट एक्ट के अंतर्गत या दूसरी जगह पर फैक्ट्री एक्ट के अंदर हमारे जो कामगार काम करते हैं, उनका कल्याण करने, उनके लिए साधन जुटाने के लिए ये कानून बनाए गए हैं. लेकिन ये सारे कानून रहने के बाद भी हमारा श्रम विभाग बहुत उपेक्षित है, हमारे पास न तो स्टाफ है और न ही फंड है और न ही दूसरे साधन हैं. यही वजह है कि लेबर लॉ का इम्पलीमेंटेशन अच्छी तरह

..4 पी - 1

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा...

से नहीं हो पाता है. जबकि महाराष्ट्र शासन और केंद्र शासन द्वारा बनाए गए कानूनों की एक बहुत बड़ी लिस्ट हमारे यहां पर है.

मैं यहां पर कहना चाहूंगा कि हमारे श्रम मंत्री महोदय बहुत ही एक्टिव, सक्षम और असरदार हैं. भगवान की कृपा से शारीरिक रुप से भी वह बहुत वजनदार हैं. इसलिए मुझे पूरी उम्मीद है कि अब हमारे श्रम विभाग को सरकार के अंदर ज्यादा वजन जरुर मिलेगा.

सरकार से अच्छे काम की उम्मीद मुझे इसलिए भी है क्योंकि हमारे वर्तमान मुख्यमंत्री महोदय ने माननीय प्रधानमंत्री और माननीय सोनिया जी के साथ काम किया है. इसलिए उनको काम करने का बहुत तजुर्बा है. उनको मालूम है कि केंद्र सरकार की ऐसी नीति ही है कि यदि हमारी फैक्ट्री बंद होती है और हमारे मजदूर बेरोजगार होते हैं तो सरकार की ओर से उनको राहत दी जाए, उनको संरक्षण दिया जाये.

यहां पर हमारे बहुत से माननीय सदस्यों ने भी कहा और मैं भी कहना चाहूंगा कि आप एक सर्वे कराकर यह पता लगाएं कि हमारे यहां पर कितने असंगठित मजदूर हैं और वे कहां-कहां पर हैं. मैं बताना चाहूंगा कि असंगठित मजदूरों से संबंधित केंद्र सरकार का एक बिल पेंडिंग पड़ा है. वह बिल सदन में न आने का एक कारण यह भी है कि यदि ज्यादा पैसों की जरुरत पड़ी तो उसके लिए फंड कहां से आएगा. उस बारे में सरकार अलग-अलग तरीके से विचार कर रही है. मुझे लगता है कि उस बिल की एक कॉपी महाराष्ट्र सरकार के पास जरुर आई होगी. असंगठित मजदूर कौन से हैं, कौन से प्राइवेट सेक्टर या दूसरे सेक्टर में असंगठित मजदूर हैं, उस बारे में महाराष्ट्र राज्य में एक सर्वे किया जाना चाहिए.

नयी आर्थिक नीति के कारण हमारे बहुत से लघु तथा मध्यम स्तर के उद्योग धंधे बंद हो गए. जिसकी वजह से बहुत सारे मजदूर बेरोजगार हो गए. इसलिए सवाल यह उठता है कि जो मजदूर पहले वहां काम करते थे उनको अब आप संगठित श्रेणी में रखेंगे या असंगठित श्रेणी में रखेंगे. उस बारे में आपको विचार करना चाहिए. क्योंकि वे भी तो अब बेरोजगार हो गए

...4 पी-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ DD पूर्वी श्री. भोगले...... 19:10

श्री जमा...

हैं.हमारी एक महिला माननीय सदस्या कह रही थीं कि असंगठित लोगों को बीपीएल का कार्ड मिलना चाहिए. मैं महाराष्ट्र सरकार और केंद्र सरकार से जानना चाहता हूं कि असंगठित क्षेत्र में काम करने वाले कैसे भी मजदूर हों. उनकी पूरी लिस्ट मेरे पास है. चाहे वे बीडी मजदूर हों, ठिया मजदूर हों, नौकरानी हो, भिखारी हो, शेतकरी हो, बाल मजदूर हो, महिला हो या पुरुष हो, मुझे पूछना है कि यदि असंगठित मजदूर को बीपीएल का कार्ड नहीं मिला है तो फिर वह कार्ड किसको मिला है. हमारा जो ग्रामीण मजदूर है उसको भी आप देख लीजिए कि उसका एक साल का कितना पगार होता है. मुझे पूछना है कि वह ग्रामीण मजदूर बीपीएल श्रेणी में आएगा या नहीं आएगा ? इसलिए यदि मजदूरों को बीपीएल का कार्ड नहीं मिला तो फिर यह बीपीएल का कार्ड किसको दिया गया है. समाज में ऐसा कौन सा वर्ग है जो इस असंगठित कामगार से भी नीचे के वर्ग में आता है, या इन मजदूरों से भी गरीब है या इनसे भी पिछड़ा हुआ है ? इसलिए इस बारे में सर्वे करना जरुरी है. यह भी सर्वे करना चाहिए कि आखिर ये बीपीएल कार्ड किसको दिए गए हैं.

हमारा कहना है कि इस बारे में हम सब को लड़ाई लड़नी पड़ेगी. हमारा इस साल का तो बजट पेश हो चुका है. लेकिन आने वाले वर्षों में श्रम विभाग को ज्यादा से ज्यादा फंड मिल सके इसके लिए हमको लड़ाई लड़नी पड़ेगी. मेरा यह भी सुझाव रहेगा कि युवकों को और जो प्रोफेशनल नवयुवक हैं उनको इस डिपार्टमेंट में भर्ती किया जाए.

मैंने पहले भी कहा कि हमारे यहां पर नागपुर में एडीशनल लेबर कमीशनर की पोस्ट सन् 2004 से खाली पड़ी है. असिस्टेंट लेंबर कमीशनर भी वहां पर नहीं है.मैंने लेबर डिपार्टमेंट से संबंधित एक-एक अधिकारी के काम का सर्वे किया है. हमारे पूर्व मंत्री भ्रष्टाचार के बारे में यहां पर बता रहे थे. वह बात वैसे भी सब को मालूम है. लेकिन मुश्किल यह है कि हम यहां की व्यवस्था के शिकार हो जाते हैं, जिसकी वजह से उस विभाग की कमियों को हम सुधार नहीं पाते हैं. मेरा सुझाव है कि आपको नयी भर्ती करनी होंगी और नये प्रोफेशनल युवक आपको इस विभाग में भर्ती करने होंगे. अच्छे पढ़े-लिखे लोगों को इस डिपार्टमेंट में भर्ती करना पड़ेगा. आज हालत यह है कि यदि आप कोई सर्वे करना चाहे तो सर्वे करने के लिए आपके पास स्टाफ नहीं

4पी- 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा...

है. जो स्टाफ आपके पास है यदि आपने उनको कोई सर्वे करने के लिए कहा तो वे लोग मजबूरी में थोड़ी-बहुत खानापूर्ति करके आपको दे देंगे.

एक बात मैं यहां पर यह कहना चाहूंगा कि 2002-03 से केंद्र सरकार महाराष्ट्र सरकार को लिख रही है कि हमने बिल्डिंग एण्ड कंस्ट्रक्शन लेबर का बिल पास किया है. उसके अंतर्गत आप एक बोर्ड बनाईए. मैं दावे के साथ कह सकता हं कि सन् 1996 से अब तक हमने 100 करोड़ रुपए से ज्यादा का सेस जमा कर लिया है. लेकिन हमारा अभी तक वह बोर्ड नहीं बना है. मुझे समझ नहीं आता कि महाराष्ट्र सरकार यह बोर्ड क्यों नहीं बना सकती है. यह बोर्ड क्या हम इसलिए नहीं बना सकते, क्यांकि बिल्डरों का दबाव हमारे ऊपर है, क्या वे लोग हमको बोर्ड नहीं बनाने देते हैं, मुझे पूछना है कि कंस्ट्रक्शन वर्कर्स का बोर्ड हमारे यहां पर क्यों नही बन पा रहा है ? दिनांक 29-6-2009 को पिछले मुख्य मंत्री महोदय के साथ हमारी एक मीटिंग हुई थी. उसके बाद दूसरी मीटिंग भी हुई थी, जिसका जिक्र हमारे माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे साहब ने भी किया है.

यहां पर बहुत सारे माननीय सदस्यों ने भी कहा और मैं भी कहना चाहता हूं कि सर्वे करने के बाद असंगठित मजदूरों को संरक्षण देने के बारे में एक कानून आपको बनाना पड़ेगा और वह सर्वे करने से पहले आपको एक कुशल प्रशासन तैयार करना पड़ेगा. ताकि वह कानून लागू हो सके. मुझे मालूम है कि डॉ. रुपा कुलकर्णी जी ने सन् 1980 से प्रयत्न किया और तब कहीं जाकर सन् 2008 में हमने नौकरानियों से संबंधित एक कानून यहां पर बनाया है. लेकिन वह कानून हमारे महाराष्ट्र में लागू ही नहीं हो पाया है. घरेलू नौकरानी को हफ्ते में एक बार छुटटी नहीं मिलती है, यदि वे गर्भवती हो गयीं तो भी उनको छुटटी नहीं मिल पाती है. किसी भी तरह की सुविधा उनको नहीं मिलती है.

अनेक माननीय सदस्य बोलते हैं कि जमा साहब आप नौकरानी रखकर देखिए, आपको पैसा देना पड़ेगा तो आपको मालूम पड़ेगा. हमारे यहां पर बहुत सारे बोर्ड हैं, नौकरानियों के लिए बोर्ड हैं, दूसरे भी बोर्ड हैं लेकिन आज आप बीड़ी मजदूरों की हालत ही देख लीजिए. इसलिए इन सब चीजों का सर्वे करके एक अभिनव कानून बनाने की कोशिश आप करें. मैं ट्रेड यूनियन का

4 पी- -4

कार्यकर्ता हू. मैं आपको विश्वास दिलाता हूं कि सरकार के प्रति मजदूरों में आज बहुत असंतोष है.

आप सभी जानते हैं कि सामाजिक कार्यकर्ता माननीय अण्णा हजारे जी सभी लोगों की राय लेकर आज दिल्ली में धरना देकर बैठे हैं. सरकार को लगता है कि यदि हम लेबर को संरक्षण देंगे तो हमारा एफडीआय नहीं आएगा, या इन्वेस्टमेंट नहीं आएगा. अच्छा इन्वेस्टमेंट लाने के लिए मजदूरों का शोषण करना पड़ेगा. लेकिन मैं बताना चाहता हूं कि मजदूरों की सहन शक्ति अब खत्म हो गयी है. जनता में और मजदूरों में बहुत रोष है. इसलिए मैं कहना चाहता हूं कि इस बारे में या तो मुख्यमंत्री महोदय के लेवल पर एक मीटिंग बुलाईए या ट्रेड यूनियन में काम करने वाले लोग तथा सामाजिक कार्यकर्ताओं की एक बैठक बुलायी जानी चाहिए ताकि मजदूरों की समस्या हल करके मजदूरों की नाराजी कम की जा सके.

हमारे यहां पर पहले लेबर एडवाइजरी कमेटी थी लेकिन अब वह नहीं है. सरकार की ओर से लेबर सोसायटी बनाकर उन सोसायटीज को सरकारी काम देने की व्यवस्था भी की जाती थी, वह व्यवस्था भी अब खत्म हो गयी है. इन सब पुरानी बातों पर फिर से ध्यान देना चाहिए.

यह बात सही है कि असंगठित मजदूरों के पास मनोरंजन का दूसरा कोई साधन न होने की वजह से उनके अंदर ज्यादा व्यसन पाये जाते हैं. व्यसन मुक्ति का एक बड़ा कार्यक्रम भी हमारे यहां पर चल रहा है और व्यसन से उनको मुक्ति भी दिलाई जा सकती है. लेकिन मैं कहूंगा कि उनको संगठित करने की भी आज बहुत जरुरत है. सरकार इस दिशा में जरुर प्रयत्न करेगी, ऐसी मुझे उम्मीद है. इतना कह कर ही मैं अपनी बात समाप्त करता हूं. धन्यवाद.

-0-

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे साहेबांनी अतिशय दुर्लक्षित, उपेक्षित घटकांना न्याय देण्यासाठी हा प्रस्ताव सभागृहामध्ये मांडून गरीब माणसांचे प्रश्न या ठिकाणी उमटविले आहेत.

सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेमध्ये जवळ जवळ 15 सदस्यांनी भाग घेत असतांना माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य सर्वश्री.किरण पावसकर, भगवानराव साळुंखे, भाई जगताप,संजय केळकर, रमेश शेंडगे, चंद्रकांत पाटील, हुसेन दलवाई, जयवंत जाधव, एस.क्यू जमा, नागो गाणार आणि माननीय सदस्या सर्वश्रीमती अलका देसाई, विद्या चव्हाण यांनी उपयुक्त सूचना केल्या आहेत. या असंघटित कामगारांबाबत शासनाने काय केले पाहिजे या बाबत त्यांनी अतिशय चांगले प्रश्न मांडले व व्यथा आपल्यासमोर मांडल्या आहेत. सभापती महोदय, कामगार मंत्री झाल्यानंतर माझे नेहमी एक वाक्य असते ते माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी उचलले आहे. ते म्हणजे ही पृथ्वी शेषनागाच्या डोक्यावर नाही तर घाम गाळून कष्ट करणाऱ्या, श्रम करणाऱ्या कामगाराच्या हातामध्ये आहे. सभापती महोदय, आपल्या राज्याची एकूण लोकसंख्या 11 कोटी आहे. या राज्यातील संघटित व असंघटित कामगारांची लोकसंख्या 4 कोटी 12 लाख आहे. त्यामध्ये असंघटित कामगारांची संख्या 3 कोटी 74 लाख आहे.माझ्याकडे जनगणनेचे आकडे अजून आलेले नाहीत. म्हणजे 50 टक्के लोकसंख्या ही असंघटित असलेल्या दुर्लक्षित असलेल्या कामगारांची असून सर्वात प्रथम असंघटित कोण असेल तर हा माझा कामगार विभाग आहे. मी पहिल्यांदा या चर्चेच्या उत्तराचे दोन भाग करीत आहे. या असंघटित कामगारांकरिता हे शासन काय करणार आहे,शासन काय करीत आहे आणि शासनाने काय केले आहे हे सांगण्याचा प्रयत्न करीन. त्यानंतर ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या आहेत, प्रश्न उपस्थित केले आहेत आणि त्याबाबत शासनाकडून उत्तराची अपेक्षा व्यक्त केली आहे त्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, सातत्याने या ठिकाणी घरेलू कामगारांचा उल्लेख करण्यात आला आहे त्यांची संख्या जवळ जवळ 50 ते 60 लाखापर्यंत जाते. अशा कामगारांसाठी आपण या सभागृहामध्ये कायदा संमत केला परंतु दुर्दैवाने त्याचे बोर्ड अजूनपर्यंत स्थापन झाले नाही ही आपली व्यथा खरी आहे. मी या राज्याचा कामगार मंत्री म्हणून आपणास आश्वासन देतो की, एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

महिन्याच्या आत या घरेलू कामगारांचे मंडळ स्थापन होईल व त्या मंडळाचे काम सुरु होईल. दरम्यानच्या काळात आयुक्त कार्यालयाने त्यांच्या नोंदणीचे काम सुरु केले असून आतापर्यंत 18 हजार घरेलू कामगारांची नोंदणी झाली आहे.या घरेलू कामगारांसाठी आपल्याला काय करता येईल, त्यांना कसा दिलासा देता येईल यासाठी आपण अनेक योजना राबवीत आहोत. या वर्षी जवळ जवळ साडे सहा कोटी रुपयांची टोकन प्रोव्हिजन करण्यात आली आहे. या कामगारांची ज्यावेळी नोंदणी पूर्ण होईल त्यावेळी त्यांच्या संख्येच्या प्रमाणात जास्तीत जास्त तरतूद करुन त्याचा लाभ देण्यात येईल. यामधून घरेलू कामगारांसाठी, त्यांच्या मुलांना स्कॉलरशिप देण्यासाठी, त्यांना बाळंतपणाच्या रजेमध्ये अनुदान देता येईल.

सभापती महोदय, सहाव्या वेतन आयोगाच्या माध्यमातून राज्य सरकारी आणि केंद्र सरकारी सेवेत काम गरणाऱ्या महिला भगिनींना सहा महिन्यांची बाळंतपणाची भर पगारी रजा दिलेली आहे. आतापर्यंत या बाळंत होणाऱ्या भगिनींसाठी कोणतीही तरतूद सेवा नियमामध्ये नव्हती ती तरतूद आपण केली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्यासाठी वैद्यकीय खर्चाची तरतूद करणे, त्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या अंत्यविधीसाठी खर्च करणे आणि वयाच्या 60-62 वर्षानंतर निवृत्त होतील त्यावेळी त्यांना निवृत्तीचे लाभ देणे

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

अशा प्रकारच्या अनेक योजना आमच्या कल्याण मंडळामध्ये प्रस्तावित झालेल्या असून मला विश्वास आहे की, लवकरात लवकर ही योजना अंमलात आणू शकलो तर घरेलू कामगारांना त्याचा चांगला लाभ मिळू शकेल.

सभापती महोदय, 1996 मध्ये केंद्र शासनाने बांधकाम कामगारांसाठी दुसरा कायदा केला होता.दुर्दैवाने आपल्या राज्यामध्ये याची अंमलबजावणी झाली नाही याचा सर्व सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. परंतु याबाबत आपण फार मोठ्या प्रमाणात जोर दिला आणि यावर्षी पासून एक टक्का सेस सर्व इमारतींमधून तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग असेल, जलसंपदा विभाग असेल किंवा जे खाजगी विकासक असतील त्यांच्याकडून एक टक्का सेस वसूल करण्याबाबत योजना आखण्याचे ठरविले आहे आणि सुदैवाने या माध्यमातून 98 कोटी रुपयांचा उपकर जमा झालेला आहे.यामध्ये नाका कामगारांचा समावेश आहे.तसेच खाणीमध्ये दगड काढणारे कामगार असतील. ज्यांनी 90 दिवस काम केले असेल त्या सर्व कामगारांची आम्ही मंडळामध्ये नोंदणी करणार आहोत. या बाबतीत देखील मी सर्व सदनाला आश्वासन देईन की, एक महिन्याच्या आत बांधकाम कामगारांचे सुध्दा कल्याण मंडळ बोर्ड स्थापन करुन त्याचेही कामकाज सुरु होईल, कामगारांची नोंदणी सुरु होईल. मी मघाशी घरेलू कामगारांच्या बाबतीत ज्या योजना सांगितल्या, त्या सगळया योजना मग त्यांना पेन्शन देण्याची योजना असेल, त्याच्या मुलांना स्कॉलरशीप द्यावयाची असेल किंवा त्या माणसाला निवृत्ती वेतनाचा लाभ द्यावयाचा असेल तर त्यासाठी एक टक्का सेस गोळा केल्यामुळे फार मोठा निधी जमा होणार आहे. त्यामुळे बांधकाम कामगारांबद्दल शासनाला अतिशय चांगल्या-चांगल्या योजना निश्चितपणे करता येतील आणि या निमित्ताने एक चांगले काम करता येईल.

सभापती महोदय, शेत मजुरांचे कल्याण मंडळ करावे ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. माथाडी बोर्डाप्रमाणे ऊस तोड कामगारांचे देखील बोर्ड तयार करावे आणि त्यांनाही त्याचे फायदे द्यावेत ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच सफाई कामगारांचे देखील कल्याण मंडळ तयार करावे असा विचार आहे म्हणजे सफाई कामगार, ऊस तोड कामगार आणि शेतमजूर कामगार यांचे मंडळ करण्याच्या दृष्टीने बरेचसे काम केलेले असून,यासाठी आम्ही लवकरात लवकर मंत्रिमंडळापुढे जाऊन या तीनही मंडळाचे काम लवकर सुरु करण्याचा प्रयत्न करीत आहोत. अजूनही राज्यामध्ये बरेच लोक राहिलेले आहेत.अनेक सन्माननीय सदस्यांनी त्याचा काही प्रमाणात



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

उल्लेख केला. आपल्याकडे असंघटित कामगारांची यादी मोठया प्रमाणात आहेत आणि त्यामध्ये जवळजवळ 50-60 जणांचा समावेश आहे. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात पेपरवाले, दूधवाले आहेत, विणकर आहेत,यंत्रमाग कामगार आहेत,मच्छीमार आहेत,कचरा गोळा करणारे आहे,रिक्षा ओढणारे आहेत, वर्तमानपत्रे वाटणारे, अगरबत्ती तयार करणारे, मादक पेय बनविणारे, पशुसंवर्धन करणारे,ऑटोमोबाईल्स्वाले आहेत. तसेच बेकरीमध्ये काम करणारे, बँण्ड वाजविणारे, मणी बनविणारे, बांगड्या बनविणारे, बिडी उत्पादक आहेत, सायकल दुरुस्त करणारे आहेत, टिकलीचे उत्पादन करणारे आहेत, लोहार काम करणारे इ.असे बरेच आहेत.

श्री.विक्रम काळे (खाली बसून) : सदरहू यादी सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या सगळ्या कामगारांसाठी अम्ब्रेला कायदा करावा असे सन्माननीय सदस्य श्री.सय्यद ज़मा आणि इतरही अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले. याबाबत 2008 मध्ये केंद्र शासनाने सामाजिक सुरक्षा अधिनियमाखाली कायदा केलेला आहे. आपल्या राज्यामध्येही तसाच कायदा करुन येथे जे अनेक उद्योग आहेत, ज्याचा मी आता उल्लेख केला आहे. त्याठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना एकत्रित आणून त्यांच्या साठी देखील कल्याणाच्या योजना कशा प्रकारे सुरु करता येतील याचा सुध्दा आम्ही निश्चितपणे प्रयत्न करणार आहोत.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ......

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी बाल मजुरीच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला. बाल मजुरीची प्रथा घातक आहे. बाल मजुरी कशासाठी करतात ? त्या आई-वडिलांची आर्थिक परिस्थिती बरोबर नसते. त्यामुळे मुलांना कामावर पाठवून त्यांच्याकडून येणाऱ्या उत्पन्नातून आई-वडील घर चालविण्याचा प्रयत्न करतात. आपण त्या संदर्भात टास्क फोर्स नेमला. त्या टास्क फोर्सने 2005-2006, 2006-2007, 2007-2008, 2008-2009 मध्ये धाडी घातल्या. 2005 मध्ये आपण 30 धाडी घातल्या आणि 910 बाल कामगारांना मुक्त केले. 2006 मध्ये 222 धाडी घातल्या आणि 1225 बाल कामगारांना मुक्त केले. 2007 साली 235 धाडी घातल्या आणि 845 बाल कामगारांना मुक्त केले. 2008 मध्ये 396 धाडी घातल्या आणि 1198 बाल कामगारांना मुक्त केले. 2009 मध्ये 446 धाडी घातल्या आणि 385 बाल कामगारांना मुक्त केले. 2010 मध्ये 397 धाडी घातल्या आणि 232 बाल कामगारांना मुक्त केले. अशा प्रकारे 4791 मुलांना आपण यामधून मुक्त केले. या मुलांना मुक्त केल्यानंतर बाल सुधार गृहाकडे पाठविणे किंवा त्यांच्या एनसीएलपीच्या ज्या थोड्या शाळा आहेत त्यामध्ये पाठविण्याबाबत उल्लेख करण्यात आला. त्यामध्ये आपल्या हाताला फारसे काही लागलेले नाही. त्यांचे चांगले शिक्षण करणे महत्वाचे आहे. पुन्हा ती मुले जर आई-वडिलांकडे गेली तर आई-वडिलांची गरिबीची परिस्थिती असल्यामुळे पुन्हा ते याच गोष्टीकडे वळतील. म्हणून त्यांना निवासी शाळेत ठेऊन त्यांचे शिक्षण कसे करता येईल या दृष्टीने आपल्याला आवश्यक ते प्रयत्न करावे लागतील. तसे प्रयत्न केले तर ही बाल मजुरीची संख्या घटल्याशिवाय राहणार नाही. यामध्ये केंद्र शासन, राज्य शासन तसेच शिक्षण खात्याशी चर्चा करावी लागेल आणि या मुलांच्या शाळेसाठी आपल्याला काम करावे लागेल. या बाल मजुरीबाबत आपण सगळ्यांनी सतर्क राहण्याची आवश्यकता आहे.

सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी लहान मुलांच्या संदर्भात मंडणगड येथील रोजगार हमी योजनेच्या कामाचा उल्लेख केला. मी मंडणगड येथून माहिती घेतली. त्या ठिकाणी तशा पध्दतीची परिस्थिती नाही. सहाय्यक कामगार आयुक्त, रत्नागिरी यांनी दूरध्वनीवरुन माहिती दिली की, मंडणगड तालुक्यात रोजगार हमीच्या कोणत्याही कामावर अशी परिस्थिती नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. हसन मुश्रीफ ....

सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडल्यानंतर मला शॉक बसला आणि म्हणून मी ताबडतोबीने जिल्हाधिकाऱ्यांना या बाबतची परिस्थिती विचारली. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांच्याकडे मी ही माहिती पाठवितो. त्यांनी ती जरुर वाचावी. पण सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले तशी परिस्थिती त्या ठिकाणी नाही. परंतु हे खरे आहे की, बालमजुरी नष्ट झाली, शासनाने सगळे बालमजूर मुक्त केले, असे मी म्हणणार नाही. गरिबी असल्यामुळे बाल मजूर आहेत. या संदर्भात समाजाचे प्रबोधन करणे, त्यांच्या आई-वडिलांची परिस्थिती सुधारणे, त्यांना दारिद्र्य रेषेच्या वर आणणे हे केल्याशिवाय बाल मजुरी कमी होणार नाही, असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जमा तसेच अनेक सन्माननीय सदस्यांनी अभ्यासगट नेमावा तसेच चर्चा करावी अशी सूचना केली. मी शासनाच्या वतीने सांगेन की, अभ्यासगट वगैरे न करता याबद्दल दोन तीन बैठका घेऊन सगळे जे एनजीओ असतील, यामध्ये काम करणाऱ्या ज्या संघटना असतील या सगळ्यांना एकत्रित करुन या असंघटित कामगारांबद्दल चांगले काय करता येईल, कायद्यामध्ये काय बदल करता येतील, यासाठी शासन निश्चितपणे प्रयत्न करील. मी कामगार नेता नाही. परंतु मी कामगारांच्या घामाची किंमत करणारा कार्यकर्ता असल्यामुळे, अतिशय संवेदनशील माणूस असल्यामुळे मी याकडे अतिशय चांगल्या पध्दतीने लक्ष देईन. कामगार विभागामध्ये असंघटित कामगारांना न्याय देण्याचे काम मी प्रामाणिकपणे करीन असे अभिवचन देतो. या असंघटित कामगारांना न्याय देण्याची भूमिका आपण घेऊ.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय, अतिशय संवेदनशील आहेत या बद्दल शंका नाही. कारण आम्ही एकत्रित काम करीत आहोत. आपण एका बाबतीत आणखी संवेदनशील राहिलात तर आणखी जास्त बरे होईल. आपले अधिकारी जे सांगतात तेच खरे असे कृपा करुन आपण समजू नका. या सभागृहामध्ये मी ज्या काही गोष्टी मांडल्या त्या अतिशय जबाबदारीने मांडल्या. आपल्याला जी माहिती दिलेली आहे ती अगदी टिपीकल म्हणजे अधिकारी आपला बचाव करण्यासाठी माहिती देतात तशी माहिती दिलेली आहे. मी उद्या किंवा परवा आपल्याला त्याचे फोटोग्राफ्स देईन. ते पाहिल्यानंतर आपला विश्वास बसेल.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा पहिलाच प्रसंग असेल की, सन्माननीय सदस्य भाषण करीत असताना मी ताबडतोब चिठ्ठी लिहून जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. खरे-खोटे काय आहे ते तपासून घेऊ.

श्री. भाई जगताप : आपण तत्पर आहात त्या बद्दल माझे काही म्हणणे नाही. फक्त अधिकारी आपल्याला कशी गोलगोल माहिती सांगतात हे मी आपल्या निदर्शनास आणून दिलेले आहे. आपण अंब्रेला ॲक्टच्या बाबतीत सांगितले. हे सगळे एका क्लस्टरमध्ये आणण्याच्या दृष्टीने देशाचा जो कायदा झाला आहे त्या धर्तीवर आपण या कायद्याच्या बाबतीत सुध्दा किती लवकरात लवकर विचार करणार आहात ? कारण बाकीचे सगळे विवाद त्यामध्ये येतील.

यानंतर श्री. ओटवणेकर .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अभ्यासगट नेमणार नाही. मात्र अधिवेशन झाल्यानंतर तज्ज्ञांची एक बैठक घेण्यात येईल. अशा 3-4 बैठका झाल्यानंतर लवकरात लवकर कायदा तयार करून आणू.

श्री एस. क्यु. जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने बहुत ही अच्छा निर्णय लिया है. मेरा एक ही प्रश्न है कि इसको लागू करने के लिए मशीनरी आप तैयार करेंगे या नहीं, इस बारे में मंत्री महोदय बताएंगे तो ज्यादा अच्छा होगा.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, वर्ग-3 आणि वर्ग-4 साठी बंदी आहे. वर्ग-1 व वर्ग-2 ची पदे आपण महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरतो. आपण 50 टक्के पदे सरळसेवेने तर 50 टक्के पदे पदोन्नतीने भरतो. मी येथे असेही नमूद करतो की, हे खाते देखील पदे भरण्याबाबत उपेक्षित आहे. पोलीस, आरोग्य या विभागांना पदे भरण्यासाठी प्राथम्य दिले जाते. लेबर ऑफिसर्सची पदे लवकरात लवकर भरावीत म्हणून आमचा सातत्याने आग्रह आहे. मी सदर पदे भरण्यासंबंधी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांना स्वत: भेटलो आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची फार मोठी फौज आमच्याकडे आहे. त्यांचासुद्धा उपयोग आम्ही या असंघटित कामगारांसाठी करून घेऊ.

**तालिका सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

.......

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करणे

**मु. शी.** : समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करणे या विषयावरील तारांकित प्रश क्रमांक 9019 ला दिनांक 7 डिसेंबर 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.विक्रम काळे वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9019 ला दिनांक 7 डिसेंबर 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, समाजकार्य महाविद्यालयाचे नाव वाचल्यानंतरच आपल्या महाराष्ट्रात किती महत्त्वाचे महाविद्यालय सुरू आहे याची कल्पना येते. समाजकार्य कसे करावे यासंबंधातील अभ्यास शिकविणारे हे महाविद्यालय आहे. महाराष्ट्रात अतिशय कमी संख्येने अशी महाविद्यालये आहेत. 28 मे 2009 रोजी राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला. सहावा वेतन आयोग लागू करून दोन वर्षे झाली आहेत. असे असताना समाजकार्य महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू झालेला नाही. हा प्रश्न डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये आलेला होता. याला सुद्धा एक वर्षे उलटून गेलेले आहे. सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, आम्ही लवकरच मंत्रिमंडळापुढे जाऊन सहावा वेतन आयोग लागू करू. या विषयासंबंधी आपण आणि आम्ही सातत्याने सहावा वेतन आयोग लागू होण्यासंबंधी प्रयत्न करीत आहोत. अनेक वेळा संबंधित

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

अधिकाऱ्यांना जाऊन देखील आम्ही भेटलो. एवढेच नव्हे तर संबंधित मंत्र्यांकडे जाऊन वारंवार पाठपुरावा केला. तेव्हा कुठे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागला असे कळते. या महाविद्यालयातील प्राध्यापक आहेत त्यांना अजून पर्यंत सहावा वेतन आयोग लागू केलेला नाही, ही खेदाची बाब आहे. राज्यातील इतर सर्व कर्मचाऱ्यांना, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात काम करणाऱ्या प्राध्यापकांना, शालेय विभागात काम करणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू झाला. कृषि महाविद्यालय, इंजिनिअरिंग कॉलेज असेल, पॉलिटेक्निक कॉलेज असेल इथल्या सुद्धा प्राध्यापकांना सहावा वेतन आयोग लागू झाला. कमी संख्येने परंतु, अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना अद्याप पर्यंत सहावा वेतन आयोग दोन वर्षे झाली तरी लागू करण्यात आलेला नाही. हा शासनाच्यावतीने दुर्लक्षितपणा म्हणावा लागेल की, शासन हेतुपुरस्सर असे करीत आहे काय याचा शोध घेणे गरजेचे आहे. वारंवार मी मंत्रालयात जातो तेव्हा कळते की, फाईल वित्त विभागाकडे आहे. वित्त विभागाकडे गेल्यानंतर ते सांगतात की यात त्रुटी आहेत. कसली त्रुटी आणि कसला प्रस्ताव हे येथे अवगत झाले पाहिजे. म्हणून मी येथे अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. गेली दोन वर्षे एवढा विलंब का लागला, कुणामुळे लागला, यामध्ये दोषी कोण आहे, यात दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्या विरूद्ध काय कारवाई करणार आहात हे कळले पाहिजे. दोन वर्षे झाली तरी अजून या प्राध्यापकांना सहावा वेतन आयोग लागू झालेला नाही.

यानंतर श्री.खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

म्हणून हे अधिवेशन संपण्यापूर्वी समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना सहावा वेतन आयोग लागू केला जाईल काय, त्यासंबंधीचा शासन निर्णय ताबडतोब काढला जाईल काय असा प्रश्न मी विचारु इच्छितो.

आता शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी शासनाने जी.आर.निर्गमित केला असल्याची माहिती मिळाली आहे. परंतु त्यातही एक चूक केलेली आहे. हाच सहावा वेतन आयोग इतर विभागातील कर्मचाऱ्यांना मग कृषी विभागातील असतील, अभियांत्रिकी विभागातील असतील, शालेय शिक्षण विभागाती असतील, उच्च शिक्षण विभागातील असतील या विभागातील सर्व प्राध्यापकांना दिनांक 1.1.2006 पासून सहावा वेतन लागू केला आहे. परंतु येथे मात्र सन 2009 पासून लागू केला आहे. हा अन्याय कशासाठी, हा भेदभाव कशासाठी केला जातो ? या समाजकार्य महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना सुध्दा त्याच तारखेपासून सहावा वेतन आयोग लागू केला पाहिजे. विभाग वेगवेगळे असले तरी शासन एकच आहे. इतर विभागातील शिक्षक व कर्मचाऱ्यांना ज्या तारखेपासून सहावा वेतन आयोग व वेतनश्रेण्या लागू केल्या आहेत त्याच तारखेप्रमाणे व त्या प्रमाणेच समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासन वेतनश्रेण्या लागू करणार आहे काय ? माझी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती आहे. मंत्री महोदय अतिशय कार्यक्षम आहेत, वरिष्ठ आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून आम्हाला खूप अपेक्षा आहेत.

समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांकडून मागणी केली जाते की, वरिष्ठ महाविद्यालयातील जे प्राध्यापक आहेत त्या प्राध्यापकांना निवृत्ती वेतनाचा लाभ मिळतो. परंतु या महाविद्यालयातील प्राध्यापकांना निवृत्ती वेतनाचा लाभ मिळत नाही. तो लाभ आम्हालाही मिळावा. त्यांनी यासाठी शासनाकडे वारंवार मागणी केलेली आहे. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे बैठका झालेल्या आहेत. परंतु त्याच्यातून मार्ग निघालेला नाही. यामुळे शासनावर आर्थिक बोजा पडणार आहे असे कारण पुढे केले जाते. शिक्षणासारख्या क्षेत्राकडे शासनाचे दुर्लक्ष होणे योग्य नाही. त्यामुळे समाजकार्य महाविद्यालयातील कर्मचारी व प्राध्यापकांना हे अधिवेशन संपण्यापूर्वी सहावा वेतन आयोग लागू करुन त्यासंबंधीचा जी.आर.इश्यू केला जाईल काय, तसेच त्यांना निवृत्ती

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

वेतनाचा लाभ देण्यात येईल काय, त्यासंबंधी शासन केव्हा निर्णय घेणार आहे, त्याचप्रमाणे शिक्षक कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासंबंधी काढलेल्या जी.आर.मध्ये दुरुस्ती करुन इतर विभागातील शिक्षकांना ज्या तारखे पासून सहावा वेतन आयोग लागू केला आहे त्या तारखेपासून त्यांना दिला जाईल काय असे चार प्रश्न मी या निमित्ताने विचारतो आणि माझे भाषण संपवितो.

---------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी महत्वाच्या विषयावर अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित केली आहे. त्याबाबत मी केवळ 1-2 मुद्दे मांडणार आहे. केंद्र सरकारने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी वेतन व महागाई भत्त्यासंबंधी जो निर्णय घेतला तो राज्यामध्ये लागू करण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी घेतला आहे. त्यामुळे याबद्दल वाद नाही. केंद्रीय कर्मचाऱ्यांचा डी.ए.वाढला की राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या डी.ए.मध्ये वाढ होते. तेथे वेतन आयोग लागू झाला की, राज्यात लागू केला जातो. यासाठी राज्य सरकार फार खळखळ करीत नाही. दुर्दैवाने येथे उच्च शिक्षण विभागात जे कर्मचारी आहेत किंवा प्राध्यापक आहेत त्यांना सहावा वेतन आयोग लागू झालेला नाही. हे कर्मचारी 2009 पासून सातत्याने मागणी करीत आहेत. अशा प्रकारच्या महाविद्यालयांची संख्याच मुळात कमी असल्यामुळे प्राध्यापकांची संख्याही कमीच आहे. वास्तविक अशी महाविद्यालये राज्यात पाहिजेत, कारण त्यामुळे समाजाचा फायदा होत असतो. या प्राध्यापकांची संख्या कमी असल्यामुळे शासनावर खूप आर्थिक बोजा पडणार नाही. त्यामुळे शासनाने त्यांच्या मागणीसंबंधी तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे.

उच्च शिक्षण विभागाने त्यांच्या खात्यासंबंधी निर्णय घेतला आहे. आता अशा प्रकारची कार्यपध्दती सुरु आहे की, आदिवासी विभागातील शिक्षण संस्था असतील तर त्याबाबत त्यांच्या विभागाकडून निर्णय घेतला जातो, समाजकल्याण विभागाच्या शिक्षण संस्था असतील तर त्याबाबत त्यांच्या विभागाकडून निर्णय घेतला जातो. अल्पसंख्याक विभागाच्या शिक्षण संस्था असतील तर त्या विभागाकडून निर्णय घेतला जातो, या पध्दतीमुळे राज्यात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ 19:45

श्री. हुसेन दलवाई...

मंत्री महोदयांनी हा सहावा वेतन आयोग सामाजिक शिक्षण महाविद्यालयांना लागू केला जाईल अशा प्रकारचा निर्णय घेऊन हा प्रश्न सोडवावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस. क्यु.. जमा (विधानसभेने निवडलेले) : सभापति महोदय, मैं आपके माध्यम से शासन को कहना चाहता हूं कि महाराष्ट्र शासन ने निर्णय लिया है कि यहां पर केंद्र सरकार के छठे पे कमीशन की सिफारिशों को लागू किया जाएगा और वह यहां पर 1.1.2006 से लागू हो भी रही हैं, तो फिर कुछ विभागों में उन सिफारिशों को लागू क्यों नहीं किया जा रहा है. कुछ विभागों के साथ यह भेद भाव क्यों किया जा रहा है ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि नागपुर महानगर पालिका में दो यूनियनों को मान्यता प्राप्त है. एक तो शिक्षकों की यूनियन को मान्यता प्राप्त है और एक मजदूरों की यूनियन को मान्यता प्राप्त है. नागपुर महानगर पालिका में सन् 2010 से यह वेतन आयोग लागू तो किया गया लेकिन कहा कि वे उनको एरियर्स नहीं देंगे. मेरे हिसाब से यह भेद भाव है. एक और बात मैं यहां पर कहूंगा कि शासन की ओर से कहा गया था कि वहां के 160 कर्मचारियों को वापस काम पर लेने का निर्णय हो गया है. लेकिन उनको अभी तक काम पर नहीं लिया गया है. माननीय मंत्री महोदय इस बारे में उत्तर देंगे, ऐसी मेरी उनसे अपेक्षा है.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) :उच्च शिक्षण खात्याच्या अखत्यारीमध्ये मातृसेवा संघ समाजकार्य महाविद्यालय, नागपूर आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्था येत असून त्यांना सहावा वेतन आयोग लागू झालेला आहे. मग तशा प्रकारची समाजकार्य विद्यालये फक्त सामाजिक न्याय विभागात आहेत म्हणून त्यांना सहावा वेतन लागू होत नाही काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, आपण नेहमी असे ओरडून सांगत असतो की, आदिवासी विकास विभागाला, सामाजिक न्याय विभागाला इतका आऊटले दिलेला आहे. माझा मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, मंत्री महोदय त्यांच्या विभागाच्या आऊटलेमधून हा सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेऊ शकत नाहीत काय, त्यासाठी वित्त विभागाची सबब कशाला ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या प्रश्नाची सोडवणूक करण्यास खूप विलंब झ ाालेला आहे हीही गोष्ट खरी आहे. आपल्या राज्यामध्ये अशा प्रकारची फक्त 51 महाविद्यालये आहेत. त्यामुळे फार काही आर्थिक बोजा शासनावर पडेल अशातला भाग नाही. परंतु ही गोष्ट राहून गेलेली आहे. जानेवारी 2006पासून सहावा वेतन लागू करण्यासंबंधीचे आमचे प्रयत्न आहेत. वित्त विभागाचा याला विरोध आहे. परंतु हे अधिवेशन संपण्यापूर्वी यासंबंधातील निर्णय शक्य वाटत नाही. परंतु मे अखेरपर्यन्त सहावा वेतन आयोग लागू करण्याचे आमचे प्रयत्न राहाणार आहेत. हा विषय सामाजिक न्याय विभागाकडे कसा आला हा प्रश्न सन्माननीय सदस्यांप्रमाणे आम्हाला देखील पडलेला आहे. हे शैक्षणिक कार्य आहे. त्यामुळे हा विषय सामाजिक न्याय विभागाकडे यावयास नको होता. यामध्ये सामाजिक असा शब्दप्रयोग झाल्यामुळे हा विषय सामाजिक न्याय विभागाकडे आलेला आहे असे मला वाटते. शिक्षण हा विषय सामाजिक न्याय विभागाचा नाही. तो शिक्षण विभागाचा विषय आहे. दुसरे असे की, यामधील सर्व लोक हे अनुसूचित जातीमधील नाहीत. तसे ते असते तर ते समजण्यासारखे होते. याबाबतीत योग्य तो निर्णय घेतला जाईल. यामध्ये जी काही दिरंगाई झालेली आहे ती 31 मे पर्यन्त पूर्ण करण्याच्या दृष्टीने माझ्याकडून निश्चितच प्रयत्न केले जातील.

श्री. विक्रम काळे : मी मंत्री महोदयांना चार प्रश्न विचारले. सहावा वेतन आयोग देण्याच्या बाबतीत उशीर झालेला आहे हे त्यांनी कबूल केलेले आहे, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. दोन वर्षे उशीर झालेला आहे. हे खाते कुणाकडे असावे हा शासनाचा निर्णय आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 19:50

श्री. विक्रम काळे...

सभापती महोदय, या दोघांच्या वादामध्ये आमच्या शिक्षकावर अन्याय का ? आमच्या शिक्षकांनी का सहन करावयाचे ? सामाजिक न्याय म्हणून हा विभाग तुमच्याकडे ठेवला की अजून काही प्रिय होते म्हणून हा विभाग तुमच्याकडे ठेवला या गोष्टीशी मला काही देणे घेणे नाही. माननीय मंत्री महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहू शकता की, हा विषय उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे द्यावा. आम्ही त्या संबंधी पाठपुरावा करु. सहावा वेतन आयोग सर्वांना लागू झाला. आता माननीय मंत्री महोदय कबूल करीत आहेत की, या गोष्टीस उशीर झाला आहे. माननीय मंत्री महोदय, आपण आपले वजन वापरा. आपण वजनदार मंत्री आहात. हे अधिवेशन संपण्यास अजून दोन आठवडे आहेत. हे अधिवेशन संपण्याच्या पूर्वी या समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग 1 जानेवारी, 2006 पासून लागू करणार काय ? या समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा बाबतीत शासनाने आदेश काढला असेल व त्यात जी चूक झालेली असेल तर ती चूक दुरुस्त करुन त्यांना सुध्दा 1 जानेवारी, 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू केला पाहिजे. यासंदर्भात जी काही चूक झाली आहे, ती दुरुस्ती शासन करणार आहे काय ? या समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू करावी याबाबत वित्त विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी किती दिवसात प्रस्ताव पाठविणार ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या प्रश्नांची मी मघाशीच उत्तरे दिलेली आहेत. 31 मे, 2011 पर्यंत म्हटले आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी हा निर्णय होणे कठीण आहे असे मला वाटते. माझा असा प्रयत्न आहे की, यासंदर्भातील निर्णय मंत्रिमंडळाच्या पुढील बैठकीत झाला पाहिजे. परंतु मंत्रिमंडळासमोर अनेक विषय असतात. त्यामुळे मी मे महिन्याची वेळ सांगितली आहे. दुसरा जो इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबतची माहिती तपासून घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, वित्त विभागा शिवाय तुमच्या आऊट-ले मधून देता येते काय ? वित्त विभागाला विचारल्या शिवाय व त्यांची मान्यता घेतल्या शिवाय कोणतीही गोष्ट करता येत नाही. या राज्यात अशा बाबतीत शिस्त लावलेली आहे. ती शिस्त मोडली तर ते योग्य होणार नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : अधिवेशन संपण्यापूर्वी समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्यास काय हरकत आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : माझी तर इच्छा आहे की, हा विषय मंत्रिमंडळाच्या पुढील बैठकीत आला व त्यास मान्यता मिळाली तर मला आनंदच होईल.

**तालिका सभापती** ( श्री. रामनाथ मोते ) : माननीय मंत्री महोदयांनी समाधानकारक उत्तर दिलेले आहे.

श्री. विक्रम काळे : गेल्या तीन वर्षापासून मी या सभागृहात हा प्रश्न उपस्थित करीत आहे. अजून त्या प्रश्नास न्याय मिळत नाही.

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी किमान करतो असे म्हटले आहे.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, पुढील मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय मंजूर व्हावा असा माझा प्रयत्न आहे. एवढया लवकर प्रश्न सुटला तर त्या गोष्टीचा मला देखील आनंद होईल.

----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ प्रथम श्री.शिगम 19:50

**पृ. शी.** : सातारा जिल्ह्यातील वाईजवळील मांढरदेवी दुर्घटने नंतरही राज्यातील तीर्थक्षेत्र असुरक्षित असणे

**मु. शी.** : सातारा जिल्ह्यातील वाईजवळील मांढरदेवी दुर्घटने नंतरही राज्यातील तीर्थक्षेत्र असुरक्षित असणे या विषयावरील तारांि□त प्रश्□□मां□ 14080 ला दि□□ 21 मार्च, 2011 रोजी शास□□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यां□ उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सातारा जिल्ह्यातील वाईजवळील मांढरदेवी दुर्घटनेनंतरही राज्यातील तीर्थक्षेत्र असुरक्षित असणे या विषयावरील तारांि□त प्रश्□□मां□ 14080ला दि□□ 21 मार्च, 2011 रोजी शास□□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अ□□ती□□□म 92 अ□ये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित □रीत आहे.

सभापती महोदय, सातारा जिल्हयातील वाई जवळील मांढरदेवी दुर्धटनेसंदर्भातील चर्चा आहे. गेल्या पाच वर्षापासून या घटनेच्या संदर्भामध्ये राज्य शासनाचे लक्ष वेधले गेले आहे. ही मांढरदेवीची दुर्घटना घडल्यानंतर संपूर्ण सरकार जागे झाले. इतर सर्व समाज जागा झाला. त्या दुर्घटनेच्या वर्णनाबाबतीत मी बोलणार नाही. या दुर्घटनेत शेकडो महिला मृत्युमुखी पडल्या आणि शेकडो महिला जखमी झाल्या. देवीला अर्पण करण्यासाठी भाविकांनी साडया आणल्या होत्या, त्याच्यामध्ये महिलांचे मृतदेह तेथून नेण्यात आले. माजी न्यायमूर्ती राजन कोचर यांची समिती नेमली गेली. या समितीस आपण मुदतवाढ देखील दिली आहे. माझे तर अनेक प्रश्न आहेत. ते प्रश्न मी सभागृहात देखील उपस्थित केले होते. मांढरदेवी येथे पाण्याची व्यवस्था नव्हती, या घटनेनंतर तेथे पाण्याची टाकी बसविण्यात आली. मीही अर्धा तास चर्चा एवढयासाठी उपस्थित केली आहे की, प्रत्येक जिल्हयामध्ये अनेक प्रकारची देवस्थाने आहेत. जी डोंगरावरती देवस्थाने आहेत. सज्जनगड येथील देवी आहे, नाशिक येथील सप्तश्रृंगी देवी आहे...

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

एकवीरा देवी, लेण्याद्री आदी ज्या ज्या ठिकाणी डोंगरावर देवस्थाने आहेत तेथे राजन कोचर समितीने सुचविले आहे की, भाविकांना जाण्यासाठी एक मार्ग आणि पायऱ्यांवरुन उतरण्यासाठी दुसरा मार्ग असणे आवश्यक आहे. आज पाच वर्षे उलटून गेली. ही फक्त पोलिसांची जबाबदारी आहे असे म्हटले जाते. चेंगराचेंगरी होऊ नये हे पाहण्याची त्यांची मुख्य जबाबदारी आहे. आज काही माननीय सदस्य सभागृहात असतील, काहींच्या स्मरणात असेल, स्वत: गृह राज्यमंत्री कोल्हापूर परिसरातील आहेत, सभागृहात सरकारने आश्वासन दिले होते की, आम्ही तीर्थक्षेत्रासाठी खास मंत्री नेमू, परंतु काही घडले नाही. वेगळा विभाग करु असे सांगितले होते, ते केले नाही. आज जे प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत त्याकडे मी सरकारचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, आज जी मंदिरे डोंगरावर आहेत त्या ठिकाणी व्यवस्थित व सुरक्षितपणे पायऱ्या चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी स्वतंत्र मार्ग असले पाहिजेत. चेंगराचेंगरी झाली तर लोकांनी कुठे थांबले पाहिजे अशा ठिकाणी, आऊट-ले किंवा सुरक्षित जागी गर्दीचा लोंढा आला तर कुठे थांबविता येऊ शकतो या प्रकारची योजना आखली पाहिजे. सरकारने सांगितले होते की, आम्ही तसे परिपत्रक काढले आहे. किती गर्दी येणार हे अगोदर कळले पाहिजे. 12 तारखेला रामनवमी आहे. 14 एप्रिलला डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती आहे. नंतर हनुमान जयंती येणार आहे. प्रत्येक जिल्हयामध्ये काटेकोरपणे पोलीस यंत्रणा किती गर्दी येणार आहे याचा अंदाज घेते का? माझी अशी मागणी आहे की, प्रत्येक जिल्हयामध्ये कोणत्या यात्रा कधी आहेत याची माहिती त्या त्या ठिकाणच्या पोलीस स्टेशनला असते. जिल्हा स्तरावर त्याबाबत अजिबात समन्वय नसतो. त्या भागातील पोलीस स्टेशन आणि तेथील तुटपुंजा स्टाफ लक्षात घेता पाली येथील खंडोबा, पुणे येथील निमगाव खंडोबाच्या यात्रेच्या वेळी संपूर्ण जिल्हयाचा स्टाफ जाऊ शकत नाही. तीन-चार पोलीस अधिकारी तेथे जातात व 10-10 लाखाच्या गर्दीवर नियंत्रण करण्याचा प्रयत्न करतात. जाण्या-येण्याच्या वाटेबरोबर तेथे विजेचा पुरवठा अखंडितपणे सुरु राहिला पाहिजे. नगर जिल्हयामध्ये मोहता देवी येथे मी स्वत: भेट दिली. त्या ठिकाणी 24 तास वीज पुरवठा होईल अशा पध्दतीने केंद्र सरकारने 28 लाख रुपये मदत देऊन यंत्रणा उभी करुन दिली आहे. ज्या यंत्रणेमुळे सौर ऊर्जेवर सतत वीज पुरवठा सुरु असतो. अखंडित वीज पुरवठा झाला पाहिजे. आज सुध्दा लेण्याद्री येथे वीज पुरवठा नाही. तेथे अशा पध्दतीची सौर दिव्याची यंत्रणा बसवावी.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

अन्यथा इन्व्हर्टर किंवा जनरेटर बसवून कातरवेळेला भाविक जातात तेव्हा अखंडित वीज पुरवठा झाला पाहिजे.

सभापती महोदय, पुरातत्व विभागाबाबत सरकारने जास्त लक्ष घालणे गरजेचे आहे. बऱ्याच ठिकाणी चढण्यासाठी कठडे नाहीत. मोठमोठ्या पायऱ्या आहेत. जेजुरी येथे पाहिले तर अनेक ठिकाणी पायऱ्या चढत असताना भाविकांचा मोठा लोंढा आला तर कठीण प्रश्न निर्माण होतो. आधारासाठी कायमस्वरुपी कठडे असले पाहिजेत. रोपवे करण्यासाठी प्रत्येक ठिकाणी मागणी केली जाते. आमची अशी अपेक्षा आहे की, काही देवस्थाने गरीब आहेत, काही देवस्थानांकडे भरपूर निधी आहे. काही देवस्थानांना शक्य नसेल परंतु ज्यांना शक्य आहे तेथे रोपवेची उभारणी केली पाहिजे. शासनाने दिलेल्या उत्तरात म्हटले होते की, वेगवेगळ्या ठिकाणच्या तीर्थक्षेत्राकरिता 52 कोटी रुपये, तुळजापूरला 75 कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. देहू आळंदी, भंडारा डोंगर या ठिकाणी भाविकांना सोयीस्कर होईल यासाठी लिफ्ट, रोपवे, साधे रस्ते करण्यासाठी आपत्कालीन व्यवस्था म्हणून प्रत्येक जिल्हयामध्ये पोलीस अधीक्षक किंवा शहरामध्ये पोलीस आयुक्तांच्या अंतर्गत टास्क फोर्स तयार करावा. तो टास्क फोर्स त्या जिल्हयामध्ये किंवा त्या शहरामध्ये कोणत्या यात्रा आहेत त्या यात्रांमध्ये राजन कोचर समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी झाली किंवा नाही याची तपासणी करेल. यासाठी सरकारने पावले उचलणे गरजेचे आहे. या देवस्थानांच्या ठिकाणी जात असताना रस्त्याच्या बाजूने अपघात होतात, कठडे तुटतात, अतिक्रमणे झालेली असतात. म्हणून देवस्थानाकडे जाणा-या मार्गावरील घाटांची दुरुस्ती करणे ही गृह विभागाची जबाबदारी नसली तर वाहतूक पोलीस या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष वेधू शकतात. जिल्हाधिकाऱ्यांकडे बैठका होतात त्या बैठकीमध्ये सूचना करुन लक्ष वेधण्याची गरज आहे.

नंतर 4वाय.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ........

अनेक वेळा डोंगर कडे कोसळल्याच्या घटना घडल्या आहेत.

महोदय, अशा देवस्थानच्या ठिकाणी चेंगराचेंगरी होऊ नये म्हणून पोलीस विभागाला प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. या निमित्ताने मी मुद्दाम सांगू इच्छिते की, बऱ्याच ठिकाणी आपण पाहतो की, मंदिरांच्या सुरक्षिततेचा अथवा देवस्थानच्या सुरक्षिततेचा प्रश्न येतो तेव्हा त्या देवस्थानचा स्टाफ आणि पोलीस विभाग यांच्यामध्ये समन्वय नसतो. हे स्वाभाविक आहे की केवळ गर्दीच्या व्यवस्थापनाबाबत मी म्हणणार नाही तर ही चेंगराचेंगरी टाळण्यासाठी देवस्थानच्या अडचणी व त्यांच्या अपेक्षांचाही विचार केला पाहिजे. तसेच त्या देवस्थानकडे भाविकांची गर्दी आटोक्यात आणणे तसेच चेंगराचेंगरी कशी टाळता येईल यासाठी पोलिसांना प्रशिक्षण आवश्यक आहे. कारण पोलिसांवर भरपूर ताण असतो परंतु सामान्य कान्स्टेबलने सुध्दा लाऊड स्पीकरवर किती मोठ्याने बोलले पाहिजे याची माहिती देणे आवश्यक असते. किंवा अशा प्रकारच्या देवस्थानच्या ठिकाणी काही महिलांच्या अंगात येण्याचे प्रकार असतात त्यावेळी आरती मिरविली जाते त्यावेळी सुध्दा असे प्रकार घडण्याची शक्यता असते, हे कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिरात पाहिलेले आहे. हे करीत असताना मंदिर कर्मचारी आणि पोलीस यांचे मोठ्या प्रमाणात प्रबोधन व लोक प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. तसेच आपत्कालीन व्यवस्थापनाचे काम करणाऱ्या काही स्वयंसेवी संस्था सुध्दा चांगले काम करतात. पुण्यातील गणेशोत्सवात अशा संस्थांची चांगली मदत होते. या शिवाय अनेक ठिकाणच्या मंदिरात आवश्यक तेवढा पोलीस फोर्स असतोच असे नाही अशा वेळेला स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊन प्रत्येक जिल्ह्यातील देवस्थानाच्या ठिकाणी होणारी गर्दी नियंत्रणात आणण्याची व्यवस्था त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांनी करावी, असे मला वाटते.

महोदय, यासंदर्भात न्या. कोचर यांच्या समितीने ज्या सूचना केल्या होत्या त्यांची अंमलबजावणी शासनाने कशा प्रकारे केली त्याचा अहवाल समोर येणे आवश्यक आहे. मध्यंतरी न्या. कोचर यांचे स्टेटमेंट मी वाचले की, "एकाही आमदाराला मी दिलेल्या समितीच्या अहवालाची आठवण नाही". हे ऐकून मला खरोखरच वाईट वाटले की शासनावर विश्वास ठेवून लोक वेळ देतात आणि अशा प्रकरणांची चौकशी करतात त्यांनाही पुरेसे सहकार्य दिले जात नाही. याचे कारण लोकांमध्ये समजूत पसरली की चेंगराचेंगरी झाली यासंबंधीची साक्ष देण्यासाठी

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे........

पोलिसांसमोर गेल्यानंतर आपल्यावरच केस होईल व आपल्याला नुकसान भरपाई मिळणार नाही. तरी देखील या विधायक सूचना न्या. कोचर यांनी केल्या त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासनाची आहे. पण त्यावर देखरेख करण्याची जबाबदारी मात्र गृह विभागाची आहे. तसेच अशा देवस्थानच्या ठिकाणी अग्निशमन दल सुध्दा कसे देता येईल, आग विझविण्यासाठी बंब उपलब्ध करुन देणे अशा महत्वाच्या बाबी तालुका स्तरावर असाव्यात पण त्याची अंमलबजावणी कधीच हात नाही. म्हणून तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी काम करीत असताना टास्क फोर्स प्रत्येक शहरात असावा, त्यांच्याकडे स्वत:चे कॅलेंडर असावे. त्यावरुन कोणता सण कोणत्या तारखेला आहे हे त्यांना कळेल. तसेच पोलीस आणि समाजाचेही प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने काय कार्यवाही झाली त्याचा अहवाल सभागृहाला सादर करावा, अशा बाबींकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधते व माझे भाषण पूर्ण करते.

------

...3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्य मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित केली आहे. मांढरदेवी यात्रेत जी दुर्घटना झ ाली त्या अनुषंगाने अन्य सर्व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणचा विषय देखील सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला व काही सूचना केल्या. त्यांनी न्या. कोचर समितीचा उल्लेख केला. या समितीला दोन तीन वेळा मुदतवाढ दिली होती. सन 2007 मध्ये समितीने आपला अंतिम अहवाल शासनाला दिलेला आहे. त्यातील शिफारसी शासनाने स्वीकारल्या असून अपर मुख्य सचिव, गृह यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व त्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे धोरण शासनाने घेतले. त्याचप्रमाणे विविध विभागांकडून ॲक्शन टेकन रिपोर्ट मागवून घेण्याची कार्यवाही सुध्दा करण्यात आली. या अनुषंगाने उपाययोजना करण्याच्या संदर्भात धर्मादाय आयुक्तांना ज्या पध्दतीने सूचना देण्यात आल्या त्यानुसार परिपत्रके काढली व सर्व मंदिर देवस्थानांना कळविले आहे.

यानंतर श्री. गायकवाड ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ....

या संदर्भात जी समिती नेमण्यात आली होती तिने काढलेले निष्कर्ष वेगवेगळया विभागाशी संबंधित आहेत. तीर्थक्षेत्राचा विकास वेगवेगळया विभागाच्या माध्यमातून होत असतो. शहरी भागातील तीर्थक्षेत्राचा विकास नगर विकास विभागाच्या माध्यमातून आणि ग्रामीण भागातील तीर्थ क्षेत्राचा विकास ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून होत असतो. त्यामुळे त्या समितीने जे काही मुद्दे मांडले होते ते मुद्दे त्या त्या विभागाकडून अंमलात आणण्याच्या दृष्टीकोनातून गेल्या तीन चार वर्षापासून शासन सातत्याने प्रयत्नशील राहिलेले आहे.अनेक ठिकाणच्या तीर्थक्षेत्राच्या विकासाकरिता मास्टर प्लॅन तयार करण्यात आले आहेत. अनेक तीर्थक्षेत्रासाठी प्राधिकरण तयार करण्यात येऊन भविष्यकाळातील 100 वर्षाचा विचार करुन नियोजन करण्याचे धोरण शासनाने ठरविलेले आहे. पंढरपूर, तुळजापूर इत्यादी तीर्थक्षेत्राचा विकास करण्याचा प्रयत्न प्रामुख्याने शासन करीत आहे. त्यांनी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांची अंमलबजावणी व्हावी या दृष्टीने शासन निश्चितपणे प्रयत्नशील आहे.एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यामध्ये अनेक यात्रास्थळे आहेत. त्याचबरोबर वेगवेगळे संत, महात्मे त्या त्या भागात होऊन गेलेले आहेत त्या ठिकाणी लाखो संख्येच्या यात्रा दरवर्षी भरत असतात. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मांढरादेवीच्या यात्रेसाठी ग्राम विकास विभागातर्फे 1 कोटी 93 लाख रुपये देऊन तसेच पर्यटन विभागामार्फत काही निधी देऊन त्या ठिकाणचा विकास करण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे.केन्द्र शासनाने सुध्दा त्याकरिता काही मदत दिलेली आहे. जी प्रमुख मंदिरे आहेत त्या ठिकाणी लाखो लोक येत असतात त्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था चांगली रहावी या दृष्टीने जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असावी आणि देवस्थान कमिटीच्या सदस्यांबरोबर तिचा समन्वय असावा ,त्याचबरोबर स्थानिक लोकांबरोबर तिचा समन्वय असावा, दर महिन्याला आढावा बैठक घ्यावी अशा सूचना शासन संबंधितांना निर्गमित करील अशा प्रकारची ग्वाही मी या निमित्ताने आपल्याला देऊ इच्छितो.सभापती महोदय , आपत्कालीन व्यवस्थापन हा पोलिसांचा विषय आहे. या संदर्भातील प्रशिक्षण पोलिसांना वेगवेगळया माध्यमातून मिळालेलेच असते. परंतु सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, देवस्थानाचा जो स्टाफ आहे त्याच्याशी

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ....

समन्वय साधून आपत्कालीन व्यवस्थेमध्ये त्यांनाही सहभागी करुन घेतले तर अधिक बरे होईल. याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, अशा प्रकारचा निर्णय सुध्दा निश्चितपणे घेतला जाईल.या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने जे मुद्दे मांडलेले आहेत त्या बाबतीत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तीथक्षेत्राच्या विकासासाठी कठडे बांधणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, लाईटच्या सुविधा करणे इत्यादी कामे नगरविकास विभाग वा ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून शासन करीत आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, तीर्थक्षेत्राच्या यात्रांसाठी दिवसेंदिवस गर्दी वाढत चालली आहे. कोकणातील भराडी देवीच्या यात्रेसाठी यंदा पाच लाख लोक आले होते. या यात्रकरुंची व्यवस्था करण्यासाठी सरकारी कर्मचारी विशेषत: पोलीस कर्मचारी चार पाच दिवस तेथे होते. परंतु त्यांची झोपण्याची , राहण्याची तसेच त्या ठिकाणी शौचालयाची देखील सोय केलेली नव्हती. पाच दिवस ते अत्यंत वाईट अवस्थेत राहत होते. गृह विभाग देखील माननीय मंत्र्यांकडेच आहे. या निमित्ताने मला त्यांना असे विचारावयाचे आहे की, तीर्थक्षेत्राचा विकास करीत असतांना चार पाच दिवस जे सरकारी कर्मचारी वा पोलीस तेथे जातात त्यांना राहण्यासाठी गृह विभागातर्फे वा पर्यटन विकास विभागामार्फत एखादा वेगळा हॉल तयार करण्यात येणार आहे काय ?

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला जोडूनच मला एक प्रश्न विचारावयाचा आहे. सन्माननीय मंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. या विषयाबद्दल त्यांना चांगल्या प्रकारची आस्था आहे असे त्यांच्या उत्तरावरुन मला दिसून आले आहे. राजन कोचर समितीच्या अहवालावरील ॲक्शन टेकन रिपोर्ट सादर केला असे माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे परंतु त्याची प्रत आम्हाला मिळालेली नाही तेव्हा जुलै महिन्यातील अधिवेशनामध्ये राजन कोचर समितीच्या अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही केली यासंबंधीचा ॲक्शन टेकन रिपोर्ट उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय ? त्याचबरोबर जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचे माननीय मंत्र्यांनी मान्य केले आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. काही शहरामध्ये कार्तिक स्वामीचे मंदिर असून त्या ठिकाणी लोकांची गर्दी असते. हिंदूच्या मंदिरा बरोबरच ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सरफरे

डॉ. नीलम गोऱ्हे...

खे्ड शिवापूरला असलेल्या दर्ग्यामध्ये हजारो लोक वाहनांव्दारे जाऊन हार घालतात. माझा प्रश्न असा आहे की, शहरामध्ये पोलीस आयुक्तांच्या अखत्यारीत अशी समिती तयार करणार काय? आपण म्हटल्याप्रमाणे एटीआर सभागृहामध्ये सादर झालेला नाही, तो आम्हा विधिमंडळ सदस्यांना व जनतेला उपलब्ध करुन देणार काय?

श्री एस. क्यु. जमा : सभापति महोदय, जैसा अभी यहां पर कहा गया कि जहां-जहां पर बड़े-बड़े मेले लगते हैं, वहां पर जिला अधीक्षक या पुलिस आयुक्त की अध्यक्षता में एक कमेटी बनायी जानी चाहिए. मेरी जानकारी के अनुसार शासन का पहले से ही आदेश है क्योंकि नागपुर में दीक्षा भूमि या कोराडी माता मंदिर या राम टेक मंदिर में भी मेला लगता है और बहुत बड़ी संख्या में लोग वहां पर आते हैं. मैं बताना चाहता हूं कि पालक मंत्री की अध्यक्षता में भी वहां पर मीटिंग होती है. लेकिन हमारा कहना है कि ग्रामीण क्षेत्र के लिए आप जिला अधिकारी की अध्यक्षता में कमेटी बनायें. क्योंकि जिला अधिकारी दूसरे विभागों को काम करने के लिए आदेश दे सकता है. जबकि पुलिस अधीक्षक दूसरे विभाग के अधिकारियों को काम करने के लिए आदेश नहीं दे पायेंगे. साथ ही जहां पर महानगर पालिका है और पुलिस आयुक्त हैं, वहां पर विभागीय आयुक्त की अध्यक्षता में कमेटी बनायी जानी चाहिए. क्योंकि कलेक्टर साहब की मीटिंग में आयुक्त साहब का आना शिष्टाचार की दृष्टि से संभव नहीं हो पाएगा. इसलिए मेरा कहना यही है कि जहां पर महानगर पालिका है वहां पर विभागीय आयुक्त की अध्यक्षता में एक कमेटी होनी चाहिए ताकि वे दूसरे संबंधित विभागों को आदेश दे सकें. उदाहरण के तौर पर सड़क बनाने के लिए, पानी तथा लाइट की व्यवस्था करने के लिए वह संबंधित विभागों को आदेश दे सकते हैं और ग्रामीण क्षेत्र में जिला अधिकारी की अध्यक्षता में कमेटी बनायी जानी चाहिए, तभी यह काम सुचारु रुप से हो सकता है. पुलिस अधीक्षक सिर्फ पुलिस विभाग को ही आदेश सकते हैं, बाकी विभागों को आदेश देना उनके लिए संभव नहीं होगा.

डॉ. नीलम गोऱ्हे : ज्यावेळी आपत्ती येते त्यावेळी फक्त पोलीस व्यवस्थेसाठी असतात. त्यामुळे तुम्ही शहरातील तीर्थस्थळांच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांचा उल्लेख केला असेल तर मी समजू शकते, परंतु ग्रामीण भागामध्ये फक्त पोलिसांचाच उपयोग होतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केलेला विषय अतिशय महत्वाचा आहे. ग्रामीण भागामध्ये वर्षभर यात्रा भरत असतात. त्यामध्ये पंढरपूर, तुळजापूरच्या ठिकाणी भरणाऱ्या मोठया यात्रेचे पोलीस चांगल्या प्रकारे नियोजन करीत असतात. काही यात्रा ग्रामीण भागात भरतात उदा. साताऱ्यामध्ये धुळदेवची यात्रा भरते त्या ठिकाणी 1 लाखापेक्षा जास्त भाविक येतात. मंत्री महोदय ज्या जिल्ह्यातून आले आहेत तेथील पट्टणकोडवलीच्या भीरदेवच्या यात्रेला लाख ते दोन लाख भाविक येतात. माझ्या जिल्ह्यातील आरेवाडीला भरणाऱ्या भिरोबाच्या यात्रेला लाखाच्या वर भाविक येतात. त्या यात्रेमध्ये स्वत: यात्रेकरु नियोजन करीत असतात. ग्रामीण भागामध्ये शेतीतून चांगले उत्पन्न मिळू लागल्यामुळे लोकांकडे दोन चाकी, चार चाकी वाहने आल्यामुळे यात्रेच्या ठिकाणी वाहनांची प्रचंड गर्दी होते. त्यामुळे यात्रेला पायी जाणाऱ्या यात्रेकरुंचे अतिशय हाल होतात. ग्रामीण भागात प्यायला पाणी मिळत नसल्यामुळे जर एखादा पाण्याचा टँकर आला तर तो टँकर ज्या ठिकाणी थांबेल त्या ठिकाणापर्यंत हजारो यात्रेकरु टँकरच्या मागे पळत जातात. या बाबतीत माझी अशी विनंती आहे की, यात्रेच्या ठिकाणी दोन चाकी आणि चार चाकी वाहनांच्या पार्कींगची व्यवस्था चांगल्या प्रकारे झाली पाहिजे. ही यात्रा दोन किंवा तीन दिवसांची भरत असल्यामुळे ज्या तालुक्यामध्ये यात्रा भरते त्या तालुक्याबाहेरील पोलीस अधिकारी त्या ठिकाणी बंदोबस्तासाठी पाठविले पाहिजेत. यात्रा सुरु झालेल्या तारखेपासून ती संपेपर्यंत वरिष्ठ दर्जाचे पोलीस अधिकारी आणि त्यांच्या हाताखाली काम करणारे कर्मचारी सतत त्या ठिकाणी देखरेखीकरिता हजर असावयास पाहिजेत. जेणेकरुन यात्रेकरुंची चांगल्या प्रकारे त्या ठिकाणी सोय होऊ शकेल अशी मला आपल्याला विनंती करावयाची आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी मांडलेला मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. ग्रामीण भागामध्ये काही लाखांच्या यात्रा भरत असतात व त्या ठिकाणी काही शे-पाचशे पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी पाठविले जात असतात. अशावेळी त्या गावातील सरपंचाचे घर किंवा एखादा हॉल उपलब्ध करुन त्या ठिकाणी पोलीस कर्मचाऱ्यांची

.....3



श्री पाटील.....

तात्पुरती व्यवस्था करुन दिली जाते. तेव्हा माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेच्या बाबतीत निश्चितपणे विचार करुन नगर विकास विभाग आणि ग्राम विकास विभाग या दोन विभागाच्या माध्यमातून तीर्थ क्षेत्राच्या विकासासाठी दोन ते चार कोटींचा निधी खर्च करीत असतो. तेव्हा अशा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी पोलीस कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्था करण्याकरिता त्या निधीमधून चार ते पाच लाखाचा शौचालययुक्त हॉल बांधण्याबाबत शासनाची सकारात्मक भूमिका आहे. त्यासंबंधी या दोन्ही विभागाच्या असलेल्या जी.आर. मध्ये निश्चितपणे बदल केले जातील अशी मी याठिकाणी ग्वाही देतो.

सभापती महोदय, शहरामध्ये असलेल्या तीर्थ क्षेत्राच्या ठिकाणी पोलीस उपायुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असेल, त्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांचा एक प्रतिनिधी समाविष्ट करण्यात येईल. त्याचप्रमाणे ते तीर्थस्थळ ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये येत असेल तेथील प्रभारी पोलीस अधिकारी या सर्व प्रक्रियेमध्ये जबाबदार राहील.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील .......

ज्या-ज्या जिल्ह्यामध्ये यात्रा भरतात, त्याठिकाणी 4 ते 5 लाख लोक यात्रेसाठी येतात, तेथे सुध्दा एस.पी.लेव्हलचे अधिकारी देखील उपस्थित असतात. त्यामुळे यात्रा स्थळांचे महत्व लक्षात घेता सर्व योजनांच्या माध्यमातून जेवढया जास्त उपाययोजना करता येतील, तेवढ्या करण्याच्या बाबतीत आमचा निश्चित प्रयत्न राहील. मघाशी सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी सांगितले त्याप्रमाणे समितीने जो ॲक्शन प्लॅन सुचविलेला आहे, त्याच्या माध्यमातून वेगवेगळया मंदिराच्या संबंधी ॲक्शन प्लॅन करण्याबाबत सांगितले आहे. मघाशी मी याबाबत सांगत असताना ॲक्शन टेकन रिपोर्ट असे चुकून बोललो असेन. पण प्रत्येक मंदिराच्या बाबतीत ॲक्शन प्लॅन करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या अनुषंगाने ज्या-ज्या विभागांच्या संदर्भात मुद्दे मांडलेले आहेत, ते सर्व मुद्दे संबंधित सर्व विभागांना कळविलेले आहेत.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : अर्धा तास चर्चा संपलेली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 06 एप्रिल 2011 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10.30 ते दुपारी 12.30 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीत महाराष्ट्र विधान परिषद नियम 101 अन्वये प्रलंबित व नियमित लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी 12 वाजून 45 मिनिटांनी सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 08 वाजून 16 मिनिटांनी बुधवार, दिनांक 06-04-2011 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही